(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची एक सूचना आलेली आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सदरहू विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो हे मांडण्याची संधी संबंधित सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

अमरावती येथील आदिवासी विकास निरीक्षक यांच्यावर जनजातीय समितीच्या अहवालाप्रमाणे कारवाई करण्यासंदर्भात

(१) * ***२६५६४*** ***श्री.दिवाकर रावते , श्री.जगदीश गुप्ता*** **:** सन्माननीय ***आदिवासी विकास मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्थ असलेल्या श्री.बारई आदिवासी विकास निरीक्षक यांनी कर्मचाऱ्यांना नोकरीत कायम करण्याकरिता शासकीय कर्मचाऱ्यांकडून पैसे घेतल्याचे जनजातीय समितीच्या अहवालात म्हटले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.बारई आदिवासी विकास निरीक्षक यांच्यावर अप्पर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती यांनी कोणतीही कारवाई न करता त्यांना आदिवासी विकास शाखेचे कक्ष तसेच न्युक्लिअस बजेट योजनासारख्या अतिसंवेदनशील योजनांची कामे करण्याकरिता लिपिक म्हणून त्यांच्याकडे अपर आयुक्त कार्यालयात त्यांना प्रतिनियुक्तीवर घेतले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जनजातीय समितीच्या अहवालानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : (१) अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दिनांक २८ ते ३० एप्रिल, २०१० च्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये, श्री.बारई नावाचे कर्मचारी आश्रमशाळेच्या दर वर्षीच्य मान्यतेसाठी रु. १०,०००/- घेतात अशी तक्रार त्या भागातील सन्माननीय सदस्यांनी केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने श्री.बारई यांच्याकडून आश्रमशाळांचे कामकाज काढून घेण्यात आले व दिनांक ३० मे, २०११ च्या आदेशान्वये त्यांची एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी येथे बदली करण्यात आली.

दरम्यान अपर आयुक्तालयात मोठ्या प्रमाणात काम असल्याने श्री.बारई यांना न्युक्लिअस बजेटचे काम पाहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सदर कामही श्री.बारई यांच्याकडून काढून घेण्यात आले आहे.

(३) व (४) अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या इतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या तक्रारीची चौकशी करण्यात येत आहे, चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न येतो. हा प्रश्न मी या वेळेला मुद्दाम उपस्थित केलेला आहे. कारण त्या प्रश्नाशी माझा काही संबंध नसतो. आदिवासींच्या संदर्भातील गंभीर विषय असल्यामुळे नेहमी त्या संदर्भातील प्रश्नावर 20 ते 25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिनिटे चर्चा होते परंतु निर्णय येत नाही. गेल्या वेळी अशाच प्रकारे 35 मिनिटे विषय चालला असताना काय प्रश्न आहे म्हणून मी उत्सुकतेने कागद हातामध्ये घेतला तेव्हा असे लक्षात आले की, भ्रष्टाचारासंबंधीचा प्रश्न आहे म्हणून मी ऊठून उभा राहिलो आणि प्रश्न विचारला. त्याचा पाठपुरावा मला माहीत नव्हता त्यामुळे जी काही माहिती होती त्याच्या आधारावर मी प्रश्न विचारला. माननीय मंत्री महोदयांनी कारवाई करु असे सांगितले. आपल्याला माहीत आहे की, कामकाज सल्लागार समितीमध्ये माननीय श्री. अजितदादा पवार यांना आठवण केल्यानंतर कारवाई केली पण ज्यांच्यावर कारवाई व्हावयास पाहिजे होती त्यांच्यावर कारवाई न होता दुसऱ्यावरच कारवाई झाली. त्यामध्ये काय असेल ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. या प्रश्नामधील श्री. बारई नावाचे जे सद्गृहस्थ आहेत ते 10 हजार रुपये घेतात हे शासनाने उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. उत्तरात शासनाने मान्य केल्यानंतर त्यांच्या बाबतीत चौकशी चालू आहे असे जे सांगितले आहे ते कितपत योग्य आहे ? शासनाची खंबीरता यामध्ये दिसणार की नाही ? अधिकारी पैसे घेतो हे शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर आपण त्या संदर्भात नुसती चौकशी करतो असे सांगण्यापेक्षा तातडीने त्याला घरी बसविणार की नाही ? त्यांची नुसती बदली केली म्हणजे झाले का ? म्हणजे इथे गुन्हा केला आता तिथे गुन्हा करतो. त्यांची केवळ बदली केली. आदिवासींचे प्रशासन अशा पध्दतीने चालविणार का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भामध्ये जी मागणी केलेली आहे त्या बाबत मी सांगू इच्छितो की, विधानसभेची समिती त्या ठिकाणी गेल्यानंतर समितीच्या सदस्यांकडे काही लोकांनी तक्रार केली. तक्रार केल्यानंतर त्या वेळच्या उपायुक्तांनी चौकशी केली. समोरासमोर चौकशी केली. त्यामध्ये श्री. सावे आणि श्री. बारई या दोघांची नावे घेतली. चौकशी केल्यानंतर त्यांनी प्रत्यक्षात तशा प्रकारचे पुरावे पाहिलेले आहेत. त्यांची ताबडतोब बदली केली. बदली केल्यानंतर त्या संदर्भात त्यांची जी चौकशी करावयास पाहिजे होती ती चौकशी त्याप्रमाणात झाली नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, त्यांना बडतर्फ करुन आजच चौकशीचे आदेश देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी पहिला जो विषय सांगितला तो वेगळा आहे. त्या संदर्भात विधान परिषदेमध्ये जनरेटर खरेदीच्या संदर्भात चर्चा झाली. त्या संदर्भात चौकशी झाली. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26564.... श्री. बबनराव पाचपुते ...

ठिकाणी चर्चा झाल्यानंतर आपण समिती नेमली होती त्या समितीने अहवाल तयार केला. त्या अहवालामध्ये प्रथमदर्शनी दोष दाखविलेला आहे. त्या पध्दतीने परत त्याची छाननी केलेली आहे. श्री. वरवणकर हे वन विभागाचे अधिकारी असल्यामुळे वन खात्याला लिहिले आहे की, त्यांच्या संदर्भात ताबडतोब आम्हाला कारवाई करावयाची आहे त्याला परवानगी द्यावी. वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून तशा प्रकारची परवानगी मिळाल्यानंतर ताबडतोब कारवाई करण्यात येईल. त्या दरम्यान प्रकल्प अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वन विभागाच्या अधिकाऱ्यांना कारवाई करण्यासाठी विचारले आहे असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले. वन विभागाचे आदरणीय मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. माननीय मंत्री महोदयांनी आपली सक्षमता सिध्द करावी.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ते आयएफएस अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावर डायरेक्ट कारवाई करता येत नाही. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने वन विभागाला लिहिले आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सदर अधिकारी प्रतिनियुक्तीवर आदिवासी विकास विभागाकडे आहेत. त्यांनी त्यासंबंधी कारवाई करण्यासंबंधीचा प्रस्ताव आमच्याकडे पाठवावा. आम्ही कारवाई करु.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26564...

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांचे नाव मंत्री महोदयांनी घेतले आहे त्यांच्या संदर्भात विधानपरिषदेत 11 वेळा चर्चा झालेली आहे. आयुक्त, ॲण्टीकरप्शन ब्युरो यांनी 1 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा अहवाल दिलेला आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांना अटक करण्यासाठी त्यांनी परवानगी मागितलेली आहे. परंतु त्यांना अटक करण्याची परवानगी मिळत नाही. हे अधिकारी भ्रष्टाचारी आहेत. त्यामुळे त्यांना त्या पदावर का ठेवले गेले आहे, ज्या ठिकाणी आर्थिक उलाढाल होत नाही अशा ठिकाणी त्यांची तातडीने बदली करण्यात येईल काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आजचा प्रश्न आणि सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मागील अधिवेशनामध्ये हा प्रश्न विचारलेला होता. मी या विषयी नियम 93 च्या सूचनेचे निवेदनही वितरित केले होते. परंतु नियम 93 च्या सूचनेचे निवेदन ज्यांनी पुकारावयाचे होते ते सन्माननीय सदस्य सभागृहात गैरहजर होते. ते का गैरहजर राहिले होते, त्याचे कारण मला माहिती नाही. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता आणि स्वत: बापूसाहेब सुध्दा गैरहजर राहिले होते. हे दोघेही गैरहजर राहिल्यामुळे नियम 93 च्या सूचनेच्या निवेदनावर चर्चा होऊ शकली नाही. त्यावेळी प्रश्नोत्तरे झाली असती तर हा प्रश्न संपला असता. शासन या प्रश्नावर चर्चा करण्यास तयार आहे, परंतु सन्माननीय सदस्य गैरहजर राहतात त्याला शासन काय करणार ?

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्री महोदय माझ्यावर हेत्वारोप करीत आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांना मी सांगू इच्छितो की, मी तुम्हाला पूरक प्रश्न विचारण्यास संधी देईन. कृपया आपण खाली बसावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात एक निवेदन माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे आले होते. ते निवेदन माझ्याकडे आल्यानंतर मी त्यावर तातडीने कारवाई केलेली आहे. त्यामुळे शासनाचा कोणालाही पाठीशी घालण्याचा हेतू नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26564....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती या कार्यालयात श्री.बारई यांची किती काळ सेवा झालेली आहे ? दुसरी एक गंभीर बाब अशी आहे की, अनुसूचित जमाती कल्याण समितीला त्यांनी अवमानकारक वागणूक दिलेली आहे. काही दिवसांपूर्वी आपल्या सभागृहाची एक समिती जसलोक रुग्णालयाला भेट देण्यासाठी गेली होती. त्यावेळी रुग्णालयाचे सीईओ श्री.मसंद यांनी समितीला अपमानास्पद वागणूक दिली होती. त्यामुळे सभागृहाने त्यांना शिक्षा केली होती. शासकीय अधिकारी जर अशा प्रकारचे समितीबाबत वागत असतील तर समितीला काही अर्थ राहणार नाही. म्हणून श्री.बारई यांनी पैसे घेतल्याच्या कारणासाठी आणि त्यांनी समितीला अपमानास्पद वागणूक दिली व काही उद्गार काढले आहेत त्यासंबंधी शासनाने खास चौकशी करावी अशी माझी मागणी आहे, शासन त्याप्रमाणे चौकशी करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. त्या ठिकाणी समिती गेली असता आमच्याकडून पैसे घेतले जातात अशी काही लोकांनी तक्रार केली. त्यावेळी एटीसी हजर होते. तक्रारीच्या वेळी लोकांनी सावरकर यांचे नाव घेतले होते. सावरकरबरोबर श्री.बारई यांचेही नाव घेतले होते. श्री.बारई त्या कार्यालयात 4 वर्षांपासून कामावर आहेत. आदिवासी विकास विभागामध्ये कर्मचारी कमी आहेत. लोकांनी श्री.बारई यांचे डायरेक्ट नाव घेतले नव्हते, पण श्री.सावरकर यांचे नाव घेतले होते. त्यांनी समितीला अपमानकारक वागणूक दिलेली नाही. समितीमध्ये सदस्यांनी तोंडी चर्चा केल्यानंतर श्री.सावरकर यांची बदली करण्यात आली आणि श्री.बारई यांची त्या जागेवरुन धारणीला बदली केली होती. अशा प्रकारची शासनाने कारवाई केलेली आहे. पण या कारवाईने माझे समाधान झालेले नसल्यामुळे यासंबंधी पूर्ण चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्यावर हेत्वारोप केला असल्यामुळे मला आपण बोलण्याची संधी द्यावी.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26564....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आता मंत्री महोदय असे बोलून गेले की, आदिवासी विकास विभागामध्ये कर्मचारी कमी आहेत. आदिवासी भागाचा व तेथील लोकांचा विकास होत नाही. स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाल्यावरही आदिवासी लोकांचा विकास झालेला नाही. म्हणून शासन आदिवासींचा विकास करण्यासाठी संपूर्ण कर्मचाऱ्यांची भरती किती दिवसात करणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आदिवासी विकास विभागाबाबत सहानुभूती दाखविली आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या विभागात कर्मचारी कमी आहेत हे खरे आहे. त्यामुळे या विभागात कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी परवानगी मिळालेली आहे. भरतीची रितसर प्रक्रिया सुरु केलेली आहे. एवढेच नव्हे तर जात पडताळणी विभागातील 87 रिक्त पदे भरण्यासाठी परवाच परवानगी मिळालेली आहे. त्यांची भरती ठराविक कालावधीत होईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा विषय राहणार नाही. येत्या 2-3 महिन्यामध्ये ही भरती केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : उत्तराच्या भाग (3) व (4)मध्ये असे नमूद केलेले आहे की, अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या इतिवृतात नमूद करण्यात आलेल्या तक्रारीची चौकशी करण्यात येत आहे, चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. हा चौकशी अहवाल मागवून किती दिवसात कारवाई करण्यात येईल ?

श्री. बबनराव पाचपुते : एक महिन्याच्या आत कारवाई करण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : 1 महिन्याच्या आत कारवाई करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. अशा प्रकारच्या कारवाईची आश्वासने 11 वेळा देण्यात आलेली आहेत. असे असताना या अधिका-यावर कारवाई का केली जात नाही ? कारवाई न करण्यामध्ये सरकारचा उद्देश काय आहे ? आयुक्त, आदिवासी विकास यांनी 68 लाख रु.चा भ्रष्टाचार झाल्याचा अहवाल दिलेला आहे. ॲण्टी करप्शन विभागाने चौकशी केल्यानंतर 1 कोटी रु.चा भ्रष्टाचार झाल्याचा अहवाल शासनाकडे पाठविलेला असून त्या अधिका-याला अटक करण्याची परवानगी देखील शासनाकडे मागितलेली आहे. सदस्यांकडे वेगळया पध्दतीने बोट दाखविण्या पेक्षा आधी मंत्री महोदय भ्रष्ट अधिका-यावर कारवाई करतील काय ?

श्री. बबनराव पाचपुते : मघाशी मी या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. मागील अधिवेशनामध्ये शेवटच्या दिवशी नियम 97 अन्वयेच्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये हजर राहिले नाहीत असे मी सांगितले.

श्री. जगदीश गुप्ता : शासनाने कारवाईच्या संदर्भात सभागृहाला 11 वेळा आश्वासन दिलेले आहे..

सभापती : हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी वारंवार प्रश्न विचारलेले असून या प्रकरणी संबंधित अधिका-यावर कारवाई होणे हे सभागृहाच्या दृष्टीने आवश्यक आहे. या अनुषंगाने माझी विनंती आहे की, विधिमंडळाच्या ज्या समित्या दौ-यावर जातात त्यामध्ये विधानसभा आणि विधानपरिषदेचे सदस्य असतात. या समित्यांची प्रतिष्ठा कशी वाढेल या दृष्टीने देखील आपण काळजी घेणे जरुरीचे आहे आणि आपणा सर्वांचे ते काम आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मंत्री महोदयांनी संबंधिताला बडतर्फ करतो असे सांगितले. माननीय वन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी देखील "अहवाल द्या मी कारवाई करतो" असे सांगितलेले आहे. मला वाटते हा प्रकार फार गंभीर आहे. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी स्वत: लक्ष घालून ॲण्टी करप्शन विभागाने दिलेला अहवाल आणि अटक करण्याची मागितलेली परवानगी या दृष्टीने योग्य त्या पध्दतीने निर्णय घ्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे असे आपण सांगितले. सन 2009-10मध्ये रु.4.5 कोटी, सन 2010-11मध्ये रु. 7.5 कोटी आणि सन 2011-12मध्ये रु.22.5 कोटी इतके पैसे आदिवासी विभागाला दिलेले आहेत. मंत्री महोदय सांगतात की आदिवासी विभागाकडे कर्मचारी नाहीत. वन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले की "माझ्याकडे अहवाल पाठवा मी कारवाई करतो". या सर्व गोष्टी असताना या प्रकरणी कारवाई करण्याऐवजी मंत्री महोदय असे सांगतात की, मागील अधिवेशनामध्ये नियम 97च्या चर्चेच्या वेळी हा प्रश्न उपस्थित करणारे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये हजर राहिले नाहीत. आयुक्त, आदिवासी विकास यांनी भ्रष्टाचार झाल्याचे मान्य केलेले आहे, ॲण्टी करप्शन विभागाने संबंधिताला अटक करण्याची परवानगी मागितलेली आहे. असे असताना सरकारने सुमोटो कारवाई करण्याऐवजी मंत्री महोदय सांगतात की, सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये हजर नव्हते. असे सांगून माननीय मंत्री महोदयांनी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचा अवमान केलेला आहे. हे योग्य नाही. याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यवतमाळ जिल्ह्यात सन २००१ ते २०११ पर्यंत २२१३ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

(२) * ***२६४४१ श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती अलका देसाई , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्री.माणिकराव ठाकरे , डॉ.सुधीर तांबे*** **: तारांकित प्रश्न क्रमांक २१७०१ ला दिनांक १७ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय ***महसूल मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सन २००१ ते २०११ पर्यंत २२१३ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येपैकी प्रलंबित असलेल्या ३४ प्रकरणापैंकी १० प्रकरणांची सुरु असलेली चौकशी पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, सदर १० प्रकरणांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१) होय.

(२) चौकशीसाठी प्रलंबित असलेल्या १० प्रकरणांची चौकशी करण्यात आली असून त्यापैकी ८ प्रकरणे निकषात बसत असल्याने पात्र ठरविण्यात आली असून त्यांना मदत देण्यात आली आहे. उर्वरित दोन प्रकरणे निकषात बसत नसल्याने अपात्र ठरली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26441.....

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, विदर्भ में किसानों की आत्महत्या के बारे में बहुत गंभीर प्रश्न है. किसानों की आत्महत्या के बारे में निर्णय लेने के लिए शासन की जो यंत्रणा है, जो मशीनरी है, वह गंभीर नहीं है. किसानों की आत्महत्या के आंकड़े जमा करने के सिस्टम में और उनको मुआवजा देने के सिस्टम में बहुत सारी त्रुटियां हैं. इस वजह से आत्महत्या करने वाले किसानों के परिवार को बेनीफिट नहीं मिलता है. मैं आपके माध्यम से मंत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ कि विधान परिषद के माननीय सदस्यों ने पिछले अधिवेशन में तारांकित प्रश्न क्रमांक 22701 के माध्यम से यही प्रश्न पूछा था और इस प्रश्न के उत्तर में माननीय मंत्री श्री. पतंगराव कदम ने यवतमाल जिले के आत्महत्या करने वाले किसानों की जो संख्या बताई थी और आज जो उत्तर माननीय कृषि मंत्री की ओर से दिया गया है, उस में यवतमाल जिले में आत्महत्या करने वाले किसानों की जो संख्या बताई गई है, उसमें तफावत है. मेरा पहला प्रश्न यह है कि यवतमाल जिले में आत्महत्या करने वाले किसानों की कौन सी संख्या अधिकृत मानी जाए ? किसानों की आत्महत्या तय करने के लिए शासन ने 2007 में एक ग्राम स्तर पर और दूसरी जिला स्तर पर, इस प्रकार से 2 समितियां बनाई हैं. मेरा दूसरा प्रश्न यह है कि इन समितियों में उस क्षेत्र के विधान सभा और विधान परिषद के सदस्यों का समावेश क्यों नहीं है ? क्या शासन इन समितियों में आमदारों का समावेश करेगा ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 21701, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य हे उपप्रश्न विचारताना तारांकित प्रश्न क्रमांक 22701 चा उल्लेख करीत आहेत. त्या प्रश्नाची सध्या माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. आजच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात जी आकडेवारी दिलेली आहे, ती जिल्हाधिकारी स्तरावरुन प्राप्त झालेली आहे. ती आकडेवारी उत्तरामध्ये नमूद करण्यात आली आहे. शासनाने अतिशय लेटेस्ट माहिती उत्तरामध्ये नमूद केलेली आहे. यासंदर्भातील जी समिती आहे, त्या समितीमध्ये विधानसभा सदस्य आणि विधान परिषद सदस्यांचा समावेश करण्यात येईल काय असाही उपप्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. मी त्याबाबतीत सांगू इच्छितो की, या समितीमध्ये सन्माननीय सदस्यांना घेण्याबाबत

. . . D 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26441..... (. . . .श्री. प्रकाश सोळंके)

निश्चितपणे विचार करु, परंतु सध्या जी यंत्रणा कार्यरत आहे, त्या यंत्रणेच्या माध्यमातून निर्णय घेण्यास वेळ लागतो आहे. या समितीमध्ये विधानसभा सदस्य अथवा विधानपरिषद सदस्यांचा समावेश केला तर त्यामध्ये अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे. तरी सुध्दा या समितीमध्ये विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांचा समावेश करण्याबाबतची बाब निश्चितपणे तपासून पाहू.

श्री. सय्यद पाशा पटेल : यवतमाळ जिल्हयात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी केंद्र सरकारने 3750 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. राज्य शासनाने 1075 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. तरी तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत त्याचे कारण शासनाला कळले आहे काय ? असल्यास, त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासन काय प्रयत्न करीत आहे ? आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यासाठी राज्य व केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात निधी प्राप्त झाला होता, त्यात कृषी अधिकाऱ्यांनी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांना शासन निलंबित करणार आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयासाठी आर्थिक मदत देण्याच्या योजनेचे पैसे अधिकाऱ्यांनी गिळंकृत केले आहेत.

यानंतर श्री.भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रमाणित नाही

जवळजवळ 300 ते 400 अधिकाऱ्यांची नावे पुढे आली होती. त्यापैकी किती अधिकाऱ्यांना निलंबित केले, आणखी किती अधिकाऱ्यांना निलंबित केले जाणार आहे? उर्वरित अधिकाऱ्यांबाबत पुरावे नष्ट झाल्याने त्यांचे निर्दोषत्व सिध्द झाले आहे काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात अनेक समित्या गठित केल्या गेल्या. त्या समित्यांचे अहवाल शासनास प्राप्त झाले असून या आत्महत्यांबाबत नापिकी, कर्जबाजारीपणा, गृहकलह, व्यसनाधीनता अशा अनेक कारणमिमांसा पुढे आलेल्या आहेत. या प्रश्नाचा खूप विस्ताराने अभ्यास झालेला आहे. शेवटची डॉ.नरेंद्र जाधव समिती नेमण्यात आली होती, त्या समितीने या प्रश्नाबाबत अभ्यास करुन जो अहवाल शासनास सादर केला तो अहवाल स्वीकारण्यात आला असून त्या अहवालातील शिफारशींबाबत कार्यवाही सुरु आहे. पॅकेजच्या संदर्भात जो एकंदरीत अहवाल आला त्या पध्दतीने कार्यवाही सुरु आहे. त्या संदर्भात स्वतंत्र प्रश्न विचारावा लागेल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश वेगळा आहे. प्रश्नाची व्याप्ती मोठी असली तरी प्रश्न स्पेसिफिक आहे. शासनाने उत्तरात दिलेली 2213 ही आत्महत्यांची आकडेवारी योग्य आहे काय? यापेक्षा अधिक आत्महत्या झालेल्या आहेत अशी आमची माहिती आहे. हे खरे नसेल तर आम्हाला शासनाचे आभार मानले पाहिजेत. 34 प्रकरणांपैकी 10 प्रकरणांची छाननी झाली आणि त्यातील 8 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरित दोन प्रकरणे कोणत्या निकषात बसत नाहीत? 2213 ही आकडेवारी योग्य आहे की त्या आकडेवारीमध्ये तफावत आहे?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी यापूर्वी उल्लेख केला होता की, मूळ तारांकित प्रश्न 27701 हा दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी उपस्थित करण्यात आला होता आणि त्या प्रश्नाच्या अनुषंगाने आज तारांकित प्रश्न क्रमांक 26441 उपस्थित झालेला आहे. मूळ प्रश्नाच्या उत्तरातील आकडेवारी आणि आजच्या उत्तरातील आकडेवारी यामध्ये कोणतीही तफावत नाही. 10 प्रकरणांपैकी 8 प्रकरणे पात्र ठरली असून 2 प्रकरणे अपात्र ठरली आहेत. याचे कारण म्हणजे राजू अत्राम, रा.करंजी, ता.केळापूर व श्रीमती शोभा दफडे, रा.तारखेडा, ता.नेर यांच्याकडे थकीत कर्ज आढळून आले नाही. म्हणून या दोघांची प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26441.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 2213 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे शासनाने सभागृहाच्या पटलावर मान्य केलेले आहे. त्यामुळे या संदर्भात मंत्री महोदयांविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करण्याचा आमचा हक्क अबाधित राहणार आहे. माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी उत्तरात दिलेली 2213 ही आकडेवारी योग्य आहे की अयोग्य आहे असा प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री महोदयांनी ही आकडेवारी योग्य असल्याचे म्हटले आहे. जर ही आकडेवारी सत्य असेल तर हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याचा हक्क राखून ठेवून मी प्रश्न विचारु इच्छितो की, दोन शेतकऱ्यांची प्रकरणे अपात्र ठरली, कारण त्यांच्याकडे बँकेचे कर्ज थकीत नव्हते. 10 वर्षापासून अवैध सावकारांनी दिलेली कर्जे बेकायदेशीर ठरवायची, ती गृहित धरायची नाहीत या संदर्भातील शासन निर्णय अडवून ठेवला आहे. अशा सावकारी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची शासनाने कर्जमुक्ती केली नाही हे खरे आहे काय? 48 कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे संकेत माननीय कृषी मंत्री यांनी मागील वर्षी तिसऱ्या अधिवेशनात सदनात दिले होते.

नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे सभागृहात सांगितले होते त्याबाबत शासनाने काय केले, तसेच याच प्रश्नावर सभागृहात तत्कालीन माननीय कृषी मंत्री व महसूल मंत्री यांना उत्तर देताना थांबावे लागले होते. तेव्हा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करुन सभागृहात सांगितले होते की, विदर्भातील शेतकऱ्यांना पॅकेजच्या माध्यमातून ज्या गायी देण्यात आल्या होत्या त्या कोण्या माजी आमदार किंवा खासदार यांनी घेतल्या असतील तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यात येईल. अशा तिन्ही बाबींच्या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, प्रश्नामध्ये जी आकडेवारी विचारलेली आहे ती सन 2001 पासून 2011 पर्यंतची आहे. ही माहिती जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे आलेली असते. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारलेला आहे तो या प्रश्नाशी निगडित नसून त्यासाठी स्वतंत्रपणे प्रश्न विचारावा लागेल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देण्याऐवजी जी पळवाट शोधली ते योग्य नाही. त्यांना पळवाट शोधता येणार नाही. कारण मी जो प्रश्न विचारलेला आहे तो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांशी निगडित असाच असल्याने त्यासाठी वेगळा प्रश्न विचारावा किंवा पळवाट शोधणे हे अयोग्य आहे. मी विचारले की, ज्या 48 कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे शासनातर्फे सदनात सांगण्यात आले होते त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे, तसे न करता सभागृहात मोठ्या मनाने सांगण्यात येते की, या प्रकरणातील दोन शेतकऱ्यांवर कर्ज नसल्याने त्यांना मदत मिळू शकत नाही. पण माझी माहिती अशी आहे की, या शेतकऱ्यांवर खाजगी सावकाराचे कर्ज आहे, बेकायदेशीर स्वरुपाचे कर्ज असेल तर शासनानेच त्यासंदर्भात कर्जमुक्तीचे आदेश काढले होते. ते आदेश संबंधित शेतकरी किंवा तेथील अधिकाऱ्यांपर्यंत पोहचले नाहीत काय, अशा प्रकारे शेतकरी खाजगी व बेकायदेशीर कर्जाच्या जाळ्यात सापडल्यानंतर मुक्त होत नाही हा विषय सुध्दा याच प्रश्नाच्या संदर्भातील आहे, त्याचे उत्तर मंत्री महोदयांना द्यावे लागणार आहे. यासंदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या प्रश्नाची व्याप्ती इतकी मोठी आहे की, त्यामध्ये अनेक विभागांचा संबंध येतो. त्यासाठी केवळ ठराविक विषयापुरता मर्यादित तारांकित प्रश्न विचारुन भागणार नाही तर स्वतंत्रपणे चर्चा होऊ शकते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26441.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, तसे असेल तर हा प्रश्न राखून ठेवावा व चर्चा मंजूर करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, या प्रकरणाशी अनेक विभागांचा संबंध आहे. त्यात सिंचन, उर्जा, सहकार असे अनेक विभाग निगडित आहेत. त्यामुळे या प्रश्नाशी निगडित बाबींवर मी उत्तर देतो व अन्य जास्तीची माहिती हवी असेल तर त्यासाठी स्वतंत्र चर्चा घ्यावी लागेल.

सभापती : जो प्रश्न विचारलेला आहे त्या अनुषंगानेच आपण उत्तर द्यावे. अन्य प्रश्न असतील तर त्यासाठी वेगळ्या पध्दतीने विचार करता येईल. या विषयासाठी स्वतंत्रपणे 40 मिनिटांची चर्चा सभागृहात उपस्थित करण्यास मी मान्यता देतो. विदर्भ तसेच अन्य ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या संदर्भातील हा प्रश्न असल्याने माणुसकीच्या दृष्टीने या चर्चेला मी अनुमती देतो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य सरकारने रेडीरेकनर मध्ये केलेली मोठी दरवाढ सर्वसामान्यांवर अन्यायकारक असल्याबाबत

(3) * 25214 श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य सरकारने 1 जानेवारी,2012 पासून केलेली रेडीरेकनर मधील मोठी दरवाढ अन्यायकारक आहे असा आक्षेप मा.उच्च न्यायालयातील वकील व रजिस्ट्रेशन फी ॲड स्टॅप डयुटी पेपर्स असोसिएशनचे अध्यक्ष यांनी दिनांक 09 जानेवारी, 2012 व त्या सुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रेडीरेकनर मध्ये झालेल्या दरवाढीचा फटका राज्यातील सर्वसामान्यांना घर घेताना बसणार आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने काही ठोस उपाययोजना केली आहे काय असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(4) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) होय.

(2) नाही.

(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई जगताप : महोदय, या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे त्यालाच माझी हरकत आहे. कारण "रेडिरेकनर मध्ये झालेल्या दरवाढीचा फटका राज्यातील सर्वसामान्य माणसाला घर घेताना बसणार आहे, हे खरे आहे काय," या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर "नाही" असे दिलेले आहे. परंतु जेव्हा रेडिरेकनरच्या दरात वाढ होते तेव्हा त्या प्रमाणात स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन फी मध्ये देखील वाढ होतच असते, त्यामुळे "नाही" असे उत्तर दिले ते योग्य नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25214.....

श्री. भाई जगताप..

सभापती महोदय, हा विषय कोर्टाच्या लक्षात आलेला आहे. परंतु...

सभापती : सन्माननीय सदस्य मंत्री महोदयांना विचारु शकता की, आपण दिलेल्या उत्तरामध्ये आपल्याला दुरुस्ती करावयाची आहे काय ? त्यांनी "होय" म्हटले तर मंत्री महोदय दुरुस्ती करतील व नाही म्हटले तर तुम्ही म्हटल्या प्रमाणे प्रश्न येणार नाही.

श्री. भाई जगताप : मंत्री महोदयांना उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सदर उत्तरामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, एका बाजूने रेडीरेकनरचे रेट 10-20 टक्के, उर्वरित महाराष्ट्रात 10-30 टक्के व सिंधुदुर्ग रत्नागिरीसाठी 100 टक्के झालेले असतांना ग्राहकांना फटका बसणार नाही असे मंत्री महोदय कसे काय म्हणू शकतात ? सिंधुदुर्ग-रत्नागिरीमध्ये रेडीरेकनरचे रेट 100 टक्के आहेत असे मी म्हणतो परंतु भाई तर ते 400 टक्के झालेले आहेत असे म्हणत आहेत. तसेच रेडीरेकनर कशाच्या आधारावर वाढविले जाते ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे वार्षिक मुल्य दर तक्ते मुंबई मुद्रांक शुल्क नियम, 1995 अन्वये तयार केले जातात. वार्षिक तक्ते तयार करतांना प्रामुख्याने त्या वर्षात नोंदवली गेलेली खरेदी-विक्री व्यवहाराचे सरासरी दर, संबंधित मूल्य विभागाचे गुणदोष, बाजारातील कर इत्यादी बाबी विचारात घेतलें जातात. सदर मूल्य दर तक्ते 1 जानेवारी म्हणजे वर्षाच्या सुरुवातीला प्रसिध्द केले जातात. साधारणपणे सदर 3 मुख्य तत्वे विचारात घेऊन तक्ते तयार करण्याचे काम केले जात असते.

सभापती महोदय, मला सभागृहाला अजून एक माहिती द्यावयाची आहे की, सदनिकेचे बाजार मूल्य 2.5 लाखापर्यंत असेल तर त्यासाठी मुद्रांक शुल्क फक्त 100 रुपये आकारले जाते. सदनिकेचे बाजारमूल्य 2.5 लाख किंवा 5 लाखापेक्षा कमी असेल तर 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारले जाते. 5 लाखापर्यंत सदनिकेचे मूल्य असेल तर 7,600 रुपये मुद्राकं शुल्क आकारले जाते. 5 लाखापेक्षा सदनिकेचे बाजार मूल्य जास्त असेल तर 7,600 + 5 लाखापेक्षा अधिक बाजारमूल्याच्या 5 टक्के मुद्रांक शुल्क आकारले जात असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात देण्यात आलेली महिती पूर्णपणे चुकीची आहे. कुडाळमध्ये सदनिकेचा दर पूर्वी 10,400 होता तो 22,000 रुपये झाला असून यामध्ये 122.54 टक्के वाढ झालेली आहे. सावंतवाडीमध्ये सदनिकेचा दर पूवी 10,200 होता तो 20,000 रुपये झाला असून यामध्ये 96 टक्के वाढ झालेली आहे. कणकवलीमध्ये सदनिकेचे दर पूवी 13,000 होता तो 22,000 रुपये झाला असून यामध्ये 69 टक्के वाढ झालेली आहे. मालवणमध्ये सदनिकेचा दर पूवी 9,800 होता तो 30,000 रुपये झाला असून यामध्ये 206 टक्के वाढ झालेली आहे. कणकवलीमध्ये जागेचा दर 70,000 होता तो 3.90 लक्ष रुपये झाला असून यामध्ये जवळ जवळ 400 पट वाढ झालेली आहे. कुडाळमध्ये 640 रुपये दर होता तो आता 22,000 रुपये झाला असून यामध्ये 243 टक्के वाढ झालेली आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र किंवा अन्य भागात रेडीरेकनरच्या दरामध्ये जास्तीत जास्त 10 टक्के वाढ असायची परंतु आता एकाच वर्षामध्ये 100 टक्क्यापासून 400 टक्क्यापर्यंत वाढ झालेली आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयाची रेडीरेकनरची वाढ थांबून त्या ठिकाणच्या रहिवाश्यांना दिलासा दिला जाणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 1990 सालापासून 1 जानेवारी रोजी रेडरेकनर वाढविला जात असतो. यासाठी स्वतंत्रपणे एस्टॅब्लिशमेंट असून सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यासंदर्भात काम करीत असतात.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीकारी नोंदी

श्री.बाळासाहेब थोरात...

त्यांच्या माध्यमातून खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात याचा अभ्यास केला जातो. खरेदी विक्री खतांसह तेथे होणारा विकास यांचा विचार केला जातो. भूसंपादनाच्या निवाड्यांचा विचार केला जातो. बांधकाम व्यावसायिकांशी चर्चा केली जाते. त्यांच्या प्रदर्शनामध्ये भाग घेतला जातो. महसूल कार्यालयातील अधिकारी देखील यामध्ये सहभागी होतात. तसेच लोकप्रतिनिधींशी देखील डिसेंबर मध्ये बैठक घेण्यात येते. त्यामुळे एक जानेवारी रोजी दर वाढ होत असते. या सगळ्यांचा अभ्यास करून रेडीरेकनर वाढविले जातात. हा राज्याचा महसूलाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. सिंधुदुर्गमध्ये रेडीरेकनरच्या दरामध्ये वाढ झाली आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. रेडीरेकनर तयार करताना विभाग केले जातात. 20 टक्के पेक्षा जास्त वाढ 59 विभागांमध्ये झाली आहे, 20 ते 50 टक्के वाढ 19 विभागांमध्ये झाली आहे, 50 ते 100 टक्के वाढ 28 विभागांमध्ये झाली आणि 100 टक्केपक्षा जास्त वाढ 12 विभागांमध्ये झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शेजारी गोवा हे राज्य आहे. तसेच कोकणाला समुद्र किनारपट्टी लाभली असल्यामुळे या सर्वांचा परिणाम जमीन खरेदीवर झालेला आहे. आज येथे मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदी होत आहे. जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, तहसीलदार, जिल्हा उप निबंधक यांची समिती नेमून त्यांना त्यांचा अहवाल देण्यास सांगितले. त्या समितीने जो अहवाल दिला त्यानुसार आपण सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये रेडीरेकनरमध्ये वाढ केलेली आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, पूर्वी कणकवली शहरामध्ये 2 टक्के स्टॅम्प ड्युटी फ्लॅटवर आकारली जात होती. ती आता 6 टक्के आकारण्यात येणार आहे. तेव्हा याचा शासन फेरविचार करणार आहे काय ? सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मोठमोठे उद्योजक आपले पैसे व्हाईट करण्याकरिता चढ्या दराने जमिनी घेत आहेत. सदर जमिनी कर्ज घेऊन खरेदी करीत आहेत. काही माजी मंत्री, माजी आमदार, परप्रांतीय 100 एकर जमिनी घेत आहेत. त्यामुळे आज येथील दर वाढलेला आहे. याची फेर चौकशी करण्यात यावी. शेतकऱ्याने केलेल्या व्यवहाराची शहानिशा करून त्यांना दिलासा देण्याकरिता आणि नवीन जमिनी खरेदी करण्याकरिता हा जो वाढविलेला दर आहे तो कमी करणार आहात काय, त्याची फेर चौकशी करणार आहात काय ? ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सर्व विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत आहे हे सन्माननीय सदस्यांनी कबूल केले आहे. अनेक लोक येत आहेत. खरेदी-विक्रीवर जो खर्च केला जातो त्याचा परिणाम रेडीरेकनरवर होत असतो. त्यामुळे वेगळा विचार करता येणार नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, बांधकाम व्यवसायिकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून दर वाढ ठरवितो. रेडीरेकनरचा दर वाढविला तरी जो ग्राहक आहे, जो घर विकत घेत आहे, त्याच्यावरच हा सर्व भार टाकला जातो. तेव्हा शासन या ग्राहकाचा कधी तरी विचार करणार आहे काय, त्याला कधी तरी विश्वासात घेणार आहे काय ?

दरवर्षी रेडीरेकनरचा रेट वाढत असेल तर शेवटी हा बोजा कोणावर पडतो आहे ? आज सर्वसामान्य माणसाला घरासह कुठलेही व्यवहार करणे अशक्य होत चालले आहे. तेव्हा सर्वसामान्य माणसाला आपण कधी विश्वासात घेणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, रेडीरेकनर नुसार स्टॅम्प डयुटी भरावी लागते. सदर स्टॅम्प डयुटी ही एकूण किंमतीवर भरावी लागते. दहा लाखाचा फ्लॅट बारा लाखाचा झाला तर फार फार तर 10 ते 20 हजार रूपये वाढतात. यातूनच राज्य शासनाला महसूल मिळतो म्हणून हे आवश्यक आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25214 . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एका बाजूला बाकीच्या जिल्ह्यांमध्ये रेडीरेकनर मध्ये 10 ते 30 टक्के अशी नाममात्र वाढ होत असताना विशिष्ट भागामध्ये म्हणजे रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागामध्ये ही वाढ 100 ते 125 टक्क्याच्या वर जात आहे. मला असे वाटले होते की, या बाबतीत समितीने काही अभ्यास केला असेल. जर तसा अभ्यास केला असेल तर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितले त्याप्रमाणे विशिष्ट भागामध्ये म्हणजे उदाहरण द्यावयाचे तर चिपी येथे विमानतळ होत आहे, त्यामुळे तेथे भाव वाढलेले आहेत असे काही भाग असतील. परंतु मी ही गोष्ट दाखवू शकतो की, अनेक ठिकाणी रेडीरेकनर पेक्षा कमी किंमतीने खरेदी-विक्री होत आहे. पण संबंधितांना मात्र रेडीरेकनर प्रमाणे पैसे भरावे लागतात. त्यामुळे या निर्णयाचा शासन फेर विचार करणार आहे काय ? त्याचप्रमाणे असे करीत असताना तेथील स्थानिक शेतकरी, तेथील लोकप्रतिनिधी यांचे मत विचारात घेऊन फेर विचाराच्या बाबतीत आपण निर्णय घेणार आहात काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी सिंधुदुर्ग बाबत चर्चा सुरु आहे. या बाबतीत मी विभागनिहाय वाढ किती झाली आहे ते सांगितले. त्यामुळे सगळयाच विभागामध्ये एकदम 100 टक्के वाढ झाली आहे अशातला भाग नाही तर काही ठिकाणी 20 टक्के वाढ झाली आहे, काही ठिकाणी 60 टक्के वाढ झालेली आहे तर काही ठिकाणी 21 ते 50 टक्क्यापर्यंत वाढ झालेली आहे आणि फक्त 12 विभाग असे आहेत की, ज्याठिकाणी जास्त वाढ झालेली आहे. ज्यावेळेस अशा प्रकारची तक्रार करण्यात येते तेव्हा त्याबाबत आपण अपील करु शकतो आणि त्या मध्ये अभिनिर्णय करुन आपण त्या पध्दतीने केले तर संबंधित अधिकारी येऊन तपासतात आणि योग्य तो निर्णय देतात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, याबाबतीत अडीच लाखाची मर्यादा असून 100 रुपये नाममात्र आहे. परंतु अडीच लाखाची मर्यादा दहा लाखापर्यंत करण्याचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबत शासन निश्चित विचार करील.

. . . .आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तासगांव (जि.सांगली) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या मान्य करण्याबाबत

(4) *25066 श्री.भगवान साळुंखे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो पुंडलिक गाणार, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तासगांव (जि.सांगली) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिनांक 3, 4 व 5 जानेवारी 2012 रोजी वा त्यासुमारास अर्धपोटी ठेवण्यात आले असून मागील वर्षभर विद्यार्थ्यांना अपुरे व निकृष्ट जेवण पुरवठा केला जात आहे या शिवाय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य, पुस्तके वेळेत उपलब्ध व्हावीत व भोजनाचा दर्जा सुधारावा या प्रमुख मागण्यांसाठी वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषण केले असल्याचे माहे जानेवारी 2012 च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर उपाशी पोटी विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : (1) व (2) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(अ) प्रभारी अधीक्षक यांच्याकडे असलेला वसतीगृह अधीक्षकांचा कार्यभार त्यांच्याकडून काढून घेऊन दुसऱ्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

(ब) श्री.बी.के.डांगे, सफाईगार यांना दिनांक 8.1.2012 पासून निलंबित करण्यात आले आहे.

(क) स्वयंपाकी, स्वयंपाकी मदतनीस यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्यात आलेली आहे.

(ड) धान्य पुरवठा ठेकेदारास रू.10,000/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(इ) दिनांक 26.1.2012 पासून नवीन शासकीय इमारतीमध्ये वसतीगृहाचे स्थलांतर करण्यात आले आहे तसेच वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सुधारित आदेशानुसार आहार पुरविण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, तासगाव (जि.सांगली) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर आंदोलन केले होते. त्यामुळे दिनांक 3, 4 व 5 जानेवारी 2012 रोजी तेथील विद्यार्थ्यांना उपाशी ठेवण्यात आले. त्याठिकाणी 7-7 विद्यार्थ्यांना एकाच ताटामध्ये जेवावयास लागत आहे. तसेच त्याठिकाणी एकाच खोलीमध्ये 10-10, 12-12 विद्यार्थ्यांना कोंबण्यात आलेले आहे अशी तक्रार देण्यात आली. या विद्यार्थ्यांना जेवढ्या शासकीय सवलती मिळावयास पाहिजेत, त्या विद्यार्थ्यांना दिल्या जात नाहीत असे त्यांनी आपल्या निवेदनामध्ये म्हटलेले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, एकंदर 75 विद्यार्थ्यांच्या वसतीगृहामध्ये फक्त 60 विद्यार्थ्यांची भरती केली असून 15 विद्यार्थी बोगस आहेत. अशा प्रकारे याबाबतीत तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, एका दुय्यम दर्जाच्या प्रभारी अधीक्षकांकडील चार्ज काढून तो दुसऱ्या व्यक्तीकडे देण्यात आलेला आहे.पण संबंधित अधीक्षकांवर कोणती कारवाई केली याबाबत उत्तरामध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे याबाबत माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत संबंधितांची सखोल चौकशी करुन कारवाई केली जाणार आहे काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच विद्यार्थ्यांनी जी मागणी केलेली आहे, त्यानुसार त्यांनी ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्या सगळयांची एकत्रितपणे चौकशी करुन संबंधितांवर कडक कारवाई करुन तेथील विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांसमोर जे उपोषण करण्यात आले होते. त्यामध्ये जे-जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्याबाबत आपण कारवाई केलेलीच आहे. त्यात स्वयंपाकी, सुप्रिटेंन्डन्ट, सफाई कामगार इ.आहेत. तसेच त्यांची दुसरी अशी मागणी होती. दिनांक 26-7-2011 रोजी शासनाने वसतीगृहासाठी एक नवीन निर्णय घेतला होता. त्यांचे असे म्हणणे होते की, आम्हाला वाढीव निर्वाहभत्ता मिळालेला नाही किंवा बाकीच्या सवलती दिल्या नाहीत. पण मला येथे सांगण्यास अतिशय आनंद वाटतो की, पूर्वी मुलांना 50 रुपये निर्वाह भत्ता दिला जात होता, तो आता 500 रुपये करण्यात आला आहे आणि मुलींसाठी 50 रुपये निर्वाह भत्ता दिला जात होता, तो आता 600 रुपये करण्यात आला आहे. तसेच विभागीय स्तरावर 225 रुपये देत होतो, त्याऐवजी आता मुलांसाठी दर महिना 800 रुपये आणि मुलींसाठी 900 रुपये देण्यात आलेले आहेत. दुसरी महत्वाची गोष्ट सांगावयाची आहे की, यामध्ये जो विलंब झाला त्याचे कारण असे की, याबाबतीत डिसेंबरमध्ये पूरक मागणी मान्य झाली असल्याने आता त्यांना निर्वाह भत्ता सुध्दा देण्यात आलेला आहे. त्यानंतर दोन दिवसांनी संबंधितांनी उपोषण सोडलेले आहे.तसेच दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तेथे साफसफाई करण्यात आली नव्हती कारण ती जुनी इमारत होती. मात्र आता आपण 26 जानेवारीला नवीन इमारतीमध्ये सर्व मुलांना शिफ्ट+ केलेले आहे. कारण याअगोदर तेथे विजेच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाला होता, परंतु तो आता सुटलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या वसतीगृहामध्ये 15 मुले बोगस आहेत. परंतु अजूनपर्यंत याबाबत काही तक्रार आलेली नाही. याबाबत जर तक्रार आली तर त्याची चौकशी करु.

असंशोधित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25066....

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उपोषणास बसावे लागले. जर ते उपोषणाला बसले नसते तर त्यांना न्याय मिळाला नसता. जिल्हा समाजकल्याण अधिकारी वसतिगृहांची तपासणी करुन त्या प्रमाणे शेरेबुकात शेरे नमूद करतात. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी या वसतिगृहाची तपासणी केली काय, असल्यास त्यांना कोणत्या त्रुटी आढळून आल्या, त्यांना त्रुटी आढळून आल्या तर त्यांनी कारवाई का केली नाही ? सफाई कामगार, स्वयंपाकी आणि स्वयंपाकी मदतनीस यांच्यावर कारवाई करण्यात आली असे उत्तरात नमूद केलेले आहे. परंतु ज्या अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी आहे त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सदरहू वसतिगृहाची इमारत जुनी होती आणि त्या इमारतीची साफसफाई बरोबर होत नव्हती. ठेकेदाराने अपेक्षेप्रमाणे धान्य पुरवठा केला नाही असे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. अधिकाऱ्यांनी नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात वसतिगृहास भेट दिली होती. जानेवारी महिन्यात या बाबी उपस्थित झाल्या. नवीन निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता द्यायचा आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, "यज्ञाला बळी बोकडाचा" या म्हणी प्रमाणे येथे सफाई कामगार यांना निलंबित केले तर स्वयंपाकी आणि स्वयंपाकी मदतनीस यांची एक वार्षिक वेतनवाढ कायम स्वरुपी रोखण्यात आली. अपुरे व निकृष्ट दर्जाचे जेवण पुरविले जाते अशी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची तक्रार होती. याचा अर्थ ठेकेदार अपुरे व निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवत होता हे स्पष्ट होते.असे असताना त्याच्यावर फक्त 10 हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे धान्य पुरविले म्हणून त्याचा ठेका रद्द करुन तो दुसऱ्या ठेकेदारास द्यावयास पाहिजे होता. कारण आपण त्यांना ठरवून दिलेल्या धान्याच्या रेट प्रमाणे पैसे देतो. त्याच प्रमाणे प्रभारी अधीक्षक यांनी विद्यार्थ्यांना पुस्तके व साहित्यांचे वाटप केले नाही, असे असतानाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली ? त्यांच्याकडून फक्त अधीक्षकाचा कार्यभार काढून घेण्यात आलेला आहे. दुसरे म्हणजे अधीक्षक जे धान्य काढून देतो ते स्वयंपाकी शिजवतो. स्वयंपाकी स्वत:च्या घरुन धान्य आणत नाही. ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे धान्य पुरविले म्हणून त्याच्यावर फक्त दंडात्मक कारवाई करुन चालणार नाही तर शासन त्याचा ठेका रद्द करणार काय ? त्याचप्रमाणे अधीक्षकांवर देखील कारवाई करणार काय ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25066....

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या प्रकरणी जरुर चौकशी करण्यात येईल. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, पूर्वी आपण विद्यार्थ्यांना अमुक इतके ग्रॅम तेल दिले पाहिजे अमुक इतक्या ग्रॅमची रोटी दिली पाहिजे अशी पध्दत होती. परंतु आता आपण विद्यार्थ्यांना पोटभर जेवण देण्याचा जी.आर.काढलेला आहे. सुरुवातीला आपण विभागीय पातळीवर, जिल्हापातळीवर हा निर्णय घेतला होता. परंतु आता आपण तालुका पातळीवर देखील हा निर्णय घेतलेला आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या प्रकरणी चौकशी करण्यात येईल जर कोणी दोषी असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे असे म्हणणे आहे की, जे खालचे कर्मचारी आहेत त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. परंतु वसतिगृहाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई न करता त्यांच्याकडून फक्त कार्यभार काढून घेण्यात आलेला आहे, हे बरोबर नाही. तेव्हा मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला आणखी सुधारित उत्तर देतील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अधीक्षकांवर कारवाई करण्यात येईल.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्याच्या दुर्गम भागात शिकणा-या शासकीय आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना स्वेटर्सचे वाटप करण्यात आले नसल्याबाबत

(5) * 25123 डॉ.दीपक सावंत : तारांकित प्रश्न क्र.15163 ला दिनांक 31 मार्च,2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना उलन स्वेटर देण्याच्या निर्णयानुसार निवड केलेल्या ठेकेदारांकडून सर्वच विद्यार्थ्यांना वुलन स्वेटर देण्यात आली आहेत काय,

(2) सर्व विद्यार्थ्यांना वुलन स्वेटर देण्यात आली नसल्यास, किती विद्यार्थ्यांना स्वेटर देणे शिल्लक आहे व यासंदर्भात कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(3) सदर योजनेसाठी आतापर्यंत किती रक्कम खर्च झाली आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : (1), (2) व (3) शासकीय आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वुलन स्वेटर देण्यात आलेली असून त्यावर रू. 6,95,02,750/- इतकी रक्कम खर्च झाली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्यामुळे या प्रश्नासाठी थोडासा वेळ वाढवून द्यावा अशी मी पहिल्यांदाच विनंती करतो. या सभागृहामध्ये आम्ही सातत्याने हा प्रश्न उपस्थित करीत असतो. ब्लँकेट खरेदी घोटाळा असेल, चादर-बेडशीट घोटाळा असेल, लाईफबॉय साबण खरेदीचा घोटाळा असेल हे सर्व घोटाळे या सभागृहात मांडण्यात आले पण आजपर्यंत एकाही घोटाळयाचा निर्णय झालेला नाही आणि कोणावरही कारवाई झालेली नाही तसेच ठेकेदार आपले नातेवाईक आहेत त्यांची नावे देखील कळली नाहीत. सभापती महोदय, हाच प्रश्न दिनांक 20 मार्च, 2011 ला विचारण्यात आला होता. या विषयासंबंधी मी दिनांक 02-06-2011 रोजी माननीय सचिवांना पत्र लिहिले होते पण त्या पत्राचे उत्तर आलेले नाही. सभापती महोदय, माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, आपण या विषयाच्या संदर्भात मलस विशेषाधिकार भंगाची सूचना देण्याची परवानगी द्यावी. माझा पहिला प्रश्न असा आहे की, मागच्या वेळी असे सांगण्यात आले होते की, पुरवठादाराकडून 75 टक्के लोकांना स्वेटर्स दिले गेले आहेत. पण ते स्वेटर्स त्यांच्या मापाचे नव्हते. या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये सर्व विद्यार्थ्यांना वुलन स्वेटर देण्यात आलेले आहेत असे म्हटले आहे. हे स्वेटर्स नेमके कोणत्या महिन्यात आणि कोणत्या वर्षाचे देण्यात आले आहेत कारण प्रत्येक वर्षातून एकदा स्वेटर्स देण्यात येतात. या स्वेटर्सचा पुरवठादार कोण होता असा प्रश्न मी विचारला होता पण त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले नाही. तिसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, जर यामध्ये गैरव्यवहार झाला असेल तर शासन याची चौकशी करुन संबंधितावर कारवाई करणार आहे का? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, साधारणत: हे सर्व विद्यार्थी दोन लाखापेक्षा जास्त आहेत. त्यांना तीन वर्षातून एकदा स्वेटर्स देण्यात यावेत अशा प्रकारचा जी.आर.सन 2001 साली काढण्यात आलेला आहे. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना दर तीन वर्षातून एकदा स्वेटर्स देण्यात येतात. यावेळी स्वेटर्स देण्याची प्रक्रिया सुरु होत असताना रेट कॉन्ट्रॅक्ट आहे काय अशा प्रकारची विचारणा ऊर्जा व उद्योग विभागाकडे करण्यात आली होती त्यावेळी अशा प्रकारची रेट कॉन्ट्रॅक्ट नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे पुन्हा ....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, याच प्रश्नाला गेल्यावेळी वर्षातून एकदा वुलन स्वेटर्स देय आहेत असे उत्तर देण्यात आलेले आहे आणि आता तीन वर्षातून एकदा वुलन स्वेटर्स देय आहेत असे सांगण्यात येत आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी आता याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बाकीच्या साहित्याच्या बाबतीत बरोबर आहे. प्रत्येक वर्षी कपडे दिले जातात परंतु स्वेटर्स देण्याच्या बाबतीत स्वतंत्र जी.आर.काढण्यात आलेला आहे. कपडे दर वर्षी देण्यात यावेत अशा प्रकारचा जी.आर.आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कपडयाच्या बाबतीत जे सांगितलेले आहे ते बरोबर आहे. स्वेटर्स तीन वर्षातून एकदा देण्यात येतात.

सभापती : शासनाने काढलेल्या जी.आर.मध्ये स्वेटर्स प्रत्येक वर्षी देण्यात यावेत असे म्हटले असेल तर ते मंत्री महोदयांनी तपासावे आणि त्यामध्ये दुरुस्ती करावी.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, त्या संदर्भातील जी.आर. मध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या संदर्भातील सर्व माहिती माझ्याजवळ आहे. दिनांक 27-12 रोजी स्वेटर्स देण्याचे फायनल करण्यात आले आणि त्याच दिवसापासून स्वेटर्स देण्यास सुरुवात झालेली आहे. मार्च, 2011 पर्यंत स्वेटर्सचा पूर्ण पुरवठा करण्यात आलेला आहे. इयत्ता पहिली ते दुसरी, तिसरी ते चौथी, पाचवी ते सहावी, सातवी ते आठवी, नववी ते दहावी, अकरावी ते बारावी अशा प्रकारे वेगवेगळया इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळया साईजचे स्वेटर्स पुरवठा करण्याबाबत कळविण्यात आले होते त्याप्रमाणे त्या साईजचे स्वेटर्स मिळालेले आहेत आणि स्वेटर्सचा पुरवठा पूर्ण झालेला आहे. यासाठी समिती क्रमांक -2 नियुक्त करण्यात आलेली आहे. यामध्ये आयुक्त, चार एटीसी

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते. . .

आणि दोन उपायुक्त असतात. ही सर्व खरेदी ई-टेंडरिंगप्रमाणे करण्यात आलेली आहे. एकूण पाच लोकांचे टेंडर आले होते. त्या पाचही लोकांनी अटी व शर्ती पूर्ण केल्या होत्या परंतु त्यातल्या त्यात कमी दराचे टेंडर मे.विराज डेकोरेट, मुंबई यांचे असल्याने त्यांना ही ऑर्डर देण्यात आलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्याकडे पेपर्स पाठविलेले आहेत त्यामध्ये वर्षातून एकदा स्वेटर्स देय आहेत असे म्हटलेले आहे. तीन वर्षातून एकदा स्वेटर्स देय आहेत असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. सभापती महोदय, माझा पुढचा प्रश्न असा आहे की, या सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षी स्वेटर्स मिळत नाहीत. दीड वर्षाने एकदा स्वेटर्स मिळतात आणि ते देखील मे महिन्याच्या आसपास मिळतात म्हणजे हिवाळा संपल्यानंतर ते मिळतात अशी माझी माहिती आहे. तेव्हा या सर्व प्रकाराची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात येईल काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी या ठिकाणी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे. स्वेटर्स पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी रेट कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे स्वेटर्स पुरविण्याची पध्दत होती. त्यामुळे प्रथम ऊर्जा आणि उद्योग विभागाकडे विचारणा करण्यात आली पण रेट कॉन्ट्रॅक्ट नसल्यामुळे आम्ही ही स्वेटर्स पुरवू शकत नाही अशा प्रकारचे पत्र त्यांनी पाठविलेले आहे. त्यामुळे ई-टेंडरिंगसाठी विभागाने स्वतंत्र जी.आर. काढला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25123.... श्री. बबनराव पाचपुते ....

इ-टेंडरींग केल्यानंतर त्या पध्दतीने खरेदी केलेली आहे. त्यामुळे यामध्ये कोठेही अडचण नाही. डिसेंबर ते मार्चपर्यंत पूर्ण पुरवठा केलेला आहे. या संदर्भात उशीरही झालेला नाही आणि कोणाचीही तक्रार नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वेगळ्या प्रकारे काही झालेले नाही. त्यामध्ये आपली तयारी असेल तर माझी चौकशीची तयारी आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/ D/

मराठवाडा विभागातील आठ जिल्हयातील १२० गौंड व राजगौंड जमातीची बोगस प्रमाणपत्रे काही व्यक्तींनी मिळविल्याबाबत

(६) * २५७४६ *श्री.विनायकराव मेटे , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , ॲड. उषा दराडे* : सन्माननीय ***आदिवासी विकास मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील आठ जिल्हयातील १२० गौंड व राजगौंड जमातीची बोगस प्रमाणपत्रे काही व्यक्तींनी मिळविल्याचे माहितीच्या अधिकारात मागविलेल्या माहितीद्वारे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोगस जमातीची प्रमाणपत्रे मिळविणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते: (१) सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ व त्याअंतर्गत नियमामधील तरतूदीनुसार जातीचे प्रमाणपत्र हे जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राधिकृत केलेल्या "सक्षम प्राधिकारी" यांचेकडून दिले जाते. तसेच श्री.राम शंकरराव पाटोळे यांच्याकडून गोंड, राजगोंड व महादेव कोळी जमातीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद या समितीकडून त्यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे.

(२), (३), व (४) श्री.व.सु.पाटील, तत्कालीन सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांच्याबाबत प्राप्त झालेल्या गंभीर यांना तक्रारीच्या अनुषंगाने श्री. पाटील यांना दिनांक ०९ मार्च, २०१२ च्या शासन आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या कार्यकालावधीमध्ये निर्गमित करण्यात आलेल्या वैधता प्रमाणापत्रांची प्रशासकीय तपासणी करण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मराठवाडा विभागातील जात पडताळणी समिती अक्षरश: भ्रष्टाचाराचे कुरण झालेली आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, तेथील सह आयुक्त श्री. व.सु.पाटील होते त्यांना पाच सहा दिवसापूर्वी म्हणजे 9 मार्च, 2012 ला निलंबित केलेले आहे. परंतु त्या अगोदर इतकी वर्षे हे होत आहे. एकटे सह आयुक्त त्या मराठवाडा विभागातील समितीमध्ये बसणारे होते म्हणून त्यांनाच निलंबित कले. त्या ठिकाणी संपूर्ण मराठवाड्यामध्ये गौंड आणि राजगौंड यांना जी बोगस प्रमाणपत्रे दिलेली आहेत ती खालच्या अधिकाऱ्यांनी जे अहवाल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिले त्यावरुन दिलेली आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी असे असत्य अहवाल दिलेले आहेत त्यामध्ये तेथील अगोदरचे डीवायएसपी श्री. कुंटेवार आहेत, पी.आय.श्री. संजय कुंजलवार आहेत, श्री. मुंजा मुळे आहेत, श्री. व्यंकट आहेत तसेच श्री. भालेराव आहेत. त्यांनी असे अहवाल दिल्यामुळे अशी असत्य प्रमाणपत्रे दिली. त्यामुळे शासनाने श्री.व.सु.पाटील यांना निलंबित केले. ज्यांनी हे खरोखर केलेले आहे त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार, त्यांना निलंबित का केले नाही ? ज्यांनी बोगस प्रमाणपत्रे घेतलेली आहेत त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. यामध्ये अडचणी झालेल्या आहेत. माहितीच्या अधिकाराखाली चौकशी झाली. या ज्या समित्या आहेत त्या स्वायत्त आहेत. त्यांना नेमण्याचा आपल्याला अधिकार आहे. त्यांची काम करण्याची पध्दत आखून दिलेली आहे. चर्चा झाल्यानंतर आपण एकच नव्हे तर तीन सह आयुक्तांना आणि एका उप संचालकांना निलंबित केलेले आहे. या संदर्भात जे एकूण प्रकरण आलेले आहे त्या प्रकरणाची सगळी चौकशी होऊन दोन समाजाला जास्त प्रमाणपत्रे दिलेली आहेत या बाबत चर्चा झाली आणि सगळी चर्चा झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्याही झालेल्या आहेत. जात पडताळणीच्या संदर्भात तेथे कर्मचारी कमी आहेत. या संदर्भात एकूण 87 कर्मचारी भरण्यास परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे की, या संदर्भात त्या ठिकाणी पोलीस जे रिपोर्ट देतात त्या सगळ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत आणि आपण त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत गृह खात्याला कळविले आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, औरंगाबाद विभागाच्या जात पडताळणी कार्यालयाच्या अनेक तक्रारी आहेत. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, श्री.व.सु.पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. 9 मार्च, 2012 रोजी म्हणजे एलएक्यू लागल्यानंतर ही कारवाई झाली. जात पडताळणीसाठी प्रमाणपत्र मिळावे यासाठी जो अर्ज दाखल केलेला असतो तो अर्ज दाखल केल्यानंतर किती दिवसात जात पडताळणी प्रमाणपत्र द्यावयाचे याबाबत त्या ठिकाणी कोणतीही नियमावली तयार नाही. त्या ठिकाणी दोन-दोन, तीन-तीन वर्षे अर्ज प्रलंबित राहतात. यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25746 ..... श्री. विक्रम काळे.....

सुधारणा करुन जात प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केल्यानंतर ते किती दिवसात मिळणार तसेच त्याची वर्गवारी करुन पहिल्यांदा कोणी अर्ज दाखल केलेला आहे ते नोटीस बोर्डावर लावून आलेल्या प्रत्येकाला ते दिसावे अशा पध्दतीची पारदर्शकता त्यामध्ये आणण्याचे काम अधिवेशन संपण्यापूर्वी शासन करणार का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, होय.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/ D/

ठाणे समाजकल्याण विभागाला दलित वस्ती सुधार योजनेसाठी दिलेला निधी वापराविना पडून असल्याबाबत

(७) * २५२८४ ***श्रीमती विद्या चव्हाण , श्री.हेमंत टकले , श्रीमती उषा दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते , श्री.नितीन गडकरी , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नागो पुंडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील*** : सन्माननीय ***सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या समजाकल्याण विभागाकडून ठाणे समाज कल्याण विभागाला दलित वस्ती सुधार योजनेसाठी दिलेल्या ७५ लाख निधीपैकी सुमारे ४२ लाखाचा निधी वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वापराविना पडून असलेला निधी वापरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : (१), (२), (३) व (४) सन २०११-१२ या आर्थिक वर्षात दलित वस्ती सुधार योजनेकरीता जिल्हा परिषद, ठाणे साठी रू. १००.०० लाख तरतूद करण्यात आली होती. सदर तरतुदीपैकी रू.७५.०० लाख अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले होते. दिनांक १३.१२.२०११ रोजी पालघर, भिंवडी, अंबरनाथ या तालुक्यातील रू.३३,२२,०९८/- इतक्या रक्मेच्या प्रशासकीय कामांना मंजुरी दिल्यानंतर सदर निधी वित्तप्रेषणाद्वारे वितरित करण्यात आला आहे. तसेच दिनांक १६.१.२०१२ रोजी शहापूर व तलासरी या तालुक्यातील रू.३७,०२,५८२/- इतक्या रकमेच्या १२ कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर निधी वित्तप्रेषणाद्वारे वितरीत करण्यात आला आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याला दलित वस्ती सुधारणा योजनांसाठी शासनाकडून दरवर्षी निधी देण्यात येतो. त्यामध्ये जोडरस्ते, पाणी पुरवठा, समाज मंदिर, सौर दिवे अशा कामांचा समावेश असतो. परंतु त्यांनी 1 कोटी रुपये मागितल्यानंतर त्यांना 75 लाख रुपये दिले गेले.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असा निधी कोणत्याही प्रकारची कामे पूर्ण न करताच परत जातो. उत्तरामध्ये रु.33,22,098 इतक्या रकमेच्या कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्याचे आणि दिनांक 16.1.2012 रोजी रु. 37,02,582 इतक्या रकमेच्या कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्याचे नमूद केलेले आहे. दैनिक "पुढारी" आणि अन्य वर्तमानपत्रातून याकडे लक्ष केन्द्रीत केल्यानंतर पुढची रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. दलित वस्त्यांची मोठ्या प्रमाणावर कामे असताना देखील त्या प्रमाणात दलित वस्त्यांना निधी उपलब्ध करुन दिला जात नाही हे खरे आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : हे अंशत: खरे आहे. बीडीएस मार्फत ठाण्यासाठी 1 कोटीची तरतूद करण्यात आली होती. त्या पैकी 75.00 लाख रु. अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आले. त्यापैकी 70 लाख रुपये 31 मार्च पूर्वी खर्च होतील. ठाण्यामध्ये 284 दलित वस्त्या असून 250 दलित वस्त्यांना पूर्ण लाभ आणि उर्वरित दलित वस्त्यांना अंशत: लाभ मिळणार आहे. पूर्वी जेथे दलितांची 50 घरे असतील अशा वस्त्यांनाच लाभ देण्यात येत होता. परंतु आता दलितांची 10 घरे जेथे असतील तेथे देखील लाभ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. पूर्वी दलित वस्तीसाठी 10 लाखाची मर्यादा होती ती वाढवून 20 लाख करण्यात आलेली आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आलेली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगावंकर, श्री. चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गो-हे, श्रीमती शोभा फडणवीस व श्री. परशुराम उपरकर यांनी "गिरणी कामगारांसाठी सध्या तयार असलेल्या 6948 घरांपैकी 170 घरे प्रत्येकी 4 लाख 81 हजार रुपये व उरलेली 6778 घरे प्रत्येकी 8 लाख 34 हजार रुपये किंमतीने देण्याचा निर्णय घेणे, गिरणी कामगार गिरण्याच्या संपामुळे हालाखीचे जीवन जगत असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री यांनी घरासाठी जाहीर केलेली रक्कम भरण्यास असमर्थ असणे, गिरणी कामगारांनी वेळोवेळी आंदोलने, निदर्शने, मोर्चे काढून मोफत घरे मिळण्याची केलेली मागणी, गिरणी मालकांनी म्हाडा व महानगरपालिका यांना देय असलेली 1/3 जागा अद्यापही ताब्यात दिलेली नसणे, गिरणी कामगारांच्या सर्वेक्षणात 1 लाख 26 हजार 166 गिरणी कामगार व 22 हजार 701 वारसांचे असे मिळून 1 लाख 48 हजार 767 अर्ज शासनाकडे प्राप्त झाले असून गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याबाबत कार्यवाही न करणे, राज्य शासन गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत कोणतीही सहानुभूती दाखवित नसल्याने गिरणी कामगारांमध्ये पसरलेला असंतोष, त्यासाठी आंदोलन तीव्र करण्याचा दिलेला इशारा व मोफत घरे मिळण्याबाबतची होत असलेली मागणी" अशा प्रकारची सूचना दिलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हा विषय नियम 289च्या प्रस्तावाचा कसा होतो याबाबत 2 मिनिटामध्ये आपली भूमिका मांडावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंबंधी सरकारची भूमिका काय आहे, गिरणी कामगारांच्या घरासंबंधी सरकार काय करणार आहे, हे तातडीने समजावे याकरिता नियम 289अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेची नोटीस आम्ही दिलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीशी चाही

श्री. दिवाकर रावते....

सदनाच्या प्रथा आणि परंपरा यांचा आदर राखणे हे सत्तारुढ पक्षाचे, विशेष करुन माननीय मुख्यमंत्र्यांचे काम आहे. खरे म्हणजे त्या दिवशी सदनामध्ये विरोधी पक्षाचा अशासकीय ठराव होता. अशासकीय ठराव असला तरी त्या ठरावाला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्री राज्य शासनाची भूमिका सभागृहासमोर मांडू शकत होते. अशासकीय ठरावाच्या माध्यमातून सरकारी भूमिका मांडण्याचे एक संसदीय कार्य पध्दतीतील उत्तम उदाहरण घडले असते. याबाबतीत राज्य सरकारच्या भूमिकेबाबत निवेदन करण्याचा माननीय मुख्यमंत्र्यांना अधिकार होता. सभापती महोदय, आपल्याला माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव मान्य करणे भाग पडल्यामुळे ते निवेदन सभागृहात मांडले गेले आणि गिरणी कामगारांच्या संदर्भामध्ये जे निवेदन आले, ते निवेदन गिरणी कामगारांवर अन्याय करणारे आले. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या निवेदनामध्ये किती कामगारांनी घरासाठी अर्ज केले अशीही माहिती दिली. किती मृत कामगारांच्या वारसांनी अधिकार प्रस्तावित केला त्याबाबतची देखील माहिती दिली. 1 लाख 43 हजार गिरणी कामगारांना घरे कोठून देणार यासंदर्भातील स्पष्ट खुलासा त्या निवेदनात माननीय मुख्यमंत्र्यांनी केला नाही. गिरण्यांची किती जमीन शासनास प्राप्त झाली व किती गिरण्याच्या जमिनी अद्याप प्राप्त व्हावयाच्या आहेत, याबाबतची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी दिली नाही. गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत सरकार गेल्या 15 ते 20 वर्षापासून कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही करु शकत नाही ही गोष्ट त्या निवेदनातून स्पष्ट झालेली आहे. उर्वरित गिरणी कामगारांना घरे कशा पध्दतीने उपलब्ध करुन दिली जाणार आहेत हा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे.

महोदय,गिरणी कामगारांसाठी 5 ते 6 हजार घरे तयार आहेत. त्या घरांची शासन लॉटरी काढणार आहे ती घरे गिरणी कामगारांना शासन उपलब्ध करुन देणार आहे. या घरांची किंमत देखील जाहीर करण्यात आली आहे. गिरणी कामगारांवर अनेक वर्षापासून अन्याय होत आहे, त्या अन्यायाला वाचा फुटली पाहिजे. गिरणी कामगारांसाठी भविष्यात किती घरे होणार आहेत, ती घरे कशा पध्दतीने वितरित केली जाणार आहेत, तसेच ती घरे गिरणी कामगारांना कधीपर्यंत देण्यात येणार आहेत इत्यादी बाबतची सविस्तर माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. गिरणी कामगारांचा घराचा प्रश्न अतिशय ज्वलंत व गंभीर आहे. हा सगळा विषय तातडीने चर्चा करण्याचा असल्यामुळे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

नियम 289 अन्वये प्रस्ताव सभागृहासमोर आणलेला आहे. आज गिरणी कामगारांनी जोपर्यंत त्यांचा घराचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत आझाद मैदानावर कायम स्वरुपी ठिय्या आंदोलन सुरु केलेले आहे. मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न आणि शेतकऱ्यांची झालेली फसवणूक हे दोन प्रश्न आमच्या दृष्टीने या अधिवेशनात सर्वात महत्वाचे आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी गिरणी कामगारांचा प्रश्न सभागृहात मांडला होता. परंतु त्या दिवशी त्या प्रश्नाला योग्य प्रतिसाद मिळाला नाही. पण योगायोगाने का होईना माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या घरासंदर्भात निवेदन केले. त्यात त्यांनी म्हटले की, गिरणी कामगारांसाठी जी घरे बांधली आहेत, त्या घरांचे वाटप करुन टाकू आणि पुढचे पुढे बघू. आम्हाला पुढच्या कार्यवाही संदर्भात उत्सुकता आहे. या सभागृहाला राज्य शासनाने धोरण समजले पाहिजे. गिरणी कामगारांचा घराचा प्रश्न तातडीने चर्चेला यावा अशी आमची आग्रही भूमिका आहे. धन्यवाद.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न वेळोवेळी, वेगवेगळया माध्यमातून या सभागृहात उपस्थित झालेला आहे. आज गिरणी कामगारांनी आझाद मैदानात ठिय्या आंदोलन सुरु केलेले आहे. मी मागे म्हटले होते की, मुंबई महाराष्ट्रात असेल याचे एकमेव कारण गिरणी कामगारांचा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतला सहभाग आहे. त्यामुळे मुंबईचे अस्तित्व टिकविणे आणि मुंबईची आर्थिक उन्नती या दोन्ही गोष्टींमध्ये गिरणी कामगारांचा मोठा वाटा आहे. त्या गिरणी कामगाराला आपल्या हक्काच्या घरासाठी लढावे लागत आहे. मुंबईतील गिरण्याच्या जमिनीच्या माध्यमातून वस्त्रोद्योग महामंडळ एका बाजूला हजारो,कोटी रुपये कमावित आहेत. दुसऱ्या बाजूला गिरणी कामगारांना आपल्या हक्काच्या घरांसाठी सातत्याने मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे इत्यादी आयुधे वापरावी लागत आहेत. परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातील घोषणा केली. त्या घोषणेत घराची किंमत 8 लाख रुपये एवढी सांगितली. पर स्केअर फूट 1400 रुपये कन्स्ट्रक्शन दर वगळला तर उरलेला 1500 रुपयांचा दर आहे. त्यात व्हॅट आहे, वेगवेगळया पध्दतीचे टॅक्सेस आहेत. ते टॅक्स सरकारच्या तिजोरीतच जमा होणार आहे. आज गिरणी कामगारांच्या घरांची चर्चा होणे गरजेचे यासाठी आहे की, एका बाजूला गिरणी कामगार आझाद मैदानात जमलेले असून त्यांनी तेथे ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. दुसरीकडे विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. गिरणी कामगारांच्या बाबतीत विधिमंडळात कार्य चर्चा होईल,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सरकार या बाबतीत काय धोरण ठरविणार आहे. गिरणी कामगारांसाठी जेवढी घरे बांधली आहेत, तेवढी घरे वितरित करु. पुढचे पुढे पाहू असे सांगून चालणार नाही. या ठिकाणी सविस्तरपणे चर्चा करुन गिरणी कामगारांना न्याय देण्याच्या दिशेने सरकतो आहोत अशा प्रकारचा संदेश राज्यात जावा म्हणून आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना सादर केलेली आहे. आजचे सभागृहासमोरील सगळे कामकाज बाजूला सारुन नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावावर त्वरित चर्चा घेण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, 1982 साली गिरणी कामगारांचे आंदोलन सुरु झाले होते. आज 30 वर्षानंतर देखील या सभागृहात गिरणी कामगारांना न्याय द्या असे सांगण्याची आमच्यावर पाळी आलेली आहे. 30 वर्षे सातत्याने लढा देणारे गिरणी कामगार, त्यांच्यामुळेच आम्ही आज या सभागृहात बसलो आहोत. संयुक्त महाराष्ट्राचा लढा गिरणी कामगार नसते तर यशस्वी झाला नसता आणि मुंबईमध्ये हे सभागृह अस्तित्वात आले नसते. विधिमंडळामध्ये सदस्य म्हणून आम्ही चर्चा करण्यासाठी बसलो नसतो. ज्यांच्यामुळे आम्ही आज या सभागृहात बसलो आहोत त्यांना 30 वर्षापासून सतत न्यायाची मागणी करुन शासनाच्या निर्णयाची वाट पहावी लागत आहे. आज आझाद मैदानावर हजारो गिरणी कामगार एकत्र आले असून त्यांचे या सभागृहाच्या माध्यमातून काय निर्णय होतो याकडे लक्ष लागले आहे. आज 30 वर्षानंतर देखील शासन या गिरणी कामगारांना न्याय देणार आहे की नाही? परप्रांतीयांनी या राज्यात येऊन बोगस रेशन कार्डाच्या आधारे मोफत घरे पदरात पाडून घेतली. परंतु ज्यांचा या शहरावर हक्क आहे, ज्यांचा अधिकार आहे, ज्यांच्या जागा विकून वस्त्रोद्योग विकास महामंडळाने कोट्यवधी रुपये कमावले, त्या गिरणी कामगारांना मोफत घरे का दिली जात नाहीत? एका घराची किंमत 8.25 लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे आजचे सदनाचे सर्व कामकाज बाजूला सारुन गिरणी कामगारांचा प्रश्न निकाली काढण्यासाठी सभागृहामध्ये विस्तृत चर्चा होण्याची आवश्यकता आहे. शासनाने या चर्चेच्या माध्यमातून ठोस उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. गिरणी कामगारांच्या मूलभूत अधिकाराचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. लक्षावधी कुटुंबीय, महिला आणि बालके यांनी गेली अनेक वर्षे त्रास सहन केला आहे. हजारो रणरागिणी महिला गिरणी कामगार, गिरणी कामगारांच्या कुटुंबातील स्त्रिया आज आझाद मैदान येथील आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या आहेत. गिरणी कामगार कृती समितीची सर्व नेतेमंडळी, श्री.दत्ता इस्वलकर, दैनिक नवाकाळच्या संपादिका रोहिणी खाडिलकर यांनी सुध्दा या आंदोलनाबाबत पुढाकार घेतला आहे. या संदर्भात सभागृहात चर्चा व्हावी आणि त्या माध्यमातून समर्पक उत्तर शासनाकडून मिळावे अशी आमची अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, फिनिक्स मिलमध्ये मॉल बांघण्याचे काम सुरु झाले त्यावेळी मी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी उत्तर देताना असे सांगितले होते की, गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ. मागील पावसाळी अधिवेशनात सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री यांनी या सभागृहात ठामपणे जाहीर केले होते की, गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ, गिरणी कामगारांना मोफत घरे देण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे. आज नियम 289 अन्वये आम्ही जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या सूचनेला अनुसरुन आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयाला प्राधान्य द्यावे आणि चर्चा घडवून आणावी. चर्चेच्या माध्यमातून शासनाकडून समर्पक उत्तर मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा अतिशय भावनिक आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीशी संबंधित असलेला विषय आहे. या प्रश्नाबाबत अनेकदा सरकारने आपली भूमिका निश्चित करताना गिरणी कामगारांकडे दुर्लक्ष केले असे आम्ही म्हणणार नाही. परंतु आज शासनाने जी 10 हजार घरे बांधली आहेत त्यापैकी 7500 घरे प्राधान्याने ज्या ज्या गिरणी कामगारांच्या चाळी आहेत त्या चाळीतील कामगारांना देण्यात यावीत असा निर्णय झाला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. त्या घरांचे तत्काळ वितरण होणे आवश्यक आहे. गिरणी कामगारांना ही घरे मोफत द्यावीत की मोफत देऊ नयेत या संदर्भात बरीच चर्चा झालेली आहे. त्या संदर्भात एक समिती नेमण्यात आली होती. श्री.दत्ता इस्वलकर यांच्या नावाचा उल्लेख झाला. त्यांनी एक गोष्ट मान्य केली होती की, मोफत घरे न देता वाजवी दरामध्ये घरे द्यावीत. तशा प्रकारची भूमिका समितीकडून घेण्यात आली होती. त्या समितीमध्ये मी स्वत: सामील होतो. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, 8.25 लाख रुपये एका घराची किंमत निश्चित केली असली तरी आजच्या तारखेला ही किंमत जास्त वाटते या मुद्याशी मी सहमत आहे. परंतु वाजवी दरामध्ये त्यांना ही घरे तत्काळ मिळावीत. उर्वरित जे गिरणी कामगार आहेत त्यांच्यासाठी रोड मॅप असावा या दृष्टीने या सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणून नियम 289 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे त्या सूचनेला मी पाठिंबा देतो आणि तत्काळ या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी विनंती करतो.

नंतर श्री.खर्चे...

असंशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : महोदय, कदाचित या देशातील कामगारांच्या लढ्यामध्ये मुंबईतील गिरणी कामगारांचा लढा हा एक ऐतिहासिक लढा म्हणावा लागेल. हा लढा सुमारे 30 वर्षांपासून चालूच आहे. या गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी आताच सांगितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांसोबत या कामगारांच्या नेत्यांची बैठक घेण्यात आली तेव्हा त्यांच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले होते की, नेत्यांनी जरी मोफत घरांबाबत सांगितले असले तरी आम्हाला किमान वाजवी दरात ही घरे मिळावीत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी सांगितले ती गोष्ट सत्य आहे की, गिरणी कामगारांना शासनाकडून 8 लाख रुपयात घरे देण्याचा निर्णय झाला, ही किंमत जास्त असून ती कमी दरात मिळावीत.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी नियम 289 अन्वये गिरणी कामगारांच्या संदर्भात सभागृहात चर्चा घ्यावी किंवा नाही एवढ्या मर्यादित विषयापुरतेच बोलावे.

श्री. किरण पावसकर : महोदय, मी तेवढ्याच मर्यादित विषयापुरते बोलत आहे.....अडथळा.....

सभापती : विरोधी पक्षाने सभागृहात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. यापूर्वी सुध्दा अनेक वेळा अशा पध्दतीने नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिल्यानंतर त्यासंबंधीचा निर्णय देण्यापूर्वी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे विचार समजून घेतले जातात, विरोधी पक्षाने प्रस्ताव दिलेला असल्याने त्यांच्या काही सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकले जातात व सत्तारुढ पक्षातील काही सन्माननीय सदस्यांचेही विचार ऐकले जातात. त्यानंतर सभागृहाच्या नेत्यांचे म्हणणे देखील ऐकले जाते. हे लक्षात घेऊन नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा करणे कसे योग्य आहे एवढेच आपण सांगावे, अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. किरण पावसकर : महोदय, नियम 289 अन्वये चर्चा घेणे आवश्यक आहे आणि त्यावरच मी बोलत आहे. पण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना रागावण्याचे कारण मला कळत नाही. कदाचित त्यांच्या काही लोकांनी मिलची जागा विकत घेतली व त्यावर मॉल बांधले असल्याने त्या जागेवर घरे कशी व कोठून देणार असा प्रश्न असावा म्हणून ते रागावले असावेत.....अडथळा.... मी या प्रस्तावाचे समर्थनच करीत आहे, कारण कामगारांना न्याय मिळाला पाहिजे. माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी रागावू नये त्यातूनही मार्ग काढू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : आपल्या नेत्यांनी माननीय श्री. शरद पवारांनी हजारो लोकांची लाखो एकर जमीन घेतली त्यासंदर्भात आम्ही काहीच बोलत नाही.....अडथळा.....तेव्हा माझी अशी सूचना आहे की, सन्माननीय सदस्यांनी मर्यादित चर्चा करावी.

सभापती : मी या प्रस्तावावरील चर्चेला परवानगी दिल्यानंतर आपण आपले विचार जरुर मांडावेत. आता प्रश्न इतकाच आहे की, नियम 289 अन्वये सदरचर्चा कशी योग्य आहे यासंदर्भात सदस्यांनी एक-एक मिनिटात आपले विचार व्यक्त करावेत.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, नियम 289 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे त्यावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण गेली 30 वर्षे कामगार आपल्या न्याय्य हक्कासाठी लढत आहेत आणि आज सुध्दा आझाद मैदानावर ते आपल्या मागण्या घेऊन बसलेले आहेत. म्हणून या गोष्टीला प्राधान्य देऊन सभागृहात चर्चा घडवून आणावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, नियम 289 के अनुसार जो प्रस्ताव सदन के सामने चर्चा के लिए आया है, उस प्रस्ताव का मैं समर्थन करता हूं. माननीय मुख्यमंत्री महोदय ने इस बारे में जवाब भी दिया है. आजाद मैदान में आज कामगारों का मोर्चा आया है. इसलिए मेरा कहना है कि इस प्रस्ताव पर सदन में अविलंब चर्चा होनी चाहिए.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज सकाळी 11.00 वाजण्या अगोदर गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात माझ्या दालनात विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आले होते. परंतु त्यावेळेस सभागृहाचे नेते माझ्या दालनात पोहचू न शकल्यामुळे मी असा निर्णय घेतला होता की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने सभागृहाचे मत काय आहे ते जाणून घेतले जाईल व त्याच बरोबर मी सभागृहाच्या नेत्यांना सांगू इच्छितो की, या चर्चेच्या संदर्भात कशा पध्दतीने निर्णय घ्यावा ते सांगावे. या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांनी व विरोधी पक्ष नेत्यांनी आपले विचार मांडले तर मला निर्णय घेणे सोपे होईल.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्व संध्येच्या चहापानाच्या वेळेस माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विरोधी पक्ष नेत्यांना तसेच गट नेत्यांना सांगितले होते की, सरकारची प्रत्येक विषयावर चर्चा करण्याची भूमिका आहे. सभागृहात दोन दिवस छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभारण्याच्या संदर्भात सरकार चर्चा करण्यास तयार झाले व त्यासंदर्भात सरकारच्या वतीने माननीय मुख्यमंत्री महोदयानी सभागृहात उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, आज नियम 289 अन्वये गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला असून या प्रश्नाच्या संदर्भात सरकारने सातत्याने प्रत्येक अधिवेशनामध्ये सरकारची भूमिका स्पष्टपणे मांडलेली आहे. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सुध्दा या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळेसही विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना तसेच गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात जे आंदोलने करतात त्या सर्वांशी शासनाने चर्चा केली होती.

सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, सभागृहात काल माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेचा पहिला दिवस होता व आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. उद्या बुधवार व गुरुवार रोजी पुरवणी मागण्यांवर चर्चा केली जाणार आहे. दि. 23, 24 व 25 मार्च, 2012 रोजी सभागृहाच्या कामकाजास सुट्टी आहे. दि. 26 मार्च, 2012 रोजी अर्थसंकल्प सादर केला जाणार असून मार्च महिना 31 तारखेचा असल्यामुळे दिनांक 27 मार्च, 2012 रोजी कोणत्याही परिस्थितीत पुरवणी विनियोजन विधेयक मंजूर करावे लागणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

सभापती महोदय, त्यामुळे माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना तसेच सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यास राज्य सरकार तयार आहे. बजेट अधिवेशनाचा काळ हा साधारणत: दीड महिन्याचा असल्यामुळे या विषयाच्या संदर्भातील चर्चा केव्हा घ्यावयाची याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न अतिशय जिव्हाळयाचा आहे याबद्दल कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चाही आज संपली पाहिजे. त्यामुळे चर्चेच्या संदर्भातील गणित कसे बसवायचे, सदस्यांना चर्चेसाठी देण्यात आलेला वेळ सदस्य पाळणार आहेत काय याबाबत निर्णय घ्यावा. गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात राज्य सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे. सदर चर्चा नियम 289 अन्वये होत असतांना बाकीच्या कामकाजाच्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीने जो निर्णय घेतलेला आहे त्याबाबतीतील विचार माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच गट नेत्यांनी जरुर करावा एवढे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्ना संदर्भात हजारो गिरणी कामगार आज आझाद मैदानावर बसलेले आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील चर्चा आज झाली तर ती अधिक संयुक्तिक होईल. या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या मंत्रीमहोदयांच्या गिरणी कामगारांच्या नेत्यांबरोबर गाठी-भेठी व चर्चा सुरु आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात गिरणी कामगार सभागृहाच्या निर्णयाची वाट पाहत आहेत. व त्यामुळे आम्ही आज नियम 289 अन्वये गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाची चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती : या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मार्ग काढण्यासाठी सन्माननीय सभागृहाचे नेते श्री. अजित पवार, विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, माननीय भुजबळ साहेब, माननीय श्री. हर्षवर्धन पाटील, माननीय श्री. फुंडकर साहेब या सर्वांनी माझ्या दालनात यावे.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 24 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी तहकूब करण्यात आली.)

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

तालिका सभापती : मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(दुपारी 12.40 ते 1.00 वाजेपर्यंत बैठक स्थगित झाली.)

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - माननीय सभापती

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.अजित पवार (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचा सन 2010-2011 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

. . . .एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवसाच्या कामकाजाबाबत

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेमधील अनुक्रमांक 3 वर दाखविण्यात आलेल्या म.वि.प. नियम 93 अन्वये सूचना तसेच अनुक्रमांक 4 वर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना आज घेण्यात येणार नाहीत. आज नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना देण्यात आली आहे, त्याबाबत याठिकाणी सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब, सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील साहेब, त्याच बरोबर सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते या सर्वांच्या बरोबर चर्चा करुन मुंबईतील गिरणी कामगारांच्या अनुषंगाने जो अत्यंत महत्वाचा, जिव्हाळ्याचा प्रश्न आहे त्याबाबतीत आज एक तास चर्चा करण्यासाठी परवानगी देण्याचे मी ठरविलेले आहे.सर्वांची मते लक्षात घेऊन याबाबतीत मी निर्णय घेतलेला असून या विषयावरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि सत्तारुढ पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आणि सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकरजी यांची भाषणे होतील. तसेच या विषयाच्या संबंधात सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री सायंकाळी 5 वाजून 30 मिनिटांनंतर उत्तर देतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : सभापती महोदय, आम्ही या विषयाच्या संबंधातील उत्तर 4.30 वाजता देण्यात यावे असे सुचविले होते.

सभापती : तसेच आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर अनु.क्र.6 वर दाखविण्यात आलेली राज्यपालांच्या अभिभाषणावरील दुसऱ्या दिवसाची चर्चा ही वरील एक तासाची चर्चा संपल्यानंतर सुरु होईल आणि त्या विषयाच्या संबंधातील उत्तर उद्या बुधवार, दिनांक 21 मार्च 2011 रोजी सकाळी 10.00 वाजता देण्यात येणार आहे.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नावर या सदनातील सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंगजी फुंडकर सोडल्यास माझ्या अगोदर कोणीही सन्माननीय सदस्य बोललेले नाहीत. या प्रश्नाच्या संबंधात मला जास्त माहिती आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . .

अनुपालित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.....

मी गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने विधानसभेत आणि बाहेर सुध्दा लढा दिलेला आहे अनेकवेळा उपोषणे देखील केलेली आहेत. तेव्हा गिरणी कामगारांच्या संदर्भात होणाऱ्या चर्चेत मला देखील बोलण्याची संधी मिळावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहाचे नेते व माननीय विरोधी पक्ष नेते यांच्या बरोबर बैठक होऊन त्यामध्ये असा निर्णय झाला की सत्ताधारी पक्षाकडून दोन सन्माननीय सदस्य तर विरोधी पक्षाकडून चार सन्माननीय सदस्य असे एकूण सहा सदस्य बोलतील. तेव्हा मला आपली विनंती मान्य करता येणार नाही.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी मी एका माजी मुख्यमंत्री महोदयांच्या कानफाटात मारली होती. त्यावेळी आम्हा सहाजणांना पक्षातून निलंबित करण्यात आले होते. या प्रश्नासंबंधी तीन महिने पक्षाच्या बाहेर राहण्याची शिक्षा मी भोगलेली आहे. मला या विषयावर बोलणे फार आवश्यक आहे. आपण मला पाच मिनिटे का होईना बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी त्यांच्या निवेदनात जो एक शब्द वापरला तो मी कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आपण त्यावेळी सभागृहात होता. गिरणी कामगारांच्या प्रश्नावर श्री.भाऊराव पाटील व मला निलंबित करण्यात आले होते. श्रीमती सूर्यकांता पाटील देखील होत्या. आपणास हे सर्व माहीत आहे. कामगारांवर ज्या दिवसापासून अन्याय सुरु झाला त्या दिवसापासूनची इत्यंभूत माहिती ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या व्यतिरिक्त मला आहे. माझ्या इतकी इत्यंभूत माहिती अन्य कोणालाही नाही. तेव्हा आपण मला बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की, या संदर्भात सभागृहाचे नेते आणि विरोधी पक्ष नेते यांच्या बैठकीमध्ये निर्णय झालेला आहे त्याप्रमाणे फक्त सहा सन्माननीय सदस्य चर्चेमध्ये भाग घेतील. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना दहा मिनिटे बोलण्यासाठी दिलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे म्हणणे दहा मिनिटाच्या आत मांडल्यास मी त्यांचा आभारी राहीन. तेव्हा सन्माननीय सदस्यांची विनंती मला मान्य करता येणार नाही.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझ्यावर हा अन्याय आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नगर जिल्ह्यातील पिंपळगावखोंड या शाळेचे मुख्याध्यापक श्री.जालिदंर जाधव यांनी आत्महत्या केली आहे अशी बातमी काल पासून "स्टार माझा" या वृत्तवाहिनीवर सातत्याने दाखविली जात आहे. त्या शाळेच्या बांधकामासाठी मुख्याध्यापकांकडे जो निधी आला होता तो निधी ग्रामशिक्षण समितीचे सदस्य सरपंच यांनी त्यांच्याकडून जबरदस्तीने काढून घेतला व निकृष्ट दर्जाचे काम केले. मुख्याध्यापक श्री.जाधव यांना स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि राजकीय पुढाऱ्यांकडून प्रचंड त्रास होत होता. त्यांनी या संदर्भात गट शिक्षण अधिकारी आणि शिक्षण अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. परंतु कुणीही त्यांच्या तक्रारीकडे लक्ष दिले नाही. तेव्हा त्यांनी या सर्व जाचाला कंटाळून आत्महत्या केलेली आहे. मला इतका त्रास होत आहे की मी आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीमध्ये आलो आहे असे सांगूनही त्यांची कोणी भेट घेतली नाही की दखल घेतली नाही. संबंधितांनी त्यांची दखल घेतली असती तर श्री.जालिंदर जाधव यांचे प्राण वाचू शकले असते. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन नेमकी वस्तुस्थिती काय आहे याची माहिती मिळावी अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे.

सभापती : या गंभीर बाबीची शासनाने योग्य ती चौकशी करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नाशिक शहरामध्ये शेतकऱ्यांनी काद्यांस भाव मिळण्यासाठी मोठे आंदोलन उभे केलेले आहे. काद्यांचा भाव पडलेला आहे तेव्हा शासनाने हस्तक्षेप करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा याकरिता ते आंदोलन करण्यात आलेले आहे.

यानंतर कु.थोरात. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव...

कालपासून या आंदोलनाचे स्वरुप अतिशय उग्र होताना दिसत आहे. काल जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना रात्रौ 1.30 वाजेपर्यंत कोंडून ठेवण्यात आले होते. आजही संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय बंद ठेवण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी असलेल्या एका बँकेच्या व्यतिरिक्त संपूर्ण कामकाज बंद आहे याचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न लक्षात घेऊन याबाबत निवेदन करण्याचे शासनाने काल मान्य केले होते. कृपया ते निवेदन आज तरी करण्यात यावे अशी सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंतराव जाधव यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या बाबतीत मी थोडक्यात माझे म्हणणे मांडणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना काल रात्रौ 1.30 वाजता घरी जाता आले आणि आज दिवसभर त्यांना कार्यालयात येऊ दिले जात नाही. शेतकऱ्यांचा असंतोष आहे. सभागृह चालू आहे असे असताना आपण हे उघडया डोळयांनी पहावे हे मला योग्य वाटत नाही. या संदर्भात निवेदन करण्यात यावे अशी आम्ही काल या शासनाला विनंती केली होती. या संदर्भात प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी सुध्दा या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. तेव्हा या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने तातडीने निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : कांद्याच्या संदर्भात नाशिकमध्ये जे प्रक्षोभक वातावरण निर्माण झालेले आहे त्या अनुषंगाने या सभागृहात तातडीने निवेदन होण्याच्या दृष्टीने माननीय उप मुख्यमंत्री यांनी लक्ष घालावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, होय.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: गिरणी कामगारांनी घरे मिळण्याची केलेली मागणी

मु.शी.: गिरणी कामगारांनी घरे मिळण्याची केलेली मागणी या विषयावर सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर,रामदास कदम, जयंत प्र.पाटील,संजय केळकर, डॉ. दीपक सावंत सर्वश्री प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री परशुराम उपरकर वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 1 तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

या विषयाच्या संदर्भात यापूर्वी एक अशासकीय ठराव देण्यात आला होता त्यावर त्या दिवशी चर्चा झालेली नाही. आज या विषयावर 1 तास चर्चा करण्यात येत असल्यामुळे यापूर्वी देण्यात आलेला अशासकीय ठराव या पुढच्या काळात चर्चेला घेण्यात येणार नाही.

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"गिरणी कामगारांसाठी सध्या तयार असलेल्या 6948 घरांपैकी 170 घरे प्रत्येकी 4 लाख 81 हजार रुपये व उरलेली 6778 घरे प्रत्येकी 8 लाख 34 हजार रुपये किंमतीने देण्याचा निर्णय घेणे, गिरणी कामगार गिरण्याच्या संपामुळे हालाखीचे जीवन जगत असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री यांनी घरासाठी जाहीर केलेली रक्कम भरण्यास असमर्थ असणे, गिरणी कामगारांनी वेळोवेळी आंदोलने, निदर्शने, मोर्चे काढून मोफत घरे मिळण्याची केलेली मागणी, गिरणी मालकांनी म्हाडा व महानगरपालिका यांना देय असलेली 1/3 जागा अद्यापही ताब्यात दिलेली नसणे, गिरणी कामगारांच्या सर्व्हेक्षणात 1 लाख 26 हजार 167 अर्ज शासनाकडे प्राप्त झाले असून गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याबाबत कार्यवाही न करणे, राज्य शासन गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत कोणतीही सहनुभूती दाखवित नसल्याने गिरणी कामगारांमध्ये पसरलेला असंतोष त्यासाठी आंदोलन तीव्र करण्याचा दिलेला इशारा व मोफत घरे मिळण्याबाबतची होत असेली मागणी"

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, मी आपले मनापासून आभार मानतो. एखाद्या विषयावर अनेक मोर्चे काढण्यात येतात, अनेक निदर्शने करण्यात येतात. गेल्या काही कालावधीमध्ये झालेली दोन आंदोलने मला आठवतात ती म्हणजे मावळच्या शेतकऱ्यांचे आंदोलन आणि गिरणी कामगारांचा हा प्रश्न या दोन्ही विषयाच्या संदर्भात अतिशय पोटतिडिकेने आंदोलने करण्यात आलेली आहेत. गिरणी कामगार सातत्याने आपल्या मागण्यांसाठी मोर्चे काढत असतात आणि पोटतिडिकेने आपल्या मागण्या मांडत असतात त्यावेळी ते शासनाकडे एका अपेक्षेने पहात असतात. त्यांच्या या अपेक्षा म्हणजे राजकीय व्यवस्थेवरील त्याचा विश्वास होय. राजकीय व्यवस्थेवरील त्याचा हा विश्वास वाढवावयाचा असेल तर अशा प्रकारचे मोर्चे ज्यावेळी काढण्यात येतात त्यावेळी सभागृहात त्यावर चर्चा होणे हे लोकशाहीला बळकटी आणणारे असते. गिरणी कामगारांच्या विषयावर या ठिकाणी चर्चा करण्यात येत आहे त्यामुळे मी मनापासून शासनाचे अभिनंदन करतो.

या चर्चेत भाग घेणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी फक्त आठ ते दहा मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे असे आपण ठरविलेले आहे. या विषयावर अनेक वेळा सविस्तर भाषणे झालेली आहेत त्यामुळे त्या खोलात जाण्याचे कारण नाही. हा विषय कायद्याच्या वाक्यांवर किंवा लॉजिकली अजिबात सुटणार नाही. या विषयाच्या संदर्भातील भावना लक्षात घेऊन हा प्रश्न सोडवावा लागेल इतकी या प्रश्नामध्ये ताकद आहे. मी नेहमीच असे म्हणतो की, या गिरणी कामगारांमुळे मुंबई वाचली आहे. मुंबई आर्थिक दृष्टया वाढलेली आहे त्याचे मूळ कारण म्हणजे गिरणी कामगारांनी गाळलेला घाम हे आहे. मुंबई ज्यांच्यामुळे वाचली आणि ज्यांच्यामुळे भरभराटीस आली त्या गिरणी कामगारांच्या जीवावर काही लाख कोटी रुपये अनेकांनी कमावले आहेत. सभापती महोदय, दिनांक 10 एप्रिल 2001 ते 28 मार्च, 2003 या कालावधीमध्ये पाच वेळा डी.सी. रुल्स बदलण्यात आले आहेत. या डी.सी. रुल्सचे मी नेहमी असे वर्णन करतो की, तत्कालीन मुख्यमंत्री हे मुख्यमंत्री न राहता टेलर होते. फिनिक्स मिलमध्ये मॅक्डोनॉल्डचे दुकान आहे ते नकाशामध्ये कामगारांचे कँटीन दाखविले जाते. डी.सी. रुल्स पाचवेळा बदलण्यात आलेले आहेत. त्या प्रत्येक वेळी विकासकाला मदत होईल अशा पध्दतीने निर्णय घेण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

हे होत असताना प्रत्येक निर्णयामध्ये आपण गिरणी कामगारांना मारत गेलो. आज गिरणी कामगार आम्हाला घरे द्या असे म्हणतात. आपण असे म्हणावयाचे की, ते त्या ठिकाणी राहणार आहेत का, ते विकून जाणार आहेत का, अमुक करणार आहेत का वगैरे. खरोखरच हे 5 डीसी रुल्स बदल्यामुळे किती लाख कोटी रुपयांचा फायदा आपण कोणाला करुन दिला याचा कोठे तरी प्रामाणिकपणे विचार हा निर्णय करताना केला पाहिजे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांनी दिनांक 22 जुलै, 2011 रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांसोबत एक बैठक घेतली आणि त्या बैठकीत ज्या गोष्टी ठरल्या त्यातील ज्या एक-दोन गोष्टी होत्या त्यामध्ये वारसांना घरे देण्याचे मान्य केले होते. ते पुढे आलेले आहे. त्या बैठकीमध्ये ज्या गोष्टी ठरल्या त्यातील आणखी चार पाच गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. ज्या गोष्टी आपण त्यावेळच्या चर्चेमध्ये मान्य केल्या होत्या आणि ज्या गोष्टींची पुढे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे त्यामध्ये त्या ठिकाणी जे आश्वासन मिळाले होते त्यात घरांच्या किमती ठरविण्यासाठी समिती नेमून दोन महिन्यात निर्णय घ्यावयाचा होता. त्या समितीमध्ये गिरणी कामगारांच्या नेत्यांना घ्यावयाचे होते पण त्यांना समितीमध्ये न घेताच त्या संबंधीचा निर्णय झाला. त्या संबंधी जो निर्णय झाला त्या संदर्भात काय झाले या बाबत मी नंतर मांडतो.

या घरांसाठी जमीन कशी मिळेल या बाबत समिती नेमून दोन महिन्यात निर्णय घ्यावयाचा होता. अद्याप शासनाने ती समितीच नेमलेली नाही. म्हणजे कोठे तरी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आणि त्या प्रयत्नानंतर ते जमते की नाही हे पहावयाचे असे काहीच झालेले नाही. जे प्रामाणिक प्रयत्न व्हावयास पाहिजे होते ते सरकारच्या बाजूने अजिबात झालेले दिसत नाहीत. खाजगी मालकांवर तीन महिन्यात कारवाई करण्याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाला कळविले पाहिजे असे आपण नगरविकास खात्याला कळविले होते. ज्यांनी जमिनी दिल्या त्या आल्या पण ज्या खाजगी गिरणी मालकांच्या जमिनी आलेल्या नाहीत त्या का आल्या नाहीत ? त्या जमिनी न येता सुध्दा त्या ठिकाणी विकासाची कामे होत आहेत. एक तर जमिनी द्यावयाच्या नाहीत आणि जमिनी न देता त्या ठिकाणी ते गिरणी मालक ज्या विकासकांना त्या जमिनी देतात त्यांना नगरविकास विभागाकडून परवानगीपत्रे दिली जातात. मग जो गिरणी मालक गिरणी कामगारांच्या घरासाठी जमिनी देत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. विनोद तावडे .....

नाही, शासनाचे नियम तोडतो त्याला बांधकामाच्या सर्व परवानग्या शासनाकडून कशा मिळतात ? ते थांबविले पाहिजे असे माननीय मुख्यमंत्र्यांच्या त्या बैठकीमध्ये आग्रहाने ठरले होते. त्या बाबतीत सुध्दा शासनाने काहीही केलेले नाही. एनटीसीच्या 17 गिरण्यांची जमीन गिरणी कामगारांच्या घरांसाठी द्यावी असा आग्रह राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडे धरलेला आहे. एनटीसीच्या जमिनी विकून जे पैसे एनटीसीकडे गेले त्यातील एक दमडी सुध्दा मुंबईमध्ये गिरणी कामगारांच्या विकासासाठी आलेली नाही. म्हणजे मुंबईच्या जमिनी विकून केंद्रातील मंडळाकडे पैसे जाणार आणि त्यातून दुसऱ्या राज्यामध्ये गिरण्या होणार. हे आपण कोठे तरी थांबविणार की नाही ? मुळात या गिरण्या एनटीसीने कशासाठी घेतल्या होत्या ? त्या गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एनटीसीने या गिरण्या घेतल्या होत्या. ते पुनरुज्जीवन आपण केले नाही. ते काम बंद पडले. ज्या अर्थी आपण ते केले नाही म्हणून त्या परत केल्या पाहिजेत. आपल्याकडे ज्या गिरण्या केवळ पुनरुज्जीवनासाठी घेतल्या त्यांचे पुनरुज्जीवन करत नसताना केवळ त्या आमच्या मालकीच्या आहेत म्हणून विकावयाच्या, त्याचे पैसे त्यांनी घ्यावयाचे आणि ते पैसे या ठिकाणी खर्च करावयाचे नाहीत हे आपण राज्य सरकार म्हणून कोठे तरी थांबविणार की नाही हा यातील दुसरा महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करताना ज्या किमती घोषित केल्या त्यावेळी मी आग्रहाने म्हटले होते की, ज्याला आपण बांधकामाचा म्हणतो तो दर 1476 रुपये दाखविलेला आहे आणि बाकीच्या ज्या गोष्टी आहेत त्यामध्ये आणखी जवळजवळ 1500 रुपये वाढतात. त्यामुळे एकूण दर तीन ते साडेतीन हजार रुपयांपर्यंत जातो. यातील जवळजवळ 80 टक्के भाग राज्य सरकारच्या वर्क्स कॉन्ट्रॅक्ट टॅक्स आणि इतर टॅक्सच्या खाली येतो. 12 महिन्यांसाठी 10 टक्के व्याज गिरणी कामगारांकडून वसूल करण्याचे यामध्ये ठरविले आहे. ते कोठे तरी 250 रुपये होणार. असे करत करत हा सगळा बांधकामाचा खर्च 2530 रुपयांपर्यंत जातो. बांधकामाचा 2530 रुपये हा खर्च कार्पेट एरियावर कॅलक्युलेट केलेला नाही. तो खर्च बिल्टअप एरियावर कॅलक्युलेट केला. त्यांना राहण्यासाठी प्रत्यक्षात 225 चौ. फूट जागा मिळणार आणि आपण बिल्टअप एरियावर खर्च काढणार आणि या पध्दतीने गिरणी कामगारांना जागा देणार.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्यामुळे या पध्दतीने या घरांची किंमत 8 लाख 50 हजार इतकी होते. त्यामुळे मला असे वाटते की, शासन नियमात जे शब्द आहे त्याच्या आधारे हे करु पहात आहे. त्याऐवजी या प्रश्नामध्ये शासनाने भावना घातल्या तर हा प्रश्न सुटू शकतो. जो माणूस केवळ कायद्यातील तरतुदी दाखवितो त्यालाच 1 लाख 48 हजार गिरणी कामगारांना घरे देणे अशक्य वाटते. यापूर्वी 5 वेळा डी.सी.रुलमध्ये बदल करण्यात आला आणि ज्यांनी हे बदल केले त्या व्यक्तीविरुध्द बोलण्याची हिंमत कायद्याने चालणाऱ्या माणसात असेल तरच त्यांनी याबाबत बोलावे. तशी हिंमत नसेल तर त्यांना भावनांच्या आधारे हा प्रश्न सोडवावा लागेल.

मला प्रामाणिकपणे असे म्हणावयाचे आहे की, ज्यांनी परवा 'नवाकाळ' या वृत्तपत्रामध्ये आलेला अग्रलेख वाचला असेल तर त्यांना गिरण्या चालू असतानाचा काळ आठवला असेल. त्यानंतर गिरणी कामगारांचे जे आंदोलन झाले होते ते देखील डोळयासमोरुन गेले असेल. या गिरणी कामगारांना घरे मिळणे हे त्यांच्या हक्काचे आहे. हा एक भाग आहे. आपल्या हक्काचे मिळत नाही, घरे मिळतील या अपेक्षेने 30-30 वर्षे ते लढा देत आहेत. एवढी वर्षे गेल्यानंतरही हा प्रश्न सुटत नसल्यामुळे कोणी तरी हातामध्ये हत्यार घेतो. त्यातून नक्षलवादी निर्माण होतो. उद्या गिरणी कामगारांनी हातात शस्त्रे घेऊ नये असे जर सरकारला वाटत असेल तर त्यांच्या हक्काचे घर त्यांना दिले पाहिजे. शासनाने काही लोकांना गिरण्यांच्या जागांची विक्री करुन लाखो कोटी रुपयांची लूट करु दिली आहे. त्या बदल्यात शासनाने घातलेल्या अटी आहेत त्या अटींमध्ये जे बसत आहेत त्यांना सुध्दा शासन घरे देणार नसेल तर त्यांचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास उडेल आणि त्यांना आपल्या हातामध्ये हत्यार घेण्यास आपणच भाग पाडणारे करंटे ठरु. त्यामुळे या सर्व गिरणी कामगारांना घरे दिली पाहिजेत. शासनाने 8 लाख 50 हजार रुपये अशी किंमत निश्चित केली आहे. ती अयोग्य आहे. ही रक्कम 3 लाख 50 हजार रुपये असावयास पाहिजे. त्यापैकी 2 लाख रुपये केंद्र सरकार देईल, उर्वरित 1.50 लाखात गिरणी कामगारांना घर द्यावे अशी मी मागणी करतो आणि माझे विचार या ठिकाणी थांबवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सभागृहात गिरणी कामगारांच्या घरांच्या अतिशय संवेदनशील प्रश्नावर चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्यासारख्या सामान्य माणसाला आपण बोलण्याची संधी दिली आहे त्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानतो आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे सुध्दा आभार मानतो. गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाची सोडवणूक करीत असताना कित्येक वेळा सर्वच पक्षांकडून या प्रश्नाला राजकीय स्वरुप दिले जाते असा अनुभव येतो. मग आपण सगळेजण त्यामध्ये आलो. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी अनेक सरकारांनी व तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यापैकी 7-8 वेळा झालेल्या बैठकांमध्ये मी स्वत: सहभागी झालो होतो. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्यासमवेत बैठक झाली होती. त्यावेळी गिरणी कामगार कृती समितीचे सर्व पदाधिकारी व मी उपस्थित होतो. हा प्रश्न सोडविण्यासाठी काय करता येईल या गोष्टीचा ऊहापोह झाला होता. त्यावेळी सुरुवातीला जो आग्रह धरण्यात आला त्याचा आता माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी उल्लेख केला आहे. 1982 साली संपाला सुरुवात झाली ती बेस लाईन गृहित धरावी अशी मागणी करण्यात आली होती आणि ती सरकारने मान्य केली. त्या बैठकीत 70 हजार गिरणी कामगारांची संख्या निश्चित झाली होती त्यामध्ये वाढ होऊन ती 1 लाखापेक्षा अधिक झालेली आहे. एकदा बेस लाईन ठरल्यानंतर त्या कामगारांना घरे देण्याची शासनाची जबाबदारी आहे. यापूर्वी एक तृतीयांश, एक तृतीयांश, एक तृतीयांश असा जो फॉर्म्युला ठरला होता त्याबाबत मी बोलणार नाही. पण त्या निर्णयाच्या पुढे आपण गेलो आहोत. सध्याच्या परिस्थितीत शासन काय करु शकते हा खरा प्रश्न आहे. मला असे वाटते की, शासन बरेच काही करु शकते.

यानंतर श्री.शिगम....

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

म्हाडाची स्थापना झाल्यापासून मागील 10-15 वर्षामध्ये डीसी रुल्समध्ये जे जे बदल करण्यात आले ते तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन, लोकांच्या गरजा, लोकांच्या मागण्या लक्षात घेऊन केलेले आहेत. प्रशासनाला जे कर्तव्य करणे आवश्यक होते त्या प्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत. 33(5), 33(6), 33(7), 33(8), 33(9) आणि 33(10) या सगळया डीसी रुल्समध्ये आपण प्रावधान केले तर गिरणी कामगारांना घरे देणे शक्य होईल. आपण या नियमाद्वारे विकासकाला 10 टक्के घरे शासनाला सरेण्डर करण्यास सांगतो. अशा प्रकारे प्रावधान करता आले तर उर्वरित घरांचा प्रश्न सोडविता येईल. या गिरणी कामगारांना त्यांच्या घरासाठी किती वेळा आपल्या समोर यावे लागणार आहे याचा देखील विचार आपण केला पाहिजे. या आधी अनेक वेळा या विषयावर चर्चा झालेली आहे. या गिरण्यांच्या जमिनीच्या संदर्भात शासनाने 1/3, 1/3, 1/3 चा निर्णय घेतला. हा निर्णय गिरणी कामगारांचे हित डोळयासमोर ठेवून घेण्यात आला असे मी गृहीत धरतो. मी या बाबतीत कोणत्याही प्रकारचा आरोप करणार नाही. मुळात असा प्रश्न निर्माण होईल की, या जमिनी विकण्याचा निर्णय कोणी घेतला ? राजकीय हेत्वारोप करण्याची माझी इच्छा नाही. जमिनी विकण्याचा निर्णय जोपर्यन्त झालेला नव्हता तोपर्यन्त त्या जमिनी सुरक्षित होत्या. मग जमिनी विकण्याचा निर्णय कोणी केला ? मी राजकीय हेवेदावे करणार नाही. परंतु आम्ही जेव्हा काही बंधने पाळतो त्यावेळी इतरांनी देखील ती पाळणे आवश्यक आहे असे मला वाटते. आपल्याला गिरणी कामगारांना कशा प्रकारे न्याय देता येईल या दृष्टीने उपाय सुचविले पाहिजेत. जेव्हा गिरण्यांच्या जमिनी विकण्याचा निर्णय झाला त्यानंतर ख-या अर्थाने गिरणी कामगारांची परवड सुरु झाली. गिरणी कामगारांना देणी कशी मिळतील, त्यांना घरे कशी मिळतील या विषयी मनामध्ये धुगधुग होती. आम्ही सगळे त्यासाठी भांडलो. त्यावेळी श्री. सचिन अहिर हे राज्यमंत्री नव्हते. आम्ही सगळे सभागृहामध्ये भांडलो आणि त्यानंतर कामगारांची 900 कोटी रु.ची देणी त्यांना देण्यात आली. मला सांगावयाचे आहे की, आपण ठरविले तर गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंबंधी मार्ग निघू शकतो.

सभापती महोदय, मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, जेवढे डीसी रुल्स आहेत त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार या सदनाला आहेत. हॉस्पिटलसाठी वेगळा निकष लावला जातो,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

शिवशाही प्रकल्पासाठी वेगळा निकष लावला जातो. मी एका प्रकल्पाचा साक्षीदार आहे. शिवशाही प्रकल्पाच्या माध्यमातून 1982 पासून 1180 लोकांना दोन-अडीच लाखात आम्ही घरे दिलेली आहेत. हे सांगाताना मला आनंद होतोय. याचे कारण ही घरे देण्यासाठी आपण मार्ग काढले. त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले आहे. अनेक अधिका-यांनी सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे 1180 घरे देणे शक्य झाले. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, आपण कायद्याच्या कक्षेत राहून कोणतीही गोष्ट करायची ठरविली की ती आपणाला करता येते. म्हणून डीसी रुल्समध्ये बदल करुन मुंबईमध्ये जे जे विकासक असतील मग त्यामध्ये म्हाडा असेल, कार्पोरेशन असेल, सिडको असेल, खासगी विकासक असतील त्यांना अधिकचा एफएसआय देऊन गिरणी कामगारांच्या उर्वरित घरांचा प्रश्न सोडविता येईल.

सभापती महोदय, 1 लाखापेक्षा जास्तीचे अर्जदार घरांसाठी पात्र होणार आहेत ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. गिरणी कामगारांच्या वारसांना देखील घरे देण्याचा निर्णय घेतला ही देखील एक चांगली बाब आहे. गिरणी कामगार देशोधडीला लागल्यानंतर त्याच्याकडे कोणी बघणार नाही अशा प्रकारची परिस्थिती होती. गिरणी कामगारांच्या वारसांना घरे देण्याची मागणी समितीने केली आणि सरकारने ती मान्य केली त्याबद्दल मी सरकारचे आभार व्यक्त करतो. या गिरणी कामगारांसाठी आणि त्यांच्या वारसांसाठी 1 लाखा पेक्षा अधिकच्या सदनिका कशा होतील याचा रोडमॅप सरकारकडे असला पाहिजे आणि तो करण्याची सरकारची नैतिक जबाबदारी आहे हे मी येथे मुद्दाम नमूद करु इच्छितो.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, मी कोणावरही हेत्वारोप करीत नाही. परंतु मी एक गोष्ट मुद्दाम या ठिकाणी सांगू इच्छितो की, ज्यावेळी सरकारच्या माध्यमातून मोफत 30 लाख घरे देण्याच्या घोषणा झाल्या. बेरोजगारांना नोकऱ्या देण्यासंबंधीच्या घोषणा झाल्या. त्यावेळी गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्नाबाबत कोणीही उल्लेख केला नाही. 30 लाख घरांमध्ये 2 लाख गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ असे त्यावेळी कोणीही घोषणा करताना म्हणाले नाही. तशी कोणी घोषणा केल्याचे देखील मला आठवत नाही. यासंबंधी कोणी माहिती दिली तर माझ्या ज्ञानात भर पडेल. मी कोणावरही हेत्वारोप करीत नाही, परंतु ही तुमची, आमची सगळयांची जबाबदारी आहे. आम्ही ज्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा उल्लेख करतो. आम्ही चळवळीत भाग घेणाऱ्यांचे या ठिकाणी गोडवे गातो. त्यामुळे राजकारण विरहित आम्हाला या प्रश्नाकडे पाहणे आवश्यक आहे. 10 हजार घरे आपल्याकडे तयार आहेत. माझ्या माहिती प्रमाणे 7500 घरे तयार अवस्थेतील आहेत. ही घरे तत्काळ गिरणी कामगारांना वितरित केली पाहिजे. ती घरे अजून एक वर्षे तशीच ठेवली तर ती तोडावी लागतील. 1 वर्षानंतर त्या घरांची काय परिस्थिती होईल हे तुम्हा, आम्हाला माहिती आहे. गिरण्यांच्या आवारामध्ये राहणारे जे कामगार आहेत, त्यांना प्राधान्य देऊन या 7500 घरांचे वितरण तत्काळ झ ाले पाहिजे. गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या घराची किंमत 8 लाख 25 हजार रुपये ठेवण्यात आलेली आहे. आपण त्या घराच्या किंमती बाबत अनेक वेळा सभागृहात बोललो आहोत. केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगार, कष्टकरी यांच्यासाठी अनेक योजना आहेत. गिरणी कामगारांना देखील मोफत घरे मिळावीत म्हणून अनेक वेळा आपण आग्रह धरत होतो. गिरणी कामगारांना देण्यात येणाऱ्या घराची किंमत 8 लाख 25 हजार रुपये एवढी आहे, ती किंमत जास्त होते. गिरणी कामगारांना ती घरे 4 लाख 50 हजार रुपये एवढया किंमतीमध्ये दिली जावीत, अशी मी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे गिरणी कामगारांच्या रक्तसिंचनाने मिळालेल्या महाराष्ट्रातील विधिमंडळात आज आम्ही सदस्य म्हणून कार्यरत आहोत. त्या पिढीला आदर्श, त्या हुतात्म्यांना अभिवादन आणि त्यांच्या पिढीचा सन्मान करण्यासाठी ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे.

महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे म्हणाल्याप्रमाणे या प्रश्नाकडे नियमाच्या बंधनातून, नियमांच्या काटकोनातून बघू नये. हे महाराष्ट्राचे निर्माते आहेत, त्यांचे आपण काही देणे लागतो. जसे स्वातंत्र्य सैनिकांचे आपण देणे लागतो, सैनिकांचे देणे लागतो तसे महाराष्ट्राच्या निर्मितीच्या पिढीचे आपण देणे लागतो, या भावनेतून या प्रश्नाकडे बघितले तर राज्य शासनावर कोठलाही बोजा येईल असे मला वाटत नाही. बोजा पडण्याचा प्रश्नच येणार नाही. त्याच्यापुढे जाऊन गिरणी कामगारांना कशा पध्दतीने घरे द्यावयाची याबाबतीत शासनाला सूचना करु. ही वेळ काही उणी-धुणी काढण्याची नाही. गिरणी कामगारांच्या संप झाला त्यावेळी राजीव गांधी यांच्या समवेत झालेल्या तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. शरद पवार यांच्या बरोबर झालेल्या बैठका, त्याबाबतीत 1991 साली झालेला निर्णय यासंबंधीची संपूर्ण कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्यावेळची दुणी धुण्यासाठी मी उभा राहिलेलो नाही. या प्रश्ना संदर्भात दोषारोप निर्माण झालेले आहेत. ते कसे निस्तरावयाचे यासाठी आपण आज चर्चा करीत आहोत.

महोदय,माननीय श्री. नारायणराव राणे, उद्योग मंत्री आहेत. त्यांनी गिरणी कामगारांना पैसे देऊन मोकळे करा, कारण अशा प्रकारची बांधिलकी नसते, एकदा कारखाना बंद झाला, तर त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची देणी द्यावयाची असतात असे मत व्यक्त केले होते. त्याबाबतीत मी त्यांना विस्तृत पत्र लिहिले होते. ते पत्र या ठिकाणी वाचून दाखविणे शक्य नाही. यासंदर्भात माननीय उद्योग मंत्र्यांना चार पानी पत्र लिहिले आहे. त्या पत्रात मी पूर्ण भूमिका मांडली आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक गिरणीचे काय झाले, गिरणी कशी बंद पडली, बंद पडण्याची कारणे काय आहेत याबाबतच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. आता डी.सी.रुलमध्ये मोठया प्रमाणात बदल झालेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मी एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून देतो की, या राज्यात शिवशाही शासन कार्यरत असताना सर्व गिरण्या चालू होत्या. ज्या गिरण्या बंद पडल्या होत्या, त्यासाठी समिती नेमली होती. त्या समितीचे अध्यक्ष हे मराठवाडयातील संभाजीनगरचे होते. एक तृतीयांशमुळे त्या समितीमध्ये मी शेवटच्या टप्प्यात आलो. त्या समितीमध्ये गिरणीची एक तृतीयांश जमीन मालकाला द्यावयाची, एक तृतीयांश जमीन महापालिकेला द्यावयाची आणि एक तृतीयांश जमीन विकसित करावयाची अशा प्रकारचा निर्णय घेतला गेला होता. गिरणी कामगारांना एकूण 8 लाख स्केअर मीटर जमीन मिळणार होती....

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

तो बदल झाला त्यामुळे गिरणी कामगारांकरिता 1.66 लाख चौ.मीटर जमीन उपलब्ध झाली. त्याचा परिणाम असा झाला की, जवळजवळ 6.5 लाख चौ.मीटर जमीन मालकांना दान देण्यात आली. आजच्या बाजार भावानुसार त्या जमिनीची किंमत 15 हजार कोटी रुपये आहे. त्या जमिनीचा विकास करुन मालक नफा कमावणार आहेत. हे सर्व या ठिकाणी सांगायला आम्ही त्यांचे दप्तर सांभाळणारी माणसे नाहीत. ज्या गिरणी मालकांना तुम्ही नफा मिळवून दिला त्यांच्याकडून कामगारांच्या घरांचे बांधकाम करण्यासाठी रक्कम वसूल करावी. का मोफत घरे मिळणार नाहीत? हे जे बदल घडले त्यामुळे गिरणी मालकांना शासनाने जमीन दान दिली. संपूर्ण जमीन मालकांना समर्पित करण्यात आली. जमिनीची मालकी शासनाची होती. इंग्रजांनी त्या काळात ती जमीन लिजवर दिलेली होती. त्या जमिनीच्या भाडेपट्टीमध्ये बदल झाल्यानंतर ती जमीन शासनाच्या ताब्यात यायला हवी होती. परंतु शासनाने औदार्य दाखविले. गैर आहे असे मी म्हणत नाही. त्यावेळच्या परिस्थितीचा अभ्यास करावा लागेल. एवढी जमीन मालकांना दिल्यानंतर कामगारांच्या हितासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही बोलत आहोत. आतापर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. लढ्यामध्ये कामगारांच्या दोन पिढ्या पिचल्या आहेत. त्यांची तिसरी पिढी आता लढ्यामध्ये सामील झाली आहे. आम्हाला घरे कधी मिळणार याची ते वाट पहात आहेत.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या लढ्यामध्ये माननीय सदस्य श्री.भाई जगताप, माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर हेही उतरले होते. मिल कामगार सेना ही शिवसेनाप्रणित संघटना देखील त्यामध्ये होती. प्रत्यक्षात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर गिरणी कामगारांची प्रलंबित राहिलेली 900 कोटी रुपयांची देणी अदा करण्यात आली. शासनाने त्यांना शब्द दिला होता, आम्ही तुम्हाला घरे देऊ. मग कामगारांना घरे देण्याचा शासन आदेश काढला गेला. फक्त निर्णय घेतला नाही तर, आदेश काढला गेला. गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत 1/3 जमीन वाट्याला येणार आहे, त्यामधून घरे बांधून देऊ असे शासनाने सांगितले होते. जमीन कमी पडली. कारण डी.सी.रुल्समध्ये बदल करण्यात आले. त्यामुळे घरांच्या उभारणीबाबत काय करणार? अनेक प्रश्न आज निर्माण झाले आहेत.

सभापती महोदय, माझ्याकडे माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवेदनाची एक प्रत उपलब्ध आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, 1.44 लाख गिरणी कामगार आहेत, ज्यांची नोंदणी झालेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यात 22 हजार वारसदार आहेत. शासनाकडे उपलब्ध झालेली जमीन 8.95 हेक्टर आहे. म्हणजे 9 हेक्टर जमीन शासनाच्या ताब्यात आलेली आहे. आणखी जमीन ताब्यात येणे शिल्लक आहे. 9 हेक्टर जमीन ताब्यात आली आहे. त्या जमिनीवर घरे बांधलेली नाहीत. या मोकळ्या जमिनीवर 4 एफ.एस.आय.मंजूर केला तर किमान 225 चौ.फुटाची 15 हजार घरे बांधता येतील. 15 हजार घरे शासन बांधू शकते. घरे बांधण्यासाठी पैसा उपलब्ध नाही असे शासन कसे म्हणू शकते? गृहनिर्माणाची जमीन मालकांच्या ताब्यात दिली. सरकारच्या ताब्यात आज प्रचंड जागा आहे. त्यातील काही जमीन कशी देता येईल या संदर्भात आम्ही सरकारला निवेदन दिले आहे. मी ते निवेदन या ठिकाणी वेळेअभावी वाचून दाखवू शकत नाही. पैसा कुठून उपलब्ध करायचा, जागा कशी उपलब्ध करायची, घरे कशी बांधायची याचा पूर्ण आराखडा शिवसेना कार्याध्यक्ष माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या माध्यमातून आम्ही सरकारला सादर केला आहे.

निधी कुठून आणायचा हा प्रश्न उपस्थित केला जातो. ज्यांच्या रक्तातून, हाडामांसातून ही मुंबई उभी राहिली त्यांच्या हिताकरिता पैशाचा प्रश्न उभा राहतो त्यावेळी व्याकूळता येते. कशाला अभिवादन करण्यासाठी जायचे? कोणाला अभिवादन करायचे? ढोंग करता असे मी म्हणत नाही. परंतु आदर व्यक्त करीत असताना, हुतात्म्यांना अभिवादन करीत असताना पैशाचा प्रश्न निर्माण करणार असू तर ती अत्यंत गंभीर बाब आहे. प्रत्येक गोष्टीकरिता पैशाची उपलब्धी होत असताना गिरणी कामगारांसाठी पैसा उपलब्ध होऊ शकत नाही? कर बसवा. मुंबईवर जादा कर बसवा. दोन-पाच रुपये प्रत्येकाच्या खिशातून काढून घेतले तर काही कोटी रुपये उभे राहतील. बांगलादेशींच्या हिताकरिता करोडो रुपये आजही आमच्या खिशातून वसूल केले जात आहेत.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीशाली नाही

श्री. दिवाकर रावते .....

तो विषय आता संपला, बांगला देशाच्या तीन पिढ्या आतापर्यंत निर्माण झाल्या तरी मुंबई शहरातील जनतेच्या खिशातून हजारो कोटी रुपये बांगला देशाला जात आहेत तो निधी या गिरणी कामगारांच्या घरासाठी वळवावा. अशा प्रकारे पैसा उभा करायचा म्हटला तर कोठूनही करता येईल. तसेच आज महाराष्ट्रात सर्वात जास्त दारु विक्रीवर कर लावलेला आहे व त्यातून शासनाला 5000 कोटीच्या वर महसूल वर्षाकाठी मिळतो, त्यात आणखी वाढ करुन तो पैसा उभा करता येईल. एरवी शासन राज्याच्या विकासाला दारु विक्रीच्या माध्यमातून पैसे उभे करते मग या गिरणी कामगारांच्या घरांसाठी अशा प्रकारे पैसा का उपलब्ध करीत नाही हा माझा सवाल आहे. रोजगार हमी योजनेचा पैसा सुध्दा इकडे तिकडे शासन घेते तो इकडे ध्यावा असे मी म्हणणार नाही पण मुंबईचा जो वाटा आहे तो आपण यासाठी निर्माण करु शकता. अशा रितीने सर्व बाजूंनी पैसा उपलब्ध करता येऊ शकतो पण त्यासाठी राज्यकर्त्यांची व शासनाची इच्छाशक्ती तसेच निर्धार असला पाहिजे. तसेच या कामगारांना घरे देऊन त्याचे श्रेय सुध्दा सरकारनेच घ्यावे, ते आम्हाला नको, आम्हाला फक्त या कामगारांना घरे मिळाली पाहिजेत असेच मनापासून वाटते. शासनाने त्यांना ही मोफत घरे उपलब्ध करुन द्यावी, आम्ही शिवतीर्थावर त्यांचे जाहीर रित्या अभिनंदन करु, शासनाचा गौरव करु, फक्त गिरणी कामगारांना घरे द्यावीत एवढाच मुख्य उद्देश आहे. मग हा प्रश्न तुमचा किंवा आमचा नसून केवळ गिरणी कामगारांच्या घरांचा आहे. यासंदर्भात विचार व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे भरपूर माहिती आहे पण वेळेअभावी मी ते सांगत बसणार नाही. एवढेच मात्र नम्रपणे सांगू इच्छितो की, गिरणी कामगारांच्या सर्वच संघटना आज आपसातील मतभेद विसरुन, प्रत्येकाची टोकाची भूमिका विरुन आझाद मैदानावर एकत्र आलेल्या आहेत. त्याचे कारण म्हणजे या संघटनांच्या ही बाब लक्षात आली की, दुसरीकडे गेल्यानंतर फाटाफूट होते म्हणून या सर्व संघटना एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी टाहो फोडत आहेत, त्यामुळे या संघटना कोणाही एका पक्षाच्या नसून सर्वांच्याच आहेत आणि अगदी व्याकुळतेने आझाद मैदानावर शासनाच्या निर्णयाकडे डोळे लावून बसलेल्या आहेत. या मोर्चाला भेटण्यासाठी माननीय विरोधी पक्ष नेते गेलेले आहेत. त्याचप्रमाणे शासनाने, माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा भेट द्यावी, त्यांना आश्वासित करावे अशी आमची मागणी आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी जे निवेदन दिलेले आहे ते

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आम्हाला मान्य नाही. म्हणून मी पुन्हा विनंती करतो की, पैसा कोठूनही उपलब्ध होऊ शकतो, शासनाच्या चुकीमुळे हजारो कोटी रुपये गिरणी मालकांच्या खिशात गेलेले आहेत ते बाहेर काढावेत व या गिरणी कामगारांना मोफत घरे उपलब्ध करुन द्यावी अशी विनवणी मी माननीय मुख्यमंत्र्यांना करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, नियम 289 अन्वये चर्चेला आलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन त्यासंबंधी माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, शासनाने गिरणी कामगारांना आजपर्यंत जी आश्वासने दिलेली आहेत ती खोटी ठरलेली आहेत असे मी या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यावेळेस गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याबाबतचा निर्णय झाला तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी शासनाचे अभिनंदन सुध्दा केले होते. आता मला मात्र धोका एवढाच वाटतो की, शासनाने या घरांची जी 8 लाख रुपये किंमत ठरविलेली आहे त्यात पुढील काळात वाढ होऊन 16 लाख रुपये सुध्दा शासन मागू शकते. तेव्हा देखील सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप सांगतील की, मागील वेळेस शासनाने जरी 8 लाख रुपयात घरे देण्याचे कबूल केले होते तरी या घरांची किंमत 1 कोटी रुपये आहे व ते घर फक्त 16 लाख रुपयातच शासन उपलब्ध करुन देत आहे म्हणून शासनाचे अभिनंदन सुध्दा करतील. तसेच गिरणी कामगारांच्या प्रश्नांची उकल किंवा बाजू कोणत्याही भांडवलदार वर्तमानपत्रांनी घेतली नाही. एकच वृत्त पत्र असे आहे की, ज्या दैनिकाने नेहमीच गिरणी कामगारांच्या बाजूने आपले मत व्यक्त केले. ते दैनिक म्हणजे "नवा काळ". त्या वृत्तपत्राच्या संपादिका श्रीमती जयश्री खाडिलकर यांचे मी आभार व्यक्त करतो. त्यांनीच गिरणी कामगारांचे प्रश्न नेहमी उचलून धरले आहेत व हा प्रश्न ज्वलंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तत्कालीन नगर विकास विभागाचे प्रधान सचिव व "आदर्श" सोसायटीचे खरे नायक श्री. रामानंद तिवारी यांच्या सहीने तेव्हा एक जी.आर. काढला होता तो गिरणी कामगारांच्या विरोधात होता. अशा प्रकारे शासनाची मनापासून इच्छा होती पण श्री. रामानंद तिवारी सारख्या अधिकाऱ्याने घोटाळा केला आहे हे तिवारीच यातील महानायक आहेत.

उप सभापती : "देव तारी त्याला कोण मारी" या उक्तीचा विचार करुन सन्माननीय सदस्यांनी चिंता करु नये.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सन 2004 मध्ये गिरण्यांच्या जागेवर मॉल बांधले गेले होते त्यावेळेस शासनातर्फे सांगण्यात आले होते की, मॉलमध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना अग्रहक्क दिला जाईल परंतु तसे काहीही घडले नाही. गिरण्यांच्या जागेवरील मॉलला आम्ही विरोध केला होता. मॉलमध्ये गिरणी कामगारांची मुले आहेत कोठे ? मॉलमध्ये गिरणी कामगारांची 1 टक्का सुध्दा मुले नाहीत. जे 105 हुतात्मे झालेले आहेत त्यातील अधिक हुतात्मे हे कोकणातील आहेत. यामधील खरा लढा कोकणातील माणसानेच जिवंत ठेवलेला होता. या गिरण्यांच्या जागेवर जी काही घरे बांधली जाणार आहेत त्या ठिकाणच्या आसपासच्या जमिनीचा दर हा फार मोठा आहे. या ठिकाणी एक लाख, दीड लाख चौ.फूट रुपये असा जमिनीचा दर आहे. त्यामुळे या ठिकाणी 5 हजार रुपये भाव वाढविला तर गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सुटू शकेल. नाही तर या ठिकाणी 1 चा एफ.एस.आय वाढवून दिला तरी सुध्दा गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सुटू शकेल. परंतु हे शासन असे करणार नाही. या प्रश्नाच्या संदर्भात गेल्या 8-10 वर्षात 8-9 मुख्यमंत्री आम्ही बघितले आहेत परंतु या सर्व मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात वेगवेगळी भूमिका या सभागृहात जाहीर केलेली आहे.

सभापती महोदय, हे सरकार गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात उदासीन आहे त्याचे उदाहरण आपल्याला बघावयाचे झाले तर आज या सभागृहात गिरणी कामगारांच्या संदर्भात चर्चा सुरु असतांना मंत्रिमंडळातील एकमेव मंत्री या सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे हे सरकार गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात किती उदासीन आहे हे स्पष्ट होते. गिरणी कामगारांचा ज्वलंत प्रश्न असतांना या चर्चेच्या दरम्यान शासनाचा एकमेव मंत्री या सभागृहात उपस्थित आहेत त्यामुळे हे सरकार गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्ना संदर्भात काय भूमिका घेणार आहे हे दिसून येते. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गिरणी कामगारांना घरे 4.5 हजार रुपये चौ.फूट या दराने नाही तर गिरणी कामगारांना मोफतच घरे दिली गेली पाहिजेत. गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले पाहिजे की, आम्ही दिलेल्या शब्दाप्रमाणे गिरणी कामगारांना मोफतच घरे देणार आहोत व आम्ही तुमच्या पाठीशीच आहोत असे सांगितले तरच या चर्चेचे खरे फलित होईल नाही तर ही चर्चा फोल ठरेल असे मला वाटते. गिरणी कामगारांना मोफत घरे देण्याचा निर्णय झाला तर 105 हुतात्म्यांना ख-या अर्थाने श्रध्दांजली वाहण्याचे भाग्य आम्हाला लाभेल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र. --- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ट्रेड युनियन आणि कामगार हा विषय आल्यानंतर कै.नारायण मेघाजी लोखंडे यांचे नाव कोणी विसरेल असे मला तरी वाटत नाही. कै. नारायण मेघाजी लोखंडे यांनी बॉम्बे मिल हँड असोशिएशन ही आपल्या देशातील पहिली कामगार संघटना सुरु केली होती. त्यांनी पहिल्या कामगार संघटनेला मिलचेच नाव देऊन सुरुवात केली होती. कामगारांना एकत्रित करतांना अशा रीतीने जी युनियन सुरु झाली ती टेक्सटाईल कामगारांना घेऊनच झाली होती. परंतु मागील इतिहास सांगून सभागृहाचा वेळ काढण्यापेक्षा संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या 106 हुतात्म्याच्या संदर्भात आपण या सभागृहात नेहमी चर्चा करीत असतो. जे 106 हुतात्मे झाले त्यामध्ये गिरण गावातील कामगारांची संख्या 22 एवढी आहे. मागच्यावेळी ठरले होते की, गिरणी कामगारांसाठी घरे तयार असून ती त्यांना देण्यात येणार आहेत.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

मागच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले की, हुतात्म्यांच्या वारसांना घरे दिली जातील. आज पर्यंत त्यांच्या वारसांना घरे का देण्यात आली नाहीत ? जे कामगार आज बाहेर बसले आहेत त्यांनी या 22 हुतात्म्यांच्या वारसांना घरे देऊ नयेत असे सांगितले आहे काय ? मला वाटते त्यांना श्रद्धांजली अर्पण करायची असेल तर 22 हुतात्म्यांच्या वारसांना सर्वप्रथम तयार असलेली घरे दिली पाहिजेत असे सर्वपक्षीय ठरविण्यास हरकत नाही. आपण नेहमी घरांच्या बाबत बोलतो. पण आज एकूण घरांची संख्या किती आहे ? 1982 साली संपाला सुरूवात झाली. तेव्हा 2,49,555 गिरणी कामगार होते. आज संपानंतर 1,74,156 कामगार दाखविले जात आहेत. म्हाडाने राबविलेल्या मोहिमेमध्ये दीड लाख कामगारांनी आता पर्यंत नोंदणी केली आहे. घरे किती तयार आहेत ? किती मिळणार आहेत ? आपण त्यांना किती देणार आहोत ? याचे राजकारण करू नये.

बंद झालेल्या मिलची 1/3 जमीन म्हाडास मिळण्यासंबंधीचा पहिला कायदा 1991 मध्ये झाला आहे. त्यानंतर युतीचे शासन आले. आज आघाडी सरकार सत्तेवर आले आले. आपण सर्व जमिनीची मोजणी करणार आहोत. एकूण 600 एकर मिलची जमीन होती. त्यापैकी 200 एकर जमीन मिळायला हवी होती. त्यापैकी 100 एकर मिळाली. 100 एकर जमीन मिळाली नाही. 40 गिरण्यांचे मालक म्हणतात की, आम्ही मिलची जागा देणार नाही. ह्या प्रश्नावर आपण वारंवार बोललो आहोत. ज्या जागा आता तयार आहेत त्याचे वाटप कशा प्रकारे केले जाईल हे पाहिले पाहिजे. सव्वा लाख घरे आपल्याला द्यायची आहेत. तेवढी घरे बांधण्यासाठी अतिरिक्त एसएसआय दिला पाहिजे. यासाठी कायद्याचा किस काढता कामा नये. कायदा बाजूला ठेवून जास्त एफएसआय दिला आहे. मरीन लाईन्स येथे एक हॉटेल होत आहे. त्या हॉटेलसाठी सर्व निकष बाजूला ठेवून त्यांना जास्त एफएसआय दिला आहे. हॉस्पिटलला जास्त एफएसआय दिला आहे. शिक्षण संस्थांना जास्त एफएसआय दिला आहे. त्यामुळे गिरणी कामगारांची समस्या सोडविण्यसाठी विचार करून जास्त एफएसआय देण्यात यावा अशी मी विनंती करीत आहे. नियमाला बगल देऊन हा प्रश्न आपण सोडविला नाही तर असेच भरपूर मोर्चे काढले जातील. मग त्यासाठी मुंबई बंदची हाक दिली जाईल. मी त्या गिरणी कामगारांचे आभार मानेन. मागच्या वेळी एका संघटनेने मुंबई बंदची हाक दिली तेव्हा याच कामगारांनी सांगितले की, आम्हाला मुंबई बंद करायची नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

कामगारांच्या मागण्या काय होत्या त्या आपण बघा. पहिल्यांदा सांगण्यात आले की, या सर्वांना मोफत घरे पाहिजेत. माननीय मुख्यमंत्र्यां समवेत बैठक झाली त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपणही असाल, तेव्हा श्री.इस्वलकर यांनी सांगितले की, आम्हाला मोफत घर नको. आम्हाला माफक दरामध्ये घर द्यावे. राज्यकर्ते मोफत घरे देण्यास तयार असताना कामगारांचे नेते व स्वत: कामगार सांगतात की, आम्हाला माफक दरामध्ये घरे द्यावीत. हे मी अशासाठी सांगत आहे की, त्यांचा प्रश्न 1982 मध्ये देखील सुटू शकला असता.

1982 मध्ये संप झाल्यानंतर 1985, 1990 व 1995 मध्ये मुंबईतील राष्ट्रीय पातळीवरील फार्मास्युटिकल कंपना बंद झाल्यात. यामध्ये ग्लॅक्सो, सिबा-गायगी, युनिकेम, यांचा देखील समावेश होता. या कंपन्या नुसते कामगार धोरण घेऊन बसल्या नाहीत. ज्यावेळी कंपन्या बंद झाल्या तेव्हा व्हीआरएसच्या रूपाने एवढी मोठी रक्कम देण्यात आली की, आजही ते कामगार सुस्थितीमध्ये रहात आहेत.

1982 मध्ये मिल बंद झाल्या. हाच निर्णय आपण 1990, 1995, 2000 साली घेतला असता तर आज त्यांच्या हातामध्ये चांगली रक्कम आली असती. त्यामुळे त्यांच्यावर आज घरांची मागणी करण्याची वेळ आली नसती. घरांची मागणी करीत असताना ज्या गिरण्यांच्या जागेवर मॉल्स व हॉटेल्स उभी राहिली आहेत तेथे गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या द्याव्यात असे देखील सांगण्यात येत आहे. त्यावेळी त्यांच्यासाठी ट्रेनिंग सेंटर काढले आहे असे देखील सांगण्यात आले. पण खऱ्या अर्थाने गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या देण्याची सूतराम देखील व्यवस्था केलेली नाही.

मी सभागृहामध्ये गिरण्यांना आगी लावल्यासंबंधातील लिस्ट दिली होती. ही लिस्ट मोठी आहे. शेवटची आग दादर मधील गुलमोहर मिलला लागली आहे. गिरणींना आगी लावण्याचे मध्यंतरी वादळ आले होते. आगी लागल्यानंतर त्या मिल आगीत भस्मसात व्हायच्या म्हणून रि-डेव्हलपमेंटसाठी प्लॉट देण्यात आले. त्याच्या चौकशीचे काय झाले ? आजही माझ्याकडे ती लिस्ट

..3

BGO/ KGS/ KTG/ शरद.. 13:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आहे. नऊ मिल्सना आगी लावण्यात आल्या. सन 2004 रोजी मिलला पहिली आग लावली आहे. शेवटची आग 20 जानेवारी 2010 रोजी लागली आहे. मिलना आगी लागल्यानंतर कोणावर एफआयआर दाखल केला आहे ? तेथे काम करणाऱ्या वॉचमनवर. म्हणजे मालक राहिले बाजूला.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गिरण्यांना आग लागल्यानंतर पंचनामा केला असता तेथे केमिकल वगैरे टाकण्यात आले होते अशा बऱ्याच गोष्टी पुढे आल्या. पण आजपर्यंत कोणत्याही मालकांवर कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही.

सभापती महोदय, गिरणी कामगारांना जागा द्यावयास पाहिजे, त्यांना घरे मिळाली पाहिजेत आणि ती सुध्दा माफक दरामध्ये द्यावयास पाहिजेत अशी या सदनातील सर्व पक्षाच्या सदस्यांची मागणी आहे. या बाबतीत मी अशी विनंती करीन की, ज्या घरांचे बांधकाम झालेले आहे, याबाबत सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी चांगली गोष्ट सांगितली की, जी घरे तयार आहेत, त्यांचे जर वाटप केले नाही तर मग थोड्याच दिवसांनी असे सांगितले जाईल की, या इमारती पाडून त्याचे पुन्हा रि-डेव्हल्पमेंट करावे. त्यापेक्षा जी घरे उपलब्ध आहेत, त्यांचे वाटप करण्यात यावे. तसेच म्हाडाच्या घरांबाबत जी लॉटरी काढण्यात येते, त्यामध्ये देखील आपण गिरणी कामगारांना प्राधान्य देऊ शकतो. आपण बाहेरच्या लोकांसाठी एवढ्या प्रमाणात लॉटरी काढत असताना खरे म्हणजे येथील गिरणी कामगारांसाठी त्या सदनिका देऊ शकतो. पण यासाठी कोणी राजकारण केले, हा प्रश्न कोणी धसास लावला आणि घरांसाठी जे 30 वर्षे लढत आहेत त्यांचा प्रश्न कोणी सोडविला, ते कोणाच्या सांगण्यावरुन झाले इ.बाबींकडे लक्ष न देता याबाबत विचार केला पाहिजे. कारण पिचलेल्या कामगारांसंबंधात मी दोन ओळी सांगू इच्छितो.

गरीबाच्या मुलाला बायको गोरी काय किंवा काळी काय
आणि महागाईने पिचलेल्या कामगाराला होळी काय आणि दिवाळी काय.

त्यामुळे या कामगारांच्या घराचा प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यासाठी सरकारने कटिबध्द राहून

श्रीमती विद्या चव्हाण (खाली बसून) : हे काय आहे ?

श्री.रामदास कदम (खाली बसून) : महिलांची चेष्टा .....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी महिलांची चेष्टा करीत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, या ओळी किरण पावसकर या कवीच्या नाहीत तर मराठीतील एक गझल असून त्यातील ही वाक्ये आहेत.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी आपल्यालाच सांगतो की, याठिकाणी महिलांची चेष्टा करण्यासाठी मी बोललो नाही तर त्याचा भावार्थ लक्षात घ्यावा.पिचलेल्या कामगारांच्या भावना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

मांडताना मी बोललो आहे.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : सदरहू ओळी कामकाजातून काढून टाकाव्यात.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय,"गरिबा घरच्या मुलीला नवरा काळा काय आणि गोरा काय."असे म्हणावे . . . .

श्री.किरण पावसकर : तसेही चालेल पण त्याचा भावार्थ घ्यावा. म्हणून मी सांगू इच्छितो की, सर्व पक्षांनी केलेल्या मागणीनुसार या कामगारांचा मुंबईवर पहिला हक्क आहे आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी केवळ येथे घोषणा न करता त्यांना प्रत्यक्षात घरे मिळावीत आणि ती माफक दरामध्ये मिळावीत. याबाबतीत कोणी असे सांगू नये की, त्यांना ही घरे फुकट मिळावीत आणि त्या लोकांच्या भावना दुसरीकडे वळवावयाच्या, त्यामध्ये वेळ काढावयाचा, त्यासाठी मोर्चा काढावयाचे असे प्रकार न करता गिरणी कामगारांना माफक दरामध्ये घरे मिळावीत एवढी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांचा संदर्भ मांडल्याशिवाय चैन पडत नाही याबद्दल धन्यवाद. कदाचित त्यांना त्यांची आठवण येत असेल.

श्री.किरण पावसकर (खाली बसून) : मी त्यांचे नाव घेतले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यावेळी जो बंद करण्यात आला होता, तेव्हा शिवसेनेने मुंबई बंद पुकारला होता आणि मुंबई बंद करण्याच्या बाबतीत आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत:त्यांना फोन करुन विनंती केली होती. त्यानंतर त्यांना वेळ देण्यात आली, बैठकही झाली आणि समिती देखील नेमण्यात आली आणि त्यामुळे बंद मागे घेण्यात आला. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केली होती.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य माझ्या वक्तव्याबद्दल बोलले आहेत म्हणून सांगू इच्छितो.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, आता यावर जास्त चर्चा नको.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी मागच्या अधिवेशनामध्ये देखील बोललो आहे आणि त्यावेळीही मी त्याबाबत सांगितले होते.

उप सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .2 डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, 1992 सालापासून गिरणी कामगारांचे आंदोलन सुरु आहे. आज पुन्हा एकदा गिरणी कामगार शासनाकडून न्याय मिळावा म्हणून रस्त्यावर बसून आंदोलन करीत आहे. त्यांना असे वाटते की, ही शेवटच्या टप्प्यातील लढाई आहे. सध्या विधान सभेचे अधिवेशन सुरु असल्याने आपल्याला न्याय मिळेल या अपेक्षेने सर्व गिरणी कामगार उपोषणाला बसलेले आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी गिरणी कामगारांच्या घरा संदर्भात जे निवेदन केले त्याचा मी धिक्कार आणि निषेध करतो. येथे काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, माफक दरात घरे द्यावीत अशी गिरणी कामगारांची मागणी होती. माझ्याकडे काल गिरणी कामगारांचे नेते आले होते त्यांनी मला सांगितले की, गिरणी कामगारांना मोफत घरे द्यावीत अशी आमची मागणी आहे. तेव्हा प्रथम सन्माननीय सदस्यांनी गिरणी कामगार नेत्यांना भेटावे, त्यांच्याशी चर्चा करावी नंतर सभागृहात बोलावे. सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप व किरण पावसकर हे कोकणातील आहेत. त्यांना माहीत आहे की, सर्वात जास्त गिरणी कामगार हे कोकणातील आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, या प्रश्ना संदर्भात बैठका झाल्या होत्या आणि त्या बैठकांमध्ये काय चर्चा झाली याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. त्या बैठकीमध्ये माफक दरात घरे देण्याची चर्चा झाली असे त्यांनी सांगितले.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, गिरणी कामगार नेत्यांनी मला जे सांगितले ते मी येथे सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना माहीत आहे की, बहुसंख्य गिरणी कामगार हे कोकणातील आहेत. आज कोकणातील गिरणी कामगारांची काय अवस्था झालेली आहे, ज्या गिरणी कामगारांची पत्नी गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र मोडून आपला संसार चालवित आहे ते घरांसाठी 8 लाख रुपये कोठून आणणार ? आपल्या मुलीचे वा मुलाचे लग्न करण्याची त्यांची ऐपत नाही, गिरणी कामगारांची पत्नी शिमगा, दसरा व दिवाळी सणाला नवीन साडी विकत घेऊ शकत नाही ते माफक दरातील घरांसाठी कोठून पैसे आणणार ? आम्ही राजकारणासाठी भाषण करणार नाही. आम्ही मोफत म्हणायचे त्यांनी माफक म्हणायचे असे राजकरण करण्यापेक्षा आज गिरणी कामगारांची अवस्था काय आहे हे मी सांगत आहे. गिरणी कामगारांकडे दहा-वीस हजार रुपये नाहीत ते 8 लाख रुपये कोठून आणणार ? गिरणी कामगारांची अशी अवस्था डोळ्यासमोर असताना मी शासनाची बाजू घेऊन बोलतो, माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांची शाबासकी घेण्यासाठी आम्ही मुद्दे खोडून काढतो हे येथे कशासाठी दाखवावयाचे ? गिरणी कामगारांची आज काय परिस्थिती आहे,(अडथळा) मी हे सर्व जबाबदारीने बोलत आहे. सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे... ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आम्हाला सुध्दा त्यांच्यासारखे मोठ्याने बोलता येते. शेवटचे भाषण म्हणून त्यांनी अशा प्रकारच्या अविभार्वात बोलू नये. या प्रश्नावर दिवसभर चर्चा करण्याची आमची तयारी आहे. त्यांचा कामगार क्षेत्राशी काय संबंध आहे, 25 वर्षे आम्ही लढा दिला. त्यांनी किती संप मोडले त्याची यादी मी देईन. कोणत्या कंपनीमध्ये कशी माणसे ठेवली याची यादी देईन. तेव्हा या प्रश्नाला वेगळे स्वरुप येता कामा नये. आम्ही आमच्या मर्यादा पाळल्या. हा प्रश्न कसा सुटेल याची आम्ही चर्चा केली. आम्ही कोणावर हेत्वारोप केले नाहीत. आम्ही शेवटी कसे चांगले बोलतो हा अविर्भाव कोणी दाखवू नये. आम्ही कामगार चळवळीतील माणसे आहोत. पदासाठी येथे आलेलो नाही. वेळ आली तर आम्ही रस्त्यावर उतरण्याचे काम देखील केलेले आहे अणि तसे आम्ही सरकारला सांगितलेले आहे. तेव्हा येथे हेत्वारोप करु नये.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण या चर्चेसाठी वेळ वाटून दिली. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना बोलण्यासाठी वेळ दिला होता. असे असताना आता मला थांबवून ते बोलत आहेत. मी चर्चेच्या बाहेर एकही शब्द बोललो नाही.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचे एवढेच म्हणणे आहे की, भाषण करताना हेत्वारोप करु नये. माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांना खूष करण्यासाठी सन्माननीय सदस्य भाषण करतात असे म्हणणे बरोबर नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी वस्तुस्थिती मांडलेली आहे.गरिबांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम होत आहे हे आम्ही सभागृहात सांगायचे नाही काय ? कोकणातील गरीब गिरणी कामगारांची परिस्थिती आमच्या डोळ्यासमोर दिसत असताना आम्ही ती मांडायची नाही काय ? त्यांचे सरकार आहे, त्यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांशी बोलून दिवसभर चर्चा ठेवावी.

यानंतर कु.थोरात...

अशुधारित प्रत/ प्रसिद्धीशाली नाही

श्री. रामदास कदम ...

मग दहा मिनिटे बोला, पंधरा मिनिटे बोला, शासन तुमचे आहे मग अडचण काय आहे?

श्री. भाई जगताप : आमची 24 तास चर्चा करण्याची तयारी आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, एक तर सन्माननीय सदस्यांना थांबवा नाही तर मी खाली बसतो. ही पध्दत बरोबर नाही. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

उप सभापती : मी आपल्याला सरंक्षण देतो. आपण केवळ मुद्देसूद भाषण करावे विषयांतर करु नये.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, गिरणी कामगारांची आजची परिस्थिती पाहिल्यानंतर त्यावर या सभागृहात बोलावयाचे नाही का? गिरणी कामगारांचे संप फोडले असे या ठिकाणी सांगण्यात येत असेल तर सन्माननीय सदस्यांनी त्या विषयावर या ठिकाणी भाषण करावे. त्यांचे तोड कोणी पकडले आहे का? नसेल तर त्यांनी या ठिकाणी याबाबत बोलावे पण सभागृहात अशा प्रकारे धमकी देऊ नये. सभापती महोदय, 1991 साली शिवशाहीचे शासन असताना 58 गिरण्यांकडे 600 एकर जागा होती. त्या वेळी डी.सी. रुलमधील 1/3 प्रमाणे 200 एकर जागा या गिरणी कामगारांना मिळत होती. मग ते डी.सी. रुल्स कोणी बदलले? आम्ही ते बदलले नाहीत. मी या ठिकाणी राजकीय बोलण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. पण ती वस्तुस्थिती आहे, ते रेकॉर्ड आहे. गिरणी कामगारांवर कोणी अन्याय केला? पुन्हा या ठिकाणी उलटे सांगण्यात येत आहे. 600 एकरमधील 200 एकर जागा गिरणी कामगारांना मिळणार होती ती 200 एकरवरुन 35 एकरवर कोणी आणली? आणि म्हणून या ठिकाणी मोठयाने बोलण्याचा प्रश्न येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. हे सर्व आपल्याला स्पष्टपणे दिसत आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक लहानशी गोष्ट सांगू इच्छितो. एका बाजूला गिरणी कामगारांना न्याय द्यावयाचा नाही आणि दुसऱ्या बाजूला गिरणी कामगारांनी आंदोलन केल्यानंतर ती आंदोलने चिरडावयाची. आज आंदोलन चालू असताना आलेली नोटीस मी वाचून दाखवितो. माननीय न्यायालयामध्ये हजर राहण्याबाबतचा तो विषय आहे. ज्या गिरणी कामगारांनी रास्तारोकोचे आंदोलन केले होते त्यांच्यावर केसेस टाकण्यत आल्या आणि 20 दिवसात चार्जसिट दाखल करण्यात आले आहेत. देशद्रोहीच्या बाबतीत 90-90 दिवस चार्जशिट दाखल करण्यात येत नाही म्हणून ते सुटतात पण या गिरणी कामगारांनी फार मोठा गुन्हा केला आहे का? स्वत:च्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

हक्कासाठी रस्त्यावर आले म्हणून माननीय न्यायालयामध्ये हजर राहण्याबाबत दिनांक 01-03-2012 रोजी भोईवाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. 50122, कलम 341,34 भा.द.वि. सह 37(1)(3) सह 135 मु.पो.का.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये आपणास अटक करण्यात आलेली आहे. आपण सध्या जामिनावर मुक्त आहात. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण केला असून गुन्हयाचे दोषारोपपत्र माननीय महानगर दंडाधिकारी 19 वे न्यायालय, दादर, मुंबई येथे दिनांक 20-03-2012 रोजी सादर करण्यात येणार आहे म्हणजे ते आज सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे आपण दिनांक 20-03-2012 रोजी दुपारी 15.00 वाजता न चुकता आपल्या वकीलासह माननीय न्यायालयात हजर राहण्याबाबत सूचना देण्यात येत आहे असे त्या पत्रात म्हटले आहे.

श्री.एस.क्यू. जमा : यह नोटिस कब की है.

श्री. रामदास कदम : सदर नोटिस दिनांक 17-03-2012 ची आहे. कसाब सारख्या देशद्रोह्यांना पोसण्यात येत आहे. त्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करण्यात येत आहेत. या सर्व देशद्रोह्यांना वागणूक देण्यात येत नसेल त्या पध्दतीची वागणूक कामगारांच्या पुढाऱ्यांना देण्यात येते असे असताना देखील आम्ही या सभागृहात बोलावयाचे नाही का? ही मुस्कटदाबी आहे. गिरणी कामगारांचे आंदोलन उद्ध्वस्त करुन टाकण्याचे काम शासन करीत आहे. म्हणून सभापती महोदय, मला या ठिकाणी एक गोष्ट मुद्दाम सांगावयाची आहे की, झोपलेल्याचे सोंग घेतलेल्याला जागे करता येत नाही अशी या शासनाची अवस्था आहे.

सभापती महोदय, वस्त्रोद्योग महामंडळ हे पैसे कमविण्यासाठी आहे का? गिरणी कामगारांना न्याय देणे हे वस्त्रोद्योग महामंडळाचे काम आहे. ज्या गिरण्या मुंबईमध्ये आहेत त्या गिरण्यांच्या जागेवर मुंबईतील मराठी माणसाचा आणि गिरणी कामगारांचा पूर्ण हक्क आहे. या जागा शंभर वर्षापूर्वी या गिरणी मालकांना मोफत देण्यात आलेल्या आहेत. वस्त्रोद्योग महामंडळाने या जागा पाच हजार कोटी रुपयाला विकून ते पैसे दिल्लीला नेलेले आहेत. ते पैसे दिल्लीतून परत घेऊन यावे. कशासाठी या ठिकाणी निव्वळ भाषणे करता? शासन तुमचे आहे. या वस्त्रोद्योग महामंडळाच्या माध्यमातून पाच हजार कोटी रुपये दिल्लीला केंद्र शासनामध्ये नेण्यात आले आहत ते पैसे या ठिकाणी परत आणावेत. गिरणी कामगारांना आपण मोफत घरे का देऊ शकत नाही?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...

आपण गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ शकतो. त्यासाठी केंद्र शासनाचे अनुदान मिळते. माननीय मुख्यमंत्र्यांचे दिल्लीमध्ये चांगले वजन आहे. त्यांनी अधिक अनुदान मागून घ्यावे. महापालिकेकडून अनुदान घेण्यात यावे. मग मोफत घरे देण्यामध्ये काय अडचण आहे. अशा प्रकारे आपण मोफत घरे देऊ शकतो.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

त्या ठिकाणी जे बिल्डर आहेत मग ते कोणीही असोत त्यांच्याकडून पैसे घ्या. ते मेहरबानी करतात का ? यांनी विकत घेतली, त्यांनी विकत घेतली, आमचे आहेत, तुमचे आहेत, कोणाकोणाचे आहेत ? जे आहेत त्यांच्याकडून पैसे घ्या आणि या गिरणी कामगारांसाठी मोफत घरे बांधण्याकरिता मदत करण्यासाठी आपण या सगळ्या गोष्टी केल्या तर आपण त्यांना मोफत घरे देऊ शकतो.

सभापती महोदय, मागच्या दहा पंधरा वर्षामध्ये आपण पोलिसांसाठी राखीव असलेले भूखंड, महानगरपालिकेकडे राखीव असलेले भूखंड, जिल्हाधिकाऱ्यांकडे राखीव असलेले भूखंड असे किती भूखंड सोसायट्यांना दिले ? आपण यादी काढा. श्री. तिवारी यांची चौकशी करा. हे भूखंड आपण या सोसायट्यांना देता. त्याची यादी आम्ही काढतो. मी परत त्या विषयावर येणार आहे. कोणकोणत्या आयएएस अधिकाऱ्याचे, आयपीएस अधिकाऱ्यांचे किती फ्लॅट्स आहेत याची सगळी माहिती देतो. असे असताना गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी जागा नाही. जागा येऊ शकतात फक्त आपली मानसिकता हवी. या ठिकाणी पहिल्यांदा माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, भीक नको पण कुत्रा आवरा. आपण हे सर्व थांबवावे. हे जे सर्व गुन्हे लावलेले आहेत ते तरी थांबवावेत. हे धंदे कशासाठी चालले आहेत ? एक समिती गठीत केली त्याचे काय झाले ? जी घरे तयार आहेत ती सुध्दा आपण देऊ शकत नाही. शासन आपले आहे. मुख्यमंत्री आहेत, त्या खात्याचे मंत्री आहेत, सचिव आहेत. तयार असलेली घरे आपण तीन-तीन वर्षे देऊ शकत नाही. तयार असलेली घरे तीन तीन वर्षे देण्याची आपली लायकी नसेल तर मग सरकारमध्ये कशाला बसता ? या ठिकाणी गिरणी कामगारांची चेष्टा सुरु आहे. गिरणी कामगारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम चालू आहे.

या ठिकाणी आपल्या माध्यमातून मी पुन्हा शासनाला सांगतो की, ज्या गिरणी कामगारांची कुवत असेल त्यांचा सर्व्हे करा आणि ज्यांची कुवत असेल त्यांना माफक दरात घरे द्यावीत परंतु ज्यांची कुवत नसेल, ज्यांच्याकडे पैसे नसतील त्यांना मोफत घरे द्यावीत. माझी आपल्यामार्फत पुन्हा शासनाला विनंती आहे की, आपली जी समिती असेल त्या समितीची पुन्हा बैठक घ्यावी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

पण आजच्या आज निर्णय घ्यावा. मधल्या काळामध्ये आपण बाहेरुन येणाऱ्या लोकांना भाड्याने देण्यासाठी 5 लाख घरे बांधण्याचे ठरविले. परप्रांतीयांच्या सेवेसाठी आपण म्हाडाच्या माध्यमातून 5 लाख घरे बांधणार मग आपल्या महाराष्ट्रातील हे जे 1 लाख 42 हजार गिरणी कामगार आहेत त्यांच्यासाठी आपल्याकडे जागा नाही का ? इतकी मोठी विसंगती आपल्याला या ठिकाणी पहावयास मिळते. म्हणजे परप्रांतीयांना भाड्याने देण्यासाठी म्हाडाच्या माध्यमातून 5 लाख घरे बांधणार. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, ज्या गिरणी कामगारांमुळे आम्ही मुंबईमध्ये विधान सभेत बसलो आहोत त्या गिरणी कामगारांना कोणत्याही परिस्थितीमध्ये न्याय देण्याचे काम सरकारने करावे नाही तर सरकारने चालते व्हावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

उप सभापती : आता ही चर्चा थांबविण्यात येत आहे. यानंतर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु होईल.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

उप सभापती : आता सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, आपण असे का करता ?

(काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

उप सभापती : सन्माननीय सदस्य असेच करतात. मी आपल्याला बोलण्याची बिलकुल संधी देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे आता सभागृहात उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, आपण असे का करता ?

(काही सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना बोलू देण्याची विनंती करतात)

श्री. दिवाकर रावते : आम्ही वेळेत चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना पाच मिनिटे बोलू द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य कोठे तरी भलतीकडेच जातील.

श्री. दिवाकर रावते : त्यांना पाच मिनिटे बोलू द्यावे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला सभागृहाचा फार कंटाळा आला असेल तर मी आपला कंटाळा घालवतो पण कृपया हे नको.

(काही सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना बोलू देण्याची विनंती करतात)

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेब, आपण त्यांचे जामीनदार आहात का ?

(काही सन्माननीय सदस्य होय म्हणतात)

उप सभापती : मी घंटा वाजविल्यानंतर सन्माननीय श्री. राम पंडागळे यांना गप्प करण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेब आपले राहील.

श्री. संजय केळकर : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे हे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचे ते ऐकतात.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आज लक्षवेधी सूचनेवर चर्चा होणार आहे का ?

उप सभापती : आज लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येणार नाहीत.

श्री. जयंत प्र. पाटील : हे आधी सांगावयास पाहिजे.

उप सभापती : मला असे वाटले की, मघाशी माननीय सभापतींनी सांगितले असेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला थोडक्यात दोन तीन मुद्दे मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

उप सभापती : आपण एकच मुद्दा मांडावा.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नावर मला या ठिकाणी मुद्दाम बोलण्याची संधी द्यावी अशी मी विनंती करतो याचे कारण असे आहे की, ज्या वेळी गिरणी कामगारांचा संप झाला त्या वेळी मी आमदार होतो आणि त्या संपाचा मी एक साक्षीदार आहे. म्हणून आपण मला बोलण्याची संधी द्यावी अशी मी आपल्याला वारंवार विनंती करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना मी सांगू इच्छितो की, आपण हरकतीचा मुद्दा मांडण्याची माझ्याकडे परवानगी मागितली होती. म्हणून मी आपल्याला परवानगी दिली आहे. भाषणासाठी मी आपल्याला परवानगी दिलेली नाही.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मला भाषण करण्यासाठी आपण परवानगी द्यावी. सभापती महोदय, आता सभागृहात राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष आलेले आहेत. म्हणून मला भाषण करण्याची संधी द्यावी. आमच्या पक्षाच्या प्रतोदांनी आपल्याला विनंती केलेली आहे म्हणून मला आपण संधी द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे नेते व माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर सभागृहात उपस्थित आहेत. मला या सभागृहाला दोन गोष्टींची आठवण करुन द्यावीशी वाटते. ज्यावेळी मुंबईव्यापी संप सुरु झाला त्यापूर्वी सबंध मुंबईतील गिरण्यांमध्ये धुरळा उडत होता. या गिरण्यांमध्ये जवळजवळ 2.5 लाख कामगार काम करीत होते. विशेषत: कोकणातील मराठी माणूस गिरणीत काम करीत होता. त्यावेळी अचानक हा संप सुरु झाला. श्री.होशिंग हे त्यावेळी राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष होते. त्यांना मुंबईतील सर्व आमदारांनी तुम्ही कोठे तरी कमी पडत आहात असे म्हटले होते. बी.आय.आर.ॲक्टनुसार केवळ राष्ट्रीय मिल मजदूर संघालाच मिल मालकांबरोबर चर्चा करण्यास अनुमती होती. गिरणी कामगारांना योग्य नेतृत्व मिळत नसल्यामुळे राष्ट्रीय मिल मजदूर संघाला सोडून हा सर्व कामगार वर्ग कामगारांचे नेते डॉ.दत्ता सामंत यांच्याबरोबर गेला होता. जवळजवळ 2.5 लाख गिरणी कामगार होते. डॉ.सामंत यांची मुंबईतील वरळी भागात पहिली सभा झाली होती. डॉ.दत्ता सामंत म्हणजे संप असे समीकरण होते. आता मुंबईत संप सुरु होणार हे सर्व मुंबईकरांना माहीत होते. त्यावेळी वस्त्रोद्योगाची वाईट परिस्थिती होती. अशा परिस्थितीत गिरणी कामगारांच्या संपाचा पुकारा डॉ.दत्ता सामंत यांनी केला होता. तो संप सुरु होऊन 5-6 महिने झाले होते.

सभापती महोदय, या निमित्ताने मी एक गोष्ट मुद्दाम नमूद करतो. तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांना अनेक

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राम पंडागळे.....

गिरणी कामगारांनी या प्रश्नात लक्ष घालून कामगारांचा प्रश्न सोडविण्याची विनंती केली होती. त्याचवेळी कुली चित्रपटाचे बेंगलोर येथे चित्रीकरण सुरु होते. चित्रीकरणाच्या वेळी श्री.अमिताभ बच्चन यांना अपघात झाला होता. श्रीमती इंदिरा गांधी सर्व कार्यक्रम सोडून श्री.अभिताभ बच्चन यांना ब्रीच कॅण्डीमध्ये भेटण्यासाठी गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी मी यासंबंधी पत्रक काढले होते. श्रीमती इंदिरा गांधी यांना मी वर्तमानपत्राच्या माध्यमातून खुलेपणे विचारले होते. त्याबाबत सर्व वर्तमानपत्रातील पहिल्या पानावर बातमी आली होती. श्रीमती इंदिरा गांधी ह्या देशाच्या महिला पंतप्रधान असताना आमच्या मुंबईच्या कामगारांच्या मुलांच्या पोटात संध्याकाळचे अन्न जात नाही म्हणून , आपल्या मुलींचे ठरलेले लग्न होत नाही म्हणून, आपल्या मुलांचे संगोपन व शिक्षण होत नाही म्हणून, कामगारांच्या बायका अंगावर रॉकेल टाकून पेटवून घेऊ लागल्या आहेत. आपल्या मुलांचे उदरनिर्वाह होत नाही म्हणून कामगारांच्या बायका मुंबईतील रेल्वे प्लॅटफॉर्मवर जाऊन देह विक्री करु लागल्या आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही गिरणी कामगारांसाठी 5 मिनिटांचा वेळ देत नाही आणि ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये श्री.अमिताभ बच्चन यांना बघण्यासाठी जातात हे मुंबईकरांचे दुर्दैव आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

(सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी हे आपली जागा सोडून मार्गिकेमध्ये येऊन सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना उद्देशून काही वक्तव्ये करीत असतात.)

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, इंदिरा गांधी जी हमारे देश की सर्वमान्य नेता थीं. उनके बारे में इस तरह की बात कैसे की जा सकती है.... जूते से मारेंगे साले को..

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना मी भाषण करण्याची परवानगी देत नव्हतो. परंतु आपण सर्वांनी विनंती केल्यामुळे मी त्यांना भाषण करण्याची परवानगी दिली. त्यांनी आपल्या भाषणामध्ये स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या संबंधी जे काही उद्गार काढलेले आहेत ते गैरलागू असतील तर ते काढून टाकण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील आपले भाषण सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये जे काही झाले ते वेगळे आहे. सन्माननीय सदस्यांनी शिव्या दिलेल्या आहेत.

(सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी हे उभे राहून बोलत असतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आपण कृपया "लंका जलाके के हनुमान बना" अशी भूमिका घेऊ नका. सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. मी सभागृहाच्या कार्यवाहीतून आक्षेपार्ह वाक्ये काढून टाकलेली आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना बोलण्याची संधी द्यावी असा आग्रह धरल्या बद्दल मी माफी मागतो. परंतु त्यांनी गिरणी कामगारांच्या बायका देहविक्रय करतात अशा प्रकारचे शब्द वापरलेले आहेत ते देखील कार्यवृत्तातून काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांचे सर्व भाषण सभागृहाच्या पटलावरुन काढून टाकण्याबाबत सांगतो...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचा डोकोरम जात चालला आहे. खालच्या सभागृहाबद्दल या ठिकाणी बोलता येत नाही. या सभागृहाचा मी सदस्य असल्याबद्दल मला दु:ख होत आहे. या सभागृहामध्ये विशिष्ट उंचीवर चर्चा होत असते. मी आज विधानसभेच्या प्रेक्षक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

गॅलरीमध्ये बसलो असताना एका मंत्री महोदयांनी तेथेही शिवीगाळ केली आणि आज देखील या सभागृहामध्ये शिवीगाळ करण्यात आली. मला भरपूर दु:ख होत आहे. या सभागृहामध्ये मी सदस्य असताना या पध्दतीची चर्चा, या पध्दतीचे वागणे आणि बोलणे होत आहे हे बरोबर आहे असे वाटत नाही. ही हसण्यावारी नेण्यासारखी गोष्ट नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने सभागृहामध्ये अशोभनीय असे वर्तन होत आहे आणि याची दखल सर्व सन्माननीय सदस्यांनी घेण्याची गरज आहे असे मला वाटते.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उप सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.24 ते 2.34 पर्यन्त स्थगित झाली.)

...नंतर श्री. गिते...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याच्या प्रयत्न करतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये अत्यंत अश्लाध्यता निर्माण झालेली आहे. सन्माननीय सदस्य हे कॉग्रेस पक्षाचे सदस्य असून त्यांनी सभागृहात जे काही उद्गार वापरले आहेत आणि राष्ट्रवादी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना जामीन ठेवून बोलण्याची त्यांना संधी दिली...

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यांनी ज्या महिलेबद्दल अवमानकारक उद्गार काढले त्या संदर्भात काँग्रेस पक्षाचे प्रमुख म्हणून माननीय मुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी सदनामध्ये माफी मागितली पाहिजे, त्या शिवाय या सभागृहाचे कामकाज चालणार नाही. हा डेकोरमचा विषय आहे.

उप सभापती : मी सभागृहाची बैठक तहकूब करण्यापूर्वी या ठिकाणी काही प्रकार घडला. सभागृह चालविण्याचा अधिकार हा या ठिकाणी आसनस्थ असलेल्या सभापतींचा असतो. म्हणून सभागृहात एकंदरीत जे काही वर्तन घडले, बोलाचाली झाली किंवा हेत्वारोप करण्यात आले, अनुचित उद्गार काढण्यात आले त्या बद्दल या सदनाचा प्राधिकारी म्हणून मी स्वत: क्षमा मागतो....(अडथळा)....आता मी माघार घेणार नाही. निदान याच्या पुढे तरी सन्माननीय सदस्यांनी बोलत असताना आपण काय बोलतो याचे भान ठेवून बोलावे आणि या सभागृहाचे औचित्य तसेच सभागृहाची शान कायम ठेवावी एवढी विनंती करतो. आता सभागृहाचे नियमित कामकाज पुढे सुरु होईल. सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याचे काम हे आपणा सगळ्यांचेच आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण मघाशी सभागृह तहकूब करण्यापूर्वी या सभागृहात जो प्रकार घडला आणि ज्या माननीय सदस्यांकडून तो घडला त्या सदस्यांच्या वतीने आणि विशेषत: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यांकडून घडलेल्या चुकीच्या उल्लेखामुळे आणि चुकीच्या उद्गारामुळे सभागृहाची शान कमी झालेली आहे, त्याबद्दल पक्षाच्या वतीने प्रतोद या नात्याने मी दिलगिरी व्यक्त करतो आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांना विनंती करतो की, माननीय उप सभापतींनी सुध्दा या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे, तेव्हा हा विषय थांबवावा आणि सभागृहाचे कामकाज नियमितपणे पुढे सुरु करावे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या मार्गिकेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. ज्या पध्दतीने या सभागृहामध्ये आपण सर्वांना मान खाली घालावी लागेल या पध्दतीचे वक्तव्य आणि अत्यंत बेजबाबदारपणाचे वर्तन झाले त्याकरिता सन्माननीय उप सभापतींनी सभागृहामध्ये दिलगिरी व्यक्त केलेली आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

या अनुषंगाने माननीय उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर मी चर्चा करणार आहे. तसेच माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांसोबत देखील चर्चा करणार आहे. म्हणून माझी इच्छा आहे की, ...

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, जोपर्यंत यासंबंधीचा निर्णय होत नाही, जोपर्यंत सभागृहाचे नेते व माननीय मुख्यमंत्री माफी मागत नाहीत.....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, गिरणी कामगारांच्या गंभीर अशा प्रश्नावर सभागृहात चर्चा होत असताना जे वक्तव्य येथे करण्यात आले, जो असभ्यपणा दाखविण्यात आला, ज्या पध्दतीचे वर्तन झाले मग ते दोन्ही बाजूने असेल पण जे घडले ते योग्य नाही. हे सभागृह वरिष्ठ सभागृह आहे व येथे उच्चस्तरीय चर्चा होत असतात. अशा सभागृहात शिवीगाळ करणे किंवा गिरणी कामगारांच्या महिलांबद्दल असभ्य बोलणे इतक्या वाईट पध्दतीने झाले ते चांगले नाही. तसेच यासंबंधी माननीय उप सभापतींनी माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही. वास्तविक त्यांचा यामध्ये काहीच दोष नाही. खरे तर संबंधित पक्षाच्या नेत्यांनी या प्रकरणी सभागृहाची माफी मागितली पाहिजे, कारण त्यांच्या सदस्यांनीच गैरवर्तन केलेले आहे, अशा सदस्यांवर काय कारवाई करणार आहात हे स्पष्ट झाले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहात गांभीर्याने चर्चा चालू असताना शिवीगाळ तसेच महिलांच्या अब्रूपर्यंत आम्ही जाणार असू ते योग्य नाही. म्हणून यासंबंधीचा निर्णय झाला पाहिजे. माझी विनंती आहे की, किमान त्यांना .....अडथळा.....

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, सभागृहात जो प्रकार घडला त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी दिलगिरी व्यक्त करुन हा विषय कामकाजातून काढून टाकण्याची विनंती केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभागृहात कोणत्याही सदस्याने अशा प्रकारचे असभ्य वर्तन केले तर त्यासंबंधी कारवाई झालीच पाहिजे. माझी अशी मागणी आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचे वर्तन केले त्यांच्या विरुध्द निलंबनाचा प्रस्ताव आणावा, तोपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे आणि कृपा करुन या सभागृहात सर्वसामान्य माणसाची अप्रतिष्ठा केली जाते असा संदेश जनमानसात जाऊ नये. सभागृहाचे संपूर्ण कामकाज आम्ही करण्यास तयार आहोत पण यासंबंधीचा निर्णय झाला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, सभागृहात जो प्रकार घडला तो सर्वांनाच मान खाली घालायला लावणारा आहे. म्हणून मी सांगितले की, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कामकाज मंत्री यांच्याबरोबर मी चर्चा करतो आणि या प्रसंगाच्या बाबतीत जेवढा कठोर निर्णय घेणे आवश्यक असेल तेवढा कठोर निर्णय घेण्यात येईल. मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 2.43 वाजता, 15 मिनिटांसाठी स्थगित झाली)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर)

तालिका सभापती (श्री. परशुराम उपरकर) : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 2.58 वाजता, 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आजची परिस्थिती पाहिली तर मला सांगावयास खेद वाटतो की, त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन या सरकारने ज्या पध्दतीने काम करावयास पाहिजे होते, परंतु या सरकारने राज्यातील जनतेची आणि विधीमंडळाची वेळोवेळी दिशाभूल केल्याचे दिसते. सरकारच्या गाडीला गिअरच पडत नाही काय ? अशा प्रकारची सरकारची अवस्था असल्याचे आपल्याला गेल्या दहा वर्षापासून दिसत आहे. मला ही गाडी पंक्चर झाली आहे असे वाटते. कारण शासनाचा एकही निर्णय मग तो शिक्षणाच्या बाबतीत असो किंवा सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत असो, आदिवासी विभागाशी संबंधित असो, समाजकल्याण विभागाच्या बाबतीत असो तो राबविला जात नाही. एवढेच नाहीतर महाराष्ट्रातील रस्त्यांवरील खड्डयांबाबत देखील येथील जनतेला कोर्टामध्ये रिट पिटीशन टाकून कोर्टामधून निर्णय आणावे लागतात अशी या सरकारची अवस्था आहे. त्यामुळे मला सांगावयास खे्द वाटतो की, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने सरकारने त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन काही काम केले आहे असे दिसत नाही.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 3 मध्ये आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष जाहीर झालेले आहे आणि महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने सहकारामध्ये अग्रेसर होता, प्रगतीपथावर होता. परंतु आज या सहकार क्षेत्राची अवस्था काय आहे तर या क्षेत्रातील असंख्य बँका बुडालेल्या आहेत. अनेक बँकांचे जे संचालक आहेत ते निरनिराळ्या राजकीय क्षेत्रातील पुढारी असून ठेवीदारांना वाऱ्यावर सोडण्यात आलेले आहे. या महाराष्ट्रामध्ये शेकडो बँकांना बुडवणारे बाहेर आहेत आणि जे बुडालेले ठेवीदार आहेत त्यांना वाऱ्यावर सोडल्यासारखी अवस्था सहकार खात्याने केलेली आहे आणि तरी देखील संबंधित निवडून येतात अशी स्थिती आहे.आज जरी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असले तरी देखील अजून सहकाराच्या संबंधातील ठोस धोरण तयार करण्यात आलेले नाही. तसेच साध्या-साध्या पतसंस्था आहेत ज्या गोरगरीबांना मदत करतात. या पतसंस्थांना बंधपत्र देणे हे सरकारच्या नियमाप्रमाणे बंधनकारक आहे. परंतु आज महाराष्ट्रामध्ये अशी अवस्था आहे की, 100 तील 80 संस्थांनी बंधपत्र दिलेली नाहीत. खरे म्हणजे संचालक मंडळ निर्माण झाल्यानंतर 15 दिवसामध्ये ती द्यावी लागतात. मग याबाबतीत कोणीतरी तक्रार केल्यानंतर ती पतसंस्था रद्द होते आणि तेथे पुन्हा निवडणूक होते. काही बँकांच्या बाबतीत देखील असेच आहे. मी या निमित्ताने आपल्याला सर्वांना सांगू इच्छितो की, बंधपत्राच्या अटीबाबत एखादा अध्यादेश काढला पाहिजे, कारण पतसंस्थांच्या माध्यमातून या महाराष्ट्रातील अनेक लोकांना याचा उपयोग होत आहे. केवळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

बंधपत्र नाही म्हणून या पतसंस्था बंद होता कामा नयेत. म्हणून यासंबंधात अध्यादेश काढावा. तसेच बंधपत्राची मुदत देखील वाढविण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.4 हा राज्याचा समतोल प्रादेशिक विकास साधण्याच्या संदर्भातील आहे. परंतु जर या सरकारने महाराष्ट्र राज्याचा खरोखर समतोल विकास केला असता तर कोकणाच्या बाबतीत वेळोवेळी निरनिराळया क्षेत्रामध्ये अन्याय झाला नसता. मग कोकणातील सिंचनाचा विषय असो, मच्छीमारांच्या बाबतीत असो,नद्यांच्या बाबतीत असो, धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या बाबतीत असो किंवा तेथील किल्ल्यांच्या बाबतीत असो तेथे कोणत्याही क्षेत्रामध्ये समतोल विकास झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे कोकणातील जे सन्माननीय सदस्य आहेत ते वेळोवेळी ही बाब सरकारच्या निदर्शनास आणत असतात, सरकारचे लक्ष वेधत असतात.पण मला सांगावयास खेद वाटतो की, या सरकारने कोकणाच्या बाबतीत सातत्याने अन्याय केलेला असल्यामुळे कोकणातील लोक जे स्वप्न पहात आहेत की, जगातील पर्यटक कोकणामध्ये आला पाहिजे आणि कोकणातील आंबा जगभरामध्ये गेला पाहिजे.परंतु यासाठी सरकारच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात आल्याचे आपल्याला दिसून येत नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये ठाणे जिल्ह्याचा देखील समावेश आहे. तसेच एम.एम. आर.डी.ए.च्या संदर्भात सांगावयाचे तर या संस्थेवर सरकारचे पूर्णपणे नियंत्रण आहे.परंतु ठाणे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असताना तेथे तशा प्रकारचा समतोल विकास होत असल्याचे दिसून येत नाही. मुंबईसाठी निधी खर्च केला जातो.परंतु ठाणे जिल्ह्यामध्ये एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून जो निधी खर्च व्हावयास पाहिजे तसा तो झालेला दिसत नाही. तसेच एम.एम.आर.डी.च्या बाबतीत देखील अनुशेष असून पाच वर्षापूर्वी ठाणे जिल्ह्यासाठी आणि रायगड जिल्ह्यासाठी सहा हजार कोटी रुपयांचा अनुशेष होता. त्यामुळे समतोल विकास कुठे आहे? असा माझा प्रश्न आहे आणि माननीय राज्यपाल यांनी याबाबत जो मुद्दा मांडलेला आहे त्याबद्दल मला खेद होत आहे कारण हा काही समतोल विकास नाही तर हा एकतर्फी विकास आहे की काय ? अशा प्रकारची शंका या भागामध्ये रहाणाऱ्या लोकांच्या मनामध्ये निर्माण होत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, समतोल विकासाच्या निमित्ताने आणखी एक बाब सांगू इच्छितो की, आज महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायतींचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झालेले आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असताना तेथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधक्मे आणि अतिक्रमणे वाढत आहेत. आपण ठाणे जिल्ह्यातील बोईसर ग्रामपंचायतीचा विचार केल्यास त्या ठिकाणी एखाद्या महानगरपालिकेसारखी वस्ती झालेली आहे. त्या ठिकाणी मोठमोठे मॉल्स व इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. परंतु बोईसर अजूनही ग्रामपंचायत आहे. तेव्हा आपली विकास नियंत्रण नियमावली कोठे गेली ? आपणास त्या ठिक्माणी चांगल्या पध्दतीने विकास करायचा असेल तर बोईसरला वेळीच नगरपालिकेचा दर्जा देणे आवश्यक आहे. त्या भागाकरिता सरकारच्या माध्यमातून एक विकास नियंत्रण नियमावली बनविली तर त्या ठिकाणी योग्य पध्दतीने रस्ते होतील, योग्य पध्दतीने इमारती बांधल्या जातील. आज या ग्रामपंचायतीं मोठ्या झालेल्या आहेत, तेथे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण होत आहे, तेव्हा आपण त्या ठिकाणी वेळीच विकास नियंत्रण नियमावली आणली पाहिजे. आपणास समतोल विकास साधायचा असेल तर ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या वाढलेली आहे किंवा जेथे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे त्या ठिकाणी तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी अर्थसहाय्य मंजूर केल्याचा उल्लेख आहे. त्या बाबत सांगू इच्छितो की, या वर्षी चांगले पर्जन्यमान होऊन सुध्दा पाण्याचे व्यवस्थित नियोजन न केल्यामुळे राज्यातील अनेक भागांत जानेवारी व फेब्रुवारी महिन्यापासून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. त्यामुळे राज्यातील पशुधन सुध्दा चाऱ्या अभावी संकटात सापडले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे. परंतु अर्थसहाय्य मिळवण्यासाठी अशक्यप्राय अटी व शर्ती घातल्यामुळे सामान्य शेतकरी या आर्थिक मदतीपासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्याला लाभ मिळण्यासाठी त्याला ठोस मदत करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 8 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण लागू केल्या संबंधीचा उल्लेख आहे. आपण महिलांसाठी 50 टक्के आरक्षण दिले ही चांगली गोष्ट आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये त्यांना आपण एक प्रकारचे समान बळ दिले. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांना जे बाकीचे बळ द्यावे लागते ते सरकारने दिलेले नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था दिवसेंदिवस आर्थिकदृष्टया कमकुवत झालेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाबतीत राजकारण केले जाते. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये विरोधकांची सत्ता असेल त्याठिकाणी अनेक विकास कामांमध्ये अडथळे आणले जातात. ठाणे जिल्ह्यातील गावदेवी मार्केटच्या बाबतीत असा प्रकार झालेला आहे. गावदेवी मार्केटच्या संदर्भात महापालिकेच्या अधिकाऱ्यांना 72 वेळा मंत्रालयात खेटे मारावे लागल्याचे पासेस त्यांनी दाखविले. त्यानंतर गावदेवी मार्केटची जागा हस्तांतरीत झाली आणि आता त्या ठिकाणी मार्केट होणार आहे. एखादा उपक्रम पाच-सहा वर्षे कसा पोस्टपोन केला जातो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

सभापती महोदय, पेट्रोल आणि डिझेलच्या संदर्भात ऑक्ट्रॉय कमी करण्यासाठी सरकारकडे एक वर्षापूर्वी विनंती केलेली आहे. परंतु अजून त्यावर निर्णय झालेला नाही. या निर्णयामुळे ठाण्यातील जनतेला याचा निश्चितपणे फायदा झाला असता. ऑक्ट्रॉय कमी करण्या संदर्भात शासनाने मंजुरी दिली तर पेट्रोल आणि डिझेलचे भाव निश्चितपणे कमी झाले असते. आता पुन्हा पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढणार आहेत. परंतु सरकारला अजून जाग आलेली नाही. सरकारने त्या प्रपोझलला अजून मान्यता दिलेली नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महिलांकरिता हेल्पलाईन सुरु करण्यात आल्याचा उल्लेख आहे. खरे म्हणजे ही सुविधा 24 तास उपलब्ध असली पाहिजे. त्याच प्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी देखील हेल्पलाईनची सुविधा उपलब्ध असली पाहिजे असे सरकारने धोरण आखायला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दहशतवादी आणि नक्षलवादी कारवायांची समस्या प्रभावीपणे हाताळण्यासंबंधीचा उल्लेख आहे. मला या ठिकाणी सांगण्यास खेद वाटतो की, आज गावागावांतील वाळू माफियांना रोखण्यामध्ये सरकारला यश आलेले नाही. त्यांना अडथळा करणाऱ्या सरकारी अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांचे ते मुडदे पाडत आहेत. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये दहशत निर्माण करीत आहेत. एकीकडे शासन दहशतवादी आणि नक्षलवादी कारवाया प्रभावीपणे हाताळण्यासाठी कार्यवाही करीत आहे तर दुसरीकडे वाळू माफियांना रोखण्यात शासनाला यश आलेले नाही. आज शहरात मोठ्या प्रमाणावर दरोडे पडत आहेत, छोट्या मोठ्या चोऱ्या होत आहेत. गळ्यातील मंगळसूत्र आणि चेन पळविण्याचे प्रकार घडत आहेत या घटना रोखण्यात सरकारला अपयश आलेले आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये "ग्रामसभा बळकटीकरण अभियानाचा" उल्लेख आहे. परंतु आज कोणताही विचारविनिमय न करता, सामान्य जनतेला गृहीत धरुन आपल्या मर्जीप्रमाणे कार्यवाही होताना आपण पाहत आहोत.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर. . . .

या ठिकाणी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो. हजारो लाभार्थी प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहतात. गावामध्ये इंदिरा आवास योजना भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे तरी देखील ग्रामसभेच्या बळकटीकरणाचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. मला सांगण्यास खेद वाटतो की, या उपाययोजना कागदावर राहिलेल्या आहेत. खऱ्या अर्थाने ग्रामसभेला कुठल्याही प्रकारची बळकटी आलेली दिसत नाही.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 26 मध्ये असे म्हटलेले आहे की,"प्रतिकूल हवामानामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या आर्थिक हानीपासून वाचविण्यासाठी हवामानावर आधारित फळ पीक विमा योजना सुरु केली आहे." यामध्ये अनेक फळांसाठी फळ पीक विमा योजना चालू केली आहे. कोकणातील आंबा आणि काजू या पिकांचा यामध्ये अंतर्भाव व्हावा यासाठी आम्ही आग्रही होतो त्यामुळे कोकणातील या दोन पिकांचा या फळ पीक विमा योजनेमध्ये अंतर्भाव केला त्यावेळी आम्ही शासनाला धन्यवाद दिले. परंतु कोकणातील भौगोलिक परिस्थिती व वातावरणातील वैविध्य विचारात न घेता विमा कंपनीने ऑटो वेदर स्टेशन बसविण्याचा निर्णय घेतलेला आहे. ते ऑटो वेदर स्टेशन्स अद्यापपर्यंत बसविण्यात आलेले नाहीत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विमा हप्त्याची रक्कम परवडेल अशी ठेवावयास पाहिजे होती ती शेतकऱ्यांना परवडेल अशी ठेवली न गेल्यामुळे शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात विमा घेता येणार नाही हे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.हापूस आणि काजू या फळ पिकाखालील एकूण क्षेत्र लक्षात घेता शासनाने यासाठी निर्धारित केलेले संरक्षित क्षेत्र खूपच कमी आहे त्यामुळे या बाबतीत शासनाने पुनर्विचार करावयास पाहिजे.

सभापती महोदय,मी या ठिकाणी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 54 मध्ये असे म्हटले आहे की, "नद्यांच्या काठावर वसलेली शहरे आणि मोठी गावे यांमधून सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणापासून नदीच्या पाण्याचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजना सुरु केलेली आहे".परंतु अद्यापपर्यंत ठाणे जिल्हयातील आणि कोकणातील हे प्रदूषण दूर झालेले नाही. वेळोवेळी या नद्यांचा गाळ उपसा करण्यासाठी मग वशिष्टी नदी असो, अर्जुना नदी असो अशा ज्या अनेक नद्या कोकणात आहेत त्या नद्यातील गाळ उपसा करण्यासाठी जे ठोस धोरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर. . . .

निर्माण करावयास पाहिजे, त्यासाठी आर्थिक तरतूद करावयास पाहिजे ती झालेली नाही. त्यामुळे मला खेद वाटतो तेव्हा यासाठी ठोस धोरण व आर्थिक तरतूद होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या भाषणातील मुद्दा क्रमांक 61 मध्ये बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या बाबतीत शासन अग्रेसर आहे असे म्हटलेले आहे. परंतु मला या ठिकाणी सांगण्यास खेद वाटतो की, या महाराष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने शिक्षणाचा खेळखंडोबा चाललेला आहे. शिक्षक असो, शिक्षण असो, शिक्षण संस्था असोत या शिक्षणामधून पिढी घडवावयाची आहे. त्याकरिता ज्या पध्दतीने चांगले धोरण आखावयास पाहिजे, ज्या पध्दतीची भूमिका घ्यावयास पाहिजे आणि यासाठी लागणारे आर्थिक नियोजन करावयास पाहिजे, ते झालेले दिसत नाही त्यामुळे खऱ्या अर्थाने शिक्षणाचा विस्तार आणि शिक्षणाची संस्कृती मोठया प्रमाणात निर्माण केली गेलेली नाही. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये अभिनंदन करण्यासारखा कुठलाही मुद्दा नाही त्यामुळे या अभिभाषणातील सगळया मुद्यांबाबत आम्ही खेद व्यक्त करतो. शासन सर्व आघाडयांवर अयशस्वी ठरलेले आहे. शासनाने या महाराष्ट्रातील लोकांच्या डोक्यावर मोठया प्रमाणात कर्ज टाकलेले आहे याच्या पलीकडे काही केलेले नाही एवढेच बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,कै. माननीय यशवंतरव चव्हाण यांच्या जन्म शताब्दीचे हे वर्ष शासन साजरे करीत आहे. या देशामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना खऱ्या अर्थाने बळकटी देण्यासाठी आणि ग्रामीण भागामध्ये जिल्हा स्तरावर एक मिनी विधानसभा असावी असे अभिप्रेत असणारे कै. यशवंतराव चव्हाण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करताना 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली आणि त्यानुसार जिल्हा नियोजन समितीचे गठन करण्याचा अधिकार घटनेने प्राप्त झाला. या अगोदर शासन नॉमिनेशन करावयाचे, जी.आर. काढावयाचे आणि आपल्या सोयीप्रमाणे सत्ताधारी पक्षाला पूरक असेल अशाच नियोजन समितीचे गठन करावयाचे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

या त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्तीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार प्राप्त झाले. त्याचप्रमाणे स्व. राजीव गांधी यांनी चौऱ्याहत्तराव्या घटना दुरुस्तीच्या निमित्ताने या ठिकाणी जिल्हा नियोजन समित्यांची नियुक्ती केली. या समित्यांची निर्मिती करीत असताना त्यामध्ये जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी, नगरपालिकेचे प्रतिनिधी यांचे प्रतिनिधित्व जास्त असण्याचा अधिकार प्राप्त झाला.

सभापती महोदय, हे शासन काय करीत आहे ? या चौऱ्याहत्तराव्या घटना दुरुस्तीच्या निमित्ताने ज्यावेळी हे अधिकार प्राप्त झाले त्या वेळेला ही बाब सत्ताधारी पक्षाला अडचणीची आहे म्हणून या नियोजन समित्याच गठीत करण्यात आल्या नाहीत. म्हणून आम्ही हायकोर्टात गेलो की, चौऱ्याहत्तराव्या घटना दुरुस्तीच्या अधिकाराने या नियोजन समित्या कार्यरत झाल्या पाहिजेत. हायकोर्टाच्या आदेशाने त्या वेळेला या समित्या गठीत झाल्या. तोपर्यंत अशी परिस्थिती होती की, पालकमंत्री आणि आपण आमदार एवढेच त्या ठिकाणी या नियोजन समित्या चालवित होतो. आता असे झाले की, आचारसंहितेचे निमित्त सांगून रायगड जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी एक जी.आर. काढला. अर्थ खात्याने एक जी.आर. काढला की, आता निवडणुका आहेत, आचारसंहिता आहे म्हणून हा कार्यक्रम पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर करावा नाही तर निधी व्यपगत होईल आणि ते विकासाला बाधक होईल म्हणून जी.आर.काढला.. हा जी.आर.माझ्याकडे आहे. त्याच्या आधी आम्ही पत्र दिले. जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य, आमदार, रायगडचे दोन्ही खासदार, आम्ही पत्र दिले की, आपण तातडीने बैठक बोलवावी, पंधरा दिवसांनी आचारसंहिता सुरु होईल. पण बैठक बोलविली नाही आणि कार्यक्रम केला. निवडणुकीची तयारी म्हणून प्रत्येक ठिकाणी 5 लाख रुपये, 7 लाख रुपये, 10 लाख रुपये, 15 लाख रुपये वाटप करण्याचा कार्यक्रम केला. जी कामे मंजूर आहेत, जी कामे जिल्हा परिषदेने घेतलेली आहेत, जी कामे आमदार फंडातून घेतली आहेत, जी कामे एस.आर.मधून, सी.आर.मधून घेतली आहेत त्याच कामावर 19 कोटी रुपये निवडणुकीसाठी वाटप करण्याचा कार्यक्रम घेतला. आम्ही त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना घेराव घातला. जिल्हा नियोजन मंडळाचे सगळे सदस्य, आमदार, आम्ही सर्व त्या ठिकाणी गेलो आणि सांगितले की, हा आमचा अधिकार आहे. रायगड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

जिल्ह्यामध्ये आम्ही मजबूत आहोत, मजबूत म्हणाण्यापेक्षा रायगड जिल्ह्यामध्ये आम्ही जागरुक आहोत आणि त्या जागरुकतेमुळे आम्ही त्या ठिकाणी हा निधी थांबविण्याचे काम केले आणि वाटप थांबविले. ज्या सचिवांनी घटनेची पायमल्ली करुन हा जी.आर.काढला त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. घटनेच्या आर्टिकल 293(43) क, घ मध्ये जिल्हा नियोजन समिती कशी गठीत करावी हे दिलेले आहे.

सभापती महोदय, गेल्या आठवड्यामध्ये आम्ही विशेष हक्क समितीमध्ये काम करीत होतो. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर सुध्दा उपस्थित होते. त्या ठिकाणी आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी जे सचिव आहेत ते असे म्हणतात की, अशी घटनादुरुस्ती नाही. घटनेमध्ये असे नाहीच. मी चुकीचे बोलतो का ? मी पुण्यामध्ये जाऊन संविधानाचे एक पुस्तक घेतले. मला इंग्रजी कमी येतो. मला थोडेफार इंग्रजी येते. मला इंग्रजी वाचता येते. मला श्री. चव्हाण साहेबांपेक्षा कमी इंग्रजी येते. घटनेमध्ये काय म्हटले आहे हे समजावे म्हणून मी मराठी पुस्तक आणले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

अशा प्रकारे शासकीय पैशांचा वापर होत असेल तर राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्याशिवाय आमच्यासमोर दुसरा पर्याय शिल्लक राहत नाही. घटनेची पायमल्ली करुन शासन कारभार करीत असेल व शासकीय पैशाची खाजगी मालमत्ता समजून वाटप करीत असेल तर त्यावर चर्चा करण्यासाठी आम्हाला हे एकच व्यासपीठ आहे. आम्ही या सभागृहात आमदार म्हणून बोलत आहोत. उद्या जिल्हाधिकारी सांगतील की, तुम्ही निवडून आला असला तरी आम्हाला मुख्य सचिवांनी सांगितल्याशिवाय तुम्हाला प्रमाणपत्र देणार नाही. हे चालणार नाही. (अडथळा)

सभापती महोदय, राज्यपालांचे आम्ही कशासाठी आभार मानावयाचे, घटनेची पायमल्ली करणाऱ्या सरकारचे आम्ही कशासाठी आभार मानावयाचे, शासकीय पैशाची लूट करीत असताना आम्ही आभार मानावयाचे काय, शासकीय निधीचा वापर निवडणुकीचा फंड म्हणून वापरणार आणि शासकीय मालमत्ता स्वत:ची आहे असे समजून राज्यकर्ते वागत असतील त्यासाठी आभार मानावयाचे काय ? मघाशी माननीय विरोधी पक्ष नेते असे म्हणाले की, मी मार्क्सवादी आहे. शेवटी आम्हाला बंदूक हातामध्ये घ्यावी लागेल. हे अधिकारी अशा प्रकारे काम करीत असतील तर आम्हाला हातात बंदूक घ्यावी लागेल आणि घटनेचे संरक्षण करावे लागेल. जी घटना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील असे म्हणाले की, आम्हाला हातात बंदूक घ्यावी लागेल. त्यांचे हे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नक्षलवादी म्हणजे कोण आहेत, सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांना मी सांगू इच्छितो की, आपण ज्या चळवळीत काम केलेले आहे त्याप्रमाणे मी सुध्दा केलेले आहे. शहीद भगतसिंग यांना सुध्दा लोक असेच बोलत होते. स्वातंत्र्य मागत असताना भगतसिंग यांच्यामुळे आपण लढाई जिंकलो. तशा मुशीतून आपण तयार झालेलो आहोत. त्यामुळे आपल्याकडून अशी अपेक्षा नाही. मी राजकीय भाष्य करीत नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, चळवळीला माझा विरोध नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मघाशी नक्षलवादी हातात बंदुका घेतात त्याप्रमाणे आम्हाला बंदुका हातात घ्याव्या लागतील असे म्हटले आहे. या विधानाला माझा आक्षेप आहे. मार्क्सवादाला माझा आक्षेप नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील : मी माझ्या वाक्याचा पुन्हा उच्चार करतो. आमचा एक पाय हायकोर्टामध्ये असतो. सन्माननीय सदस्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या असल्यामुळे त्यांना वस्तुस्थिती माहीत नाही. पण आम्हाला आमच्या वेदना व दु:ख माहीत आहे. राजकीय जीवनात काम करीत असताना राज्यकर्ते अशा प्रकारे कारभार करीत असतील तर ते योग्य नाही. आम्हाला या घटनेचे महत्व काय आहे ते माहीत आहे. आम्ही सुध्दा घटनेच्या आधारावर कामकाज करीत असतो. पण या घटनेचीच कोणी पायमल्ली करीत असेल तर या ठिकाणी कशासाठी यावयाचे ? हे अर्थसंकल्पीय अधिवेशन कशासाठी पाहिजे, आम्हाला घरीच भत्ते पाठवून द्यावे. येथे येण्याची गरज नाही. अर्थसंकल्प मंजूर करण्याची गरज नाही. या विषयाला सन्माननीय सदस्यांचा आक्षेप नाही. पण आम्हाला बंदुका हातात का घ्याव्या लागल्या त्याचा त्यांनी विचार करावा. परकीय देशाला स्वातंत्र्य देत नाहीत म्हणून भगतसिंग यांनी हातात बंदूक घेतली होती. भगतसिंग यांचे आपण वारसदार आहोत. भगतसिंग यांचे नाव आपण आदराने घेतो. पण त्यावेळी सुध्दा भगतसिंग चुकीचे आहेत असे म्हटले जात होते. सावरकर चुकीचे आहेत असे म्हणणारे या देशात महाभाग होऊन गेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना विरोध करणारे अर्धे देशमुख ते देखील मराठेच होते हा इतिहास आहे. त्यापैकी मराठवाड्यातील अधिक होते.

जिल्हा नियोजन समिती म्हणजे पालक मंत्र्यांची खाजगी मालमत्ता झालेली आहे. जे पालक मंत्री आहेत ते मालक आहेत. ज्या जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे पालक मंत्री आहेत तेथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दु:ख आहे आणि ज्या जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पालक मंत्री आहेत तेथे काँग्रेस पक्षाला दु:ख आहे.

यानंतर श्री.शिगम....

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी माझ्या बोलण्यावर आक्षेप घेतला याचे मला दु:ख होतेय. मी दोनच मुद्यावर बोलणार आहे.

सभापती महोदय, जिल्हा नियोजन मंडळाचे काम पहा. 10 मिनिटामध्ये जिल्हा नियोजन मंडळाची मिटींग आटोपते. सभागृहातील सन्माननीय सदस्यांना हे माहीत आहे. गेल्या वेळी मी जिल्हा नियोजन मंडळाची मिटींग 7 तास चालविली. मी दर वर्षी ऑगस्ट महिन्यातील 2 तारखेला विविध देशामध्ये अभ्यास दौरा करण्यासाठी जातो आणि स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी 15 ऑगस्टला परत येतो. जिल्हा नियोजन मंडळाची 16 ऑगस्टला मिटींग होती. त्यांना वाटले होते की, जयंत प्र. पाटील काही येणार नाही. परंतु मी अभ्यासदौ-यावरुन विमानाने आल्यानंतर आंघोळ न करताच तसाच जिल्हा नियोजन मंडळाच्या मिटींगला गेलो आणि शांतपणे 7 तास मिटींग चालवली. अधिका-यांना देखील असे वाटते की, जिल्हा नियोजन मंडळ ही पालक मंत्र्यांची खाजगी मालमत्ता आहे. यावर सर्वपक्षीय आमदारांनी विचार केला पाहिजे. काही ठिकाणी पालक मंत्र्यांची मेजॉरिटी नाही. आमच्या रायगड जिल्हा नियोजन मंडळामध्ये पालक मंत्र्यांची मेजॉरिटी नसून विरोधी पक्षाची मेजॉरिटी आहे. मग हसून बोलायचे, छाती वर काढून सांगायचे, गोड गोड बोलायचे आणि मंजूर करुन घ्यायचे असे चालले आहे. जिल्हा नियोजन मंडळ ही कुणाची खाजगी मालमत्ता नाही. आम्ही आमच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी सांगत नाही. म्हणून हे जे काही चालले आहे त्याचे दु:ख होते. आता वाटायला लागले की आमदारकी नको, बस झाले....सभापती महोदय, तेथील कलेक्टरला मी उचलले. तेथे पोलीस बंदोबस्तात आमदार होते. रायगड कलेक्टरची खुर्ची उचलली आणि त्याला सांगितले की, बाबा हे रायगड आहे, येथे तुला वाटेल तसे वागता येणार नाही. दोन वेळा खुर्ची आपटून त्याला खाली बसवले. 25 पोलीस बरोबर होते. जिल्हा नियोजन बैठकीसाठी गेलो त्यावेळी 100 पोलीसांचा गराडा होता. आम्ही त्यांना मारु की काय म्हणून ते घाबरले होते... याला लोकशाही म्हणायची काय ? म्हणून मी सांगितले की भगतसिंग निर्माण होतात. दुसरे आमच्या हातात काही नाही.

सभापती महोदय, या राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करीत असताना जिल्हा नियोजन मंडळाचा कारभार घटनेप्रमाणे चालला पाहिजे एवढेच आम्हाला अभिप्रेत आहे. या सभागृहामध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि आमच्या सारखे सदस्य आहेत जे या सभागृहाच्या डेकोरमला कुठे धक्का लागणार नाही याची सतत काळजी घेत असतात. मघाशी मी सांगितले की, सभागृहाचा डेकोरम बरोबर नाही. आम्ही त्यावेळी राजकारण आणले नाही. आम्ही विशिष्ट विचाराने काम करणारे आमदार आहोत. आम्ही पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून काम करीत असतो. या पेक्षा आम्ही काय करायचे ? जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने निधी वापरला जातो. त्याबाबतीत नंतर मला जिल्हाधिका-यांनी पत्र लिहिले की, चूक झाली. असे प्रकार होत असतील तर मग हातात बंदूक घ्यायची नाही तर काय कराचे ? दुसरे आमच्या हातामध्ये काय आहे ? म्हणून या अभिभाषणा बद्दल मी खेद व्यक्त करीत असताना सांगू इच्छितो की, ज्या अधिका-याने घटनेची पायमल्ली करुन जे जी.आर. काढलेले आहेत त्या अधिका-यावर कारवाई झाली पाहिजे. अशा घटनांची पुनरावृत्ती होता कामा नये. सभापती महोदय, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही. पण काळ सोकावतोय. मी जिल्हाधिका-यांना देखील सांगितले की, मी थोडा तापट आहे, आक्रमक आहे. पूर्वी जेवढा होतो त्यातील 20 टक्के देखील मी आता राहिलो नाही. माझे वडील यापेक्षा जास्त आक्रमक होते. मी पुरवणी मागण्यांवर देखील बोलणार आहे. अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना वेळेची मर्यादा येते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे बिलावर अभ्यासपूर्ण आणि विस्तृतपणे बोलतात त्याप्रमाणे मी देखील विस्तृतपणे बोलणार आहे.

सभापती महोदय, मला आणखी एका गोष्टीचा खेद होतोय तो म्हणजे राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्यामध्ये 4.31 लाख हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली आणल्याचे सांगितलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

अनुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, शासनाने एम.एम.आर.डी.ए.ला विकासाची कामे दिली आहेत. मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर ही शहरे अतिशय गतीने वाढत आहेत. ज्या गतीने शहरे वाढत आहेत, त्या गतीने पाण्याचे नियोजन केले गेलेले दिसून येत नाही. शेतीसाठी पुढील 50 वर्षाकरिता राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने पाण्याचे नियोजन कशा पध्दतीने करावयाचे हे ठरविले आहे. शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे जे साठे आहेत, ते सगळे पाण्याचे साठे नागरीकरणासाठी वापरले जात आहेत. आमच्या शेतीसाठी लागणारे पाणी नागरीकरणासाठी घेतले जात आहे, ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे आणि त्याबाबतचा साधा उल्लेखही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही याचा मला खेद वाटतो.

सभापती महोदय, रायगड जिल्हयात हेटवणे धरणाचे पाणी आहे. बाणगंगा धरणाचे पाणी आहे, या धरणातील पाणी सिडकोच्या माध्यमातून नागरीकरणासाठी नवी मुंबईत वापरण्यात येत आहे. तसेच खालापूर येथील चौक धरणातील पाणी शेतीसाठी होते. ते पाणी नागरीकरणासाठी नवी मुंबई येथे वापरण्यात येत आहे. पिण्यासाठी असलेले पाणी आणि सिंचनासाठी असलेले पाणी यासंबंधी जी आकडेवारी शासनाकडून दिली गेली आहे, ती पूर्णपणे फसवी आहे. अतिशय बोगस अशी आकडेवारी दिली गेली आहे. पाण्यासारख्या गंभीर बाबीकडे शासनाने लक्ष घालणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अपूर्ण असलेली कामे पूर्ण केल्याशिवाय नवीन कामे घेण्यात येऊ नयेत अशा प्रकारचे शासनाचे आदेश आहेत. त्या आदेशा बाबतची माहिती माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर साहेब, आपणच मला सांगितली. आपण कृष्णा खोऱ्याचे शिल्पकार आहात. मी आमदार नव्हतो, त्यावेळी माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर साहेबांनी मला सांगितले की, मी कृष्णा खोरे विकासासाठी युती सरकारला पाठिंबा दिला आहे. त्यांनी मला सांगितले की, मी कृष्णा खोऱ्याची निर्मिती केली आहे. त्यांनी त्यावेळी असेही सांगितले की, अपूर्ण कामे पूर्ण झाल्याशिवाय नवीन कामे घेऊ नका. जे प्रकल्प अपूर्ण आहेत, ते पूर्ण होईपर्यंत नवीन प्रकल्पांची कामे हाती घेऊ नये. नवीन प्रकल्प का घेऊ नये याबाबतीत मी नंतर सविस्तरपणे बोलणार आहे. नवीन प्रकल्प आले की, पर्यायाने 10 टक्के आले. जुन्या प्रकल्पासाठी पैसे उपलब्ध होत नाहीत. म्हणून त्यास

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

रस दाखविण्यात येत नाही. नवीन प्रकल्प आले तर मोबलाईज ॲडव्हान्स येतो, मशिनरीसाठी ॲडव्हान्स येतो. 10 टक्के दिल्याशिवाय प्रकल्पांची कामे मंजूर होत नाहीत. ही संपूर्ण आकडेवारी फसवी आहे. शेतीसाठी उपलब्ध असलेले पाणी नागरीकरणासाठी वापरण्याचे काम राज्य शासनाकडून होत आहे, ते काम ताबडतोबीने थांबविले पाहिजे आणि नागरीकरणासाठी नवीन पाणी साठयांचे संशोधन करुन तेथील पाणी नागरीकरणासाठी उपलब्ध करुन दिले पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, ग्रामपंचायतींचे विभाजन झाले पाहिजे असा माझा एक महत्वाचा मुद्दा आहे. माननीय यशवंतराव चव्हाण यांना या राज्याचे शिल्पकार असे म्हणतात. मी तसे म्हणत नाही. माझे त्याबाबतीत मतभेद आहेत. त्यामुळे त्या विषयाच्या बाबतीत मी जास्त कॉमेटस् करीत नाही. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये वयाच्या सातव्या वर्षापासून घोषणा देऊन मी राजकारणाची सुरुवात केलेली आहे माननीय यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. मी या गोष्टीची शासनाला आठवण करुन देत आहे. राज्यातील ग्रामपंचायती सक्षम झाल्या पाहिजेत. 2 हजार पेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या ग्रामपंचायतीचे विभाजन झाले पाहिजे. ज्या गावाचे पुनर्वसन झाले आहे, पर्यायाने ग्रामपंचायतीचे पुनर्वसन झालेले आहे, त्या पुनर्वसन झालेल्या गावाने नवीन ग्रामपंचायत मागितली तर त्या गावास नवीन ग्रामपंचायत दिली पाहिजे. नगरपालिकांपेक्षाही ग्रामपंचायतींची संख्या जास्त आहे याची सर्व सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे. सभापती महोदय, आपल्याला देखील ग्रामपंचायतीबाबतची माहिती आहे. सभापती महोदय, आपण अंबरनाथ, बदलापूर येथे राहतात. अंबरनाथ, बदलापूरच्या शेजारच्या ग्रामपंचायती बघितल्या तर मोठ-मोठया बजेटच्या ग्रामपंचायती कार्यरत आहेत. त्या मोठया ग्रामपंचायतींवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण राहिलेले नाही. त्या ग्रामपंचायतींवर नियंत्रण रहावे म्हणून लहान ग्रामपंचायतींची निर्मिती करण्यात आली पाहिजे. लहान ग्रामपंचायतीमुळे तेथील कारभारावर नियंत्रण राहू शकेल. सध्या ग्रामसेवक हा मुख्य कार्यकारी अधिकारी पेक्षा मोठा आहे असे समजतो. तो ग्रामसेवक म्हर्सिडीजमधून फिरतो आणि

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

मुख्य कार्यकारी अधिकारी हा जीपमधून फिरतो आहे अशी परिस्थिती या राज्यात पहावयास मिळते आहे. ज्या गावाची लोकसंख्या 2 हजारापेक्षा जास्त आहे, तेथील ग्रामपंचायतीचे विभाजन झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे. ग्रामपंचायती विभाजनाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही दिसून येत नाही याचा मला खेद होतो आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, सीमा प्रश्नाचा सातत्याने अभिभाषणामध्ये उल्लेख केलेला असतो. सीमा भागातील जनतेची केंद्र सरकार आणि राज्य सरकार फसवणूक करीत आहे. दोन वर्षापूर्वी मी सभागृहात बोललो होतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सीमा भागाच्या प्रश्नाबाबत तोच परिच्छेद, तीच वाक्ये उद्घोषित केलेली असतात. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पुढील वर्षी हा मुद्दा अभिभाषणामध्ये येणार नाही असे दोन वर्षापूर्वी सांगितले होते. त्यानुसार मागील वर्षी अभिभाषणामध्ये सीमा भागाचा मुद्दा वगळण्यात आला होता, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. या वर्षीच्या अभिभाषणामध्ये तोच मुद्दा पुन्हा अंतर्भूत करण्यात आला आहे. तीच वाक्ये, त्याच काना-मात्रांसह सीमा भागाचा मुद्दा अभिभाषणामध्ये अंतर्भूत करण्यात आला आहे. सीमा भागातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे. सीमा भागाचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत हा मुद्दा अभिभाषणामध्ये अंतर्भूत करु नये अशी मी शासनाला विनंती करतो. शासनाने या मुद्याचा इतरत्र कुठेही उल्लेख करावा त्याला आमची हरकत नाही. परंतु सीमा भागाचा प्रश्न निकाली काढून सीमा भागातील जनतेला न्याय देण्याची भूमिका घेण्यात यावी. सुप्रीम कोर्टात जो दावा प्रलंबित आहे तो लवकरात लवकर निकाली निघावा या दृष्टीने शासनाने लक्ष द्यावे एवढी विनंती करुन माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज या सभागृहाच्या डेकोरमची, सर्वोच्च पदाच्या गरिमेची चर्चा थोड्या वेळापूर्वी आपण केली. स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याचा आपण निर्णय घेतला. मी जाणीवपूर्वक शब्द वापरला की, आपण निर्णय घेतला. कारण तो निर्णय आपल्या सर्वांचा आहे. स्व.यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे आहेत. ज्या वेळेला व्यक्तिमत्व अतिउच्च पातळीवर असते त्या वेळेला ते संपूर्ण प्रांताचे होते. स्व.यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राच्या राजकीय विचारांचे वैभव आहेत. दोन दिवसांपूर्वी मी सभागृहात भाष्य केले होते की, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी असे सांगितले होते की, हे मराठ्यांचे राज्य नसून मराठी राज्य आहे. महाराष्ट्र हे मराठी राज्य आहे.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी मी गिरणी कामगारांच्या संदर्भात एक अशासकीय प्रस्तावाची सूचना दिली होती. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून सरकारचे धोरण काय आहे याबद्दल आम्ही चर्चा करीत होतो. कोणताही प्रस्ताव समर्पक असला तर मी एखाद दुसरे उदाहरण देतो. मतदारसंघातील प्रश्न या निमित्ताने उपस्थित करीत असताना राज्य सरकारच्या धोरणात्मक भूमिकेबाबत आपल्याला काय वाटते ही भूमिका व्यक्त करण्यासाठी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये सामील होणे आवश्यक असते. आम्हाला अभिभाषणाबद्दल का खेद होतो हे मी परवा देखील म्हणालो होतो. मी अशासकीय प्रस्ताव दिलेला होता. त्या प्रस्तावावर माझी भूमिका मांडतो आणि गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री जे निवेदन करणार आहेत ते निवेदन प्रस्तावावरील चर्चेला उत्तर म्हणून असावे अशी विनंती मी केली होती. तसे झाले असते तर या सदनामध्ये विरोधी पक्षाच्या अशासकीय प्रस्तावाचा शासनाने सन्मान केला असे वेगळे चित्र उभे राहिले असते. लोकशाहीचा सन्मान झाला असता. सभागृहात शासनाकडून लोकशाही पध्दतीने विरोधी पक्षाचा सन्मान झाला असे झाले असते. दुर्दैवाने त्या दिवशी पीठासीन अधिकारी म्हणून आपल्याला विनंती केल्यानंतर नियमात तरतूद असल्यामुळे निवेदन करण्यास माननीय मुख्यमंत्र्यांना आपण अनुमती दिली. तो आपला अधिकार होता. स्व.यशवंतराव चव्हाण यांची आठवण म्हणून पुस्तक चाळत असताना त्यांचे अद्वितीय असे भाषण मला वाचावयास मिळाले, ज्या भाषणाचा सर्वांनी अभ्यास करावा, चिंतन करावे असे ते भाष्य आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तुम्ही तर घरातलेच आहात. ज्यावेळेस पुण्यातील पानशेत धरण फुटले होते त्या दुर्घटनेच्या संदर्भात खालच्या सभागृहात चर्चा सुरु होती. तेव्हा तत्कालीन मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी कोणती भूमिका घेतली होती ते मी सांगणार आहे. ते मुख्य मंत्री आणि आजचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्यातील फरक मी या निमित्ताने सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. त्या निमित्ताने हे पानशेतचे उदाहरण देऊन तेव्हाच्या मुख्य मंत्र्यांनी घेतलेला निर्णय व केलेले भाष्य मी येथे नोंदवित आहे. शासनाचे धोरण कसे असले पाहिजे ते यातून दिसून येईल. पानशेत दुर्घटनेच्या बाबतीत विरोधकांनी मांडलेल्या अविश्वासाच्या ठरावाला यशवंतराव चव्हाणांनी उत्तर दिले होते. ते म्हणाले होते की, पानशेतचे धरण फुटल्यानंतर राज्यात खूपच संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यात एक महत्वाचा कागद गहाळ झाला त्यावर कडी म्हणजे या चौकशीसाठी न्या. बावडेकर यांच्या अध्यक्षतेखाली जो चौकशी आयोग नेमला होता त्या न्यायाधीशांनीच कागद गहाळ झाल्यामुळे आत्महत्या केली. आजची परिस्थिती पाहिली तर "आदर्श" सोसायटीसंबंधीची फाईलच गहाळ झाली तरी देखील कोणालाही अटक झालेली नाही. तसेच मुंबईत न्यायाधीशांच्या सोसायटीला जी जागा दिली आहे ती फाईल सुध्दा गायब झाली आहे. हा फरक प्रामुख्याने सांगता येईल.

महोदय, त्यावेळेस न्या. बावडेकर यांनी केवळ एक कागद गहाळ झाला म्हणून आत्महत्या केली पण त्यामुळे संशयाचे वातावरण आणखी गडद झाले आणि त्यासंबंधी काही सूचना सभागृहात मांडण्यात आल्या. त्याला उत्तर देताना यशवंतराव चव्हाण जे बोलले त्यातून त्यांचा मोठेपणा व लोकशाहीवरील विश्वास आणि विरोधकांविषयीचा आदर व्यक्त होतो. ते म्हणाले की, "सन्माननीय सदस्य श्री. अत्रे आणि सन्माननीय सदस्य कॉ. डांगे हे माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत. ज्या वातावरणात मी वाढलो आहे त्यात वयाचा मोठेपणा मानावयास शिकविले आहे त्यामुळे जी यंत्रणा उभारली आहे, ज्या पध्दतीने आम्ही काम करीत आहोत ती लोकशाहीला धरुन आहे की नाही हे आपण पाहणे महत्वाचे आहे. माझ्याही पक्षातील लोकांना जर शासनाचा निर्णय चुकीचा वाटत असेल तर त्यांनी सुध्दा त्यांना वाटत असेल अथवा त्यांची इच्छा असेल त्या बाजूने मतदान करावे." अशा प्रकारे उघडपणे त्यांनी सांगितले होते. अशा प्रकारचा निर्णय त्यांनी जाहीर केला होता ही

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांच्या मनाची विशालता या महाराष्ट्राच्या मातीच्या संदर्भात यशवंतराव चव्हाण यांनी दाखविली होती. ते तेव्हा असेही म्हणाले होते की, हा निर्णय शासनाचा आहे आणि तो जर आपल्याला चुकीचा वाटत असेल तर आपण पाहिजे त्या बाजूने मतदान करु शकता. आजच्या मुख्यमंत्र्यांना मी आवर्जून विनंती केली होती की, गिरणी कामगारांच्या संदर्भात मी अशासकीय ठराव आणलेला आहे व त्याला उत्तर देताना आपण गिरणी कामगारांच्या संदर्भात जो निर्णय घेणार आहात तो सांगावा. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यापूर्वीच सभागृहात निवेदन करुन टाकले हा फरक यशवंतराव चव्हाण साहेब आणि आजच्या माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांमध्ये आहे व तो मी या जन्मशताब्दीच्या निमीत्ताने सांगत आहे.

महोदय, ज्यावेळेस आपणाकडे आम्ही पीठासीन अधिकारी म्हणून पाहतो, आग्रह धरतो तो आमचा अधिकार असतो. आपण संपूर्ण सभागृहाचे आहात. केवळ शासन अडचणीत येणार नाही अथवा पक्ष अडचणीत येणार नाही यादृष्टीने आपला संबंध असतो, अन्यथा संपूर्ण सभागृहाचे कामकाज आपण नि:पक्षपातीपणे करीत असतात यात शंका नाही. या निमित्ताने तत्कालीन अध्यक्ष श्री. शंकरराव जगताप यांचा मी उल्लेख करणार आहे. ही माणसे कशी उदात्त विचारांची असतात हे त्यावरुन दिसून येईल. एकदा सभागृहात तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री. केशवराव धोंडगे आणि इतर सदस्यांनी सभागृहात मागणी केली होती की शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी करण्यासंबंधीचा निर्णय रद्द केला व शासनाने अचानक दि. 15 मार्च, 1985 पासून खरेदी बंद केली. या विषयावरुन खालच्या सभागृहात स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती. त्यावर माननीय अध्यक्षांनी हा विषय स्थगन प्रस्तावाचा होत नसल्याने मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे, अशा प्रकारचे रुलिंग सुध्दा दिले. त्यावेळेस सभागृहात असा मुद्दा निघाला होता की, ही ज्वारी जनावरांना सुध्दा खाण्याच्या लायकीची नाही त्यामुळे तिला कोणीच विकत घेत नव्हते आणि शासनाने ज्वारीची खरेदी अचानक बंद केल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. यावरुन सभागृहातील सदस्यांच्या भावना तीव्र होऊन भाषणे सुरु झाली. विरोधी पक्षाने आक्रमक धोरण स्वीकारुन कमालीच गोंधळ घालण्यात आला. या विषयावर तातडीने चर्चा करुन पुढील कार्यवाही करावी अशी सदस्यांची मागणी होती. त्यावेळेस तत्कालीन सदस्य श्री. केशवराव धोंडगे आणि माननीय विरोधी पक्षनेते

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

श्री. शरद पवार हे होते. त्यांनी या विषयावर सभागृहात भाषणे करुन अत्यंत तीव्र भावना व्यक्त केल्या. त्यासाठी केवळ हौदातच नव्हे तर माननीय अध्यक्षांच्या जवळ जाऊन गोंधळ घातला गेला व सभागृहाचे कामकाज काही वेळासाठी तहकूब करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांच्या मध्यस्थीने पुन्हा सभागृहाची बैठक सुरु झाली. ज्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेला अनुमती नाकारली होती त्याच विषयाला न्याय देण्याच्या दृष्टीने अन्य मार्गाने चर्चा उपस्थित करण्यास सांगणे भाग पडले. अशा प्रकारे सभागृहाचा आदर तत्कालीन अध्यक्षांनी व्यक्त केला तेव्हा माननीय यशवंतराव चव्हाण यांनी सुध्दा आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला होता.

महोदय, हे राज्य मराठी राज्य असून मराठी ही या राज्याची राजभाषा आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे भारताच्या प्रवेशद्वारजवळ येथे जो कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्या कार्यक्रमाचे आम्हाला निमंत्रण मिळाले होते. या कार्यक्रमामध्ये विरोधी पक्ष नेत्यांनी खाली बसावे लागले होते. सरकारी कार्यक्रम असा असतो काय ? या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर महामहिम राष्ट्रपती बसलेल्या होत्या. स्व.यशवंतराव चव्हाणांच्या जन्म शताब्दीवर्षाच्या प्रारंभीचा हा दिवस होता. या शासकीय कार्यक्रमामध्ये म्हणजे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात एअर चिफ मार्शल श्री. अर्जुन सिंग यांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम सुध्दा आयोजित करण्यात आला. खरे म्हणजे यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या कार्यक्रमात एअर चिफ मार्शल श्री. अर्जुन सिंग यांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम न ठेवता वेगळा कार्यक्रम ठेवावयास पाहिजे होता यासंदर्भातही मला खास हरकत घ्यावीशी वाटत नाही. परंतु या कार्यक्रमात वेदना देणारी बाब अशी घडली होती की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे मानद सचिव डॉ. काकोडकर हे अर्जुन सिंग यांच्या सन्मानाच्या भाषणास उभे राहिले तेव्हा त्यांनी मराठीतून बोलण्यास सुरुवात केली परंतु विधिमंडळाच्या सर्वोच्चस्थानी असलेल्या माननीय अध्यक्षांना येऊन सांगण्यात आले की, मराठीत बोलले तर श्री. अर्जुन सिंग यांना ते समजणार नाही त्यामुळे श्री.काकोडकरांना इंग्रजीतून भाषण करावे लागले. खरे म्हणजे स्व.यशवंतराव चव्हाणांच्या मराठी राज्याचा विचाराचा त्याच क्षणाला खातमा केला गेला. त्याच्याही पुढे जाऊन महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या महाराष्ट्राच्या सुपुत्री आहेत. त्या मराठी आहेत म्हणून शिवसेनेने भारतीय जनता पक्षाच्या विरोधात उघडपणे जाऊन मतदान केले होते. महामहिम राष्ट्रपती मराठीतून भाषण करीत असतांना त्यांना शेवटी अर्जुन सिंग यांच्या करिता इंग्रजीमधून भाषण करावे लागले. स्व.यशवंतरावांच्या जन्म शताब्दी वर्षाची सुरुवातच त्यांच्या मनाच्या विचारावर आघात करुन झाली. ही सुरुवात अनावधानाने का होईना झाली ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे मराठी भाषेचे काय होईल असे मला त्यावेळेस वाटले.

सभापती महोदय, मराठी भाषेसाठी 10 कोटी रुपयांची प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे. यासंदर्भात माननीय उप मुख्यमंत्री असे म्हणाले होते की, "मराठी भाषेसाठी लागतील तेवढे पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

शासन देईल" . त्यांनी पुढे कुत्सितपणे असेही सांगितले की, "काही लोकांना असे वाटते की, आपण मराठीचे ठेकेदार आहोत." माननीय अजित दादांना असे वाटले असेल की, मी मराठीचा ठेकेदार असेन तर मला त्याचा अभिमान आहे.

सभापती महोदय, राज्य भाषा टिकली पाहिजे, वाढली पाहिजे यासाठी आपण सर्वांनी मिळूनच प्रयत्न करण्याची गरज आहे. मराठी भाषा टिकली तरच स्व.यशवंतराव चव्हाणांच्या संदर्भात बोलण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त होईल.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात पहिल्याच पानावर प्रादेशिक विकासाच्या अनुशेषाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या "अनुशेषाच्या संदर्भात डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली असून या समितीच्या अहवालातून समतोल प्रादेशिक विकासाला रुपरेषा मिळेल" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, विधानसभेत सन्माननीय सदस्यांनी आता आम्हाला वैधानिक विकास मंडळ नको तर दुष्काळी अनुशेष ग्रस्त तालुक्यांचे मंडळ निर्माण करावे अशी मागणी केलेली आहे. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्याला उपाशी ठेवून, टनेल काढून पुढे पाणी नेणार असाल आणि अलीकडच्या तालुक्यांना दुष्काळीच ठेवत असाल तर त्यासंदर्भातील दोष वैधानिक विकास मंडळाचा नसून हा दोष राज्यकर्त्यांचा आहे. वैधानिक विकास मंडळ हे घटनेने आलेले आहे. अशा पध्दतीने काम होणार असेल तर तुमचे धोरण मराठवाडा, विदर्भ व खान्देशाला मारक ठरणारे आहे असे मी येथे सुतोवाच करतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या धोरणाबद्दल तीव्र असा खेद व्यक्त करतो. .

माझ्याकडे अनेक बाबी आहेत. तरी देखील महत्त्वाच्या शासकीय समस्या मी येथे मांडणार आहे. शासन कोणते धोरण स्वीकारत आहे, कोणते धोरण मांडत आहे हे मी निदर्शनास आणणार आहे. आदरणीय महामहीम राज्यपाल महोदय म्हणतात, माझे सरकार. ते अभिमानाने सांगतात की, माझे सरकार हे करणार आहे, ते करणार आहे. पण आज सरकारच अस्तित्त्वात नाही. आज सरकारची प्रशासकीय यंत्रणाच अस्तित्त्वात नाही. त्यामुळे कसले सरकार चालविणार राजे.

मी आता जी माहिती आपल्या पुढे सादर करणार आहे ती ऐकल्यानंतर आपणास धक्का बसेल. माझ्याकडे सामान्य प्रशासन विभागाची मंत्रिमहोदयांच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी आहे. त्यांना त्या विभागातून पगार मिळतो. प्रत्येक मंत्र्याला किती स्टाफ दिला आहे, कोण अधिकारी दिला आहे, याची माहिती आहे. आमच्या आदरणीय मुख्यमंत्र्यांकडे मुख्य सचिवांपासून ते लिपिक, शिपाई यांच्यासह एकूण 78 जणांचा स्टाफ आहे. मी आता अशी यादी वाचण्याचा प्रयत्न करणार आहे की, ती ऐकून आपल्याला धक्का बसेल. माझ्याकडे श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या यादीनुसार त्यांच्याकडे 23 जणांचा कर्मचारीवृंद आहे. त्यामध्ये विशेष कार्यकारी अधिकारी श्री.अनिल महाजन यांच्यासह सर्वांची नावे आहेत. प्रत्येक मंत्रिमहोदयांना बाहेरचा स्टाफ घ्यायला परवानगी असते. त्याप्रमाणे श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे श्री.बालाजी किनके हा बाहेरील उमेदवार आहे. तसेच श्रीमती मंदा क्षीरसागर ह्या बाहेरील उमेदवार आहेत. तसेच श्री.बाळासाहेब गुरव हे बाहेरील उमेदवार स्वीय सहायक म्हणून घेतले आहेत. या यादीमध्ये असलेली नावे आणि श्री.आर.आर.पाटील यांच्या कार्यालयाच्या बाहेर लावलेला फलक यामध्ये तफावत आहे. माझ्याकडे त्याचे फोटो आहेत. श्री.सुनील भजनावळे, स्वीय सहायक आणि श्री.गजानन कातकाडे, स्वीय सहायक असल्याचा फलक माननीय गृह मंत्र्यांच्या कार्यालया बाहेर लावला आहे. पण ते शासकीय यादीमध्ये नाहीत. ते बेकायदेशीरपणे तेथे बोर्ड लावून बसले आहेत. तसा फलक त्यांनी मंत्रालयात लावला आहे. अनधिकृतपण स्वीय सहायक म्हणून ही दोन माणसे बसली आहेत. गृह खाते असे वागत असेल तर पुढचे काय असणार ? ते काय काम करतात. त्याची नोंद कोण ठेवते. मराठी भाषेत जीएडी म्हटले की कळते. पण सामान्य प्रशासन विभाग कळत नाही. श्री.आर.आर.पाटील यांनी केले म्हणजे बाकीच्यांनी देखील केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आदरणीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंतराव पाटील आहेत. त्यांच्याकडे लघुलेखक असलेली श्री.विजय लहाने नावाची व्यक्ति विशेष कार्यकारी अधिकारी आहे. त्यांना कसे काय प्रमोशन दिले आहे? लघुलेखकाला एवढ्या मोठ्या पदावर प्रमोशन कसे दिले हा खरा प्रश्न आहे. ते नाव आमच्या सामान्य प्रशासन विभागाच्या यादीमध्ये आहे. पण काही जण बेकायदेशीररित्या देखील आहेत. श्री.संजय दिघावकर, विशेष कार्यकारी अधिकारी श्री.ग.जा.जाधव स्वीय सहायक आणि सोमानंद ढमढेरे स्वीय सहायक आहेत. त्यांनी अगोदरच दोन बाहेरील स्वीय सहायक घेतलेले आहेत. त्या व्यतिरिक्त हे फलकावर आहेत. त्यांचा उल्लेख सामान्य प्रशासन विभागाच्या यादीमध्ये नाही. अशी बेकायदेशीर माणसे त्यांच्याकडे आहेत. त्यांचा पगार कोण काढतो. त्यांना काय देण्यात येते. ते काय काम करतात हे कोणालाही माहिती नाही.

तिसरे मंत्री आदरणीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे आहेत. त्यांचा कारभार मोठा आहे. श्री.प्रफुल्ल वानखेडे तसेच श्री.धुमाळे नावाचे बाहेरील उमेदवार आहेत. ते सामान्य प्रशासन विभागाच्या यादीमध्ये आहेत. यांच्याकडेच विशेष कार्य अधिकारी म्हणून डॉ.कुलकर्णी आहेत. श्री.किशोर करंगीवार यांचे फक्त फलकावर नाव आहे. बाकीच्यांचे नाव नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

श्री.किशोर करंजीवार कोण आहेत ? त्यांना कोणी नियुक्त केले आहे, श्री.करंजीवार तेथे कसे आले, ते पूर्वी कुठे काम करीत होते? हा प्रश्न आहे. मग आबांपासून सुरुवात झाली.

सभापती महोदय, यानंतर आमचे आदरणीय मंत्री महोदय श्री.बबनराव पाचपुते यांच्या बाबत सांगावयाचे तर ते मला सकाळी म्हणाले की, साहेब तुम्ही सभात्याग केला हे मला तुमच्याकडून अपेक्षा नाही. त्याबाबत सांगावयाचे तर तुम्ही आणि मी एक व्यक्ती म्हणून उभे नाही. व्यक्तिगत दिवाकर रावते हा वेगळा विषय आहे. पण तुम्ही सरकारमध्ये आहात आणि मी जेव्हा विरोधी पक्षामध्ये एक जबाबदारी घेऊन जनतेच्या वतीने उभा असतो, त्यावेळी मला माझ्या भावनांपेक्षा जनतेच्या भावनाच व्यक्त कराव्या लागतात. आदरणीय मंत्री महादय, श्री.बबनराव पाचपुते साहेब यांच्याकडे श्री.रणभिर अहिरे हे स्वीय सहाय्यक आहेत. ते कुठून आले, ते काय करतात ? हा प्रश्न आहे. त्यांचे नाव मंत्रालयाच्या बोर्डावर आहे.

सभापती महोदय,सन्माननीय कामगार मंत्री श्री.हसन मुश्रीफ, कोल्हापूरचे श्रावण बाळ. त्यांनी खांद्यावर कावड घेतल्याचा फोटो असून, त्याची सगळीकडे होर्डींग लावलेली आहेत. कोल्हापूरचे श्रावण बाळ. त्यांनी होर्डींग लावलेली आहेत. मी त्यांना उपमा देत नाही. पण माननीय कामगार मंत्री महोदयांना हे माहिती नाही की, श्रावण बाळाच्या कावडीतून निर्माण झाले ते रामायण. रामाचे नाव घेतल्यानंतर सुध्दा ज्यांचा थरकाप होतो ते श्रावण बाळाच्या भूमिकेमध्ये असतील तर मला आनंदच वाटला पाहिजे, ते आमचे माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ. त्यांच्याकडे बाळकृष्ण अण्णाप्पा अबूलकर हे बाहेरील उमेदवार आहेत आणि त्याबाबतीत सामान्य प्रशासन विभागाकडे नोंद आहे. तसेच त्यांनी श्री.विजय पडांगळे यांना स्वीय सहाय्यक म्हणून नेमलेले आहेत पण त्यांची कुठेच नोंद नाही. त्यांना पगार कोण देत आहे? हा प्रश्न आहे.पण ते माननीय मंत्री महोदयांकडे फलक लावून टेबल-खूर्ची घेऊन काम करीत बसलेले असतात.

सभापती महोदय, यानंतर कोकणातील माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांच्याकडे श्री. गजानन सांगळे आणि श्री.बाबासाहेब राजाळे यांच्या नावाचे फलक लावून मंत्रालयामध्ये टेबल-खुर्चीवर बसून या राज्याचा कारभार सांभाळत आहेत.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग, माहिती व जनसंपर्क आणि राजशिष्टाचार विभागाच्या माननीय मंत्री, तसेच आमच्या भगिनी श्रीमती फौजिया खान आहेत. त्यांच्याकडे श्री.हुसेन मुकादम हे लघुलेखक आहेत. मग त्यांना स्वीय सहाय्यकाचे प्रमोशन कसे देण्यात आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

माननीय श्रीमती फौजिया खान या स्वत: सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्री आहेत आणि त्यांनी जर अशा प्रकारे संबंधितांना प्रमोशन दिले असेल तर मग कसा कारभार चालणार आहे ? माय गव्हर्मेंट, माझे सरकार कसे चालणार ? त्यांच्याकडे सन्माननीय आपल्या नावाचा फलक लावून बसलेले आहेत.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री.गुलाबराव देवकर, वॉन्टेड. पण काय करावयाचे? आपल्याला काही बोलता येत नाही कारण ते विधान सभेमधील आहेत. याठिकाणी आम्हाला चर्चा उपस्थित करता येत नाही, नाहीतर मी त्यांना बोलूच दिले नसते. ते विधान सभेतील सन्माननीय सदस्य असल्यामुळे नियमानुसार त्यांचा मान ठेवावा लागतो. विधानसभेचे सन्माननीय सदस्य काय ते पहातील. पण त्यांनी सुध्दा त्यांच्याकडे लघुलेखक असलेले श्री.सोमवंशी यांना ओ.एस.डी.नेमलेले आहे. अशा प्रकारे कारभाराचे विविध नमुने पहावयास मिळतात.

सभापती महोदय, पुढचे माननीय मंत्री एक कोटीवाले, एक कोटी का मालिक कोण आहे ? तर माननीय मंत्री श्री.राजेंद्र मुळीक हे होय. एक करोड का आदमी. अमरावतीचे कौन बनेगा करोडपती.

यानंतर श्री.अ.शिगम .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मी त्यावेळी होतो. ते आमच्या अकोल्याला आले. माननीय मुख्यमंत्री व मंत्री सुध्दा तेथे आले होते. त्यांच्या ताफ्यामध्ये ही गाडी होती. त्यांना माहीत झाले असते तर लफडे झाले असते. ती गाडी संपूर्ण ताफ्यासह फिरली त्यानंतर माननीय मुख्यमंत्री नागपूरला गेले. तेथून ती गाडी परत आली. आपला त्याच्याशी काही संबंध नाही. माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांच्याकडे श्री.विनोद सांगळे व वासुदेव हे दोघेजण स्वीय सहायक म्हणून काम करीत आहेत. त्यांच्याकडे अधिकृत स्वीय सहायक काम करीत आहेत त्या व्यतिरिक्त हे दोघेजण आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री.डी.पी.सावंत यांच्याकडे कोण कोण आहेत हे सांगतो. श्री.डी.पी.सावंत यांना आपले व वडिलांचे नावे मराठीत लिहायचे काय वावडे आहे मला माहीत नाही. मी त्यांना सांगितले की, आपण महाराष्ट्राचे मंत्री आहात आपण डी.पी.अशी आद्याक्षरे कशाला लिहिता. ते मला म्हणाले "आर.आर." लिहितात म्हणून मी डी.पी. लिहितो. मग मी त्यापुढे काहीच बोलू शकलो नाही. त्यांच्याकडे श्री.द.वा.खारके स्वीय सहायक म्हणून आहेत. तसेच श्री.संजय सावंत ही बाहेरील व्यक्ती काम करीत आहे. आपणास मी सर्व यादी वाचून दाखविली ही सर्व मंडळी मंत्रालयामध्ये बेकायदेशीरपणे टेबल खुर्ची टाकून आपल्या नावाचा फलक लावून कारभार करीत आहेत.

सभापती महोदय, पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रतिनियुक्तीवर राहता येणार नाही असा सरकारने कायदा बनविला. परंतु काही अधिक्‍ारी हे वर्षानुवर्षे मंत्री महोदयांकडे कसे काम करीत आहेत हा मला प्रश्न आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचेकडे श्री.सुरेश जाधव नावाचे स्वीय सहायक मागील दहा वर्षापासून काम करीत आहेत. म्हणजे एक तर आपल्या पक्षाचे सरकार गेल्यावर मोकळे होतील. परंतु नंतर ते दुसऱ्या मंत्री महोदयांकडे चिकटतील. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्याकडे श्री.के.डी.महाडिक मागील पंधरा वर्षापासून काम करीत आहेत. शासनामध्ये अन्य अधिक्‍ारी नाहीत काय ? दुसऱ्या अधिक्‍ाऱ्यांना देखील थोडी संधी द्यावी. तलावात उतरल्यानंतर सुवर्ण मासे पकडायला मिळतात तेव्हा हे सुवर्ण मासे पकडण्याची संधी दुसऱ्यांना देखील मिळायला पाहिजे. जे अधिकारी व कर्मचारी मंत्री महोदयांकडे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

10-15 वर्षे काम करीत आहेत त्याची यादी माझ्याकडे आहे. याचा अर्थ एकच होतो की, इतर अधिकारी कामास लायक नाहीत. मग ते अधिक्कारी लायक नसतील तर त्यांना नोकरीमध्ये कशाला ठेवले आहे ?

सभापती महोदय, मंत्री महोदयांकडे वर्षानुवर्षे काम करीत असलेल्यांची नावे मी वाचतो. सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याची छाननी करावी. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्याची छाननी करावी अशी माझी अपेक्षा आहे. राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांच्याकडे श्री अरुण विरळे आहेत. मंत्री श्री.संजय देवतळे यांच्याकडे श्री.अभय यावलकर आहेत. मंत्री श्री.राजेश टोपे यांच्याकडे श्री.चंद्रकांत थोरात आहेत. मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकडे श्री.कैलाश पगारे आहेत. राज्यमंत्री श्री.राजेंद्र गावित यांच्याकडे श्री.महेद्र कल्याणकर आहेत. हे सर्व अधिकारी वर्षानुवर्षे मंत्री महोदयांकडे काम करीत आहेत.

सभापती महोदय, आता मी हरविलेल्या अधिकाऱ्यांची नावे सांगतो. सामान्य प्रशासन विभागाच्या रेकॉर्डप्रमाणे त्यांची नियुक्ती मंत्री महोदयांकडे केलेली आहे,परंतु ते मंत्री महोदयांच्या आस्थापनेवर नाहीत. मग ते अधिक्कारी कोठे असतात ? श्री.दिलीप नानोटे यांची नियुक्ती मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांच्याकडे दाखविलेली आहे. श्री.डी.डेबडवार यांची नियुक्ती मंत्री महोदया प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकडे दाखविलेली आहे. श्री.प्रफुल्ल बनसाळे यांची नियुक्ती मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकडे दाखविलेली आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

श्री. राजेंद्र चव्हाण हे माननीय मंत्री श्री. प्रकाश सोळंके यांच्याकडे आहेत. श्री. एम.बी.पाटील, ओ.एस.डी. हे माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांच्याकडे आहेत. श्री. सुनील चव्हाण हे माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे आहेत. श्री. ए. पडवे हे माननीय मंत्री श्री. मनोहर नाईक यांच्याकडे आहेत. श्री. सुरेश पाटील हे माननीय मंत्री श्री. नितीन राऊत यांच्याकडे आहेत. श्री. महेश वरुडकर हे माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांच्याकडे आहेत. श्री. पी.के. राठोड हे माननीय मंत्री डी.पी.सावंत यांच्याकडे आहेत. श्री. अरिफ शेख हे माननीय मंत्री श्री. नसीम खान यांच्याकडे आहेत. श्री. दिलीप कोकाणी हे माननीय मंत्री श्री. पद्माकर वळवी यांच्याकडे आहेत. आणि श्री. रविकांत खोतवालावलकर हे माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांच्याकडे आहेत. हे सर्वजण मंत्री महोदयांकडे आहेत असे सामान्य प्रशासन विभागाची यादी सांगते पण संबंधित मंत्री महोदयांकडे त्यांचा कुठेच फलक नाही, मस्टरवर त्यांची नावे नाहीत त्यामुळे ते कुठे आहेत. याचा शोध घेण्यात यावा. असे प्रशासन असेल तर ते चालणार कसे? ज्यांना नेमले आहे त्यांचा पत्ता नाही आणि ज्यांचा संबंध नाही ते मंत्री महोदयांच्या दरवाज्यात टेबल-खुर्च्या टाकून फलक लावून बसले आहेत. लोकांना भेटत आहेत. अशा प्रकारे माझे सरकार म्हणून जे धोरण राबवावयाचे आहे ते धोरण कसे राबविले जाणार आहे? त्यामुळे कोण-कोणत्या विषयावर किती बोलावे आणि कशासाठी बोलावे हा प्रश्न निर्माण होतो. संकटात सापडलेल्या महिलांना विशिष्ट हेल्पलाईन क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधण्याची सुविधा आता संपूर्ण राज्याल उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे राज्यपाल महोदयांच्या मुद्दा क्रमांक 10 मध्ये म्हटलेले आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे ही जी नस्ती आलेली आहे ती अतिशय गंभीर आहे. डॉ. शोभा वै. बेंजरगे या आनंदवाडी, शिरुर अनंतपाळ जि. लातूर येथील आहेत. श्री. बी.एल. देशमुख नावाचे पोलीस निरीक्षक आहेत. त्यांच्या संदर्भातील एक प्रश्न या सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. त्यांना दुसऱ्याच एका प्रकरणात निलंबित करण्यात आलेले आहे. त्याच्या विरुध्द एका मुस्लिम भगिनीने माझ्याकडे तक्रार केलेली आहे. तिच्या प्रकरणामध्ये देखील त्यांना निंलबित करण्यात आले होते. त्यांना जवळ जवळ पाच वेळा निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांना निलंबित करण्यात येते आणि परत पंधरा दिवसानी त्याच जागेवर घेण्यात येते. ते असे कोण विशेष आहेत की, त्यांना संरक्षण दिले जाते. हे नेहमी दारुच्या नशेत असतात. त्यांनी मी वर सांगितलेल्या

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

डॉ. महिलेला पट्टयाने मारले होते त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये तिची तक्रार घेण्यास कोणी तयार नव्हते. हे पोलीस निरीक्षक महिलांना बोलावतात आणि त्यांना मारतात, सिगारेटचे चटके देतात. दारु पिऊन नशेत असतात पण त्यांचे नाव देशमुख असल्यामुळे लातूरमध्ये त्यांचे एवढे चालू शकते? सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून संबंधित खात्याला विनंती करावयाची आहे पण या पोलीस निरीक्षकाबद्दल काय बोलावे, शब्दच कमी पडतात. हे असे कोण देव लागून गेले आहेत की, पंधरा दिवस निलंबित केल्यानंतर परत त्याच पोलीस स्टेशनमध्ये घेण्यात येते. त्यांनी महिलांच्या छळ केल्याची सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. त्यांना काही विकृती आहे का? ते अश्लील बोलतात, अश्लील शिवीगाळ करतात. पट्टयाने मारतात असे असताना असा माणूस कसा काय सहन करण्यात येतो? प्रत्येक वेळी त्याला निलंबित करण्यात येते आणि पंधरा दिवसानी परत घेण्यात येते असा ती कोण विशेष व्यक्ती आहे? राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये जेव्हा स्त्रियांच्या बाबतीत सांगण्यात येते त्यावेळी (अडथळा) तुम्हाला शासनाचे कौतुक करावयाचे आहे पण शासन कसे चालते हे आम्हाला दाखवून द्यावयाचे आहे. जनतेचे आमच्याकडे लक्ष असते. तुमच्या कौतुकाकडे नसते. पण असे प्रकरण झालेले आहे आणि ते लोकांना माहीत आहे. महिलांवरील संकटाच्या बाबतीत राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये सांगण्यात आलेले आहे. पण अशा प्रकारच्या एका अधिकाऱ्याला शासनाला निस्तरता येत नसेल तर आम्ही महिलांवरील संकटाच्या बाबतीत कसे बोलावयाचे?

सभापती महोदय, मला माननीय कृषी मंत्र्यांना मनापासून धन्यवाद द्यावयाचे आहेत. आम्ही या ठिकाणी कापसाचा प्रश्न मांडला होता. कापसाच्या संदर्भात माझे पूर्ण भाषण धोरणात्मक होते. कापसाला किती भाव द्यावयाचा यापेक्षा कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जगविण्याकरिता कोणती पाऊले उचलली पाहिजेत या संदर्भात धोरणात्मक भाषण होते. त्यातील अनेक धोरणांचा सुतोवाच आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात करुन सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांचा सन्मान केला. कोरडवाहू शेतकऱ्यांना जगविण्यासंबंधीचे धोरण मांडत असताना विरोधी पक्षाचा आदर करत असताना माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले होते की, येणाऱ्या पाच वर्षामध्ये, दहा वर्षामध्ये कोरडवाहू शेतीच्या संदर्भातील धोरण तयार करण्यात येणार आहे आणि त्यासाठी दहा हजार कोटी रुपये राखून ठेवण्यात येत आहेत. पण या वर्षीच्या राज्यपाल महोदयांच्या

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

अभिभाषणामध्ये त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. विरोधी पक्षाच्या आग्रहानंतर कोरडवाहू शेतकऱ्यांना जगविण्याचे धोरण स्वीकारण्यात आले त्यामुळे आम्हाला असे वाटले की, विरोधी पक्षाचा सन्मान करण्यात आला आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

याला स्व. यशवंतरावांची लोकशाही म्हणतात. परंतु दुर्दैवाने या संपूर्ण अभिभाषणामध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांसंबंधीच्या धोरणाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे आपण हे धोरण सोडून देणार काय अशी शंका व्यक्त होते. म्हणून मला खेद व्यक्त करावासा वाटतो. ते यामध्ये यावयास पाहिजे होते. माननीय कृषी मंत्र्यांनी या बाबत संबंधित सचिवांना विचारावे. यामध्ये सर्वात महत्वाचे धोरण हे शेतकऱ्यांच्या संदर्भातील धोरणच असू शकते. बाकी कोणतेही नसते तरी चालले असते. पण त्या धोरणाचा यामध्ये उल्लेख नाही म्हणून आपण पत्र पाठवून विचारले पाहिजे की, ते यामध्ये का आले नाही ? आपण संबंधित खात्याला जाब विचारला पाहिजे. त्या खात्याला जबाबदार धरले पाहिजे.

आम्हाला आपण जातीयवादी म्हणून सारखे हिणवता. या अभिभाषणामध्ये असा उल्लेख केला आहे की, शासनाने 'ग्रामीण दलित वस्ती वैयक्तिक नळजोडणी व शौचालय बांधकाम योजना' सुरु केली असून या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या प्रत्येक कुटुंबाला शौचालय बांधण्यासाठी 11 हजार रुपये आणि घरगुती नळजोडणीसाठी 4 हजार रुपये अनुदान देण्यात येईल. आपण यामध्ये अनुसूचित जाती, नवबौध्द यांचा उल्लेख केला हे ठीक आहे पण या ठिकाणी आपण दारिद्र्य रेषेखालील असा उल्लेख करुन त्यांच्याबरोबर आर्थिकदृष्ट्या त्या ऐपतीमध्ये असलेले जे लोक आहेत त्यांच्याकरिता ही योजना का केली नाही ? यांना देता तेव्हा त्यांना का देत नाही ? यांच्याकडे शौचालय झाले पण त्यांच्याकडे होऊ नये असे काही धोरण आहे का ? या धोरणाची मला कीव येते. आम्हाला जातीयवादी म्हणतात पण जातीचा उल्लेख करुन ज्यावेळी आपण या योजना मांडता तेव्हा समाजातील त्याच पातळीवरच्या कुटुंबांनी काय करावयाचे हा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, मी लोड शेडींगबद्दल काही बोलत नाही कारण शासन काय करणार आहे तो विषय वेगळा आहे. सभापती महोदय, 'करुन दाखविले' या संदर्भात खूप काही बोलले गेले. आम्ही करुन पण दाखवले आणि मुंबई जिंकून पण दाखवली. बोलती बंद करुन दाखवली असे मी म्हणणार नाही पण त्याचे अनुकरण शासनाने केले त्याबद्दल अभिनंदन करावयाचे का ? दुसऱ्यांची टिंगल करीत असताना आपण काय करतो हे पाहिले पाहिजे. माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

धोरण शासनाने स्वीकारले. अभिनंदन करावे अशा प्रकारचे ते धोरण आहे. व्हर्च्युअल क्लासरुम काढले आणि करुन दाखवले असे त्यांनी सांगितले. त्या व्हर्च्युअल क्लासचे उद्घाटन करण्यासाठी अभिनेत्री माधुरी दिक्षित आल्या होत्या. त्यांनी त्या क्लासचे उद्घाटन केले. या अभिभाषणामध्ये असा उल्लेख केला आहे की, राज्यात प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी व्हर्च्युअल क्लासरुम, डिजिटल क्लासरुम, ई-लर्निंग अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे शासनाने ठरविले आहे. आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी या ठिकाणी जो पाया घातला ते शोरण शासनाने स्वीकारल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. आपण शिवसेनेचे अनुकरण केले तर आपल्या सरकारला थोडे दिवस का होईल काही चांगले दिवस दिसतील असे म्हणावयास हरकत नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणमधील मुद्दा क्रमांक 83 मध्ये 'हुनर-से-रोजगार' असा उल्लेख केला आहे. हा शब्द मला कळला नाही. यामध्ये उर्दू शब्द वापरण्याची काय गरज आहे. 'हुनर' हा उर्दू शब्द आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, हुनर-से-रोजगार या योजनेअंतर्गत शासन, आतिथ्य व्यवस्थापन प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरु करीत असून त्याव्दारे 2012-13 या वर्षात सुमारे 1500 विद्यार्थ्यांना आतिथ्य व्यवस्थापन क्षेत्रात रोजगार मिळण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. हे कोणासाठी देणार ? या सरकारची ही जी दाढ्या कुरवाळण्याची प्रवृत्ती या धोरणातून दिसते त्याबद्दल वाईट वाटते. या राज्यामध्ये असलेले हिंदू, मुसलमान, शिख, बौध्द जे कोणी आहेत ते आपलेच नागरिक आहेत. त्यांच्यामध्ये जे असतील त्यांनाच हे रोजगार देणार. त्यामुळे मग तोच शब्द वापरावयाचा अशी ही प्रवृत्ती आहे. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा भाई खूश होतील अशा प्रकारचे करावयाचे. अशा प्रकारे हे सरकार चालणार का ?

सभापती महोदय, मी मराठी शाळांच्या बाबतीत बोलणार होतो पण त्या संदर्भातील विधेयक सभागृहासमोर आहे. ते टाकाऊ असले तरी स्वागतार्हच आहे. त्यामुळे काही प्रश्न निर्माण होत नाही. मी दोन गोष्टी सांगून थांबणार आहे. वांद्रे येथील जी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची वसाहत आहे त्या ठिकाणी पाच हजार शासकीय कर्मचारी राहतात. ती जागा आपण बिल्डरला दिली. ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

तो आपला अधिकार आहे. सरकार आपले आहे. आम्ही एवढेच म्हटले की, 0.05 एवढा एफएसआय वाढवा म्हणजे पाच हजार कर्मचाऱ्यांचे कायमचे निवासस्थान होईल. पण शासन हट्टाला पेटले. शिवसेनेने मागणी केली, विरोधी पक्षाने मागणी केली म्हणून शासन हट्टाला पेटले का ? आपण ते करा आणि श्रेय घ्या. आजूबाजूला असलेले शासकीय प्लॉट्स मात्र बिल्डरला दिले, काही न्यायाधीशांच्या सोसायट्यांना दिले. शासनाची हक्काची जागा त्यांना देताना ज्या कर्मचाऱ्यांनी दोन-दोन पिढ्या त्या ठिकाणी काढलेल्या आहेत त्यांना आपण निर्वासित करणार आहात. त्या संदर्भातील धोरण या अभिभाषणामध्ये आलेले नाही. त्या संदर्भात काय करणार या बाबत उत्तराच्या भाषणात सांगितले तर आनंद होईल.

सभापती महोदय, जालना येथे ज्यावेळी शेगावचे गजानन महाराज यांच्या पालखीतील वारकरी कंटेनरखाली चिरडून मारले गेले तो विषय खूप मोठा होता. या सदनात त्या बाबत चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी तातडीने त्याची दखल घेत एक चौकशी समिती नेमली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

माननीय मुख्यमंत्र्यांनी एक चौकशी समिती नेमली. ज्यांची चौकशी करण्यासाठी समिती नेमली तेच माननीय मुख्यमंत्र्यांचे सचिव झाल्यावर कशी चौकशी होणार ? त्या जिल्हाधिकाऱ्यांनी इतकी दमदाटी केली आहे की, त्यामुळे एकही साक्षीदार पुढे येण्यास तयार नाही. मी हे अधिकृतपणे सदनात बोलत आहे. चांगले शासन व चांगले धोरण राबवावयाचे असेल व जनतेचा घोर अवमान करणाऱ्या घटना राज्यात घडू नयेत यासाठी आणि शासनाचा धाक निर्माण करावयाचा असेल तर प्रथम जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली करावी. त्यानंतर चौकशी सुरु ठेवावी अन्यथा त्या चौकशीचे कामकाज गुंडाळून टाकावे. थातूरमातूर चौकशी आम्हाला नको, कारण त्या घटनेत वारकऱ्यांचा मृत्यू झालेला आहे. चौकशी हे फक्त सोंग ठरेल. कोणत्याही प्रकारे या राज्याला गतीमानता देईल अशा प्रकारची आशा महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मला दिसत नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील त्यांचे आभार मानण्यासाठी व चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांनी पुरोगामी प्रगतीशील व महाराष्ट्राचा पाया तर घातलाच. परंतु यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्र अधिक समृध्द होण्यासाठी शासनाने ज्या योजना सन 2012-2013 या नवीन वर्षासाठी आखल्या आहेत, जे कार्यक्रम निश्चित केलेले आहेत व ज्या सुधारणा करण्याचा शासनाचा मानस आहे त्याचे प्रतिबिंब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात प्रकर्षाने उमटले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानताना पुरोगामी महाराष्ट्राची आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक घोडदौड सुरुच राहून या राज्याची प्रगती अधिक वेगाने होत राहील असा मला निश्चित विश्वास वाटतो. माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने चर्चो सत्र, व्याख्यानमाला व प्रदर्शन इत्यादी उपक्रमाचे आयोजन केलेले आहे. या सर्वातून यशवंतरावांचे चारित्र्य व चरित्र नव्या पिढीला माहीत होईल व राज्यातील युवा पिढी त्यापासून प्रोत्साहन घेईल असा मला विश्वास वाटतो. हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आहे. महाराष्ट्र राज्य हे सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेले राज्य आहे. या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने विविध कार्यक्रम व योजना आखल्या आहेत ही गोष्ट स्वागतार्ह आहे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नासंबंधी निवेदन करणार आहेत. त्याची मी फक्त आठवण करुन देत आहे.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : माननीय सभापतींच्या निर्देशानुसार राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा संध्याकाळी 5 वाजेपर्यंत सुरु राहणार आहे.

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है. मेरा कहना है कि चाहे रात के दस बज जाए, जिन-जिन माननीय सदस्यों को माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर अपने विचार रखने हैं, उन सभी माननीय सदस्यों को यहां अपने विचार रखने का मौका दिया जाना चाहिए. माननीय मुख्यमंत्री महोदय गिरणी कामगारों के बारे में जब उत्तर देना चाहे, वह अपना उत्तर उस समय दे सकते हैं. मैं कहना चाहूंगा कि माननीय राज्यपाल महोदय के .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ DD

श्री जमा...

अभिभाषण से संबंधित संविधान संशोधन तथा हाऊस के सभी रुल्स मैंने पढ़ लिए हैं. मेरा कहना है कि माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर अपने विचार रखने के लिए जिन माननीय सदस्यों ने अपने नाम दिए हैं और उनमें से जो माननीय सदस्य यहां पर उपस्थित हैं, उन सभी माननीय सदस्यों को अपने विचार रखने का अवसर यहां पर मिलना चाहिए तथा सभी माननीय सदस्यों के भाषण होने के लिए जितना समय आपको बढ़ाना है, वह आपको बढ़ाना चाहिए. इतना ही मुझे कहना है.

(इसके बाद श्री शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, राज्याचा समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी तिन्ही प्रदेशांमध्ये निधीच्या नियत वाटपाची मूलभूत तत्वे सुचविण्यासाठी शासनाने प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली असून या समितीच्या अहवालातून समतोल प्रादेशिक विकास साधला जाणार आहे. तसेच मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या क्षेत्रातील विकासाला चालना देण्यासाठी मानव विकास अभियानाची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून तळागाळातील व्यक्तींच्या विकासासाठी हे शासन कटिबद्ध असल्याचे हे द्योतक आहे.

सभापती महोदय, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण लागू केलेले असल्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, 17 वर्षापूर्वी आदरणीय श्री. शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षण लागू केले होते. देशाची महिला नीती जाहीर होण्याच्या आधी महाराष्ट्रामध्ये महिला विषयक धोरण जाहीर झाले होते. आता महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण मिळाल्यामुळे अनेक महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये कारभार करण्याची संधी मिळालेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिला निवडून गेलेल्या आहेत ही अभिमानास्पद गोष्ट आहे. मी हेही सांगू इच्छिते की, ह्या ज्या 50 टक्के महिला स्थानिक स्वराज्य संस्थावर निवडून गेलेल्या आहेत त्यांना अधिक सक्षम करण्यासाठी, त्यांना अनुभव येण्यासाठी थोडा वेळ मिळण्याची गरज आहे.

सभापती महोदय, संकटात सापडलेल्या महिलांकरिता विशिष्ट हेल्पलाईन क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध करुन महिलांना संरक्षण देण्याचा शासनाने केलेला प्रयत्न स्तुतीस पात्र आहे. महाराष्ट्रामध्ये महिलांवर होणारे अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. ही हेल्प लाईल अधिक कार्यक्षम करण्याची दक्षता गृह विभागाने घेतली पाहिजे. आपण जर पोलीस स्टेशनला साधा फोन केला तर फोनची नुसती बेल वाजत रहाते, फोन कोणी घेत नाही असा अनुभव येतो. तेव्हा आता जी हेल्प लाईन सुरु केलेली आहे तिचा महिलांना ख-या अर्थाने उपयोग होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. जेव्हा जेव्हा गरज भासेल तेव्हा तेव्हा या हेल्प लाईनचा महिलांना उपयोग करुन घेता आला पाहिजे. त्यासाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

जास्त दक्ष रहाण्याची आवश्यकता आहे. यशवंत पंचायत राज अभियान सुरु करुन 12 मार्च या दिवशी सुशासन आणि विकास या संबंधीचे निकष लक्षात घेऊन दरवर्षी अत्युकृष्ट पंचायत राज संस्थांना पुरस्कार देण्यात येणार असल्यामुळे पंचायतीमध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्याचा परिणाम तालुक्याच्या विकासावर होणार आहे. या संस्था अधिक कार्यक्षम होण्यासाठी शासन या सर्व संस्थाना संगणक बहुउद्देशीय प्रिंटर आणि इंटरनेट जोडणी आणि 20,000 स्थानिक युवकांचे तांत्रिक स्वरुपाचे मनुष्यबळ संग्राम या प्रकल्पांतर्गत पुरविणार आहे. ही बाब ग्रामीण विकासाला चालना देणारी आहे. ग्रामीण भागातील युवकांना या निमित्ताने चांगली संधी मिळणार आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागाचा पर्यावरणाभिमुख असा सर्वसमावेशक विकास हे शासनाचे धोरण असल्याची बाब ग्राम पंचायतींना देण्यात येणा-या राज्यातील एकूण 810 ग्रामपंचायतींना दिलेल्या पर्यावरण विकास रत्न या पुरस्कारातून स्पष्ट होत आहे. यामधून वनाच्या संदर्भातील, पर्यावरणाच्या संदर्भातील जागरुकता साध्य होऊ शकेल.

मानव विकास उंचावण्यासाठी आणि दारिद्र्य निर्मूलनासाठी शासनाची कटिबद्धता, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान या केन्द्र पुरस्कृत योजनेतून स्पष्ट झाली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये ही योजना एकूण 9 जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. सिंचन वाढीसाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे 4.21 लाख हेक्टर इतकी अतिरिक्त जमीन सन 2011मध्ये सिंचनाखाली आलेली आहे. जलसंपत्तीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आणि भूजलाच्या अति वापरास प्रतिबंध करण्यासाठी शासन एक सर्वसमावेशक असा कायदा करीत आहे. ही गोष्ट पर्यावरण रक्षणाच्या संदर्भातील शासनाची दूरदृष्टी सिद्ध करणारी आहे. मागे मी धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील उदाहरण दिले होते. ती वस्तुस्थिती लक्षात घेऊन शासनाने जर अशा योजना राबविल्या तर त्याचा भूजल पातळी वाढविण्यासाठी निश्चितपणे मदत होऊ शकेल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

या सर्व गोष्टी केल्या असल्यामुळेच केंद्र शासनाकडून निर्मल ग्राम पुरस्कार महाराष्ट्र शासनास दिला गेला आहे. निर्मल ग्राम पुरस्कार मिळविल्यामुळे महाराष्ट्रातील गावांची संख्या मोठी झाली आहे. गावांचा दर्जा सुधारण्यासाठी अशा प्रकारचे पुरस्कार दिले तर ग्रामविकास चांगल्या प्रकारे होऊ शकतो. शेतकऱ्यांसदर्भात महाराष्ट्र शासनाची बांधिलकी अनेक कृतीतून आणि योजनेतून सिध्द झाली आहे.

सभापती महोदय, विदर्भातील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना 4 लाख क्विंटलपेक्षा अधिक दर्जेदार बियाणे 50 टक्के इतक्या अर्थसहाय्यित दराने वितरित करण्यात आले आहे ही बाब देखील उल्लेखनीय आहे असे मला वाटते.

त्याचप्रमाणे नवीन वस्त्रोद्योग धोरण घोषित केल्याने सुमारे 11 लाख रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणे अपेक्षित आहे ही देखील अतिशय उल्लेखनीय बाब आहे.

तसेच वन क्षेत्रात 19 टक्क्याहून 33 टक्क्यांपर्यंत वाढ व्हावी या हेतूने वृक्ष लागवड करण्याचा महाप्रकल्प हाती घेतला आहे. शासनामार्फत दरवर्षी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला जातो. आज मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठया शहरांमध्ये क्रॉक्रींटचे जंगल उभे रहात आहे. ग्रामपंचायती, नगरपालिका या संस्थांमधील पदाधिकारी व सदस्य तसेच निवडून आलेले लोकप्रतिनिधी यांचेकडे वृक्ष लागवड करण्याची जबाबदारी सोपविली तर 100 कोटी वृक्षांची लागवड करण्याचे शासनाचे टार्गेट पूर्ण होईल. वृक्ष लागवडीचा कार्यक्रम आपण या राज्यात चांगल्या प्रकारे राबवू शकतो. हा वृक्ष लागवडीचा कार्यक्रम सर्वांनी जागरुकतेने राबविला तरच तो यशस्वी होऊ शकेल अन्यथा तो कागदावरच राहील अशी मला भीती वाटते.

सभापती महोदय, औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. देशाच्या एकूण स्थूल उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा 15 टक्के आहे. देशात झालेल्या एकूण गुंतवणुकीपैकी 33 टक्के गुंतवणुक महाराष्ट्रात झालेली आहे. महाराष्ट्राचा निर्यातीचा वाटाही एकूण निर्मितीच्या 25 टक्के आहे. औद्योगिक उत्पादन क्षमते बाबत महाराष्ट्राचा वाटा 20 टक्के आहे. 26 औद्योगिक क्षेत्रापैकी 20 क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. ही अग्रेसरता अशीच रहावी. गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी शासन योजना राबवित असल्याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात स्पष्ट झाले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, मला असे वाटते की, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा मला या ठिकाणी आवर्जून उल्लेख केला पाहिजे. लोकांकडून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. परंतु त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अटी घातल्या गेल्या आहेत, त्या अटींचे पालन करणे लोकांना कठीण जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मोठया प्रमाणात लोक उत्सुक आहेत. त्या लोकांना खरोखरच या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे या दृष्टीकोनातून विशेष खबरदारी राज्य शासनाने घेतली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्यासाठी करण्यात येणारी तरतूद, खाजगी शाळा काढण्यासाठी परवानगी देणारा कायदा तयार करण्याची योजना शिक्षण शुल्क सर्व सामान्याच्या आवाक्यात येण्यासाठी कायदा करण्यासाठी सुरु केलेली प्रक्रिया, प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी हर्च्युअल क्लास रुम, डिजीटल क्लास रुम, ई-लर्नींग अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा शासनाचा मानस आहे. शासन शिक्षणासंबंधी गंभीर असल्याचे द्योतक आहे. या योजना सुरु केल्या तर त्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आपली यंत्रणा तेवढी सक्षम असावी अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, परदेशात शिक्षण घेणे परवडत नाही अशा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांकरिता शासनाने शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. तालुक्याच्या ठिकाणी 5 वी 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी 100 नवीन शासकीय निवासी शाळा शासन सुरु करणार आहे. या राज्यात निवासी शाळांची खूप आवश्यकता आहे. शहरांमध्ये तसेच खेडयांमधील विद्यार्थ्यांना घरी येणे जाणे गैरसोयीचे असते. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांसाठी तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळांची खूपच आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासींच्या विकासासाठी शासनाच्या योजनांचे प्रतिबिंब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उमटलेले आहे. आश्रमशाळांमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रासाठी तरतूद करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. आजकालच्या शैक्षणिक युगामध्ये सगळयात महत्वाचे काय असेल तर ते म्हणजे व्यवसायभिमुख शिक्षण आहे. या सर्व गोष्टींकडे पाहिल्यास आपणास असे लक्षात येईल की, महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी, ग्रामीण जनतेच्या हितासाठी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

महाराष्ट्रातील औद्योगिक विकासासाठी कृषी उत्पन्नात वाढ करुन शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी, ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी, पिण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबध्द आहे. शासनाच्या या सर्व विकासात्मक गोष्टी मला स्वागतार्ह वाटतात.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, महाराष्ट्राला भारनियमनातून मुक्त करण्यासाठी शासनाने गांभीर्याने पावले उचलली आहेत आणि हा भारनियमनाचा प्रश्न 2012 पर्यंत शासन सोडविणार आहे अशी मला आशा वाटते. विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करुन सर्व भागांचा समतोल विकास करण्याचे शासनाचे धोरण आहे. विविध योजनांद्वारे शासन आरोग्याच्या सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आणखी एक मुद्दा अंतर्भूत होणे आवश्यक होते. शासनाने ग्रामीण दलित वस्ती वैयक्तिक नळ योजना आणि शौचालय बांधकाम योजना सुरु केली. या योजनेंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, नवबौध्द समाजाच्या प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी 11 हजार रुपये आणि घरगुती नळ जोडणीसाठी 4 हजार रुपये अनुदान देण्याचा कार्यक्रम आखला आहे, ही खरोखरच महत्वाची बाब आहे. शौचालये ग्रामीण पातळीवर कमी आहेत. नळ जोडणी करण्यासाठी फार मोठे प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी निधीची चणचण भासते. त्यांना जर अर्थसहाय्य मिळाले तर गावामध्ये प्रत्येकाच्या घरामध्ये शौचालय बांधण्यासाठी या मदतीचा फार उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, मुंबईमध्ये चेंबूर ते संत गाडगे महाराज चौकापर्यंत पहिली मोनो रेल आगामी वर्षात सुरु होईल असे अपेक्षित आहे. वर्सोवा ते घाटकोपर या मार्गावरील पहिला मेट्रो रेल्वे प्रकल्प लवकरच पूर्ण होत असून तो जनतेसाठी खुला होणार आहे. परंतु या संदर्भात खेदाची गोष्ट अशी आहे की, गेली 7-8 वर्षे एमयुटीपी अंतर्गत मुंबई शहरामध्ये जी कामे सुरु आहेत ती पुरेशा निधीअभावी अत्यंत धिम्या गतीने सुरु आहेत. या कामांसाठी त्वरेने निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. आज मुंबई शहरात जवळजवळ 65 ते 70 लाख लोक दररोज लोकल ट्रेनने प्रवास करीत असतात. दरवर्षी लोकल ट्रेनच्या अपघातामध्ये साधारणपणे 4500 ते 5000 लोकांचा मृत्यू होतो. या विषयाकडे शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. वाहतुकीसाठी अधिक निधी उपलब्ध करुन देऊन एमयुटीपी अंतर्गत जे प्रकल्प सुरु आहेत ती कामे त्वरित पूर्ण केली पाहिजेत.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेक मुद्यांना स्पर्श केलेला आहे. खेडेगावापासून शहरांपर्यंतचे मुद्दे अंतर्भूत झालेले आहेत. त्यामुळे शासनाचा पुढील वर्षाचा कार्यक्रम खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. प्रशासनाने सहकार्य केले तर हे सगळे कार्यक्रम कृतीत यायला वेळ लागणार नाही अशी अपेक्षा व्यक्त करते आणि माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष असेल किंवा सत्ताधारी पक्ष असेल, सत्याला सत्य आणि असत्याला असत्य मानण्यामध्ये काही गैर आहे असे मला वाटत नाही. आम्ही चांगल्या गोष्टीबद्दल जरुर अभिनंदन केले पाहिजे. तसेच सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांनी सुध्दा जे चुकीचे आहे त्याबद्दल खेद व्यक्त केला पाहिजे. परंतु ही पध्दत आपल्या सभागृहात दिसून येत नाही. त्यामुळेच बहुधा विभाजन झालेले आहे. सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य ज्या गोष्टी आपल्या मनाला पटत नाहीत त्याबद्दल देखील अभिनंदन करतात. प्रामुख्याने काही चांगल्या गोष्टीबद्दल माननीय राज्यपालांचे अभिनंदन करण्याबरोबरच खेदही व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, शिक्षणासंबंधीची मागणी 2001 पासून अनुत्तरित आहे. 2003 पासून वेतनेतर अनुदान महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांना मिळालेले नाही. एका-एका शिक्षण संस्थेला एक-एक कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम शासनाकडून येणे आहे. 2005 पासून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरलेली नाहीत. त्यामुळे मुख्याध्यापकाला शाळेमध्ये घंटा वाजवावी लागते.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

कालच यासंबंधी सभागृहात चर्चा झाली की, सन 2009 ला हा "कायम" शब्द काढण्यात आला पण शाळांचे मूल्यांकन झाले नसल्यामुळे सन 2012-13 पासून अनुदान कसे मिळणार हा प्रश्न आहे. एकदा अनुदान सुरु झाल्यानंतर 20 टक्क्यापासून 100 टक्क्यावर येण्यासाठी सुध्दा सहा वर्षांचा कालावधी लागतो, तोपर्यंत या शाळातील शिक्षकांना पगार मिळणार नाही. अशा प्रकारे अनेक प्रश्न शिक्षण क्षेत्रात आहेत त्यांवर स्वतंत्रपणे चर्चा होऊ शकते. पण त्याचाही उल्लेख अभिभाषणात नसल्याने मी खेद व्यक्त करतो.

महोदय, नागपूर येथील अधिवेशन हे पूर्णपणे एकाच मुद्यावर चालले. त्यात कापूस, सोयाबीन आणि धानाला नुकसान भरपाई मिळाली पाहिजे असा मुद्दा होता. शेवटच्या दिवशी शासनाने 2 हजार कोटीची घोषणा केली पण या घोषणेचे काय झाले, ते पॅकेज शेतकऱ्यापर्यंत पोहचले की नाही त्याचाही उल्लेख या अभिभाषणात दिसत नाही तसेच संपूर्ण कामकाजाच्या निवेदनामध्ये सुध्दा उल्लेख नाही. यापूर्वी देखील शासनाने वेगवेगळया पॅकेजची घोषणा केली. आज सकाळी सभागृहात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय समोर आला होता. राज्य शासन व केंद्र शासनाने जे पॅकेज घोषित केले ते शेवटपर्यंत पोहचले नाही आणि त्यातून कापूस, सोयाबीन आणि धान पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा उपयोग झाला नाही त्याचे पुढे काय होणार याचाही उल्लेख नसल्याने मी खेद व्यक्त करतो.

महोदय, महाराष्ट्र राज्यात संपूर्ण खेड्या-खेड्यापर्यंत ज्या जिल्हा बँका व विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या वित्त पुरवठा करतात व त्यांच्याशी समन्वय राज्य सहकारी बँक ठेवत असते. पण ती राज्य सहकारी बँक सुध्दा भ्रष्टाचारामुळे पोखरली असून शासनाला त्यावर प्रशासकाची नेमणूक करावी लागली. कोल्हापूर सारख्या अनेक जिल्हा सहकारी बँकांवर प्रशासक नेमावे लागले एवढी या बँकांची स्थिती वाईट झालेली आहे. शेतकऱ्यांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बँकेला रिझर्व्ह बँकेने नोटीस दिलेली आहे की आपल्या राज्य सहकारी बँकेला दिलेला परवाना का रद्द करण्यात येऊ नये, आणि तसे झाले तर जिल्हा बँका आणि गावातील सोसायट्यांच्या माध्यमातून होणारा वित्त पुरवठा बंद होईल. परिणामी पुन्हा सावकारांकडून कर्ज घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर आल्याशिवाय राहणार नाही व त्यामुळे शेतकरी उध्वस्त होतील. आज

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

ज्या आत्महत्या होत आहेत त्यापेक्षा जास्त आत्महत्या होतील यासंबंधीचा देखील अभिभाषणातून उल्लेख झालेला नाही.

महोदय, मी नव्याने आमदार झाल्यानंतर एकदा संध्याकाळी उशिरा थांबलो होतो. त्यावेळेस सभागृहात सावकारी कायदा पास होत होता. तो सावकारी प्रतिबंधक कायदा दिल्ली येथे महामहीम राष्ट्रपतींच्या सहीसाठी पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. पण आता मी वर्तमान पत्रातून वाचले की महामहिम राष्ट्रपतींनी या कायद्यावर सही न करता त्यात त्रुटी काढून पुन्हा राज्य शासनाकडे परत पाठविला आहे. हा कायदा येणार आणि सावकाराच्या विळख्यातून राज्यातील शेतकरी सुटणार म्हणून राज्यातील शेतकरी रिलॅक्स होता पण तो परत आल्यानंतर पुन्हा त्यांनी या त्रुटी दूर करुन राष्ट्रपतींच्या सहीसाठी पाठविला जाईल, त्यात बराच वेळ जाईल. अगोदरच सावकाराकडून पैसे घेणारे शेतकरी संत्रस्त आहेत, त्यांच्यावरची टांगती तलवार संपणार नाही अशा प्रकारचे टेन्शन या शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले आहे व त्याचा तिळमात्र कुठेही उल्लेख झालेला नाही म्हणून मला खेद वाटतो.

जगातील पहिल्या 10 प्रदुषिक नद्यांमध्ये कोल्हापूरच्या पंचगंगा नदीचा नंबर लागतो. चांगल्या गोष्टीसाठी पहिल्या 10 मध्ये नंबर येण्याऐवजी आरोग्याला नुकसान कारक अशा नदीत गेल्या 15 दिवसांपूर्वी एका साखर कारखान्याच्या मळीचा टँक लीक झाल्याने सर्व मळी नदीत विरुन गेली त्यामुळे नदीतील मासे मरण पावले. त्यासंबंधीचे फोटोग्राफ वेगवेगळ्या वर्तमान पत्रातून प्रसिध्द झाले, पर्यावरण वाद्यांनी आंदोलने सुध्दा केली, याचाही अभिभाषणातून कोठेच उल्लेख नाही, याचा मला खेद वाटतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या "आशा" या योजनेअंतर्गत गावागावातील लोकांना वैद्यकीय सेवा मिळत होती परंतु ही योजना आता केंद्रसरकारने बंद केल्यामुळे गावागावातील लोकांना आता वैद्यकीय सेवा मिळू शकणार नाही व दुस-या बाजूने या योजनेत जे लोक काम करीत होते ते बेरोजगार झाल्यामुळे त्यांना रोजगार कोण देणार अशा प्रकारचे दोन प्रश्न निर्माण झालेले आहेत. परंतु अशा प्रकारची मोठी चिंता निर्माण झालेली असतांना सुध्दा यासंदर्भातील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात न आल्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, "महाराष्ट्रातील जवळपास 27 हजार जात पडताळणी प्रमाणपत्र रद्द होणार आहेत" अशी बातमी आजच्या वर्तमानपत्रात छापून आलेली आहे. महिलांना आणि मागास वर्गीयांना आरक्षण दिल्याचा शासन डांगोरा पिटत आहे. यामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे, ओबीसींना आरक्षण दिले गेले असा ढोल ताशा लावून डांगोरा पिटला गेला. परंतु ओबीसी आरक्षणाचा फायदा खरोखरच ओबीसींना मिळाला आहे काय ? प्रामुख्याने वेगवेगळया ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदांमध्ये जे खरोखर ओबीसी होते त्यातील 90 टक्के ओबीसींना निवडणूक लढवता आलेली नाही. खरे म्हणजे निवडणूक लढवणे त्यांच्या आवाक्याबाहेरची बात आहे. परंतु त्याच भागामध्ये, त्याच जिल्हयामध्ये राहणा-या परंपरागत नेत्यांनी ओबीसीची खोटी सर्टिफिकेट्स मिळवून त्या सर्टिफिकेट्सच्या माध्यमातून त्यांनी निवडणुकाही जिंकल्या आहेत. अशा प्रकारे निवडणुका जिंकणा-यांची संख्या हजारोंमध्ये जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्यांनी अशा प्रकारची सर्टिफिकेट्स मिळवून निवडणुका जिंकल्या आहेत बोगस प्रमाणपत्र आता रद्द होणार आहेत अशी बातमी आजच्या वर्तमानपत्रात आलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात प्रत्येक अधिवेशनात चर्चा होते, त्यावर सरकार आश्वासन देते परंतु प्रत्यक्षात काहीच होत नाही. प्रत्येक वेळेस निवडणूक आली की, लोक कोर्टात जातात व कोर्टातून न्याय मिळवतात. परंतु जे विद्यार्थी शाळा-कॉलेजेसमध्ये शिक्षण घेत आहेत त्यांना फी भरण्यासाठी मुदत दिलेली असते त्यांनी ठराविक तारखेपर्यंत प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांना फी भरावी लागत असते त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

प्रश्न अजून वेगळेच निर्माण झालेले आहेत. "जात पडताळणी" नावाच्या भीषण प्रश्नाला महाराष्ट्रातील घराघरातील लोकांना तोंड द्यावे लागत आहे परंतु अशा ज्वलंत प्रश्नाचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो व माझे बोलणे थांबवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) सभापती महोदय, माननीय उल्हास पवार साहेबांनी महामहिम राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला असून त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणामध्ये सुरुवातीलाच म्हणजे पहिल्याच ओळीमध्ये "राज्य शासन आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतरावजी चव्हाण यांची जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहे" असे वाक्य वापरुन आपल्या भाषणाला सुरुवात केलेली आहे.

सभापती महोदय, योगायोगाने कृष्णाकाठचे, कराडचे सुपुत्र आणि या राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री हे याच वर्षी आपल्याला मिळाले असून तो आपल्या दृष्टीने भाग्याचा क्षण आहे. कराड येथे यशवंतराव चव्हाण साहेबांच्या मतदार संघातून त्यांनी आपल्या आयुष्याची पहिली निवडणूक लढवून कराडमधून लोक प्रतिनिधीत्व केले होते. स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशब्ताब्दी महोत्सवी वर्षात, कराडचे सुपुत्र श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना मुख्यमंत्री पदाचा जो मान मिळाला तो सुध्दा एक भाग्याचा क्षण आहे. खरे म्हणजे हा अमृतक्षण आहे. त्या अनुषंगाने मोठया दिमाखात 12 मार्च, 2012 रोजी गेट वे ऑफ इंडियावर एक कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. खरे म्हणजे मा. श्री. पृथ्वीराज चव्हाण हे आपल्याला मुख्यमंत्री म्हणून लाभल्यामुळेच एवढा मोठा कार्यक्रम होऊ शकला याची जाणीव आपण सर्वांनी ठेवली पाहिजे.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाणांना "साहेब" म्हटले जात असे. त्यावेळेस ज्युनियर लोक होते, म्हणजे माननीय श्री. शरद पवार, श्री. सुशिलकुमार शिंदे हे मा.यशवंतराव चव्हाणांना फार रिस्पेक्ट देत होते व त्यामुळेच ते त्यांना साहेब म्हणत असत. खरे म्हणजे साहेबांनी सामाजिक समतेचे राज्य निर्माण करुन सामाजिक परिवर्तन केले होते. ज्या उपेक्षित समाजाला पिढयानपिढया प्रवाहात सामील केले गेले नाही, ज्या समाजाला शासनाच्या कोणत्याही योजनेचा फायदा झाला नाही,ज्या उपेक्षितांच्या मुलांनी शाळेचा उंबरा कधी पाहिला नाही ...

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

त्यांना श्री.यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे शाळेचा उंबरा पहायला मिळाला. समाजातील जे दुर्बल घटक आहेत त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय, ओबीसी, अल्पसंख्याक इत्यादींना आर्थिक न्याय कोणी मिळवून दिला असेल तर तो म्हणजे श्री.यशवंतराव चव्हाण यांनी दिला आहे. एवढेच नव्हे तर या राज्यात सामाजिक परिवर्तन कोणी केले असेल तर ते श्री.यशवंतराव चव्हाण यांनी केले आहे. त्यांनी जातीयता, विषमता नष्ट केली आहे.

मी आज सकाळी विधान मंडळाने अमृत महोत्सवा निमित्त प्रसिद्ध केलेला स्मृतिग्रंथ चाळत होतो. त्यात सत्ता समाजहितासाठी असा श्री.सुशीलकुमार शिंदे यांचा लेख आहे. श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या नंतर श्री.शरद पवार, श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांचा वारसा चालविला. या लेखामध्ये श्री.सुशीलकुमार शिंदे म्हणतात, "सामाजिक समतेचा आर्थिक न्याय द्यायचा म्हणून हे राज्य शाहू-फुले-आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गाने चालवण्याचा निर्णय घेतला. राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला मी सामाजिक न्यायाचे महत्त्वाचे निर्णय विधान मंडळातच जाहीर केले." अनुसूचित जाती-जमाती, भूमिहीनांना जमिनी, अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासंबंधीचे अतिशय क्रांतिकारक निर्णय त्यांनी घेतले. त्यांनी यशवंतराव चव्हाणांचा आदर्श समोर ठेवला. श्री.यशवंतराव चव्हाणांप्रमाणे श्री.सुशीलकुमार शिंदे यांना देखील साहित्याची आवड आहे. जो नेता आपल्या राज्याच्या कारभार करत असतो त्याचेच अनुकरण अनेकजण करत असतात. राज्याचा मुख्यमंत्री हा सभागृहाचा नेत असतो. तो राज्याला दिशा देणारा असतो. त्यामुळे माननीय राज्यपालांचे भाषण हे अर्थसंकल्पाला दिशा देणारे असते. श्री.सुशीलकुमार शिंदे हे दलित समाजाचे आहेत. तरी देखील ते त्याचे भांडवल करीत नाही. ते आपल्या लेखात पुढे म्हणतात की, "मी योजना जाहीर केल्या आणि प्रत्यक्षात आणल्या. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजन प्रवेशासाठी साने गुरुजींनी पन्नास वर्षापूर्वी सत्याग्रह केला होता. त्याच मंदिरात पहिला दलित मुख्यमंत्री म्हणून शासकीय महापूजा करण्याचे भाग्य मला याच सभागृहाने मिळवून दिले. यशवंतरावांचा मला सहवास मिळाला. आयुष्यभर मी ज्यासाठी राजकीय, सामाजिक काम केले त्याचाच हा प्रसाद आहे." ज्यावेळी ही ऊर्जा नेत्यांमध्ये निर्माण होते ते नेतृत्त्व देशासाठी, राज्यासाठी कारणीभूत होते.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

श्री.यशवंतराव चव्हाण यांनी कृष्णा काठ हे चरित्र लिहिले. त्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन श्री.सुशीलकुमार शिंदेंनी केले आहे. मी त्याचा साक्षीदार आहे. श्री.यशवंतराव चव्हाण म्हणाले, सुशील, माझ्या ह्या ग्रंथाचे प्रकाशन तू कर. तेव्हा त्यांना तेथे जाण्यचा मान मिळाला. कराड येथे जाऊन श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी त्या ग्रंथाचे प्रकाशन केले. त्यावेळी मी त्यांच्या बरोबर हेलिकॉप्टरने गेलो होतो. त्या प्रकाशनाचा मी ही साक्षीदार होतो. श्री.यशवंतराव चव्हाण हे सह्याद्री सारखे अवाढव्य होते. त्यांचा आशीर्वाद दलित समाजातील माणसाला मिळतो त्यावेळीच खरी सामाजिक बांधीलकी आपल्याकडून नष्ट होते. आपण सामाजिक बांधीलकीवर आधारित भाष्य करतो. मी मोठे भाष्य करणार नाही. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, इतर राज्यांच्या तुलनेत त्यांनी जास्तीत जास्त पुरस्कार देशपातळीवर मिळविलेले आहेत. सर्वाधिक निर्मल ग्राम पुरस्कार आपल्या राज्याला मिळाले आहेत. अर्थसंकल्पापूर्वीच हे राज्य काय करणार आहे याचा उहापोह माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाद्वारे व्यक्त करून दाखविला आहे.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने यशवंतराव चव्हाण पंचायत अभियान आपण सुरू करीत आहोत. संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान ही योजना श्री.विलासराव देशमुख यांनी केंद्रामध्ये ग्रामविकास मंत्री असताना सुरू केली. भारत सरकारने ही योजना स्वीकारली आहे. रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्याने सुरू केली. ती आता केंद्र सरकारने स्वीकारली आहे. तशी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली संत गाडगे महाराज योजना केंद्राने स्वीकारली आहे. आता ही योजना श्री.जयराम रमेश हे केंद्रीय ग्रामविकास मंत्री झाल्यानंतर त्यांनी स्वीकारली आहे. मी मोठे भाषण करणार नाही. जुन्या पाटबंधाऱ्यांच्या दुरस्तीसाठी, नूतनीकरणासाठी 135 कोटी रूपयांची आपण तरतूद केली आहे. दलित वस्ती, ग्रामीण वस्ती, नळ जोडणी, रस्ता, शौचालये, यासाठी या अभिभाषणामध्ये योग्य तो न्याय मिळवून दिलेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. शेवटी मी म्हणेन की, श्री.यशवंतराव चव्हाण यांनी मनात जे घेतले ते त्यांनी करून दाखविले आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अनुधावित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . ..

ते बोलत होते तसे करीत होते. त्यांनी एखाद्या कार्यकर्त्याला आश्वासन दिल्यानंतर त्याप्रमाणे ते वागत होते. हे राज्य सुजलाम् सुफलाम् बनवावयाचे असेल तर यश आणि सत्तेच्या चाव्या तुमच्या हातात आल्या आहेत. तेव्हा यशवंत व्हा. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .3 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी आणि खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्याला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एकूण 92 मुद्दे पहावयास मिळतात. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शासनाने आतापर्यंत जे काम केलेले आहे आणि जे करावयाचे आहे त्याचे प्रतिबिंब त्यांच्या अभिभाषणामधून दिसत असते असे मी समजतो. पण या भाषणातील पुष्कळसे मुद्दे मागील 3-4-5 वर्षामध्ये आलेले आहेत आणि दुर्दैवाने तेच मुद्दे सातत्याने पहावयास मिळतात म्हणून मला त्याबद्दल खेद व्यक्त करावा असे वाटते.

सभापती महोदय, आपण यावर्षी स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष साजरे करीत आहोत. मला या निमित्ताने महाराष्ट्र शासनाला एक बाब विचारावयाची आहे की, आपण कै.यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र उभा केलेला आहे काय? त्यांचे ते स्वप्न होते. संयुक्त महाराष्ट्राचा कलश दिल्लीहून घेऊन येणारे महाराष्ट्र राज्याचे पहिले माननीय मुख्यमंत्री कै.यशवंतरावजी चव्हाण हे होते. त्यांचे महाराष्ट्राच्या बाबतीत एक स्वप्न होते पण आज या राज्याची काय अवस्था आहे ? एका बाजूला महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात शेतक-यांच्या आत्महत्या आज देखील होत आहेत. ज्यावेळेला कै.यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करण्याचे ठरत आहे, त्याबाबत भाषणे होत आहेत त्यावेळेला राज्यामध्ये मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि कै.यशवंतराव चव्हाण यांचे हे स्वप्न होते काय ? आज देखील मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रामध्ये भारनियमन सुरु आहे, महाराष्ट्र राज्य काळोखामध्ये आहे, आज महागाई देखील मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे की, सर्वसामान्य माणूस जगू शकत नाही हे कै.यशवंतराव चव्हाण यांना अपेक्षित होते काय ? आज राज्यामध्ये पुरेशा प्रमाणात वीज उपलब्ध नाही म्हणून मोठ्या प्रमाणात उद्योग बंद पडत आहेत. एकतर राज्यामध्ये मोठया प्रमाणात बेरोजगारी आहेच. पण आतापर्यंत ज्या कामगारांच्या हाताला काम होते, ते आता बेरोजगार होत आहेत हे कै.यशवंतराव चव्हाण यांना अपेक्षित होते काय ? तसेच त्यांची जन्मशतब्दी साजरी करणे म्हणजे काय ? त्यांना आपल्याकडून काय अपेक्षा होती ? म्हणून या सगळ्या गोष्टीं बाबत मला येथे खेद व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी मुद्दा क्र.4 मध्ये असे म्हटलेले आहे की, राज्याचा समतोल विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. पण सभापती महोदय, तसे होत नाही. याबाबतीत माझे ठाम आणि प्रामाणिक मत असे आहे की,आज संपूर्ण राज्याचा, सगळया

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

प्रदेशाचा सामजिक विकास होत नाही, समतोल विकास होत नाही. जिसके हाथ मे लाठी, उसकी म्हैस अशी स्थिती असून ते आज आम्हाला पहावयास मिळत आहे. सभापती महोदय, ते निधी नेत आहेत आणि त्या भागाचा विकास होत आहे हे आम्हाला पहावयास मिळते. म्हणून मला खेदाने सांगावेसे वाटते की, राज्याचा समतोल विकास आपण करीत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावयास पाहिजे की, आपण ज्यावेळेला राज्याचा समतोल विकास करण्याची भाषा करीत आहात, त्यावेळेला या राज्यामध्ये कोकण देखील आहे. मग जसा पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला तशा प्रकारे कोकणामध्ये विकास का होऊ शकला नाही, का झाला नाही आणि आज देखील का होत नाही ?

यानंतर श्री.अ.शिगम .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

समतोल विकासाची व्याख्या काय आहे हे आम्हाला समजले पाहिजे. माननीय राज्यपालांच्या तोंडी फक्त चांगले चांगले शब्द घालून आणि संपूर्ण महाराष्ट्रात सर्व आबादी आबाद आहे असे दाखविण्याचे काम या सरकारने केलेले आहे.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षाहून अधिक काळ झालेला आहे. परंतु आतापर्यंत कोकणावर शासनकर्त्यांनी सातत्याने अन्याय केलेला आहे. राज्यात समतोल विकास साधण्याचे काम या शासनाकडून होत नाही हे मला या ठिकाणी सांगितले पाहिजे. आज महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो त्यातील 45 टक्के पाऊस हा कोकणात पडतो. कोकणात सर्वात जास्त पाऊस पडून सुध्दा सर्वात जास्त पाण्याचा दुष्काळ कोकणामध्ये आहे. देशात 52 टक्के सिंचन होते. महाराष्ट्रात 18 टक्के होते आणि कोकणात फक्त 1.5 टक्के होते. हे सर्व पाहता माझे शासन समतोल विकास साधत आहे असे सांगितले जाते त्याबद्दल मला खेद होत आहे.

सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दोन हजार कोटी रुपये दिले. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांसाठी कोट्यवधी रुपये दिले. परंतु हे सर्व पैसे गेले कोठे ? सुरुवातीला यामध्ये 300 अधिकारी दोषी असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर हा आकडा 48 वर आला. परंतु अजून पर्यंत कोणावरही कारवाई झालेली नाही. गरीब शेतकऱ्यांसाठी असलेल्या गायी खासदारांच्या, मंत्री महोदयांच्या घरी गेल्या. मी ही सर्व माहिती माहितीच्या अधिकाराखाली घेतलेली आहे. कोणत्या मंत्री महोदयांच्या मुलाच्या, पुतण्याच्या घरी गायी कशा गेल्या याची यादी मी दिलेली आहे. शासन एका बाजूला शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी निधी देत आहे तर दुसऱ्या बाजूला तो निधी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. तेव्हा दोन हजार कोटी रुपये कोठे गेले ?

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नवव्या क्रमांकावर "महात्मा गांधी तंटामुक्त गाव" असा उल्लेख आहे. पुढे असे म्हटलेले आहे की, सुमारे 4 हजार गावांना तंटामुक्त गावे म्हणून घोषित करण्यात आली. ही चांगली बाब आहे. परंतु मंत्रिमंडळातील मंत्री महोदयांमध्ये जे तंटे होत आहेत त्याचे काय ? जिल्हापरिषदेच्या निवडणुकीमध्ये मला कोकणामध्ये हा अनुभव आला. मंत्रिमंडळातील मंत्री आपल्या सहकारी मंत्र्यांच्या बाबतीत "वाळू चोर" "लाकूड चोर"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

"कोंबडी चोर" म्हणत असल्याच्या बातम्या आम्ही वर्तमानपत्रात वाचल्या. शासन ग्रामीण भागातील तंटे मिटविण्यास पुढाकार घेत आहे, परंतु मंत्रिमंडळातील मंत्री महोदयांमध्ये जे तंटे सुरु आहेत त्याचे काय ? मंत्री महोदयांमधील तंटे मिटविले असते आणि तो उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आला असता तर बरे झाले असते. हा सर्व प्रकार शोभादायक नाही. मंत्रिमंडळातील सदस्य एकमेकांच्या छाताडावर बसलेले कधी आम्ही पाहिले नाही. परंतु आज आम्हास हे पहावयास मिळत आहे.

सभापती महोदय, कोयनेचे पाणी समुद्राला जाऊन मिळते. आपण हे पाणी कोकणाला दिले असते आणि तेथून मुंबईला आणले असते तर कोकणासह मुंबईचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटला असता.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमदास कदम. . .

पण फक्त घोषणा करण्यात येतात. विधानसभेमध्ये मला आश्वासन देण्यात आले की, कोयनेचे पाणी उचलण्यासाठी कोकणासाठी एक हजार कोटी रुपये देण्यात येतील. त्याचे काय झाले? त्याचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या भाषणात झाला असता तर मला आनंद वाटला असता. कोकण वैधानिक विकास महामंडळाची मागणी विधान परिषदेत आणि विधानसभेत केली गेली. तीन वेळा एक मताने विधानसभेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला पण त्याला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या त्यापेक्षा काहीही झालेले नाही. कोकण वैधानिक विकास मंडळाचे काय झाले ? याबाबतचे उत्तर देतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, मला पत्र आलेले आहे आणि मी दिल्लीला जाणार आहे पण त्यानंतर पुढे काय झाले? अद्याप काहीही झालेले नाही. म्हणून कोकण वैधानिक विकास मंडळाचे काय झाले या बद्दल माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणात या सभागृहाला समजले तर बरे होईल.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 19 मध्ये जुन्या पाटबंधाऱ्यांसाठी 135 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत ही चांगली गोष्ट आहे जुन्या पाटबंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी 135 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. पण कोकणामध्ये शिवशाहीच्या काळामध्ये कोकणातील पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी 35 पाटबंधाऱ्याची मंजुरी घेतली होती आणि ती कामे चालू केली होती त्याचा या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख झालेला दिसत नाही. शिवशाहीचे शासन संपले तेव्हा पासून कोकणातील 35 पाटबंधाऱ्यांची कामे तशीच राहिलेली आहेत. कोकणाने या शासनाचे काही पाप केले आहे का, काही गुन्हा केला आहे का? संबंध राज्यामध्ये समान विकास करण्यात येत आहे असे ज्यावेळी सांगण्यात येते त्यावेळी 1996 सालामध्ये 35 पाटबंधारे मंजूर केले, कामाला सुरुवात केली मग त्यानंतर गेल्या पंधरा वर्षात असे काय झाले की, कोकणातील पाटबंधाऱ्यासाठी एक पैसाही दिला नाही? कोकणातील 35 पाटबंधाऱ्याचा उल्लेख या अभिभाषणात झाला असता तर मला समाधान वाटले असते परंतु तो झाला नाही त्यामुळे मी या बद्दल खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 29 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबद्दल उल्लेख करण्यात आलेला आहे. मंत्री महोदय, श्री. हर्षवर्धन पाटील आपण रोजगार हमी योजनेचे 20 हजार कोटी रुपये मुख्य प्रवाहात आणले आहेत त्याबद्दल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमदास कदम. . .

आमची अडचण नाही पण आज कोकणामध्ये रोजगार हमी योजना पूर्णपणे ठप्प आहे. आपण त्यावेळी आम्हाला शब्द दिला होता. आपण माझ्यासमोर आयुक्तांना आणि जिल्हाधिकाऱ्यांना फोन केलेले आहेत पण शेवटी मी तो नाद सोडून दिला. सत्तेपुढे शहाणपण नसते हे आम्हाला समजले. कोकणात ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची सगळी कामे ठप्प आहेत ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या बद्दलचा उल्लेख अभिभाषणात झाला असता तर मला समाधान वाटले असते.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 38 मध्ये 2012 पर्यंत भारनियमन करणार अशी घोषणा करण्यात आलेली आहे. 2001 पासून गेल्या 12 वर्षात एकाही मेगावॅट विजेची निर्मिती झालेली नाही. सन 2001 मधील राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात हाच मुद्दा आलेला आहे. आपण सर्वजण त्याचे साक्षीदार आहोत. एका बाजूला या राज्यावर 2 लाख 45 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यातील 25 हजार कोटी रुपये विजेच्या निर्मितीसाठी खर्च केले असते तर पाच ते साडेपाच हाजर मेगावॅट विजेची भूक आपल्याला भागविता आली असती आणि आज महाराष्ट्रात 24 तास वीज देता आली असती. तुमचे शासन असताना तुम्ही कर्ज घेतले होते असे मला या ठिकाणी सांगण्यात येईल. होय, त्यावेळी आम्ही 19 हजार कोटी रुपये कर्ज घेतले होते त्यातून कृष्णाखोऱ्यासह आणि 52 उड्डाण पूलासह किती कामे केली याबाबतची यादी मी एका मिनिटात सांगू शकेन. 19 हजार कोटी रुपयांचे कर्ज आम्ही काढले होते पण आज 2 लाख 40 हजार कोटी रुपये कर्ज या शासनाने घेतले आहे, ते कशासाठी घेण्यात आलेले आहे यासंबंधीची श्वेतपत्रिका काढण्यात येत नाही. विजेचा प्रश्न सुटत नाही. कोकणात 55 हजार मेगावॅट विजचा प्रकल्प असताना देखील जैतापूरचा विनाशकारी प्रकल्प कोकणावर लादण्याचा प्रयत्न का होतो याचे उत्तर आम्हाला अद्याप मिळत नाही. 7 हजार मेगावॅट विजेची आवश्यकत असताना विदर्भामध्ये 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प घेण्यात आलेले आहेत. कोकणामध्ये 50 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प घेण्यात आलेले आहेत त्याचे काय करणार? याबाबतचे उत्तर आम्हाला मिळत नाही. त्याचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नाही हे मला अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, 100 कोटी झाडे लावण्याचा मानस अतिशय चांगला आहे. महाराष्ट्रातील सात जिल्हयामध्ये आताच पाणी नाही. (अडथळा) झाडे जगविण्यासाठी पाणी लागते ते कुठून आणणार?

यानंतर श्री. बरवड....

असंशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

100 कोटी झाडे आपण लावणार या बद्दल आनंद आहे पण ती झाडे लावल्यानंतर पुढच्या वर्षी खड्डे तेच असणार आणि झाडे नवीन असतील, अशी अवस्था होईल. म्हणून जी गोष्ट शक्य आहे ती गोष्ट झाली तर ठीक आहे. जसे छत्रपती शिवाजी महाराजांचे मोठे स्मारक आम्ही समुद्रामध्ये बांधणार आहोत हे आपण पाच सात वर्षापासून नुसते ऐकतो तशाच प्रकारे याही बाबतीत पुढच्या वर्षी माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये मुद्दा येता कामा नये. म्हणून या ठिकाणी विचार करुन निर्णय घेतला असता तर अधिक चांगले झाले असते असे मला वाटते.

सभापती महोदय, आदिवासींच्या विकासासाठी आश्रमशाळांचे बांधकाम करण्याबाबतचा मुद्दा बाब क्रमांक 74 मध्ये दिलेला आहे. ही चांगली गोष्ट आहे. पण ही बाब चौथ्यांदा माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये आणि अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये आलेली आहे. मी स्वत: आदिवासींच्या आश्रमशाळांना भेटी दिलेल्या आहेत. मी त्या आश्रमशाळांची अवस्था, तेथील मुलांची अवस्था पाहिली. त्यांच्या अंगावर कपडे नाहीत. फाटके कपडे आहेत. त्यांना गणवेश नाहीत. शिक्षक नाही. त्यांना जेवण मिळत नाही. चपाती मिळत नाही. एकदाच जेवतात. हे मी स्वत: पाहिलेले आहे. मी स्वत: भेटी दिलेल्या आहेत. त्याकडे जर शासनाने लक्ष दिले असते आणि त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केला असता तर मला आनंद वाटला असता.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख आला की, माननीय राज्यपालांचे भाषण संपले असे समजावयाचे, अशी आतापर्यंतची प्रथा आहे. बेळगाव, कारवार, धारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे ही गेल्या पन्नास वर्षापासूनची मागणी आहे. ते लहान भाऊ आहेत. आपल्याला ते मोठे भाऊ म्हणतात. त्या संदर्भात अनेक वेळा या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. मी त्या बाबत आता बोलणार नाही. पण त्यासाठी चांगले वकील देऊन आम्ही हा प्रश्न लवकर सोडवू अशा पध्दतीचे आश्वासन जर या ठिकाणी मिळाले असते तर अधिक सोयीचे झाले असते असे मला वाटते. सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे हे भाषण या शासनाने माननीय राज्यपालांची दिशाभूल करुन त्यांच्या तोंडी टाकलेले आहे असे मी समजतो. या बद्दल मी खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सभागृहात केलेल्या आक्षेपार्ह वर्तनाबद्दल सदस्यत्व निलंबित करणे

मु.शी. सभागृहात केलेल्या आक्षेपार्ह वर्तनाबद्दल सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी व सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांचे सदस्यत्व निलंबित करण्याबाबत संसदीय कार्य मंत्री यांचा प्रस्ताव

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निर्णय जाहीर करण्यापूर्वी मला बोलावयाचे आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे साहेब, मी आपल्याला बोलण्याची परवानगी देऊ शकत नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय मी, आपल्या अनुमतीने असा प्रस्ताव मांडतो □ी, आज मंगळवार, दिनांक 20 मार्च, 2012 रोजी सभा□ृहाचे □ाम□ाज सुरु असताना श्री. जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स. यांनी सभागृहात आक्षेपार्ह वर्तन करुन सर्वोच्च सभागृहाची प्रतिष्ठा मलिन केल्यामुळे त्यांनी सभागृहाचा अवमान केला आहे. त्यांच्या या आक्षेपार्ह वर्तनाबद्दल ही विधान परिषद असा ठराव करीत आहे की, त्यांचे सदस्यत्व दिनांक 22 मार्च, 2012 पर्यंत निलंबित करण्यात यावे.

तसेच आज मंगळवार, दिनांक 20 मार्च, 2012 रोजी सभा□ृहाचे □ाम□ाज सुरु असताना श्री. राम पंडागळे, वि.प.स. यांनी सभागृहात अत्यंत अशोभनीय अशा प्रकारे वर्तन करुन राष्ट्रीय नेत्यांविषयी अनुद्गार काढले व गिरणी कामगारांच्या प्रश्नांवर बोलताना सभागृहाच्या प्रतिष्ठेला न शोभणारे हीन दर्जाचे अश्लाघ्य वक्तव्य करुन सर्वोच्च सभागृहाची प्रतिष्ठा मलीन केल्यामुळे त्यांनी सभागृहाचा अवमान केला आहे. त्यांच्या या अत्यंत आक्षेपार्ह, अशोभनीय व गैरशिस्त वर्तनाबद्दल ही विधान परिषद असा ठराव □रीत आहे □ी त्यांचे सदस्यत्व विद्यमान अर्थसंकल्पीय सत्र संपेपर्यंत निलंबित करण्यात यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

सभापती महोदय, या राज्यामध्ये हे सभागृह सर्वोच्च अशा प्रकारचे सभागृह आहे. वारंवार जनतेमध्ये आणि समाजामध्ये एक उच्च सभागृह म्हणून या सभागृहाची गणना केली जाते. अनेक वेळा हाही विषय आला की, या सभागृहाची आवश्यकता आहे की नाही, याबद्दल अनेक चर्चा या राज्यात आणि इतर राज्यांमध्ये सुध्दा झालेल्या आहेत. या सभागृहाचा एक डेकोरम कायम राहिलेला आहे. एकदा पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यांच्या आसनावरुन निर्देश दिल्यानंतर या सभागृहामध्ये काम करणारा सदस्य या बाजूचा असो किंवा त्या बाजूचा असो, अशा पध्दतीने आपण या सभागृहाचा अवमान कधी होऊ देत नाही. परंतु दुर्दैवाने आज अशा प्रकारचा प्रसंग या सभागृहामध्ये आला. मी सुध्दा 18 वर्षे या विधिमंडळाचा सदस्य म्हणून काम करीत आहे. पण या घडलेल्या घटनेबद्दल पीठासीन अधिकाऱ्यांनी माफी मागणे हे आपणा सगळ्यांच्या दृष्टीने योग्य नाही असे मला वाटते. वास्तविक पाहता माननीय उप सभापती महोदय पीठासीन अधिकारी असताना त्यांनी या सभागृहाची दिलगिरी व्यक्त केली. माझी सभागृहाला विनंती आहे की, उप सभापतींसारख्या व्यक्तीने या सभागृहाची दिलगिरी व्यक्त करणारे जे वक्तव्य आहे ते आपण सभागृहाच्या कामकाजातून काढावे. त्याला सभागृहानेही मान्यता द्यावी आणि हा जो प्रस्ताव आहे तो सभागृहाने मान्य करावा. मी एकच विनंती करतो की, या सभागृहाचा कायम उच्च डेकोरम राहण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करावा.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

असे दुर्दैवी प्रसंग या सभागृहात पुन्हा येऊ नयेत. या सभागृहात विविध विषयांवर चर्चा करणे, भाषणाद्वारे आपल्या भावना व्यक्त करणे, आपली बाजू स्पष्टपणे मांडणे, एखादा विषय मान्य नसेल तर तो मांडण्याची सुध्दा सभागृहाची एक विशिष्ट पध्दत आहे. काही प्रथा आहेत, परंपरा आहे, आपण काही नियम केलेले आहेत. उद्या असा कोणी आक्षेप घेऊ नये की, सरकारच्या बाजूच्या सदस्यांनी बोलल्यावर त्यांना वेगळा न्याय दिला जातो आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांना वेगळा न्याय दिला जातो. या सर्वोच्च सभागृहाची प्रतिष्ठा ही तुमच्या व आमच्यापेक्षा अधिक महत्वाची आहे. वास्तविक हा प्रसंगच यावयास नको होता. गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी चांगल्या पध्दतीने चर्चा झाली होती. आपण त्यासंबंधी निर्णय दिला होता. आपण निर्णय देण्यापूर्वी सभागृहात व आपल्या दालनातही चर्चा झाली होती. आजच्या सारख्या घटना सभागृहात पुन्हा घडू नयेत म्हणून मी हा प्रस्ताव मांडत आहे. या प्रस्तावाला सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला.

सभापती : या सभागृहात अशा प्रकारचे गैरशिस्तीचे वातावरण होत असताना पीठासीन अधिकारी हेच या सभागृहातील अत्यंत महत्वाचा दुवा असतात यादृष्टीने सन्माननीय उप सभापतींनी या सभागृहात दिलगिरी व्यक्त केलेली आहे. त्यांचे शब्द मी कामकाजातून काढून टाकत आहे. या सभागृहाची जी प्रतिष्ठा आहे ती कोणत्याही परिस्थितीत सर्वोच्च राहिली पाहिजे यादृष्टीने सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रयत्न करावे. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना मी सांगेन की, आपण आता सभागृहाच्या बाहेर जाणे आवश्यक आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी सुध्दा सभागृहाच्या बाहेर जावे अशी मी त्यांना सूचना करीन.

(सन्माननीय सदस्य सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी व राम पंडागळे सभागृहातून बाहेर जातात.)

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

पृ.शी.: गिरणी कामगारांनी घरे मिळण्याची केलेली मागणी

मु.शी.: गिरणी कामगारांनी घरे मिळण्याची केलेली मागणी या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे चालू....)

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने गिरणी कामगारांच्या घरासंबंधीच्या अतिशय संवेदनशील प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या वेळी उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्यांची नोंद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये व त्यापूर्वी या प्रश्नासंबंधी सभागृहात चर्चा झाली होती. त्या चर्चेला दिलेले उत्तर, दिलेले आश्वासन, विविध कामगार संघटनांबरोबर झालेल्या बैठका.....

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

गट नेत्यांबरोबर झालेल्या बैठका, यासर्व बैठकांनंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होताना या प्रश्नाबद्दल मी उत्तर देईन असे सर्व गट नेत्यांना आणि गिरणी कामगारांच्या संघटनांना सांगितले होते. म्हणून संधी मिळाल्या बरोबर आधी दोन्ही सभागृहामध्ये शासनाच्या वतीने जे निवेदन केले होते त्याची पुनरावृत्ती केली. किती घरे उपलब्ध आहेत आणि किती होतील याची माहिती दिली. घरांच्या किंमतीच्या प्रश्नाची देखील चर्चा झाली होती आणि त्याची देखील कल्पना सर्वांना देण्यात आलेली होती. किती खर्च होईल, किती सूट देता येईल याबद्दल मंत्रिमंडळामध्ये जो अंतिम निर्णय झाला त्याची माहिती मी माझ्या निवेदनाद्वारे सभागृहाला दिली होती. विस्तृत निवेदन वितरित केले गेलेले आहे आणि त्याबद्दल चर्चाही झालेली आहे. वर्तमानपत्रातून देखील त्याची माहिती आलेली आहे. त्या अनुषंगाने सभागृहामध्ये चर्चा झाली.

आज गिरणी कामगारांचा मोर्चा आला होता. त्या ठिकाणी राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे काही सन्माननीय सदस्य आणि गिरणी कामगारांच्या संघटनांचे प्रतिनिधी यांच्याशी माझी चर्चा झाली. या सर्व प्रक्रियेनंतर आपल्या आलेल्या सूचना, घरांची जी किंमत मी माझ्या निवेदनामध्ये दिली होती की G+4 मजल्याच्या घरांची किंमत 4 लाख 81 हजार आणि G+24 मजल्याच्या घरांची किंमत सरासरी 8 लक्ष 3हजार ते 9 लक्ष 35 हजार अशी धरुन सरासरी 8 लक्ष 34 हजार अशी घोषित केली होती. इतर गोष्टींवर देखील सभागृहामध्ये बरीच चर्चा झाली. ही किंमत शून्य करावी, घर मोफत द्यावे असे एक मत मांडण्यात आले. दुस-या बाजूने असे मत मांडण्यात आले की घरे परवडतील अशा माफक किंमतीमध्ये देण्यात यावीत. ख-या अर्थाने दोन प्रश्न चर्चीले गेले. जी 6900 घरे तयार झालेली आहेत. ती घरे गिरणीनिहाय लॉटरी काढून वितरित करावीत असा निर्णय झाला आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी करीत असताना घराची किंमत किती ठरवायची येथे निर्णय थांबला होता. शासनाच्या वतीने मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णया प्रमाणे ही किंमत मी घोषित केली. किंमत कशी काढली गेली या बद्दल थोडा संभ्रम होता. म्हणून घरांच्या किंमतीची माहिती वेबाईटवर टाकावी असे मी आदेश दिले आणि सर्व माहिती वेबसाईटवर ठेवलेली आहे. सर्व गिरणी कामगारांकडे आणि त्यांच्या संघटनांकडे हे कॅल्क्युलेशन आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

हा निर्णय का घेतला आणि कसा घेतला हा प्रश्न आहे. जी एकूण जमीन उपलब्ध झाली त्या जमिनीवर विविध गिरण्यांच्या क्षेत्रामध्ये सदनिका बांधल्या गेल्या त्याचा जो सरासरी खर्च आला तो काढून आपल्या समोर ठेवलेला आहे. अर्थात तो खर्च होताना प्रति स्क्वेअर फूट किती खर्च आला, केन्द्र सरकारचा सेवा कर किती होता, सर्व्हिस टॅक्स किती होता, कंत्राटी कामावरचा कर किती होता, अनुषंगिक अकल्पित खर्च किती होता, महानगरपालिकेच्या जमिनीवरील बांधकामाचा आकार व इतर गोष्टी किती होत्या आणि हे सर्व काम चालू असताना म्हाडाचा व्याजावर किती खर्च झाला याची माहिती दिलेली आहे. ही माहिती आता सर्वांकडे उपलब्ध असेल. त्याच प्रमाणे म्हाडाच्या वतीने देखरेखीवर 15 टक्के खर्च असतो, आस्थापना खर्च असतो. हे सर्व खर्च धरुन हे कॅल्क्युलेशन झाले होते. सरासरी 12 लाख 65 हजार रुपये किंमत होती. केन्द्र शासनाकडून JNNURM अंतर्गत प्रति सदनिका मिळालेले रु. 2लाख 6 हजार रु. इतके अनुदान वजा करुन ती किंमत आली. त्यानंतर कामावरील देखरेख खर्च 15 टक्के आहे. हा खर्च माफ केल्यानंतर 8 लाख 34 हजार रु. अशी किंमत करण्यात आली. केन्द्र सरकारचे अनुदान पास ऑन केले आणि देखरेख व इतर अनुषंगिक खर्च माफ केल्यानंतर जो खर्च झाला तो सांगितला. या खर्चामध्ये आणखी बदल करता येईल का याची मी माहिती घेतली.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

महोदय,या सदनिका बांधण्याकामी व इतर कामे करण्यासाठीचा सर्व खर्च म्हाडाने म्हाडाने केलेला आहे. 7 हजार सदनिका बांधताना म्हाडाचा जवळपास 600 कोटी रुपये एवढा खर्च झालेला आहे. झालेला खर्च म्हाडाला परत मिळाला पाहिजे. ही घरे उपलब्ध झालेल्या जमिनीवर "ना नफा ना तोटा " या तत्वावर दिली जातील असे पूर्वीच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केले होते. तेच धोरण या शासनाने कायम ठेवले आहे. त्यामध्ये नफा घेण्याची कल्पना नाही. गिरणी कामगारांना जमीन शासन फुकट देत आहे, पण किमान घरे बांधकामाचा खर्च त्यांनी दिला पाहिजे. ही भूमिका शासनाची होती, शासनाच्या या भूमिकेबाबत तसेच दोन, तीन गोष्टीबाबत पूर्वीच्या समितीमध्ये एकमत झाले होते. पहिल्या टप्प्यातील 6 हजार घरे बांधून झालेली आहेत. ज्या गिरण्याच्या कंपाऊंडमध्ये जेवढी घरे बांधलेली आहेत, त्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या एकूण कामगारांची जी संख्या असेल, त्या कामगारांमध्ये लॉटरी काढून ती घरे वितरित केली जातील व ज्या गिरणी कामगारास घरे उपलब्ध होतील, त्यांच्याकडून घराची ठरलेली किंमत घेण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. आपण मागणी केली की, 1 लक्ष 48 हजार गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. शासनाची तशी इच्छा जरी असली तरी तेवढी घरे बांधण्यासाठी जमीन उपलब्ध झाली पाहिजे. तेवढी घरे बांधण्यासाठी जो खर्च येईल तो करण्याची आपली सर्वांची तयारी असली पाहिजे. तो खर्च सहन करण्याची आपली क्षमता पाहिजे.

महोदय, यात पहिला प्रश्न असा आहे की, त्या घरांची किंमत किती ठरवावयाची ? त्या घरांची किंमत एकदा मान्य झाली की आपल्याला ती घरे लॉटरी पध्दतीने देता येतील. दुसरा प्रश्न जी जमीन उपलब्ध झालेली आहे व होत आहे, त्या जमिनीवर 9080 घरे त्याच पध्दतीची बांधता येतील. ती घरे अजून बांधलेली नाहीत. घरांच्या बांधकामास सुरुवात झालेली नाही. त्याचे कारण असे की, शासनाला गिरण्यांकडून सगळी जमीन अद्याप मिळालेली नाही. ज्या ज्या गिरण्यांकडून जमीन मिळेल, त्या त्या ठिकाणी घरे बांधण्याचे काम करता येईल. ते काम करावयाचे असेल तर तेथील नवीन घराची किंमत किती ठेवावयाची याचा निर्णय झाला पाहिजे. मागच्या काळात ही घरे बांधलेली आहेत, त्यावेळचा जो खर्च आला आहे, त्याच्या आधारे त्या घराची किंमत 8 लाख 34 हजार रुपये एवढी ठेवलेली आहे.आज नव्याने घरे बांधण्याचे ठरविले तर त्यास किती खर्च येईल, याबाबतचा हिशोब कुठे तरी झाला पाहिजे. 8 लाख 34 हजार रुपये किंमतीचे घर आहे, ती किंमत

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

वाजवी आहे की अवाजवी आहे, ती किंमत कमी-जास्त करता येईल काय, याबाबतची माहिती मी मघाशीच दिलेली आहे. गिरण्यांकडून जसजशी जमीन मिळेल तसतशी घरे बांधण्यात येतील. परंतु ती कोणी बांधावयाची ? याबाबतीत दोन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत ती माहिती मी आपणाला दिलेली आहे. प्रत्येक गिरणीमध्ये जेवढी जमीन उपलब्ध होईल, त्या जमिनीवर एक सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करावी. त्या संस्थेचे सदस्य लॉटरी पध्दतीनेच ठरवावेत. ते त्या गिरणीमधीलच कामगार असावेत, त्या संस्थेला फुकट जमीन मिळाल्यानंतर तेथे संस्थेने घरे बांधावीत. हा प्रस्ताव आपल्यासमोर पहिल्यापासून होता. घरांची किंमत ठरवून म्हाडाला घरे बांधण्याबाबत आपण आदेश द्यावेत. ती घरे म्हाडानेच बांधून द्यावीत आणि त्या संस्थेतील लोकांना ती घरे पुन्हा लॉटरी काढून द्यावीत किंवा अगोदर लॉटरी काढून घरांचे वितरणपत्र द्यावे अशा प्रकारचे निर्णय आपल्याला दुसऱ्या टप्प्यासाठी घ्यावे लागतील.

सभापती महोदय, पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये 16 हजार घरे गिरणी कामगारांना मिळाली तर 1 लाख 34 हजार गिरणी कामगाराचे काय करावयाचे ? आपण मुंबईसाठी रुल 58 प्रमाणे सुत्र तयार केले आहे. त्या अनुषंगाने फॉर्म्यूला काढला आहे. त्यामध्ये मात्र मोकळ्या जागेवरची जमीन देण्याचा निर्णय झाला आहे. परंतु जमीन काही प्रमाणातच उपलब्ध आहे आणि त्याबाबतची माहिती मी मागील अधिवेशनात आपल्याला दिली होती. उपलब्ध झालेल्या जमिनीवर काही प्रमाणात या गिरणी कामगारांच्या घरांची व्यवस्था होऊ शकते. तो निर्णय योग्य होता की योग्य नव्हता याबाबतीत मी भाष्य करु इच्छित नाही. याबाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. जमीन मालक कोर्टात गेलेले आहेत. मालकांच्या बाजूने निर्णय झाला, कामगारांच्या बाजूने निर्णय झाला नाही, याबाबतचा संपूर्ण इतिहास सदनातील सर्व सदस्यांना माहिती आहे. उपलब्ध झालेल्या जमिनीतून किती घरे बांधणे शक्य होईल त्याबाबतची देखील माहिती आपल्याला दिलेली आहे. पहिल्या टप्प्यातील घराच्या किंमती, दुसऱ्या टप्प्यातील घरे बांधण्याची प्रक्रिया असे दोन प्रश्न आहेत आणि तिसरा प्रश्न उर्वरित 1 लाख 34 हजार गिरणी कामगारांची नावे नोंदली गेली आहेत. त्यांच्यासाठी जमीन कुठून आणावयाची आणि त्यासंबंधी पुढील प्रक्रिया कशी करावयाची, असे एकूण तीन प्रश्न आपल्या समोर आहेत. याबाबतीत मी माझ्या सहकाऱ्यांबरोबर चर्चा केली, गिरणी कामगारांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा केली, गेल्या दोन, तीन दिवसापासून गट नेत्यांशी चर्चा करीत

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

आहे

महोदय, महाराष्ट्रातील बहुतेक गिरणी कामगार हे ग्रामीण भागातील आहेत. काही गिरणी कामगार हे माझ्या जिल्हयातील आहेत. काही गिरणी कामगार कोकण विभागातील आहेत, काही गिरणी कामगार पश्चिम महाराष्ट्रातील आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

ही सर्व आपली जवळची मंडळी आहेत. खरे म्हणजे आपल्या परिश्रमाने आजची मुंबई महानगरी निर्माण करण्यामध्ये त्यांनी सिंहाचा वाटा उचललेला आहे हे कोणी नाकारु शकत नाही. त्याकरिता आपल्याला आणखी एक विचार करता येईल. याबद्दल आम्ही सर्वांनी बसून एकत्रपणे चर्चा केली. त्या ठिकाणी आम्ही एक निर्णय घेतला आहे. तो निर्णय मी सभागृहाला सांगू इच्छितो. किंमत ठरविण्याबद्दलचा प्रश्न नसून जी किंमत आहे ती कमी करता येईल काय हा विचार करण्यात आला. 8.34 लाख किंमत आहे त्यामध्ये आणखी सूट देता येईल काय हा प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रिमंडळातील माझे सहकारी यांची समिती नेमून दोन-तीन अधिकारी, मिल संघटनांचे प्रतिनिधी यांना त्या समितीमध्ये घेऊन आणखी काही सूट देता येईल काय याची चर्चा करुन सात दिवसात अंतिम निर्णय घेऊन तो सभागृहात मांडण्यात येईल आणि लॉटरी प्रक्रिया पुढे होणार असेल तर चर्चा पुढे करु. निदान 7 हजार घरे बांधली आहेत, त्याबाबत कोणी वेडयावाकडया मार्गाने अडथळे आणू नयेत अशी आमची कल्पना आहे. आज सरासरी घराची किंमत 8.32 लाख रुपये आहे. वास्तविक ती किंमत त्यापेक्षा कमी आहे. परंतु म्हाडाच्या व्याजाचा काही भाग त्यामध्ये समाविष्ट आहे. त्या व्याजाच्या भागाचा हिस्सा राज्य सरकार घेऊ शकेल काय किंवा एखादा कर असेल, जो म्हाडाला भरावा लागतो, त्या कराची रक्कम राज्य सरकार स्वीकारु शकते का असा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर घेऊन जाऊ. त्या ठिकाणी एकमत झाले तर ही लॉटरी प्रक्रिया पुढे गेली पाहिजे आणि लोकांना घरे मिळाली पाहिजेत.

सभापती महोदय, त्याचबरोबर दुसरा एक प्रकार आहे. विस्तृतपणे पाहिले तर गटनेत्यांना सभागृहात निवेदन करण्याची गरज भासणार नाही. प्रत्येक मिलमध्ये किती जमीन मिळाली आणि आणखी किती जमीन मिळणार आहे याची माहिती वेबसाईटवर देऊन आणखी किती घरे तयार होऊ शकतील याचीही माहिती वेबसाईटच्या माध्यमातून आपल्या सर्वांना देण्यात येईल किंवा सभागृहात दिली जाईल. त्यामध्ये म्हाडाने घरे बांधावयाची ठरविली तर किंमत निश्चित करण्याची प्रक्रिया करायची आहे. लॉटरी काढून तेथे गृहनिर्माण संस्था स्थापन करावयाच्या झाल्या तर तो प्रस्ताव अतिशय उत्तम असा आहे. तो मान्य झाला तर तो अंमलात आणावा लागेल.

सभापती महोदय, आणखी एक समिती गठित करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. त्यामुळे जमीन उपलब्ध करण्याकरिता इतर काही मार्ग शोधता येतील का, त्यामध्ये बृहन्मुंबई

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

क्षेत्रामध्ये, एमएमआर क्षेत्रात जमीन उपलब्ध होईल काय, एमएमआरडीएच्या माध्यमातून रेंटल हाऊसिंगकरिता जमीन उपलब्ध करण्यात येते त्या ठिकाणी गिरणी कामगारांच्या घरासाठी जमीन मिळेल का, त्या ठिकाणी कोणी अर्ज केले असतील तर त्यांच्या गृहनिर्माण संस्था स्थापन करुन त्यांना तेथे जागा देता येईल का, काही जमीन जिल्हयाच्या मुख्यालयी शासनाच्या खर्चाने उपलब्ध करुन दिली तर तेथे काहींना ॲडजस्ट करता येईल. अनेक गिरणी कामगारांनी भेटून मला सांगितले की, आम्ही आता आमच्या गावी परत आलो आहोत. आमच्या मुलांचे जीवन सुसह्य व्हावे यासाठी आम्हाला जिल्हयाच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी जमीन दिली तर आम्ही तेथे राहू. त्यामुळे काही प्रमाणात हा प्रश्न सुटू शकतो. अशा प्रकारे या प्रश्नाचे गांभीर्य हळूहळू कमी करीत जे 1.32 लाख कामगार शिल्लक राहतील त्यांच्या घराचा प्रश्न सुटावा याबद्दल दुसऱ्या समितीस मार्ग काढण्यास सांगितले आहे. काही पर्याय पुढे आले आहेत, ते पर्याय एकत्रित करुन पुन्हा शासनापुढे दोन महिन्यात विषय येईल. आज तरी आपल्या सर्वांची आणि माझी कितीही इच्छा असली तरी सर्वांना घरे मिळतील अशी परिस्थिती नाही. परंतु बऱ्याच प्रमाणात हा प्रश्न सुटू शकतो. इच्छाशक्तीने काम केले आणि कामगार संघटनांनी सहकार्य केले तर अनेक पर्याय निघू शकतात. पर्याय काढण्याची माझी इच्छा आहे. त्यातून प्रश्नाची गंभीरता कमी करुन ज्या लोकांनी मुंबईकरिता त्याग केला आहे, ज्यांचे जीवन गिरणी संपामुळे उद्ध्वस्त झाले त्यांना दिलासा देण्याची प्रक्रिया सुरु होईल.

सभापती महोदय, मला या ठिकाणी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करावयाची आहे की, ही जी प्रक्रिया आतापर्यंत पूर्ण होत आली ती पुढे न्यावी. किंमतीबद्दल आठवड्याभरात सभागृहासमोर आम्ही पुन्हा येऊ. 8.34 लाख रुपयांपेक्षा कमी किंमत करता येईल काय याचा विचार केला जाईल. त्याबद्दल अंतिम निर्णय घेण्यासाठी सभागृहासमोर विषय मांडण्यात येईल. लॉटरी पध्दत निश्चित करुन पुढील प्रक्रिया करावी, किंवा.....

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

दुसऱ्या टप्प्यातील घरे उपलब्ध होण्यासाठी काय करता येईल याबाबत सभागृहाने देखील मार्गदर्शन व सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. दुसरा मुद्दा म्हणजे इतर ठिकाणी मुंबईत व बाहेर जागा उपलब्ध होऊ शकेल काय याबद्दल आपण प्रयत्न करणार आहोत. तसेच राजीव गांधी आवास योजना जी केंद्र शासनाच्या माध्यमातून राबविली जाते त्यासाठी 50 टक्के अनुदान देण्यात येते. या योजनेच्या माध्यमातूनच आपण राज्याला झोपडीमुक्त करण्याचे अभिवचन देत आहोत आणि त्याच्या आधारे हा विचार करता येईल. अशा प्रकारे केंद्राकडून मिळणारे 50 टक्के अनुदान व राहिलेले 50 टक्के राज्य शासनाच्या माध्यमातून तसेच लाभार्थ्यांच्या माध्यमातून उभे करता येतील काय याचाही विचार करीत आहोत. अशा प्रकारे या योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या जास्तीत जास्त रकमेचा उपयोग करुन ही उर्वरित घरे बांधण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. ही बाब मंत्रिमंडळासमोर ठेवलेली असून माझा प्रामाणिक प्रयत्न हाच राहील की या माध्यमातून जास्तीत जास्त घरे उपलब्ध करुन देऊन ज्या गिरणी कामगाराने मुंबईसाठी त्याग केलेला आहे, त्यांच्या कुटुंबावर आघात झालेला आहे त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला जाईल.

महोदय, यातील काही गिरणी कामगार आज आपल्यामध्ये नाहीत म्हणून गट नेत्यांनी सूचना केल्याप्रमाणे त्यांच्या वारसांना आपण सामील करुन घेतलेले आहे. तसेच जी तयार घरे आहेत त्यांची किंमत 8.34 लक्ष रुपये आपण ठेवली असून त्याचाही विचार आपण करीत आहोत. त्याचबरोबर इतर ठिकाणी अजून 9 हजार घरे तयार झाल्यानंतर हा आकडा अजून कमी होईल. अशा प्रकारे 16 हजार घरांचे वाटप झाल्यानंतर 1.32 लाख लोकांच्या घरांचा प्रश्न राहतो. त्यांच्यासाठी इतर ठिकाणी जमीन शोधावी लागणार आहे व तशी ती शोधण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. तसेच या प्रक्रियेत सभागृहाच्या नेत्यांचे सहकार्य सुध्दा अपेक्षित असून आपण गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न पुढे सरकवू अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : महोदय, गिरणी कामगारांचे शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्र्यांना भेटल्यानंतर त्या कामगारांची आणि माझी दालनात भेट झाली होती. त्यांची अपेक्षा ही नक्कीच आहे की, या घरांची किंमत कमी करावी व तसे माननीय मुख्य मंत्र्यांनी एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. त्यासंबंधीचा निर्णय घेऊन सभागृहात मुख्यमंत्री महोदय जाहीर करतीलच व त्याचे नक्कीच आम्ही स्वागत करु. पण माझी अशी विनंती आहे की, कुठलीही आंदोलने चालतात त्यातील एका घटकाला फायदा मिळाला आणि दुसऱ्याला मिळणार नाही असे न करता दोन्हीच्या बाबतीत आपण ज्या प्रपोझल्सचा विचार केला आहे तो निर्णय सुध्दा त्याच वेळेस जाहीर करणे आवश्यक असते. त्यात आपण एमएमआरडीए च्या क्षेत्रात किंवा राजीव गांधी आवास योजनेच्या माध्यमातून तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी सुध्दा जेथे शक्य असेल तेथे जमीन मिळविण्याचा प्रयत्न करणार असे सांगितले. पण हे सर्व प्रयत्न याच अधिवेशनात, किंबहुना हे अधिवेशन संपण्यापूर्वी जाहीर केले तर बरे होईल. तरच या 1.48 लाख लोकांना न्याय मिळाल्यासारखे होईल, अन्यथा लॉटरी पध्दतीने घरांचे वाटप झाल्यानंतर त्यात काहींना मिळेल आणि काहींना मिळणारच नाही व प्रश्न पुन्हा तसाच राहील, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. तसेच मी जी सूचना केली त्यासाठी गिरणी कामगार व त्यांचे नेते देखील मान्यता देतील. म्हणून आपण या सर्व गोष्टींचा विचार करुन 20 एप्रिल, 2012 पूर्वी सभागृहात तसा निर्णय घोषित केला तर आपण गिरणी कामगारांबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या त्या गिरणी कामगारांचा शासन सहानुभूतीने विचार करीत आहे असा अर्थ होईल, याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, गिरणी कामगारांना देण्यात येणाऱ्या घरांच्या किंमतीबाबत फेरविचार करण्यासाठी कॅबिनेटसमोर जाऊन विचार करु. तसेच इतरही योजनांचा आपण विचार केला व शासनाकडून काही मदत करता येईल काय असेही त्यांनी सांगितले. माझी विनंती अशी आहे की, ज्या गिरणी कामगारांची मुले मुंबई, पुणे किंवा ठाण्यात आहेत आणि जे या घरासाठी लागणारी रक्कम देऊ शकतील असा एक भाग आणि दुसरा टप्पा असा आहे की ज्यांना खाण्याचे सुध्दा वांधे आहेत ते एक लाख सुध्दा देऊ शकणार नाहीत. मग जे पैसेच देऊ शकणार नाहीत त्यांना शासन घरे देणार की नाही हे सुध्दा स्पष्ट झाले पाहिजे. तसेच आपण म्हटल्याप्रमाणे काही गिरणी कामगारांनी मागणी केली की, आम्ही आमच्या गावाला आलेलो असून याच ठिकाणी आम्हाला जमीन उपलब्ध करुन देता आली तर द्यावी. पण जे मुंबईलाच आहेत आणि त्यांच्याकडे पैसे सुध्दा नाही, जगण्यासाठी सुध्दा त्यांच्याकडे काहीच नाही अशा लोकांच्या घरांच्या बाबत कोणता निर्णय शासन घेणार आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे. गेल्या अनेक वर्षांपासून शासन जागेच्या शोधात आहे असे सांगत आला आहात.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

मग आपली यंत्रणा इतके दिवस काय काम करीत होती ? आम्ही जागा शोधत आहोत असे उत्तर मागच्या मुख्यमंत्र्यांनी सुध्दा दिले होते. त्यामुळे जागा शोधण्यासाठी स्पेसिफिक टाईम घेतला व काही यंत्रणा ...

सभापती : आपल्याला जेवढी संधी देता येईल तेवढी देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देखील दिलेले आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी बोलण्याची संधी मागितल्यामुळे त्यांनाही मी संधी दिलेली आहे. आपल्यालाही संधी दिलेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर आपले काय म्हणणे आहे ते मांडावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, घरासाठी जे गिरणी कामगार पैसे उभे करु शकणार नाहीत त्यांना आपण मोफत घरे देणार आहोत काय, किंवा घरांच्या किंमती आणखी खाली आणणार आहोत काय याचा विचार होण्याची नितांत आवश्यकता आहे. जे लोक आता ग्रामीण भागामध्ये राहत आहेत त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत ? बाहेरच्या लोकांसाठी आपण 5 लाख घरे बांधणार होतो ती घरे आपण कोठे बांधणार होतो, त्यांच्यासाठी आपण जमीन कोठे शोधली होती ? त्या 5 लाख घरामध्ये आपण गिरणी कामगारांची एक लाख घरे ॲडजस्ट करु शकतो काय ? यासंदर्भात विचार व्हावा अशी माझी विनंती आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नाच्या संदर्भातील बैठकींना मी पूर्वीपासून हजर होतो. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी कमिटीच्या उपस्थितीच्या संदर्भात माहिती दिल्यामुळे जो समज-गैरसमज होता तो ब-याच अंशी दूर झाला असावा असा माझा समज आहे. यासंदर्भातील काही मुद्यांच्या बाबतीत आमचा गैर समज होता व तो अजून सुध्दा आहे. त्यामुळे यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना माझी अशी विनंती राहणार आहे की, पहिली कमिटी 60 दिवसात निर्णय घेणार आहे. यामध्ये घरांची किंमत 8.34 लाख रुपयांवरुन किती कमी करता येईल हे पाहिले पाहिजे. चार माळयांच्या ज्या इमारती आहेत त्यातील घराची किमत 4 लाख रुपये राहणार आहे त्यामुळे पहिल्या निकषा प्रमाणे या घरांच्या किमती सुध्दा कमी व्हाव्यात अशी विनंती आहे. आपण जे दुस-या कमिटीचे गठन करीत आहोत त्यामध्ये कृती समितीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

जास्तीत जास्त सदस्य असणे आवश्यक आहे. जागेच्या संदर्भात शासनाचे संबंधित अधिकारी मग ते एमएमआरडीएचे असतील किंवा म्हाडाचे असतील. शासनाकडे जागा आहे परंतु घरे देण्याची सरकारची मानसिकता नाही अशी लोकांची भावना होत चालली आहे त्यामुळे ही मानसिकता यापुढे राहता कामा नये. जागा कुठे आहे, कशी आहे याबाबत चर्चा होऊ शकेल. यासंदर्भात फायनल प्लॅन तयार झाल्यानंतर त्यावर मंत्रिमंडळात चर्चा होऊ शकेल. घरांच्या प्रश्नाच्या संदर्भात पारदर्शकता राहण्याची नितांत आवश्यकता आहे व हाच मेसेज लोकांच्या समोर जसाच्या तसा जाण्याची आवश्यकता आहे. हा विषय भावनात्मक असल्याकारणाने भाषणे करतांना वेगळे बोलले जाते परंतु वस्तुस्थिती वेगळीच असते त्यामुळे असे काही होता कामा नये एवढी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. या ठिकाणी मी एक सूचना केली होती की, संयुक्त महाराष्ट्राच्या लढयामध्ये ज्यांनी हौतात्म्य पत्करले होते त्या 106 हुतात्म्यांच्या वारसामध्ये 22 हुतात्मे हे गिरणी कामगार होते. त्यामुळे या 22 गिरणी कामगारांच्या हुतात्म्यांना विनाविलंब घरे दिली गेली तर सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य तसेच कामगारांचे प्रतिनिधी सुध्दा ऑब्जेक्शन घेणार नाही असे मला वाटते त्यामुळे ही मागणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य करावी अशी मी विनंती करतो

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, मैं माननीय मुख्यमंत्री और महाराष्ट्र शासन को धन्यवाद देता हूँ. उन्होंने एक कठिन विषय का रोड मॅप तैयार किया है और इससे रास्ता निकलेगा. पिछली बार जब माननीय मुख्यमंत्री ने घोषणा की थी, उस समय हमने उनसे अनुरोध किया था और पत्र लिखा था. वह पत्र गृह निर्माण विभाग के द्वारा म्हाडा के पास गया और मुझे उसका उत्तर प्राप्त हुआ. यह बात मुझे मालूम है कि मुंबई के गिरणी कामगारों का एक स्पेशल डिस्पेन्सेशन है. लेकिन महाराष्ट्र के दूसरे क्षेत्रों में भी और खास तौर से विदर्भ के नागपुर शहर में एम्प्रेस मिल और मॉर्डन मिल बंद हो गई हैं. वहां के गिरणी कामगारों की हालत ठीक नहीं है. मैं माननीय मुख्यमंत्री से अनुरोध करुंगा कि जब इतना बड़ा फैसला हो रहा है तो विदर्भ, नागपुर और महाराष्ट्र के दूसरे हिस्सों के गिरणी कामगारों के बारे में स्पेशल योजना बनाई जाए.

. . . 3T-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्यावेळेस शिष्टमंडळाची भेट घेतली होती त्या बैठकीमध्ये गिरणी कामगारांच्या शिष्टमंडळाने, गिरणी कामगारांना घरे देण्याच्या संदर्भात सरकारने मानसिकता बनवली आहे काय असा मुद्दा उपस्थित केला गेला होता.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

अन्यथा एका समिती नंतर दुसरी समितीच नेमली जाईल. सात दिवसांमध्ये आपण घरांच्या किंमतीसंबंधी निर्णय घेणार आहोत. जागा शोधण्यासंबंधी देखील समिती आहे. या समितीला काही कालमर्यादा घालून देणे गरजेचे आहे. एका अधिवेशना नंतर दुसऱ्या अधिवेशनात आपल्याला जागा देण्याची कृपा कोण करणार आहे, असा प्रश्न पडेल. तेव्हा यास देखील कालमर्यादा असावी. तरच आपण थोडे पुढे वेगाने जाण्याचा प्रयत्न करू शकू.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, येथे अत्यंत महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. पहिली सूचना घरांची किंमत कमी करण्यासंबंधातील आहे. घरांची किंमत ठरविण्यासाठी जी समिती आहे ती सात दिवसांमध्ये किंमत ठरवेल. दुसरी समिती जागेच्या उपलब्धतेच्या पर्यायाबद्दल उपाय सुचविणारी आहे. या समितीने समयबद्ध पद्धतीने काम करावे अशी सूचना करण्यात आली आहे. आम्ही दोन-एक महिन्यांचा विचार करीत होतो. यासंबंधी अधिवेशन संपण्याच्या आधी काही निर्णय घेता आला तर तो मी घेईन. जेवढी घरे उपलब्ध होतील तेवढी ती देऊन काम सुरू करण्याची माझी इच्छा आहे.

दुसरा मुद्दा संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये जे गिरणी कामगार मृत्युमुखी पडले होते त्यांच्या वारसांना लॉटरी शिवाय घर देण्याचा निर्णय मी आधीच घेतलेला आहे. तो निर्णय आम्ही मान्य करू. त्यांना स्पेशल केस म्हणून घरे लॉटरी शिवाय देण्यात येतील. तसेच इतर ठिकाणी देखील ही योजना राबविता येईल काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.जमा यांनी विचारला आहे. मी समितीला इतर ठिकाणी घरे उपलब्ध होऊ शकतील काय, याबाबत जरूर सूचना करीन. आपण सर्वांचाच आकडा काढत बसलो तर ते आपल्याला काठीण होईल. आज जमिनीचा प्रश्न बिकट आहे. या सर्वांना राजीव आवास योजनेमध्ये घ्यायचे अशी आमची इच्छा आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे. आम्ही फक्त जमीन उपलब्ध करून देऊ. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपल्या एरियामध्ये काही माहिती असेल तर ती घेऊन यावी. कारण महाराष्ट्राला झोपडीमुक्त करण्याचे आपले धोरण आहे. ते करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. आज गिरणी कामगार झोपडीत रहात नसतील. पण त्यांची अवस्था त्याच कॅटेगिरीतील आहे. त्यामुळे त्यांना आज घरे दिली पाहिजेत, अशी शासनाची भूमिका आहे. श्री.जगताप साहेबांनी

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

4 लाख 81 हजार असा दर ठेवावा अशी सूचना केली आहे. तो ही दर लागू करण्याचा प्रयत्न करू. आपणा सर्वांच्या भावना मी नोट केलेल्या आहेत. आपला काही मुद्दा राहिला असेल तर तो देखील मी नोट केला आहे. सर्वां बरोबर चर्चा करून सकारात्मक दृष्टीने शासन पुढे जाईल व त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरू.....

सभापती : राज्यपालांच्या अभिभाषणावरील दुसऱ्या दिवशीची चर्चा आता आपण पुढे सुरू करीत आहोत. आज एकूण किती वक्ते बोलणार आहेत त्याचा मी थोडक्यात आढावा घेतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे,अरूण गुजराथी, विनायक मेटे, शिवसेना पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, भारतीय जनता पक्षातर्फे सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, श्री.सय्यद पाशा पटेल, चंद्रकांत पाटील, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य भाई जगताप, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई, सन्माननीय सदस्य सर्वश्री.एस.क्यू.जमा, राजन तेली, मोहन जोशी, रमेश शेंडगे, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे, नागो कुंडलिक गाणार. सन्माननीय सदस्या डॉ.श्रीमती नीलम गोऱ्हे यांचे नाव मघाशी माझ्याकडून अनवधानाने वाचण्याचे राहून गेले आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी चर्चेला सुरूवात करावी. त्यांनी आपले विचार 7 ते 8 मिनिटांमध्ये मांडावेत.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलचा आभार प्रदर्शनाचा जो प्रस्ताव मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

प्रथमत: मी माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो. माननीय राज्यपालांचे अभिभाषण इंग्रजीमधून ऐकण्याची सातत्याने आमच्या कानाला सवय झाली होती.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु पहिल्यांदा या महाराष्ट्रामध्ये असे घडले आहे की, ...

सभापती : सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत आहे. याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या अनुषंगाने चर्चा सुरु असून या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे संपेपर्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये मी सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवित आहे.

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी याठिकाणी मराठीमध्ये भाषण करण्यास सुरुवात केली याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो आणि त्याचा आनंद सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना सुध्दा झाल्यामुळे त्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदनही केले आहे."मंगल देशा,पवित्र देशा दगडांच्या देशा" या ओळी कानावर पडतात तेव्हा संपूर्ण सुजलाम, सुफलाम् असा महाराष्ट्र, एक प्रगतीशील राज्य आमच्या सारख्या तरुणांच्या नजरेसमोर उभे रहाते आणि हे स्वप्न साकारण्याचे काम महाराष्ट्रामध्ये झाले. स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्म शताब्दीच्या वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या वतीने गेट-वे ऑफ इंडियाच्या समोर अतिशय दिमाखदार सोहळा झाला आणि मी त्याचा साक्षीदार आहे. त्यावेळी तेथे महामहिम राष्ट्रपती महोदया आणि इतर सर्व मान्यवर उपस्थित होते. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आमच्या सारख्या तरुणांपुढे भव्य, सह्याद्रीच्या डोंगरा एवढे, हिमालयाएवढे काम उभे केलेले आहे आणि ते काम आमच्या अंगावर रोमांच आणणारे आणि आम्हाला प्रेरणा देणारे आहे.

सभापती महोदय, काल आम्हाला त्यांची पुस्तके आणि सी.डी.देण्यात आली, आमदार निवासातील माझ्या रुममध्ये गेल्या नंतर मी ती ऐकली. तेव्हा त्यांच्या भाषणातील एकेक वाक्य अगदी तोलामोलाचे आहे. त्यांच्या एकेका वाक्यातून काहीतरी अर्थ ध्वनित होत आहे असे मला वाटले. अशा प्रकारे त्या काळामधील कै.यशवंतराव चव्हाण साहेबांची भाषणे ऐकावयास मिळाली. जेव्हा त्यांचा सातारा येथे सत्कार झाला. त्यावेळेस त्यांनी असे सांगितले की, मी महाराष्ट्र राज्य उभे करीत आहे आणि हे राज्य कसे टिकवावे यादृष्टीने विरोधकांना उद्देशून केलेले जे भाषण होते त्यातून काही बोध घेण्यासारखे आहे आणि मी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की,तुमच्यासारख्यांनी ते भाषण ऐकले पाहिजे. महाराष्ट्र सरकरने स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याचे ठरविले त्याबद्दल देखील मी महाराष्ट्र सरकारचे मनापासून अभिनंदन करतो. एवढेच नव्हेतर 15 तारखेला जेव्हा अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

तेव्हा मनोरा आमदार निवास येथे स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे एक चित्र प्रदर्शन सुध्दा आम्ही आयोजित केले आणि त्याचे उद्‌घाटन माननीय राज्यपाल महोदयांच्या हस्ते झाले आणि तेथे बोलके चित्र प्रदर्शन असून त्यामधून सुध्दा आपल्याला अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत, बघण्यासारख्या, काहीतरी बोध घेण्यासारख्या आहेत.स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे कार्य दीपस्तंभासारखे होते आणि आज देखील आमच्या सारख्या तरुणांना ते प्रेरणा देणारे आहे. माझी या चर्चेच्या निमित्ताने सरकारला विनंती राहील की, हे प्रदर्शन केवळ मुंबईमध्ये न भरवता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी भरवावयास पाहिजे आणि ते शालेय विद्यार्थ्यांना देखील कसे दाखविता येईल याचा सुध्दा शासनाने निश्चितपणे गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या मदतीने संयुक्त राष्ट्र संघाने हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर करण्याचे ठरविले आहे, त्यानुसार राज्य शासनाने सुध्दा हे वर्ष सहकार वर्ष म्हणून घोषित केले याचा मला मनापासून आनंद होत आहे. आज सगळयाच प्रादेशिक विभागाचा असमतोल दूर करण्यासाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने समिती गठीत केलेली आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.विक्रम काळे...

ती समिती आमच्या मराठवाड्यात येऊन गेली. त्या समितीने आमच्या विभागातील लोकप्रतिनिधींच्या सूचना ऐकून घेतल्या याचा आम्हाला आनंद झालेला आहे. केळकर समिती शासनास काय अहवाल सादर करीत आहे याबाबत आम्ही उत्सुक आहोत. केळकर समितीने सादर केलेल्या अहवालावर शासन गांभीर्याने विचार करुन मराठवाड्याचा जो बॅकलॉग आहे तो पूर्ण करण्यासाठी निश्चितपणे भूमिका घेईल अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने सरकारने पावले उचलली आहेत ही चांगली बाब आहे.

सभापत महोदय, खेड्यापाड्यातील माणसाला आपल्या कामासाठी मुंबईला जावे लागू नये आणि त्याचे काम तालुका आणि जिल्ह्याच्या ठिकाणी व्हावे म्हणून स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून पंचायत समिती व जिल्हा परिषदा स्थापन करण्याचे काम झाले. आज वाडीवस्तीतला माणूस, आमची भगिनी लाल दिव्याच्या गाडीतून फिरु लागली या सर्व गोष्टी स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या आहेत याचा आम्हाला मनापासून आनंद आहे.

सभापती महोदय, पंचायत राज अजून बळकट करण्यासाठी सरकारने त्याचे संगणकीकरण करण्याचे ठरविले आणि त्यातून "संग्राम" नावाची योजना आणली. या योजनेद्वारे प्रत्येक ग्रामपंचायतीला संगणक पुरविण्यात येणार आहेत. परंतु आपण जे संगणक पुरविणार आहात ते संगणक चालविणार कोण ? तेव्हा जे ग्रामसेवक नियुक्त होतील त्यांना संगणकाचे ज्ञान असले पाहिजे अशी अट घालावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली असली तरी आज या कल्याणकारी राज्यामध्ये कायम विनाअनुदानित धोरण, विनाअनुदानित धोरणा संबंधी लोकप्रतिनिधींना आणि शिक्षक प्रतिनिधींना सातत्याने प्रश्न विचारावे लागतात याची आम्हाला खंत वाटते. आपण शाहू-फुले-आंबेडकरांचे राज्य आहे असे सांगतो. या वर्षी स्व.यशवंतराव चव्हाण

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

यांची जन्मशताब्दी वर्ष साजरी करीत आहोत. तेव्हा शिक्षणा संबंधी जे प्रश्न असतील त्यामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध असो, वेतनेतर अनुदान असो, ज्युनिअर व वरिष्ठ कॉलेजचा "कायम" शब्द काढण्याचा प्रश्न असो हे सर्व प्रश्न महत्वाचे आहेत आणि ते सोडविण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आज सर्वात विकासाचा पाया कोणता असेल तर तो शिक्षण आहे. Education is a power असे म्हटलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले आहे की, "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो हे दूध पिणार तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही." तेव्हा शिक्षणाला महत्व देण्याकरिता सरकारने गांभीर्याने पावले उचलली पाहिजेत. शिक्षणासंबंधीचे प्रलंबित प्रश्न लवकर सोडविले पाहिजेत अशी विनंती करुन माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आपण मला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर विचार मांडण्यासाठी अनुमती दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने सहकार क्षेत्रामध्ये उत्कृष्ट व आदर्श काम केलेल्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार देण्याच्या निर्णयाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रामध्ये सहकाराच्या माध्यमातून कृषी औद्योगिक क्रांतीचे स्वप्न पाहिले. पण तोच सहकार त्यांच्या अनुयायांकडून आता कमालीचा बदनाम झालेला आहे. तो सहकार सुदृढ करणे, गतिशील आणि व्यापक करणे या दृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणतेही निर्देश मिळालेले नाहीत हा खेद मी या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, चालू वर्षी पर्जन्यमान कमी झाले आणि त्यामुळे दोन हजार कोटी रुपये खर्च करण्याचा निर्धार अभिभाषणात व्यक्त करण्यात आलेला आहे. परंतु हे दोन हजार कोटी रुपये गुंतवणूक समजून कायम स्वरुपी पाझर तलाव तयार करणे, कोल्हापूर टाईप बंधारे बांधणे, कायम स्वरुपी चारा निर्माण करणे इत्यादी योजना राबविणे, औषधी वनस्पतीची लागवड करण्याची योजना राबविणे किंवा कृषी औद्योगिकीकरणाचा पाया मजबूत करणे या बाबत अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करीत आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे....

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 15 मध्ये ग्रामसभा बळकटीकरण अभियानाबद्दल उल्लेख करण्यात आलेला आहे ही गोष्ट जरी चांगली असली तरी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक होते तो म्हणजे पंचायत राज योजनेंतर्गत तालुका आणि जिल्हा स्तरावर दर वर्षी त्या त्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली ज्या आमसभा होत असत दुर्दैवाने त्या आमसभा आता होत नाहीत त्यामुळे तेथील जनतेला पंचायत राज योजनेंतर्गत विकासाच्या कोणत्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत याची माहिती मिळत नाही. म्हणून ग्रामसभा बळकटीकरणा बरोबरच पंचायतराज बळकटकरणाचा एक भाग म्हणून तालुका पातळीवरील आणि जिल्हा पातळीवरील आमसभांचे बळकटीकरण कसे होईल हे बधावयास पाहिजे होते. पण दुर्दैवाने त्याचा उल्लेख या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला आहे. परंतु त्यासाठी आवश्यक असलेली राज्य शासनाची स्वतंत्र यंत्रणा आणि त्याला अनुषंगिक राज्य शासनाचा कायदा करण्याचा उल्लेख या अभिभाषणात करण्यात आलेला नाही असे मला या ठिकाणी खेदाने नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, 100 शासकीय आश्रमशाळा बांधण्याचा निर्धार शासनाने केला आहे पण 288 केंद्रीय आश्रमशाळा आहेत त्यांना अनुदान देण्याच्या संदर्भात कोणताही उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. स्वंयअर्थसहाय्यित तत्वावर शाळा काढण्याचा कायदा करण्याचा निर्धार राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला आहे. हा कायदा अस्तित्वात आला तर बहुजनांच्या, हरिजनांच्या-गिरिजनांच्या मोफत शिक्षणांच्या शाळांवर अनिष्ट परिणाम होणार नाही असे असेल तरच याचे स्वागत करता येईल पण याची दखल घेतली जाणार आहे असा उल्लेख अभिभाषणात आलेला नाही म्हणून या बद्दलही मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत सुधारित मानकांनुसार 21,000 रुपयापर्यंत कौटुंबीक वार्षिक उत्पन्न असलेल्या 35 वर्षावरील निराधार अविवाहित महिलांना या योजनेंतर्गत सहभाग देण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु घटस्फोटिता, विधवा, परित्यक्ता आणि बलात्कारिता यांच्या बद्दल कोणत्याही योजनेचा उल्लेख करण्यात आलेला नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो. त्याचबरोबर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे....

विद्यापीठातील शिक्षणासाठी 28 कोटी 42 लाख रुपये इतका निधी गेल्या वर्षी देण्यात आलेला आहे आणि 172 विद्यार्थ्यांनी परदेशात जाऊन शिक्षण घेतलेले आहे ही गोष्ट आनंदाची आणि स्वागतार्ह आहे. पण त्याचबरोबर आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारे परदेशी विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्याच्या दृष्टिकोनातून कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, यशदा या शिखर संस्थेमार्फत राज्यातील अधिकाऱ्यांच्या गुणवत्तेवर आधरित एक व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम निर्धारित केल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत फक्त वर्ग-1 मधील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. वर्ग-2, वर्ग- 3 आणि वर्ग-4 या वर्गातील अधिकारी कर्मचाऱ्यांना सुध्दा अशा प्रकारचे व्यापक प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे पण त्याचा उल्लेख या अभिभाषणात करण्यात आलेला नाही याबद्दल खेद व्यक्त करुन सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. परशुराम उपरकर : (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2006 मध्ये राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये प्रत्येक तालुक्यात 200 तळी अशा प्रकारे सिंधुदुर्ग जिल्हयातील 8 तालुक्यात 1800 तळी तयार करण्यात येणार आहेत असे आम्हाला वाटले होते. पण 2006 पासून आजपर्यंत फक्त 78 तळी निर्माण झालेली आहेत. म्हणजे राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाची अंमलबजावणी प्रशासन करीत नाही याबाबत मी याठिकाणी खेद व्यक्त करतो. त्याचप्रमाणे दिनांक 24 जून, 2009 रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने कोकणात एक बैठक घेतली आणि या बैठकीमध्ये कोकणाला मोठया प्रमाणात निधी मिळणार अशा प्रकारची घोषणा केली, 5232 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्या पॅकेजची मुदत तीन वर्षानंतर संपली पण या तीन वर्षामध्ये दिनांक 25 ऑगस्ट, 2009 च्या जी.आर.नुसार या पॅकेजच्या माध्यमातून विविध ठिकाणी जो पैसा द्यावयास पाहिजे होता तो न दिल्यामुळे आज बरीचशी कामे अपूर्ण आणि अर्धवट आहेत म्हणून शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजची अंमलबजावणी न केल्याबाबत मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत कार्यक्रम राज्यपालांच्या अभिभाषणात जाहीर करण्यात आलेला आहे. पण युतीच्या काळात 1995-96 मध्ये नळयोजना पूर्ण करुन सिंधुदुर्ग जिल्हा टँकरमुक्त करण्यात आला होता. त्या नळयोजनेचे आयुर्मान 15 वर्षे संपल्यानंतर त्या नळ योजनांचे पूर्णपणे नूतनीकरण करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

त्या नूतनीकरणासाठी आणि देखभाल दुरुस्तीसाठी पैसे नसल्यामुळे अनेक नळ योजना बंद स्थितीत आहेत. आता परत टँकरने पाणी पुरवठा करण्याची पाळी येऊ लागली आहे. त्याबाबत मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो. अशा प्रकारच्या कणकवली तालुक्यातील उमरठ गावातील नळ योजनेचे उद्घाटन माननीय पंतप्रधानांनी नेटवरुन केले. त्या नळ योजनेवर 20 लाख रुपये खर्च केले. पण 10 वर्षे होऊनही त्या योजनेतून पाणी मिळत नाही. जर अशा प्रकारच्या नळ योजना होत असतील तर ग्रामीण भागात पाणी पुरवठा होऊ शकणार नाही. त्या बाबत मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शासनाने कृषी अंतर्गत अन्य पिकांना पीक विमा योजना लागू केलेली आहे. कोकणातील आंबा आणि काजू या पिकांना त्यामध्ये समाविष्ट केलेले आहे. या दोन्ही पिकांना आता हमी भाव देण्याची गरज आहे. कारण वाईट हवामानामुळे अनेक वेळा पीक कमीजास्त होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. शेतकऱ्यांना आणि बागायतदारांना जो खर्च लागतो तो द्यावाच लागतो. त्यामुळे कोकणातील आंबा आणि काजू या दोन्ही पिकांना हमी भाव देण्याची गरज आहे. त्याचा उल्लेख या अभिभाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी गोरगरीब जनतेसाठी, दारिद्र्य रेषेखालील जनतेसाठी तीन महिन्याचे रेशन धान्य देण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. एक तर दारिद्र्य रेषेखालील माणूस दारिद्र्यामध्ये असतो त्यामुळे तीन महिन्याचे रेशन एकाच वेळी खरेदी करण्याची त्याची परिस्थिती नसते. पूर्वी पंधरा-पंधरा दिवसात रेशन देण्याची पध्दत होती. आता तीन तीन महिन्यांनी रेशन देण्याची ही पध्दत या गरीब माणसांना परवडणारी नाही. त्यामुळे या योजनेबाबत मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी आरोग्याबाबत बोलले गेले आहे. गेली आठ वर्षे या सभागृहात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डॉक्टरांच्या रिक्त पदांबाबत आणि डॉक्टर देण्याबाबत वारंवार चर्चा होऊनही अद्याप डॉक्टर्स दिलेले नाहीत. त्याबद्दल मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो. ड्रेझर खरेदी करण्यासाठी कोकण पॅकेजमध्ये 60 कोटी रुपये दिले. कोकणातील समुद्रातील आणि खाडीतील गाळ काढण्यासाठी 4 ड्रेझर खरेदी करण्याचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. परशुराम उपरकर ....

सभागृहात दिले होते. काल एका प्रश्नाच्या उत्तरात फक्त 16 कोटी 60 लाख रुपये खर्च करुन एक ड्रेझर खरेदी करण्याबाबत उत्तर मिळाले. तीन वर्षात 4 ड्रेझर खरेदी करावयाचे होते. ते खरेदी न केल्यामुळे आणि कोकण किनारपट्टीतील गाळ न काढल्यामुळे मच्छीमारांना आणि समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या लोकांना त्याचा त्रास होत आहे, याबाबत मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी 2010-2011 ते 2014-2015 साठी 40 किलोमीटर सर्वेक्षण करुन 110 धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांसाठी पैसे ठेवल्याचे सांगण्यात आले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरोडा गावाजवळचा बंधारा मंजूर करण्यात आला पण त्यासाठी निधी दिलेला नाही. मालवण तालुक्यात तळाशील लगतच्या समुद्र किनाऱ्यावरचा तीनही बाजूचा बंधारा अपूर्ण आहे. तो बंधारा पूर्ण करण्याची गरज आहे. देवबाग येथील खाडी किनारी असलेला बंधारा पूर्ण होण्याची गरज आहे. हे धूपप्रतिबंधक बंधारे बांधत असताना सीआरझेड कायद्यांतर्गत पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागेल अशा प्रकारे जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रक काढल्यामुळे अनेक बंधाऱ्याच्या बाबतीत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्याबाबत मी या ठिकाणी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये न्यायालयाबाबतचा उल्लेख केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग आणि वैभववाडी तालुक्यांची निर्मिती होऊन दोडामार्ग तालुक्यात मंजुरी मिळाली परंतु वैभववाडी तालुक्यात मंजुरी मिळालेली नाही. दोडामार्ग तालुक्याचे कामकाज अजून सुरु झालेले नाही. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली आणि सातारा या पाच जिल्ह्यातील लोकांना मुंबई येथे हायकोर्टात यावे लागल्यामुळे जो विलंब होतो आणि कामकाज करण्यासाठी जी अडचण येते याकरिता या पाच जिल्ह्यातील वकिलांच्या बार असोशिएशनने कोल्हापूर येथे हायकोर्ट निर्माण करण्याबाबत मागणी केलेली आहे त्याबद्दल शासनाने कोणताही उल्लेख केलेला नाही. त्याबाबत मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, शासनाच्या अनेक योजना आहेत. गोरगरीब जनतेला फायदा मिळण्यासाठी शासनाने उत्पन्नाच्या दाखल्याची अट घातलेली आहे. हा उत्पन्नाचा दाखला 19 हजार रुपये ते 21 हजार रुपयाचा असण्याची अट आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

सध्याच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक माणसाचे उत्पन्न 36 हजार ते 50 हजार रुपयांपर्यंत गेलेले आहे. म्हणून दाखला मिळण्यासाठी 36 हजार ते 50 हजार उत्पनाची अट घालण्यात यावी व त्याची नोंद राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो. माननीय राज्यपालांनी अभिभाषणातून जनतेला जी खोटी आश्वासने दिलेली आहेत त्याबाबत मी खेद व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानण्यासाठी जो ठराव मांडण्यात आला आहे त्याला पाठिंबा देत असताना माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. या राज्याचा उद्योग क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात, आरोग्य क्षेत्रात पहिला क्रमांक आहे, फक्त पाटबंधारे क्षेत्राचा अपवाद वगळला तर प्रत्येक क्षेत्रातील अग्रेसर राज्य म्हणून या राज्याकडे पाहिले जाते. परंतु सर्वात महत्वाचे उद्योग खाते आहे. 50 वर्षापूर्वी स्व.यशवंतराव चव्हाण यांनी 'सह्याद्रीचे वारे' या पुस्तकात असे नमूद केले आहे की, "केवळ शेतीवर आधारलेले देश आर्थिक दृष्टीकोनातून उन्नत होत नाही. आपल्याला हिंदुस्थान शक्तीशाली व समृध्द करावयाचा असेल तर त्यासाठी औद्योगिक शक्ती वाढली पाहिजे. खेड्यापाड्यात विजेचा वापर झाला पाहिजे. मोठ्या उद्योगाच्या चर्चा आपण ऐकतो, त्याला भांडवल लागते तेही मला मान्य आहे. पण छोटे छोटे उद्योग सुध्दा काढले पाहिजेत." उद्योगाशिवाय प्रगती नाही. आज उद्योग क्षेत्रात आपला पहिला क्रमांक आहे. परंतु हा पहिला क्रमांक टिकविणे हे एक आव्हान आहे.

या अभिभाषणाच्या परिच्छेद क्रमांक 51 मध्ये असे म्हटलेले आहे की, " केवळ पाच वर्षांच्या कालावधीत 303 विशाल प्रकल्पांमध्ये 2.63 लाख कोटी रुपये इतक्या गुंतवणुकीला आकर्षित करुन 3 लाखांपेक्षा अधिक रोजगार निर्माण करण्याबरोबरच देशात प्रकल्प अंमलबजावणीचा उच्चतम दर राखून मोठ्या गुंतवणुकींना आकर्षित करण्यात महाराष्ट्राने आपले अग्रस्थान कायम राखले आहे." ही जरी वस्तुस्थिती असली तरी हल्ली स्पर्धा फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. पूर्वी स्पर्धा नव्हत्या. आपण मागील 10 वर्षातील महाराष्ट्राची औद्यौगिक गुंतवणुकीची आकडेवारी पाहू या. गुंतवणुकीची टक्केवारी गुजरात राज्याची 11.80, महाराष्ट्राची 9.54 आणि आंध्र प्रदेशची 9.53 इतकी आहे. म्हणजे आंध्र प्रदेश व महाराष्ट्र या राज्यात सारखीच गुंतवणूक झालेली आहे. पंजाब राज्य पुढे जात आहे. उद्योग क्षेत्रातील पहिले स्थान टिकविणे हे फार मोठे आव्हान आहे. एक काळ असा होता की, महाराष्ट्रात किंवा मुंबईत कारखाना टाकण्याबाबत उद्योजक विचार करीत होते. परंतु आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. इतर राज्यात पॅकेजेस दिली जात आहेत. हरिद्वार हे तीर्थक्षेत्र होते ते आता औद्योगिक क्षेत्र झालेले आहे. तेथे व्हॅटच्या माध्यमातून किंवा सबसिडीच्या माध्यमातून तेथील राज्य शासनाने त्यांना अनुदान दिलेले आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, देशात रोजगाराची सरासरी आजही महाराष्ट्र राज्याची जास्त आहे. ही सरासरी 15.28 टक्के इतकी आहे. तामीळनाडूची 12.1 टक्के, गुजरातची 9.85 टक्के अशी आहे. पहिल्या व दुसऱ्या क्रमांकातील अंतर कमी आहे. आता राज्यात उद्योग येतीलच अशी खात्री देता येत नाही. त्यामुळे आपल्यामार्फत मी शासनाला विनंती करणार आहे की, वस्त्रोद्योगासंबंधी शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे. मध्यंतरी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेतला होता. वस्त्रोद्योगाचे जे नवीन कारखाने येतील त्यांना 12.5 टक्के व्याजासाठी व भांडवलासाठी 10 टक्के अनुदान दिले जाणार होते. त्याचे पुढे काय झाले ते समजत नाही. त्याचा जी.आर.का निघाला नाही ?

सभापती महोदय, गुजरात सरकारने एनआरआय प्रमाणे एनआरजी अशी संकल्पना सुरु केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

मी शासनाला विनंती करतो की या बाबतीत आपण देखील पुढे जाऊ या. नॉन रेसिडेण्ट महाराष्ट्र अशी संकल्पना राबवूया . जो महाराष्ट्रात रहात नाही परंतु महाराष्ट्राबद्दल ज्याला प्रेम आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची ज्याची इच्छा आहे त्यासंदर्भात धोरण जाहीर करणे अत्यंत महत्वाचे आहे. उद्योग क्षेत्राचा विकास दर 10 टक्के आहे पण सेवाक्षेत्राचा विकास दर 12 टक्के आहे. या पुढचा काळ सेवाक्षेत्राचा आहे. आपण सेवाक्षेत्र वाढवित आहोत. पुणे येथे सॉफ्टवेअर आणि नवी मुंबई येथे हार्डवेअर उद्योग सुरु करीत आहोत. त्या ठिकाणी 362 संस्था आहेत. त्यातील सरकारी संस्था फक्त 36 आहेत. सरकारी संस्था जास्त असायला पाहिजेत या मताचा मी आहे. या संदर्भात नेमके काय धोरण आहे याची श्वेतपत्रिका शासनाने काढावी अशी माझी आपणास विनंती आहे. कारण आयटीच्या माध्यमातून पुढे जास्त रोजगार मिळणार आहे. सेवाक्षेत्रामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर राहील या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

सभापती महोदय, कृषी क्षेत्रामध्ये आपल्यापुढे इरिगेशनचा प्रश्न आहे. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी असे म्हटलेले आहे की, शेतकरी आणि शेतीशी संबंधित असलेला माणूस हा शहाणा असल्या शिवाय शेती शहाणी होणार नाही, आधुनिक शेती करता येणार नाही. 2 एकरात शेतीचे काम करणारा शेतकरी आपल्या कामामध्ये पराभूत झाला तर तो देशाचा पराभव आहे. हे स्व. यशवंतराव चव्हाण यांचे 50 वर्षापूर्वीचे विचार होते. आज शेतीची काय परिस्थिती आहे. आपण कितीही प्रयत्न केले तरी आपल्या राज्याची सिंचन क्षमता 22-23 टक्क्याच्या वर जाईल अशी परिस्थिती नाही. त्यादृष्टीने पाण्याचा वापर ही अत्यंत महत्वाची बाब आहे. 80 टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. गट शेती केल्याशिवाय पर्याय नाही. गट शेतीच्या संदर्भात शासनाने एखादा अभ्यासगट नेमून कुठे तरी पायलट प्रोजेक्ट सुरु करावा. 2-4 एकर शेती देखील परवडत नाही. शेती करायला मजूर मिळत नाही. जमिनी पडीक रहातील की काय अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, नियमितपणे कर्जाची परतफेड करणा-या शेतक-यांना 1 लाख रुपयापर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याज दराने व त्यापुढील 3 लाख रुपयापर्यंतचे पीक कर्ज एक टक्का व्याज दराने उपलब्ध करुन दिलेले आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कांद्याच्या प्रश्नासंबंधी शासनाने निवेदन करण्याबाबत</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल आपण कांद्याच्या प्रश्नासंबंधी शासनाला निवेदन करण्याचे निदेश दिले हाते. कांद्याच्या प्रश्नासंबंधी मोठे आंदोलन सुरु आहे. शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसून आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी येथे कांद्याचा मुद्दा मांडला होता. त्या बाबतीत शासनाने आपली भूमिका मांडावी असे निदेश आपण दिलेले होते. माननीय मुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की, त्यांनी कांद्याच्या प्रश्नासंबंधी शासनाची भूमिका मांडली तर शेतक-यांपर्यन्त तो संदेश जाईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु...)

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, आधुनिक पध्दतीने शेती करण्याचा विचार महाराष्ट्रात झाला नाही तर शेतीच्या उत्पादनावर त्याचा निश्चितपणे परिणाम होईल. आपल्या एकूण जीडीपीमध्ये शेतीचा जीडीपी कसा वाढेल या दृष्टीने प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. आपण हवामान आणि आंतरराष्ट्रीय बाबी विचारात घेऊन केळी, द्राक्षे अशा फळ पिकासाठी विमा योजना आणलेली आहे. धान्यासाठी देखील चांगल्या पध्दतीची विमा योजना आणण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आता कांद्याच्या प्रश्नाबद्दल माननीय मुख्यमंत्री महोदयांना निवेदन करण्याची विनंती केली. धान्याच्या बाबतीत देखील नवीन पध्दतीची विमा योजना आणण्याचा विचार मागील चार-पाच वर्षापासून सुरु आहे. सरकारवर बोजा पडणार नाही अशा प्रकारचा विमा आपण आणू शकतो. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आहे. राज्यात 2 लाख 18 हजार 320 सहकारी संस्था आहेत. महाराष्ट्रात सर्वात जास्त सहकारी संस्था आहेत. असे असले तरी आज या सहकार क्षेत्रातून पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

याबाबतीत नव्याने सहकार कायदा केलेला आहे. यासंदर्भात समिती नेमली होती, त्या समितीमध्ये मी सदस्य म्हणून होतो. तो कायदा पास झाला आहे. परंतु सहकार क्षेत्रात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा याबद्दल मानसिकता निर्माण करण्याचे एक आव्हान राज्यासमोर आहे. ज्याला आपण को-ऑपरेटिव्ह कॉमन वेल्थ म्हणतो. शहरात सर्वात श्रीमंत कोण असेल तर ती सहकारी संस्था आहे. एखाद्या गावात विकास सोसायटी सर्वात श्रीमंत आहे, अशा पध्दतीचे आज वातावरण दिसून येत नाही. सहकार क्षेत्रात बरेच घोटाळे झाले आहेत. सन्माननीय मुख्यमंत्री महोदय या ठिकाणी बसले आहेत. जळगाव जिल्हयामध्ये दोन पतपेढयांनी संपूर्ण जिल्हा खाऊन टाकला. एक पतपेढी श्री.बढे सरांची आहे. मला कोणावर व्यक्तिगत टीका करावयाची नाही. परंतु या पतपेढींनी लाखो लोकांचे संसार उद्ध्वस्त केले आहेत. तापी सहकारी पतपेढीचे गेल्या सहा महिन्यापासून संचालक आणि व्यवस्थापक सापडत नाहीत. ते फरार झालेले आहेत. याबाबतीत मी काही जास्त आपल्याला सांगू शकत नाही. त्या पतपेढीबाबतची वस्तुस्थिती आपणा सर्वांना माहिती आहे.

माननीय मुख्यमंत्री महोदय हे सभागृहात उपस्थित असल्यामुळे त्यांना मी पुन्हा विनंती करतो की, महाराष्ट्रात रोजगार वाढावा म्हणून राज्य शासनाने आय.टी.च्या संदर्भातील एक श्वेतपत्रिका काढावी. त्यामुळे रोजगार वाढण्यास मोठया प्रमाणात मदत होईल.

सभापती महोदय, राज्याचे दरडोई उत्पन्न आणि गरिबी याचे प्रमाण कसे आहे, त्याबाबतीत मी माहिती देऊ इच्छितो. आज देशामध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे की ज्याचे दरडोई उत्पन्न जास्त असूनही सर्वात जास्त गरिबी महाराष्ट्रात आहे. बिहारमध्ये 35.50 टक्के दारिद्रय आहे. महाराष्ट्रात त्याचे प्रमाण 32.40 टक्के एवढे आहे. बिहार आणि महाराष्ट्रात फक्त 10 टक्क्यांचा फरक आहे. याचा अर्थ असा आहे की, एकीकडे संपन्नता, समृध्दता, श्रीमंती वाढत असताना विकास मात्र गरिबांपर्यंत पोहोचत नाही. गरिबांपर्यंत विकास जावा, त्यांना विकासाचा लाभ मिळावा यादृष्टीकोनातून शासनाकडून प्रयत्न व्हावयास पाहिजे अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, नागरिकीकरणाच्या बाबतीत देखील महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. 42 टक्के नागरिकीकरण महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रात नागरिकीकरण वाढत असताना मात्र दरडोई उत्पन्न कमी होत चालले आहे. बाहेर राज्यातून येणारे लोंढे कमी होत नाहीत म्हणून दरडोई

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

उत्पन्न कमी होत आहे हे यामागचे खरे कारण आहे. बाहेर राज्यातून येणारे लोंढे कमी झाले असते तर दरडोई उत्पन्न वाढले असते. ज्याला आपण glaring anomaly म्हणू या. या राज्यामध्ये ग्रामीण गरिबीपेक्षा नागरी गरिबी जास्त आहे. ग्रामीण गरिबी 22 टक्के आणि नागरी गरिबी ही 33 टक्के एवढी आहे. गरिबी हटविण्यासंदर्भात शासनाकडून काय उपाययोजना केल्या जाणार आहेत, यासंबंधी शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. शहरांमध्ये रोजगार मिळतो, नोकऱ्या मिळतात म्हणून लोक मोठया प्रमाणात येत आहेत. ते लोक या शहरामध्ये कशाप्रकारे राहतात याची आपल्याला सगळयांना कल्पना आहे. शहराकडे येणाऱ्या लोकांचा कल कशा पध्दतीने कमी होईल, त्यांना ग्रामपातळीवर रोजगार कसा उपलब्ध करुन देता येईल या गोष्टींकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, विजेच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर जेथे विजेचा वापर जास्त ते प्रगत राज्य आहे असे समजले जाते. या राज्यात विजेचा वापर किती प्रमाणात होतो आहे याबाबतची माहिती या ठिकाणी नमूद करु इच्छितो. महाराष्ट्रात 668 किलो वॅट वापर होतो. पंजाब 1085, तामिळनाडू 806, गुजरात 802 किलो वॅट इतका विजेचा वापर त्या राज्यामध्ये होत आहे. औद्योगिकसाठी महाराष्ट्रात 265, पंजाब 387, तामिळनाडू 320, गुजरात 365 किलो वॅट इतका विजेचा वापर होत आहे. दरडोई किती वीज वापरतो, त्यावरुन देखील त्या ठिकाणची संपन्नता काय आहे, समृध्दता काय आहे, सरासरी उत्पन्न काय आहे या बाबी लक्षात येतात.

सभापती महोदय, कृषीसाठी महाराष्ट्रात फक्त 119, पंजाब 346, तामिळनाडू 158, किलो वॅट एवढी वीज वापरली जाते. वीज आणि पाणी ही दोन क्षेत्र आहेत. Power and Water are essential for the development of Industry and Agriculture. या दोन क्षेत्रांकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. डिसेंबर, 2012 मध्ये लोडशेडींग असणार नाही अशा प्रकारची भावना अभिभाषणाच्या अनुषंगाने व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्राचा पहिला क्रमांक टिकविण्याच्या दृष्टीकोनातून आपण अजूनही बरेच प्रयत्न करु शकतो. पाण्याशिवाय आणि विजेशिवाय प्रगती नाही ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, मला माननीय राज्यपाल

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

महोदयांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी आपण संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. शासनाने वीज आणि पाणी याकडे जास्त लक्ष दिले पाहिजे. 200 ते 300 फुटावर पाणी लागत नाही. सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की.....

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

आता 1 कि.मी.पर्यंत भूगर्भात जाऊन पाणी काढणारे पंप बाजारपेठेत उपलब्ध झाले आहेत. या दृष्टीकोनातून देखील आपल्याला विचार करावा लागेल. पंजाब, हरियाणा, बिहार आणि उत्तरप्रदेश राज्यात 40 ते 50 फुटावर भूगर्भात पाणी मिळते या संदर्भात देखील विचार करावा. जेणेकरुन महाराष्ट्र राज्य भविष्यात देखील पहिल्या क्रमांकावरील राज्य असेल या संदर्भात अविश्रांत परिश्रम शासनाच्या माध्यमातून व्हावेत एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात नाशिक व पुणे येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन

मु.शी.: राज्यात नाशिक व पुणे येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, सभागृहामध्ये कांदा विषयक आंदोलनाबद्दल चर्चा झाली. मी विधानसभा सभागृहात एक निवेदन केले होते. त्यामुळे आपल्या अनुमतीने माझ्याकडे जी अद्यावत माहिती उपलब्ध आहे ती मी या सभागृहाला देऊ इच्छितो. काही दिवसांपासून पुण्याला आणि कालपासून नाशिक येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांद्याचे दर उतरल्यामुळे आंदोलने केली होती. दोन्ही ठिकाणी आंदोलनकर्ते आणि त्यांच्या नेत्यांशी संपर्क साधून मी त्यांना निरोप पाठविला. या प्रश्नाबाबत काहीतरी समाधानकारक उत्तर शोधण्याकरिता मी किंवा पणनमंत्री यांच्याशी भेटण्याचे आम्ही त्यांना निमंत्रण दिले. त्या अनुषंगाने पुण्यातील आंदोलन थांबले आणि पुण्याच्या काही आंदोलनकर्त्या प्रतिनिधींना भेटण्याची वेळ देखील ठरली.

सभापती महोदय, नाशिकमध्ये काल खासदार श्री.राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली काही आंदोलने झालेली होती. तेथील जिल्हाधिकारी कार्यालयाला घेराव घालण्यात आला. त्यांच्याशी मी स्वत: संपर्कात होतो. त्यांनाही मी मुंबईला येऊन या प्रश्नाबद्दल चर्चा करावी आणि आपण एकत्रित मिळून केंद्र सरकारशी चर्चा करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न करु असे त्यांना निमंत्रण दिले. दोन-तीन वेळा चर्चा झाल्यानंतर त्यांनी रात्री 1.00 वाजता आंदोलन स्थगित केले. या प्रश्नाबद्दल भेटायला येण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. या संदर्भात दोन-तीन महत्वाच्या गोष्टी सभागृहाला सांगणे गरजेचे आहे. आता जो लेट खरिपाचा कांदा बाजारात येऊ लागला आहे त्या कांद्याचे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळजवळ दोन ते अडीच पट अधिक आहे. गेल्या वर्षी 8.58 लाख मे.टन उत्पादन झाले होते. चालू वर्षी ते जवळजवळ 22 लाख मे.टन एवढे अपेक्षित आहे आणि स्वाभाविकच त्याचा दरावर अनिष्ट परिणाम झाला आहे. हा कांदा साठवणुकीला फार योग्य नसतो. काढणीनंतर ताबडतोब त्याची आवक बाजारपेठेत होते. त्यामुळे दर खाली.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

उतरले आहेत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, या बाबत केंद्र सरकारने काही निर्णय घेतले होते. कांदा निर्यातीवर बंदी घातली होती. त्यामुळे देखील कांद्याच्या दरावर अनिष्ट परिणाम झाला होता. म्हणून ज्या ज्यावेळी केंद्र सरकारने असा निर्णय घेतला त्या त्यावेळी राज्य सरकारने त्याबद्दल आग्रहपूर्वक व आवर्जून विरोध करुन तो निर्णय रोखण्याकरिता केंद्र सरकारला विनंती केली आणि वेळोवेळी कांदा निर्यातबंदीचा निर्णय मागे घेतला गेला. परंतु कांद्याच्या बाबतीत निर्यात जरी खुली केली तरी त्यावर निर्यातमूल्य लावण्याची पध्दत आहे. मिनिमम एक्स्पोर्ट प्राईज ही जवळजवळ 600 ते 650 डॉलर्स एवढी होती. त्यापेक्षा कमी किंमतीला कांदा निर्यात करता येणार नाही. त्यामुळे जवळजवळ निर्यात बंदीसारखीच स्थिती निर्माण होत असते. त्याकरिता प्रयत्न करुन मिनिमम एक्स्पोर्ट प्राईज कमी करावयास लावली. शेवटी आमच्या प्रयत्नाने ही किंमत 600 डॉलर्सवरुन 125 डॉलर्स एवढी करण्यात आली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत 150 डॉलर्स एवढी किंमत आहे. त्यामुळे 125 डॉलर्स मिनिमम एक्स्पोर्ट प्राईज असल्यामुळे अनिष्ट परिणाम होत नाही असे एक मत असले तरी मी दोन-तीन वेळा केंद्र सरकारच्या मंत्रीगटाचे अध्यक्ष जे वित्तमंत्री आहेत त्यांच्याशी आणि व्यापार मंत्री व कृषी मंत्री यांच्याशी चर्चा करुन माननीय पंतप्रधानांच्या कानावर हा विषय घातला होता.

नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / शोधनाधीन नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

एक म्हणजे मिनिमम एक्स्पोर्ट प्राईज रद्द करावी अशी मागणी केली आहे. तसेच अनेक वेळा पत्र लिहून ही मागणी केली आहे. आज सकाळी सुध्दा मी पुन्हा माननीय अर्थमंत्र्यांना पत्र पाठवून यासंबंधीची आठवण करुन दिली आहे. त्यामुळे राज्यात एक प्रकारचा सिग्नल जातो व त्याचा परिणाम कांद्यांच्या किमती वाढण्यात होऊ शकतो. ही गोष्ट केंद्र सरकारच्या अखत्यारित असल्यामुळे ते नक्कीच करतील पण राज्य म्हणून आपल्याला याबाबत काय करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्यासमोर प्रामुख्याने दोन पर्याय आहेत. ते दोन्ही पर्याय आपण राज्यात अवलंबिले पाहिजेत असे मला वाटते.

पहिला पर्याय म्हणजे बाजार हस्तक्षेप योजना. ही योजना यापूर्वी सुध्दा या राज्यात सन 2008-09 आणि 2009-10 तसेच 1999-2000 या वर्षांमध्ये राबविली गेली आहे. त्यामध्ये पहिल्यांदा केंद्र सरकारमार्फत नाफेड या संस्थेला एमआयएस ही योजना राबविण्यास सांगितले होते. ती योजना नाफेडने सन 1990-91 मध्ये राबविली होती तेव्हा जवळपास 61 हजार मे.टन कांदा खरेदी करण्यात आला होता. त्यानंतर सन 1999-2000 मध्ये पणन महासंघाच्या वतीने ही योजना राबविली असता 65 हजार मे.टन इतकी कांद्याची खरेदी झाली होती. या योजनेत दोन्ही वेळा मोठ्या प्रमाणात अनियमितता होऊन शेवटी योजनाच वादग्रस्त ठरली होती. त्यामुळे दोन तीन वर्षात जवळपास 200 कोटीचा तोटा आपल्या राज्याला झाला होता.

महोदय, दुसरा पर्याय आपण सन 2005-06 आणि 2008-09 मध्ये अवलंबिला होता. त्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याची योजना होती. या योजनेच्या अंतर्गत 50 रुपये प्रति क्विंटल अनुदान देण्यात आले होते. त्याला 200 क्विंटलची मर्यादा आणि जास्तीत जास्त 10 हजार रुपये अनुदान अशा प्रकारे ही योजना राबविली होती. या दोन्ही योजनांबाबत आपल्याला विचार करावा लागणार आहे व त्यासाठी शासनाची सकारात्मक भूमिका राहणार आहे. ही योजना या वर्षी कर्नाटक सरकारने राबविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जो तोटा होईल तो निम्मा केंद्र सरकार व निम्मा राज्य सरकारने सोसावा अशी ही योजना डिसेंबर, 2011 पासून कर्नाटक सरकारने सुरु केली. त्यानुसार 16 डिसेंबर रोजी प्रत्यक्ष या योजनेमार्फत कांद्याची खरेदी सुरु करण्यात आली पण 9 दिवसातच ही योजना गुंडाळावी लागली. कारण या 9 दिवसात 30 हजार

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

मे.टन कांद्याची खरेदी झाली. पण कांदा साठविता येत नाही म्हणून ही योजना अव्यवहार्य ठरली व ती गुंडाळावी लागली. या पर्यायासंबंधीचा प्रस्ताव माझ्याकडे आला असून तो आपण केंद्र सरकारकडे पाठविला तर केंद्र सरकार देखील त्यावर सकारात्मक विचार करुन त्याला मान्यता देईल. पण सरासरी आपल्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करीत असताना ही योजना आपल्यासाठी देखील फार उपयोगाची आहे असे सकृतदर्शनी तरी वाटत नाही.

महोदय, यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देणे हा दुसरा पर्याय आहे, तो आपल्याला वापरता येईल काय, वापरला तर त्यासाठी किती खर्च येईल याची माहिती घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा प्रकारे दोन्ही योजना डोळ्यासमोर ठेवून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या संघटनांशी चर्चा करुन याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच घेण्यात येईल. त्या अनुषंगाने केंद्र सरकारशी बोलणी चालू आहे. त्यांची देखील जी मदत आपल्याला मिळू शकेल ती मदत मिळविण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. यासंदर्भात मी आकडेवारी घेतलेली असून यावर्षी कांद्याचे उत्पादन खूप जास्त झालेले आहे. त्यामुळे कांदा उत्पादकांना अनुदान दिले तर त्यासाठी किती खर्च येईल, किती कांदा बाजारात येईल याबाबतचाही विचार शासनाच्या स्तरावर चालू आहे. एक दोन दिवसात माननीय पणन मंत्र्यांनी कांदा निर्यात व्यापाऱ्यांना चर्चेसाठी बोलाविलेले असून त्यातून काही मार्ग निघतो काय असेही प्रयत्न सुरु आहेत.

तिसरा पर्याय म्हणजे एक्स्पोर्ट सबसिडी देणे. पण जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार अशा प्रकारची सबसिडी देता येत नाही. म्हणून वाहतूक सबसिडी देता येईल काय अशा प्रकारे आपण चारही पर्यायांचा विचार करुन योग्य तो निर्णय घेऊ व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची भूमिका घेण्यात येईल. या प्रसंगी मी इतकीच माहिती देऊ इच्छितो की, केंद्र सरकारशी आमचा संपर्क सुरु आहे. उद्या यावर आणखी चर्चा होईल व त्यासंबंधीचा अंतिम निर्णय सभागृहात जाहीर करण्यात येईल, एवढे सांगून मी हे निवेदन पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.**शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु...

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या माननीय राज्यपाल महोदयांनी जे अभिभाषण केलेले त्यासंदर्भात मुद्दा क्रमांक 2 व शेवटचा मुद्दा सोडून बाकीच्या मुद्याच्या संदर्भात मला खेद व्यक्त करावयाचा आहे. मुद्दा क्रमांक 2 मध्ये महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या स्मृतीस मी आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त व्याख्यानमाला व चर्चासत्र दि. 17 व 18 मार्च, 2012 रोजी विधानमंडळात चर्चा आयोजित करण्यात आली होती. परंतु ही चर्चा पुढे ढकल्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, संयुक्त राष्ट्रसंघाने सन 2012 हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. अभिभाषणात देखील यासंदर्भात उल्लेख करण्यात आलेला आहे की, 2 जानेवारी पासून आपण सहकार वर्ष म्हणून घोषित केलेले आहे.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे)

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये महत्वाच्या ज्या मजूर सहकारी संस्था आहेत त्यामध्ये ख-या अर्थाने मजूर आहेत काय असा माझा सवाल आहे. मजूर सहकारी संस्था ठेके घेतात आणि तो ठेका 10ते 15 टक्के मार्जीन घेऊन विकून टाकतात हे मला येथे खेदाने सांगावेसे वाटते. लेबर संस्थेमध्ये जे प्रतिनिधी आहेत त्यांच्या जवळ पॅन कार्ड, टू व्हीलर्स, फोर व्हीलर्स व्हेईकल्स आहेत, मोठमोठया इमारती आहेत ते संस्थेचे सदस्य आहेत त्यामुळे ख-या अर्थाने मजुरांना सहभाग मिळत नाही. मजुरांचे ख-या अर्थाने शोषण केले जाते त्यामुळे या मुद्याच्या संदर्भात मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, एपीएमसीचा सहकार कायदा आहे. जे पदवीधर लोक आहेत, ज्यांच्याजवळ फोर व्हीलर्स गाडया आहेत त्यांनी हमालाचे लायसन्स तयार करुन आज ते बाजार समितीचे प्रतिनिधीत्व करीत आहेत त्यामुळे यासंदर्भातही खेद व्यक्त करतो. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

सभापती महोदय, सेवा सहकारी संस्थांमध्ये अत्यंत वाईट अवस्था निर्माण झालेली आहे. पूर्व विदर्भातील सेवा सहकारी संस्था अडचणीत आलेल्या आहेत. त्यामुळे सन 2012 हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असल्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मागच्या नागपूर अधिवेशनात कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतक-यांना शासनाने 2000 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर केले होते. या विषयाच्या संदर्भात मी सभागृहात 30 मिनिटे भाषण केले होते. या विषयाच्या संदर्भात मी भाषण केले होते म्हणून मला शासनाने त्यावेळेस निलंबित केले होते काय ? असा माझा सवाल आहे. यासंदर्भात जी घटना घडली होती त्यासंदर्भातील लेखी निवेदन मी माननीय मुख्यमंत्र्यांना दिले होते व त्यांची भेट सुध्दा घेतली होती. या घटनेमध्ये माझी काय चूक होती ती शासनाने मला अद्याप सांगितलेली नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

नागपूर हिवाळी अधिवेशनात काही आमदारांनी कापसाच्या संदर्भात प्रदर्शन केले होते परंतु त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. परंतु मी धान उत्पादक शेतकरी असल्यामुळे माझे निलंबन करण्यात आले. मी सभागृहात एक आठवडा नव्हतो त्याचेही मला दु:ख नाही, यांसदर्भात माझे सदस्यत्व गेले असते तरी मला दु:ख झाले नसते परंतु सर्व शेतक-यांना शासनाने 2000 कोटी रुपयांची सरसकट मदत केली असती तर मला आनंद झाला असता. शासनाने कापसाला न्याय दिला.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

भात, सोयाबीन शेतकऱ्यांना आपण न्याय दिला नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. शेतकऱ्यांना आपण सरसकट मदत करायला पाहिजे होती. 31 मार्च पर्यंत मदत मिळाली पाहिजे. ती मिळू शकत नाही, असे चित्र आहे. कारण 200 कोटीच्यावर अजून मदत पोहोचली नाही. त्यामुळे कोणत्या धान उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे, असा प्रश्न या निमित्ताने उभा राहातो. त्याचा उलगडा उत्तरातून होणे आवश्यक आहे.

महिलांना 50 टक्के आरक्षण दिले आहे. त्याचे मी स्वागत करतो. पण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये उमेदवारांची संख्या एकल असेल तर तेथे महिलांना प्रतिनिधित्त्व अधिक मिळते म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सम संख्या असली पाहिजे. तरच 50 टक्के पुरूषांना आणि 50 टक्के महिलांना त्यात सहभाग मिळू शकेल. मला महिलांना येथे विरोध करावाचा नाही. आज सभागृहात 51 टक्क्यांपेक्षा जास्त महिला दिसत आहेत. हे खरे चित्र आहे म्हणून 50 टक्के सम करण्यासंबंधीचा निर्णय शासनाने घेतला पाहिजे. त्याबद्दल देखील मी खेद व्यक्त करीत आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील 11 व 12 वा मुद्दा आमच्या गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याशी संबंधित आहे. हे दोन्ही जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. मागच्या अधिवेशनात मी नवीन न्याय सहायक विज्ञान संस्था गडचिरोली येथे सुरू करण्यासंबंधातील सूचना दिली होती. ही सूचना चांगली आहे. या चांगल्या योजनेचा उपयोग नागपूर येथे होऊ शकत नाही. गोंदिया किंवा गडचिरोली जिल्ह्याच्या जवळ नवीन न्याय सहायक विज्ञान संस्था काढली असती तर कदाचित याचा जास्त लाभ झाला असता. त्यामुळे नक्षलवाद्यांमध्ये निश्चितपणाने दहशतीचे वातावरण निर्माण झाले असते.

मी गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांचा निवासी आहे. मी यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकारान्वये माहिती विचारणार आहे. मी डीपीडीसीचा सभासद आहे. अंगणवाडी, शालेय इमारती, पिण्याचे पाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र, विद्युतीकरण या सारख्या महत्त्वांच्या सुविधांसंबंधी एकही शब्द माझ्या कानावर आता पर्यंत कधीही आलेला नाही. पण याचा एका शब्दाने देखील उल्लेख झालेला नाही. त्यामुळे सन 2010-2011 व 2011-22012 या दोन वर्षामधील जवळ जवळ 55 कोटी रूपये कुठे खर्च झाले यासंबंधातील माहिती शासनाच्यावतीने मिळू शकली तर मी शासनाचा आभारी राहीन. ही योजना केंद्र शासनाची होती. त्यामुळे नक्षल जिल्ह्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असता, असे मला वाटते. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

सिंचना संबंधी देखील मोठा गाजावाजा केला. राज्यात सिंचन क्षमतेवर भर देण्यात आला असला तरी गोंदिया जिल्ह्यात लघु पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून 59 पाटबंधारे बांधण्यात आले असून त्यावर 6 कोटी 50 लाख 12 इतका निधी खर्च झाला आहे. परंतु, अंदाजपत्रकानुसार सदर बंधाऱ्यांच्या माध्यमातून किमान 889 हेक्टर क्षेत्र सिंचना खाली येणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ 445 हेक्टर क्षेत्र सिंचना खाली येत असल्याची माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त झाली आहे. निधी पूर्ण खर्च झाला पण उद्दिष्ट पूर्ण झाले नाही, हे यातून सिद्ध होते. म्हणजे गोंदिया, भंडारा,गडचिरोली जिल्ह्यातील सिंचनाचा प्रश्न आहे तो फार मोठा आहे. त्या संबंधातील आकडे मी आता सांगत नाही. माझ्याकडे भरपूर आकडे आहेत. पण वेळे अभावी ते मी ठेवू इच्छित नाही.

वन जमिनींचा प्रश्न शासनाने सोडविला असता तर गोंदिया, भंडारा आणि पूर्व विदर्भातील सिंचनाचा प्रश्न सुटला असता. पण खेदाने सांगावेसे वाटते की, वन विभागाच्या हरकतीमुळे सिंचनाची कामे अडून पडली आहेत. त्यामुळे निश्चितपणाने यासंबंधी आम्हाला न्याय मिळू शकलेला नाही.

महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहीर योजना फक्त अनुसूचित जातीच्य लोकांसाठी राबविली जाते. ही योजना एस.टी., एन.टी., ओ.बी.सी.च्या लोकांसाठी का नाही, असा माझा सवाल आहे. आम्हाला तुम्ही जातीयवादी म्हणता. पण येथे आपलेच जातीयवादाचे लक्षण दिसून येते, म्हणूनच मी येथे खेद व्यक्त करतो. एस.सी., एस.टी., एन.टी. या सह इतर प्रवर्गातील लोकांनासुद्धा आपण जवाहर विहिरींचा लाभ द्यायला पाहिजे. पण तो दिलेला नाही.

नेटवर्क संबंधातील अहवाल आलेला आहे. गडचिरोली, भंडारा आणि अतिदुर्गम भागात नेटवर्क नाही. जेथे पुरूष संपर्क करू शकत नाही. तेथे आमच्या महिला पोलीस कशा काय संपर्क करणार आहेत हा प्रश्न आहे. महिलांना किंवा पुरूषांना डायरेक्ट पोलिसांशी संपर्क साधावयाचा असेल तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नेटवर्कचे जाळे पसरविले पाहिजे. जेणे करून त्या योजनेचा लाभ सर्वांना मिळू शकेल.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अनुवादित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिनांक 1 एप्रिल 2011 ते 31 मार्च 2012 पर्यंत शासनाने केलेल्या कामाचा उहापोह करण्यात आलेला आहे. पण पुढच्या वर्षी म्हणजे 2013 मध्ये यावेळेस निश्चितपणे चांगले धोरण आणि चांगल्या योजना तयार करण्यात आल्याचे दिसून आलेले नाही. खरे म्हणजे महाराष्ट्राचे उज्वल भविष्य बघावयाचे होते तर केवळ मागचा फळा वाचून चालणार नाही तर नवीन फळा वाचावयास पाहिजे होता. तसेच आपण 2012 मध्ये राज्य लोड शेडींग मुक्त करण्याचे जाहीर केले होते आणि ती बाब आपण 1 जानेवारी रोजी जाहीर केली होती की, 31 डिसेंबर 2012 रोजी जाहीर केली होती याबाबतीत कुठेही उल्लेख नाही. मात्र आज खेड्या-पाड्यामध्ये 10-12 तास लोडशेडींग सुरु आहे. याठिकाणी आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी सांगितले की, जर महाराष्ट्र राज्याला उज्वल करावयाचे असेल आणि स्व.यशवंतरावजी चव्हाण यांचे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर महाराष्ट्रातील सर्व योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यची गरज आहे. म्हणून मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 2 आणि शेवटचा मुद्दा वगळता बाकीच्या सर्व मुद्यांबाबत खेद व्यक्त करतो आणि माझ्या भाषणाला विराम देतो. भारता माता की जय.

. . . .4 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे जे अभिभाषण आहे तो आगामी अर्थसंकल्प आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. सर्वसामान्य शेतकरी, विद्यार्थी, बेकार तरुण या सर्वांना न्याय देण्याचे काम राज्य शासनातर्फे होणार आहे आणि याची प्रांजळ कबुली या अभिभाषणातून दिल्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत करतो.

सभापती महोदय, राज्यातील जे प्रादेशिक विभाग आहेत तेथे असमतोलपणा आहे आणि अशा वेळी तेथे समतोलपणा यावा या उद्देशाने डॉ.विनय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी इरिगेशनबाबत, शिक्षणाबाबत आणि इतरही वेगवेगळ्या मुद्यांबाबत चर्चा केली असल्याने मी येथे तेच-तेच मुद्दे मांडणार नाही.मात्र प्रादेशिक असमतोलपणा दूर करावयास पाहिजे.विशेषत:कोकणा- तील इरिगेशनच्या बाबतीतील असमतोलपणा दूर केला पाहिजे. आज विदर्भ, मराठवाडा किंवा कोकण या तीन भागाबाबत माहिती घेतली तर कोकणामध्ये इरिगेशनच्या बाबतीत सर्वात जास्त बॅकलॉग आहे. तेथे जवळपास 1 लाख 6 हजार हेक्टर जमीन पाण्याखाली आहे. म्हणून त्याबाबत विधान सभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये सातत्याने ठरावही करण्यात आलेले आहेत की, जर कोकण वैधानिक विकास महामंडळ निर्माण झाले तरच खऱ्या अर्थाने कोकणाला न्याय मिळेत आणि ते होण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न करण्याची गरज आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहा मध्ये सांगितले होते आणि तशा प्रकारचे प्रयत्न होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय,ग्रामीण भागातील पर्यावरणाबाबत सर्व समावेशक विकास घडवून आणण्या-साठी शासनाने एक पर्यावरण संतुलित, समृध्द योजना, ग्राम समृध्द योजना आणलेली आहे. त्याबद्दल मी शासनाला खरोखरच मनापासून धन्यवादे देतो.तसेच शासनाने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी यावर्षीच्या बजेटमध्ये जवळजवळ 38 कोटी रुपयांचा निधी देखील दिलेला आहे आणि ही अतिशय चांगल्या प्रकारची योजना आहे. तसेच कोकणामध्ये चांगल्या पध्दतीने, अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात फळझाडे आणि वृक्षांची लागवड केली जाते.सर्वात जास्त क्षेत्र हे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 9 लाख ते 12 लाख हेक्टर क्षेत्र हे फळझाडांच्या लागवडीखाली आलेले आहे.माझी शासनाला विनंती आहे की,त्याठिकाणी पर्यावरणाचा समतोल राखताना कोकणचा इतर बाजूनेही विकास होण्याच्या दृष्टीकोनातून शासन प्रयत्नशील आहे.पण यामध्ये अडचणीचा भाग असा आहे की,डॉ.गाडगीळ यांची एक सदस्य समिती कोकणामध्ये आली आणि त्यांनी अतिशय जाचक पध्दतीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली . . . .

जेणेकरुन तेथे कोणताही व्यवसाय होणार नाही, जे.टी. होणार नाही, कोणताही नवीन व्यवसाय येणार नाही अशा प्रकारचा अहवाल राज्य शासनाला व केंद्र शासनाला दिलेला आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

या एक सदस्य समितीला जे विरोध करणारे लोक होते त्यांच्यापैकी एकाच्या घरी ते राहिले होते. आम्ही त्यांना भेटायला गेलो होतो. तेव्हा माझी सरकारला विनंती आहे की, हा अहवाल तपासून पहावा. कोकणाच्या दृष्टीने हा अहवाल पूर्णपणे चुकीचा आहे. पर्यावरण साध्य झाले पाहिजे यात वाद नाही. परंतु अहवालात ज्या जाचक अटी घातलेल्या आहेत त्या अत्यंत चुकीच्या आहेत तेव्हा तो अहवाल रद्द करावा अशी शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारला करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय पेय जल योजने संबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख आहे. जल स्वराज्य, भारत निर्माण योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून हजारो कोटी रुपये राज्य शासनाला मिळतात आणि ते पैसे ग्रामीण भागापर्यंत जातात. परंतु खऱ्या अर्थाने त्या पैशाचा उपयोग होतो काय ? आता जल स्वराज योजना जाऊन राष्ट्रीय पेय जल योजना आली. या योजनेद्वारे प्रत्येक जिल्ह्याला लोकसंख्येच्या प्रमाणात 70-80 कोटी रुपये मिळत आहेत. आतापर्यंत जेवढ्या योजना आल्या त्याची शासनाने श्वेतपत्रिका काढावी. आता पर्यंत आलेले पैसे ग्रामीण भागापर्यंत पोहोचले काय,हे पैसे ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठ्याचे स्त्रोत बळकटीकरणासाठी खर्च झाले काय याचा विचार निश्चितपणे होणे गरजेचे आहे. राज्य सरकारच्या देखील अनेक योजना आहेत. तेव्हा राज्य सरकारच्या योजना आणि केंद्र सरकारच्या योजना यांचा ताळमेळ घातला गेला पाहिजे. आपण एकेका जिल्ह्याला वर्षानुवर्षे टँकर देऊन राज्य शासनाचे करोडो रुपये खर्च करीत आहोत. तेव्हा ग्रामीण भागात खरोखरच पैसे जाण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करायला पाहिजेत त्यासाठी श्वेतपत्रिका काढावी असे मला वाटते.

सभापती महोदय, कोकणावर वनसंज्ञेच्या संदर्भात फार मोठा अन्याय झालेला आहे. सन 1997-98 मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांकडून किती जमीन वनसंज्ञेखाली आहे याचा रिपोर्ट मागविला होता. त्यावेळी आमच्या सरकारने घाईगर्दीने थोडा चुकीचा रिपोर्ट दिला. महाराष्ट्र राज्यातील 65 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली येत आहे आणि त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 42 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली येत असल्याची माहिती दिली. त्यामुळे आज कोकणात कोणतेच प्रकल्प होऊ शकत नाही. कोकणात इरिगेशनचा प्रकल्प येऊ शकत नाही,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

त्याशिवाय लोकांच्या राहत्या घराच्या ठिकाणी वनसंज्ञा दाखविलेली आहे. त्यानंतर श्री.भूषण गगराणी यांच्या अध्यतेखाली पुन्हा एक कमिटी झाली त्या कमिटीने 1800 हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली असल्याचे सांगितले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी आरोग्य मंत्री उपस्थित आहेत. शासनाने "राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना" ही अतिशय चांगली योजना महाराष्ट्रात आणली त्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. या योजनेमधून जवळपासून दीड लाख रुपयापर्यंत रुग्णावर मोफत उपचार मिळणार आहेत. या योजनेमध्ये 972 आजारांचा समावेश केलेला आहे. ही योजना तात्पुरत्या स्वरुपात आठ जिल्ह्यांकरिता लागू केलेली आहे. या आठ जिल्ह्यांमध्ये कोकणातील रायगड जिल्ह्याचा समावेश आहे. माझी आपणास विनंती आहे की, या योजनेमध्ये कोकणातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करुन या योजनेची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रभर वाढवावी.

सभापती महोदय, 13 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी 205 कोटी रुपये मिळालेले आहेत. कोकणातील चार जिल्ह्यांसाठी हे पैसे आहेत. समुद्र किनाऱ्या जवळची गावे अतिशय अडचणीत आलेली आहेत. राज्य सरकार नेहमी केंद्र सरकारकडून आलेले आकडे दाखविते, परंतु राज्य सरकारने देखील त्यासाठी तरतूद केली पाहिजे अशी मी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर कु.थोरात..

अनुधावित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय,राज्यपालांच्या अभिभाषणावर रात्री इतक्या उशिरा बोलावे की बोलू नये असा बऱ्याच वेळेला प्रश्न निर्माण होतो परंतु राज्यपाल महोदयांचे अभिभाषण म्हणजे पुढच्या संपूर्ण वर्षाबरोबरच काही काळासाठीची शासनाची दिशा दर्शविणारे अभिभाषण असते. या वर्षीच्या अभिभाषणाचे वैशिष्ट्य असे की, कै. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ शासनाने यशवंत पंचायत राज अभियान सुरु केलेले आहे. परंतु सर्व जिल्हयातील संपूर्ण पंचायत राज व्यवस्थेचे चित्र पाहिले तर पंचायतराज व्यवस्थेचे विकेंद्रीकरण मनापासून केलेले आहे का, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या हातामध्ये निर्णय घेण्याचे अधिकार ठेवलेले आहेत का, त्यांच्या ऑडिटचा किंवा त्यांच्या कामाचा दर्जा काय आहे, याचे कधीतरी पुर्नपरीक्षण करण्यात येणार आहे का ? याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, विधिमंडळाच्या समित्या अनेक जिल्हयांना भेटी देतात त्यावेळी त्या ठिकाणचे चित्र समोर येते. त्या ठिकाणी अपुरा कर्मचारी असतो. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या बाबतीत चुकीच्या लाभधारकांनी फायदा घेतलेला आहे अशा प्रकारच्या शकडो प्रश्नांवर या दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा होत असते. त्यामुळे या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची देखरेख करणाऱ्या यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याच्या बाबतीत प्रयत्न सुरु झालेले आहेत असे चित्र कुठेही दिसत नाही त्यामुळे मला याबाबतीत खेद व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका झालेल्या आहेत. या निवडणुकांमधील निकाल हा संपूर्ण राजकीय चर्चेचा विषय आहे. परंतु ईव्हीएम मशीनमधील अनेक गैरप्रकारांच्या संदर्भात कोर्टात आज सुध्दा खटले प्रलंबित आहेत. ईव्हीएम मशीन योग्य त्या प्रकारची असण्या सोबतच विधानसभा निवडणुकीच्या वेळी ईव्हीएम मशीन्सची सी.सी.टी.व्ही.च्या खाली राखण करण्याची व्यवस्था केली होती तशी व्यवस्था जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांमध्ये केली गेली नाही. या ईव्हीएम मशीनचा निकाल आम्ही खात्रीशीरपणे देऊ शकतो असे अनेक ठिकाणचे एजंट्स सांगत होते कोल्हापूर येथे गुन्हेगारी स्वरुपाची क्रिमिनल केस नोंद झालेली आहे. ईव्हीएम मशीनचे कुठलेही बटन दाबले तरी फक्त राष्ट्रवादी पक्षाला मतदान केल्याचे दिसत होते. त्यामुळे फेर मोजणी झाल्यावर नवीन ईव्हीएम मशीनने तेथील निवडणुकीचा निकाल बदलला गेला आहे. हा प्रश्न फक्त पक्षाचा नाही. राज्य शासनाच्या सामान्य

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

प्रशासन विभागाकडे या सगळया यंत्रणेवर देखरेख करण्याची जबाबदारी होती. जेव्हा निवडणुका असतात त्यावेळी राज्यपाल महोदय संपूर्ण राज्याची काळजी घेत असतात. निवडणुकीच्या वेळी बोगस शिधापत्रिकांचा विषय असतो. अनेक ठिकाणी मतदार याद्यांमध्ये प्रचंड गोंधळ झालेले दिसून आले. बऱ्याचशा ठिकाणी असे चित्र दिसले की, मोक्काचे आरोपी अनेक मतदारसंघामध्ये जाऊन हस्तक्षेप करीत आहेत. या सगळया परिस्थितीचा विचार करुन निवडणूक यंत्रणा आणखी चांगली बनविण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे याबद्दल विचार झालेला आहे असे अजिबात चित्र या अभिभाषणात दिसत नाही म्हणून मला याबद्दल खेद व्यक्त करावासा वाटतो. पुढच्या काळात महाराष्ट्रात जेव्हा निवडणुका होणार आहेत तेव्हा या बाबतीत काय सुधारणा केल्या जाणार आहेत या बद्दल विचार झाला पाहिज असे मला वाटते.

सभापती महोदय, नुकताच उच्च न्यायालयाने एक निकाल दिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी नद्या जोड प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे. त्याबद्दल जे आक्षेप होते त्यापैकी बरेचसे आक्षेप मोडीत काढलेले आहेत. आज मार्च महिन्यात अधिवेशन सुरु आहे. जल नितीवर बऱ्याचवेळा सदनाच्या बाहेर चर्चा केली जाते. गेल्या वर्षी या सभागृहात जल नितीच्या संबंधीच्या विधेयकावर चर्चा केली पण त्यापलीकडे जाऊन दर वेळेला या दोन्ही सदनांच्या बाहेर जल निती बद्दल चर्चा होते आणि त्या बद्दलचा निर्णय तज्ञ समितीमार्फत घेतला जातो. श्री. माधवराव चितळे हे जलतज्ञ आहेत त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक नदीच्या खोऱ्यातील किती पाणी शेतीसाठी वापरावे किती पाणी पिण्यासाठी वापरावे या बद्दलचा पूर्ण आराखडा तयार केलेला आहे. पाण्यावरुन एक विभाग विरुध्द दुसरा विभाग असे वादविवाद सुरु होतात. जल निती तयार केलेली आहे याची माहिती किती सन्माननीय आमदारांना आहे? विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये जलनितीबद्दल चर्चा होते पण त्याची अंमलबजावणी झाली नाही तर एक तालुका विरुध्द दुसरा तालुका, एक जिल्हा विरुध्द दुसरा जिल्हा असा वाद सुरु झालेला दिसतो म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जलनितीच्या संदर्भात एका वर्षा बरोबरच पुढील दहा वर्षांचा विचार व्हावयस पाहिजे होता पण तो झालेला दिसत नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत/ अशुद्धीशाली नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

. सभापती महोदय, तिसरा जो मुद्दा आहे त्यावर खूप चर्चा होत आहे, जाहिराती होत आहेत, कार्यक्रम होत आहेत. मुलींची नावे बदलण्याचा कार्यक्रम आपण करतो. पण तरीही स्त्रीगर्भ हत्येसारखा जो प्रश्न आहे त्या बाबतीत अंमलबजावणी यंत्रणांमध्ये शासन नक्की काय करु इच्छिते या बद्दलचा एखादा कृती कार्यक्रम असणे अपेक्षित होते. विशेषत: स्त्रीगर्भ हत्येच्या संदर्भात त्या त्या ठिकाणी असणारी जी निदान करणारी यंत्रणा आहे त्या यंत्रणांवर देखरेख नसल्यामुळे आजही मोठ्या प्रमाणावर स्त्रीगर्भ हत्या होत आहेत. या हत्या रोखण्यासाठी सरकार नक्की काय करु इच्छिते या संदर्भामध्ये कोणताही कार्यक्रम माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसत नाही. प्रत्यक्षात आरोग्य विभाग काही प्रयत्न करीत आहे पण त्यासाठी सर्वांचा मिळून तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर जो एकत्रित प्रयत्न झाला पाहिजे तो आजही आपल्याला होताना दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. याबद्दल कोठेही खंत आणि खेद व्यक्त होत नाही, ही अत्यंत दु:खदायक गोष्ट आहे असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, आपण वाजतगाजत आणि खूप मोठी चर्चा करुन शिक्षण शुल्क नियंत्रण कायदा गेल्या अधिवेशनामध्ये मान्य केला. तो कायदा आपण केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला. सर्वपक्षीय आमदार त्या समितीमध्ये काम करीत होते. सर्वांनी मिळून ते ठरविले. मार्च-एप्रिल-मे महिन्यामध्ये पालकांना प्रचंड मोठ्या प्रमाणात फी द्यावी लागते आणि चार किंवा पाच वर्षाचे जे छोटे बालक शाळेमध्ये जाणार आहे त्याच्यासाठी मध्यमवर्गाला तर भूर्दंड पडतोच पण गरीब घरातील मुलांना सुध्दा पाहिजे त्या शाळेत जवळपास प्रवेश मिळतोच असे नाही. म्हणून हा शिक्षण शुल्क नियंत्रण कायदा प्रत्यक्षामध्ये कधी अंमलात येणार ? ही जबाबदारी जशी राज्य सरकारची आहे तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्या कायद्याच्या अंमलबजावणीबद्दल, तो कायदा कधी लागू होणार याबद्दल उल्लेख करावयास पाहिजे होता. या वर्षाचा जो मोसम आहे तो निघून जाईल आणि परत आता वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांचा धुमाकूळ प्रत्येक भागामध्ये चाललेला आहे. याकडे सुध्दा मला खेदाने लक्ष वेधावेसे वाटते. आपण कायदे करतो परंतु त्याच्या मंजुरीसाठी आपली राजकीय इच्छाशक्तीच नसेल तर ते कायदे प्रत्यक्षात किती अंमलात येतील ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

जशी या शिक्षण शुल्क कायद्याची परिस्थिती आहे तशीच परिस्थिती कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याची आहे. गेल्या वर्षी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याच्या संदर्भामध्ये समुपदेशन केंद्रांचा उल्लेख केला होता पण आज आपल्याला असे चित्र दिसते की, या कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याची अंमलबजावणी कशी होणार आणि त्यासाठी कोण काम करणार ? हे काम करणारा किंवा त्यावर देखरेख करणारा जो महिला आयोग आहे तेथील पदे गेली दोन वर्षे रिक्त आहेत. प्रत्येक वेळी आम्ही सभागृहामध्ये न कंटाळता त्याबाबत आवाज उठवितो. महिला आयोग असेल, राज्यातील अनेक महामंडळे असतील, विविध स्वरुपाच्या समित्या असतील, त्या ठिकाणी आज जवळजवळ 12 हजार पदे रिक्त आहेत. एका अर्थाने सरकारला मदत करणाऱ्या या यंत्रणा आहेत. पण स्वत:च आपण भयग्रस्त असल्यामुळे, या महामंडळाचे अध्यक्ष काही शिरजोर होतील का, राज्य महिला आयोगावर नेमलेले लोक सरकारच्या विरुध्द काम करतील का, अशा पध्दतीची भूमिका सरकारच्या मनामध्ये घेते की काय, अशी मला शंका वाटते. म्हणून या सगळ्या नियुक्त्या होण्याच्या संदर्भात सुध्दा नक्की कोठे गाडे अडले आहे हा एक फार मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, दोन मुद्दे मांडून मी लवकरात लवकर माझे भाषण संपविणार आहे. नद्या प्रदूषणाचा प्रश्न महाराष्ट्रामध्ये खूप घनगंभीर झालेला आहे. ठिकठिकाणी होणारा बेकायदा वाळू उपसा आपण बघतो. मोठेमोठे डंपर भरुन, गाड्या भरुन जाताना पाहतो. जेव्हा त्या गाड्या अडविल्या जातात तेव्हा अधिकाऱ्यांवर आणि कार्यकर्त्यांवर हल्ले होण्याचे प्रसंग घडत असतात. नद्यांच्या प्रदूषणामध्ये रासायनिक प्रदूषण या सोबतच सगळ्या महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती यांच्याकडून कोणतीही प्रक्रिया न करता सोडला जाणारा मैला आणि त्यामुळे लोकांना प्रदूषित पाणी प्यावे लागणे या प्रश्नावर गेली तीन चार वर्षे आपण सभागृहात बोलतो पण कोणतीही महानगरपालिका, कोणतीही ग्रामपंचायत यांनी नक्की काय करावयाचे याबद्दल सरकार त्यांना कोणतेही मार्गदर्शन करीत नाही आणि आपण कोणतीही पावले उचलत नाही. त्यामुळे मला असे वाटते की, याबद्दल एक ठोस कृती कार्यक्रम सुध्दा दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, शेवटचा परंतु सगळ्यात महत्वाचा मुद्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दलचा आहे. रविवारी 18 तारखेला मी यवतमाळमध्ये पांढरकवडा येथे गेले होते. पांढरकवड्यामध्ये जवळजवळ 200 आत्महत्याग्रस्त शेतकरी महिला एकत्र आल्या होत्या. त्यांनी जे काही प्रश्न मांडले त्या प्रश्नांमधून एक चित्र स्पष्ट दिसते की, दुर्दैवाने पतीने आत्महत्या केल्यावर जी जमीन तिचा पती कसत होता आणि ज्यामध्ये ही महिला सुध्दा अर्धांगिनी म्हणून काम करण्यामध्ये सहभागी आहे ती जमीन त्यांच्या नावावर सुध्दा झालेली नसते. कारण एकत्र कुटुंबामध्ये खातेफोड झालेली नसल्यामुळे त्या जमिनीतून तिला निष्कासित केले जाते किंवा काही सुना आम्हाला अशाही भेटल्या की,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

काही ठिकाणी सासू सासरे तिच्यावर अवलंबून आहेत. सून अशी म्हणते की, मी माहेरी जाणार नाही. कारण सासू सासऱ्यांची मी काळजी घेत आहे. ते तिला मुलीप्रमाणे सांभाळत आहेत. काही कुटुंबे अशी दिसली की, तिचा जमिनीवर आता ताबा नाही हे दाखविण्यासाठी सासरचे सर्व लोक तहसील कचेरीबरोबर सामील झालेले आहेत. यवतमाळ जिल्ह्यात 2 हजार विधवा महिला आहेत त्याप्रमाणे मराठवाड्यात सुध्दा विधवा महिलांची संख्या वाढलेली आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांसाठी पुनर्वसन व विकासाची योजना जाहीर केली जाईल असे वाटत होते. पण प्रत्यक्षात ते आलेले दिसत नाही. म्हणून मराठीतील तीन म्हणी राज्य शासनाच्या कारभाराला लागू पडत आहेत. पहिली म्हण म्हणजे तहान लागल्यानंतर विहीर खणणे. शासनाकडून प्रत्येक वेळी तात्पुरती घोषणा केली जाते, पुढे त्याबाबत काहीच होत नाही. दुसरी म्हण म्हणजे आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी. एका जिल्ह्यात एखादा प्रसंग घडल्यानंतर दुसऱ्याच जिल्ह्यात योजना सुरु केली जाते. तिसरी म्हण म्हणजे आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कारटे. या भूमिकेतून सरकारने काम न करता व्यापक भूमिका घ्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण येथेच संपविते.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी अशी म्हण सांगितली की, आपला तो बाब्या, दुसऱ्याचे ते कारटे. त्यांचे म्हणणे अगदी खरे आहे. ही म्हण सभागृहातील अनेकांना लागू होते. प्रत्येकाने आत्मपरीक्षण करुन ती समजून घ्यावी. त्याबाबत मी त्यांचे आभार मानते. मी सुरुवातीलाच राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन व स्वागत करुन माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणात एक महत्वाचा विषय आलेला आहे. सन 2011-2012 मध्ये मानव विकास अभियानाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. मानव विकास अभियानाची व्याप्ती वाढविण्यासाठी जिल्हा हा निकष लागू केला जात असे. बीड जिल्ह्याचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास परळी पॉवर स्टेशनचा विकास वेगळ्या पध्दतीने होतो. याचा अर्थ संपूर्ण बीड जिल्ह्याचा विकास झाला असा होत नाही. पैठण तालुक्याचा विकास झाला म्हणून औरंगाबाद जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांचा विकास झाला असा त्याचा अर्थ होत नाही. हा मुद्दा अनेक वेळा चर्चेला आलेला होता. त्याचे सूतोवाच या अभिभाषणामध्ये झालेले आहे. तालुका हा निकष लागू करुन पुढची पावले टाकली जातील आणि मानव विकासाचा घटक जिल्ह्याऐवजी तालुका घटक मानला जाईल अशी भावना व्यक्त केलेली आहे. ती राज्याला विकासाच्या दृष्टीने पुढे घेऊन जाणारी आहे.

कृषी क्षेत्राबाबत असे नमूद केले आहे की, 2000 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य शेतकऱ्यांना दिलेले आहे. खरे म्हणजे हे वर्ष शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी व वाईट गेलेले आहे. निसर्गाने शेतकऱ्यांना साथ दिली नाही. खरिपाच्या वेळी पाऊस वेळेवर आला नाही. जो काही पाऊस पडला त्यातून पेरण्या केल्या होत्या, पण बियाणे उगवण्यासाठी आवश्यक असलेला पाऊस पडला नाही. उगवण झाल्यानंतर कापसाला बोंडे धरण्यासाठी पाऊस पडावयास पाहिजे होता तो पडला नाही. रासायनिक खतांचा अधिक वापर केल्याने त्याचा दुष्परिणाम असा झाला की, ज्या शेतामध्ये एकरी 10 क्विंटल कापूस पिकत होता त्या शेतामध्ये एकरी 2 क्विंटलही कापूस पिकाला नाही अशी दुर्दैवी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ॲड.उषा दराडे....

सोयाबीन पिकाच्या बाबतीत शेतकऱ्यांना जे बियाणे दिले गेले त्याची उगवणच झाली नाही अशी वाईट अवस्था निर्माण झाली. याचा फटका राज्यातील विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यांना बसला. पांढरे सोने पिकविणारे जिल्हे म्हणून ज्या जिल्ह्यांकडे पाहिले जाते त्यांना बसला. त्यासाठी यापूर्वी शासनाने 2 हजार कोटी रुपयांची मदत देण्याची घोषण केलेली आहे. त्यासाठी शासनाचे अभिनंदन केलेच पाहिजे. या योजनेच्या अंमलबजावणीस होण्याला होत असलेला विलंब टाळला पाहिजे. खरे म्हणजे विकासाच्या कामांना कात्री लावून हा पैसा बाजूला काढलेला आहे. शासनाच्या तिजोरीत पैसा नसताना शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. फूल ना फुलाची पाकळी शेतकऱ्यांना दिली आहे हे मला माहीत आहे. या मदतीतून शेतकऱ्यांचे कुटुंब उभे राहणार नाही. या वर्षाच्या दुष्काळामुळे शेतकरी उभा राहू शकणार नाही, पण त्याला निश्चितपणे दिलासा मिळाल्याशिवाय राहणार नाही. या दृष्टीने ही योजना चांगली आहे.

विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे हे सर्वांनाच मान्य करावे लागेल. परंतु हल्ली मराठवाड्यात सुध्दा काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीशाली नाही

ॲड. उषा दराडे...

शेतकरी आत्महत्या करतात अशा प्रकारच्या बातम्या येतात. नव-याच्या त्रासाला कंटाळून स्वत:ला जाळून घेतल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून येतात. परंतु कर्जबाजारी झालेल्या कुटुंबामध्ये नवरा गेला म्हणून कोणत्या महिलेने आत्महत्या केली अशी बातमी कुठे ऐकला मिळत नाही. मला महाराष्ट्रातील अशा तमाम भगिनींच्या मनोधैर्याचे, त्यांच्या कामाच्या चिकाटीचे आणि जगण्याच्या आत्मविश्वासाचे कौतुक करावेसे वाटते. अशा कठीण परिस्थितीमध्येही महिला जगण्याचा प्रयत्न करतात. मला एकच सांगावयाचे आहे की, शेतकरी आत्महत्या करतो याचे मुख्य कारण त्याची आर्थिक परिस्थिती होय. त्याच्या मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी, मुलींच्या लग्नासाठी आणि पेरणीसाठी लागणारा पैसा त्याच्याकडे नसतो. राज्यातील शेतकरी हा फक्त शेतीवर अवलंबून आहे. शेतीचे क्षेत्र आता कमी व्हायला लागले आहे. लोकसंख्या वाढायला लागली आहे. ज्या कुटुंबाकडे 50 एकर शेती होती त्यांच्याकडे आता 10एकर 5 एकर सुध्दा शेती नाही. शेतकरी अल्पभूधारक झालेले आहेत आणि अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन व्हायला लागले आहेत. दुसरीकडे पाण्याचा दुष्काळ आहे. पडणार पाऊस हा कमी आहे आणि त्यामध्ये आपण पाण्याची अडवणूक मर्यादित केलेली आहे. महाराष्ट्राने पाण्याची अडवणूक केलीच नाही असे मी म्हणणार नाही. महाराष्ट्राने बरीच प्रगती केलेली आहे. परंतु बरेचसे पाणी वाहून जातेय. पाण्याची उपलब्धता मोठया प्रमाणावर व्हायला पाहिजे. ठिबक सिंचनाच्या बाबतीत महाराष्ट्र शासन हे केन्द्र शासनाच्या सहकार्याने 90 टक्के अनुदान देण्याचा प्रयत्न करीत आहे असे माझ्या ऐकण्यात आलेले आहे. त्या बाबतीत मी खात्रिशीर असे सांगू शकत नाही. परंतु ठिबक सिंचनाचा उपक्रम आपण महाराष्ट्रामध्ये राबविला तर जे पाणी 5 वर्षात 10 वर्षात आटणार आहे ते पाणी पुढे किती तरी अधिक वर्षे टिकविता येईल.

सभापती महोदय, मघाशी बोलत असताना माझ्या एका सहकारी बांधवाने सांगितले की, शहरीकरण वाढत आहे. शेतीचे पाणी शहारासाठी पाण्याची तहान भागविण्यासाठी वापरले जात आहे आणि ही गोष्ट खरी आहे. पूर्वी ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या होती. आता शहराची लोकसंख्या 48 टक्के काही ठिकाणी ती 50 टक्के इतकी झालेली आहे. म्हणून आपल्याला कुठे तरी पाण्याचे नियोजन हे करावे लागेल. त्यादृष्टीने महाराष्ट्र पुढे जात आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी स्त्रीभ्रूण हत्येचा प्रश्न येथे मांडला. PCPNDT ॲक्टमध्ये दुरुस्त्या करायच्या का असा मुद्दा त्यांना मांडला. माननीय आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक पर्यवेक्षण समिती निर्माण केलेली आहे. महाराष्ट्रातील भ्रूणहत्या कशा रोखायच्या यासाठी या कमिटीच्या माध्यमातून यशस्वीपणे प्रयत्न केले जात आहेत. या कमिटीच्या माध्यमातून यंत्रणा कशी प्रभावीपणे राबवायची यादृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. ब-याच ठिकाणी अशा प्रकारे सोनोग्राफी करणा-या सेंटर्सना सील देखील केलेले आहे. यापूर्वी गर्भजल परीक्षा केल्याबद्दल शिक्षा झाल्याचे ऐकिवात नव्हते. गर्भजल परीक्षा करुन मुलगी आहे की मुलगा आहे हे तपासून बघणे हा गुन्हा असून त्याबद्दल अनेकांना शिक्षाही झालेली आहे. गर्भपात करण्याचा अधिकार स्त्रीला आहे आणि तो असायला पाहिजे. कदाचित स्त्रीची इच्छा नसताना देखील तिच्यावर गर्भपाताची इच्छा लादली जाऊ शकते. पण केवळ मुलगा आहे की मुलगी आहे या जेण्डरबायस दृष्टीकोनातून गर्भपात करणे हा गुन्हा आहे. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करीत आहे. त्यासाठी मला या महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करायचे आहे. खरे म्हणजे ही कौतुकाची गोष्ट नाही.

स्त्रीयांच्या संदर्भात या ठिकाणी बोलत असताना आपण महिलांच्या संदर्भातील विविध कायद्याची चर्चा केली. आपण खूप कायदे केले, खूप योजना केल्या. त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही आपण केला. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे असे जे चित्र रंगविले जात आहे त्याला मनुवादी संस्कृती, पुरुष प्रधान संस्कृती कारणीभूत आहे. त्यामध्ये मेडिया आणि साहित्य या दोन गोष्टींवर महाराष्ट्र शासनाला विशेष लक्ष द्यावे लागेल. कारण अशा प्रकारचे साहित्य जाणीवपूर्वक जोपासले गेले. अशा प्रकारचा मिडिया जाणीवपूर्वक जोपासला गेला. यामधून स्त्रीही वंश निर्माण करणारी वस्तू आहे असे चित्र रंगविले गेले आहे. त्यामुळे साहित्य आणि मिडिया यावर महाराष्ट्राचे कुठे तरी निर्बंध असायला पाहिजेत. "साहित्यातील नवे प्रवाह, आकलन आणि अन्वयार्थ" असे डॉ. माधव फुटवाड यांनी लिहिलेले एक पुस्तक आहे. त्यामधील पृष्ठ क्रमांक 20 आणि 21वर जे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे तेवढे वाचून दाखवून मी माझे भाषण संपविते. ते असे म्हणतात, "भारतीय स्त्री वाद भूमिका आणि वास्तव, सैध्दांतिक पातळीवर भारतीय स्त्रीवादाच्या संदर्भात असे म्हणता येईल की, श्रृती, स्मृती,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुराणोक्त, सनातनी मनोवृत्तीतून आकाराला आलेली पुरुष प्रधान भारतीय समाज व्यवस्था नीट समजावून घेऊन स्त्रीत्वाचे भान राखून समन्वयाची भूमिका घेत आयुष्य अधिक समृद्ध कसे करता येईल याचा विचार करणारी भूमिका म्हणजे भारतीय स्त्रीवाद. भारतीय स्त्रीवादाला अत्यंत उपकारक ठरलेली एक बाब म्हणजे भारताने स्वीकारलेली लोकशाही प्रशासन व्यवस्था...

...नंतर श्री. गिते...

अप्रसिद्धीसाठी नाही / अप्रमाणित प्रत

ॲड.उषा दराडे...

भारतीय राज्य घटनेने स्त्रियांना दिलेला समानतेचा हक्क आणि स्वातंत्र्य, शिक्षणाच्या संदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा अत्यंत महत्वाच्या, औद्योगिकरणा नंतरची बदललेली अर्थव्यवस्था, वाढत्या कौटुंबीक गरजा, गरजा भागण्यासाठी पुरुषाच्या कमाईला पडणाऱ्या मर्यादा व कमाईसाठी स्त्रियांनी घराबाहेर पडणे इत्यादी गोष्टी स्त्रीवादी भूमिकेस उपकारक अशा ठरलेल्या आहेत. या ठिकाणी लोकशाहीचा उल्लेख केला, तो महत्वाचा आहे. आमच्या हक्कांचा उल्लेख केला, तो हक्क जोपासण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत आलेले आहे, यापुढेही करीत राहील अशा प्रकारची मी या ठिकाणी अपेक्षा व्यक्त करते. मी पुन्हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत समाधान व्यक्त करुन त्यांचे आभार मानते आणि माझे मनोगत पूर्ण करते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अभिनंदनाचा जो ठराव या सभागृहात मांडला गेला, त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, तारांकित प्रश्न तसेच विविध आयुधांचा वापर करुन अनेक विषय या सभागृहात सन्माननीय सदस्यांकडून उपस्थित केले जातात. त्या विषयांमध्ये आरोग्य विभाग असेल, सकाळी चर्चेला आलेला सामाजिक न्याय विभाग असेल, आदिवासी विकास विभाग असेल, शिक्षण विभाग असेल, शिक्षण विभागाच्या बाबतीत तर विचारावयास नको. या सर्व विभागांमध्ये फार मोठया प्रमाणावर रिक्त पदे आहेत. त्याचा विपरित परिणाम कामकाज करण्यामध्ये आणि प्रशासन चालविण्यामध्ये होतो आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये राज्य शासनाच्या विविध विभागातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात काही ठोस कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता होती. त्याचा उल्लेख या अभिभाषणात दिसून येत नाही. रिक्त पदे भरण्यासंदर्भातील कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा अशी माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर, मुंबई उच्च न्यायालयाच्या स्तरावर फार मोठया प्रमाणात न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. दहा-दहा, बारा-बारा वर्षापूर्वी याचिका दाखल झालेल्या आहेत, अद्यापही त्या याचिकांचा निर्णय लागत नाही. आपण असे म्हणतो की, "जस्टीस डीले मिन्स जस्टीस डिनाईड". लोकांना वेळेवर न्याय द्यावयाचा असेल तर प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शासनाने निश्चितपणे काय उपाययोजना केलेल्या आहेत, यासंदर्भातील उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसून येत नाही. न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शासनाने धडक कार्यक्रम हाती घ्यावा, अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने अनेक वेळा सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर क्रीडा धोरण लवकरच जाहीर करु अशा प्रकारची घोषणा केलेली आहे. या क्रीडा धोरणास अंतिम स्वरुप अद्यापही राज्य शासनाला देता आलेले नाही. क्रीडा धोरणाच्या संदर्भात शासनाची निश्चित भूमिका अभिभाषणाच्या निमित्ताने राज्यातील जनतेसमोर येण्याची आवश्यकता होती. क्रीडा धोरण जाहीर न झाल्यामुळे क्रीडा क्षेत्राच्या बाबतीत चुकीचे निर्णय शासनाकडून घेतले जात आहेत. आमच्या शालेय

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

स्तरावरील विद्यार्थ्याने राज्य स्तरावरील खेळामध्ये सहभाग घेतला असेल तर त्या विद्यार्थ्यास 25 गुण दिले जात होते. याबाबतीत शासनाने निर्णय घेतलेला आहे, परंतु तो निर्णय अद्याप जाहीर झालेला नाही. याबाबतचे आदेश निघाले असतील, कदाचित ते आदेश आमच्यापर्यंत पोहोचले नसतील. पुढील वर्षापासून या विद्यार्थ्यांना 25 गुण दिले जाणार नाहीत. खेळात सहभाग घेतलेला विद्यार्थी नापास झाला तर त्यास 25 गुण द्यावयाचे. तो विद्यार्थी उत्तीर्ण झाला तर त्यास 25 गुण द्यावयाचे नाहीत. एका बाजूला क्रीडा क्षेत्रात येण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देतो. दुसऱ्या बाजूला मात्र त्या विद्यार्थ्यांना फायदा देण्याऐवजी त्यांचा फायदा काढून घ्यावयाचा अशा प्रकारचा निर्णय शासनाकडून घेतला जात आहे. त्या निर्णयाचा शासनाने फेरविचार करावा, अशी माझी विनंती आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात क्रीडा धोरणाच्या बाबतीत उल्लेख नसल्याने शासनाने तात्काळ क्रीडा धोरण जाहीर करावे अशीही शासनास विनंती आहे.

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी या सदनात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या अनुषंगाने अतिशय चांगला विचार मांडला आहे. आपण मानव विकास मिशन योजनेचे अभिनंदनही केले आहे. मानव विकास मिशनमध्ये नक्की कोणाचा विकास झाला याचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे...

. यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

वेळेअभावी मी स्पष्टपणे बोलू शकत नाही. पण हा मानव विकास अभियान राबविणारे जे आहेत त्यांचा विकास झाला. सर्वसामान्य जनतेचा ज्या पध्दतीने विकास व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने होत नाही. थोडाफार लाभ जरुर मिळाला असेल, परंतु माझ्याकडे अनेक उदाहरणे आहेत. नक्की कोणाचा विकास झाला हे मी निदर्शनास आणून देऊ शकतो. त्यामुळे या संदर्भातील धोरण निश्चित करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने केंद्र शासनाच्या 2009 च्या शिक्षण हक्क विधेयकाची अंमलबजावणी सुरु केली. परंतु मागील तीन वर्षात राज्य शासनाने अद्यापही नियमावली तयार केलेली नाही. या संदर्भातील राज्य शासनाचे धोरण सभागृहासमोर येणे आवश्यक होते. राज्य शासनाने केंद्र सरकारचे विधेयक स्वीकारल्यामुळे या राज्यामध्ये त्या विधेयकाच्या अनुषंगाने काही नियोजन करण्याची आवश्यकता आहे. इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याची आवश्यकता आहे. सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. सहा वर्षापासून नव्हे तर तीन वर्षापासून म्हणजे बालवाडीतील शिक्षण, छोटा शिशू आणि मोठा शिशू वर्गातील शिक्षण देण्याची जबाबदारी आता शिक्षण संस्थांची आहे. राज्य सरकार मात्र आठवीचा विचार करीत आहे. बालवाडी, शिशू वर्गाचा विचार करणार आहात की नाही, त्या संदर्भातील सुविधा देणार आहात की नाही, शिक्षकवर्ग नेमणार आहात की नाही, त्यांना प्रशिक्षण देणार आहात की नाही? या संदर्भातील राज्य शासनाचे धोरण सभागृहासमोर आले पाहिजे.

सभापती महोदय, मागील तीन वर्षात राज्य शासनला निकषानुसार पदे भरता आली नाहीत. जवळजवळ 39 हजार पदे जिल्हा परिषदांमध्ये रिक्त आहेत. शिक्षण हक्क विधेयकातील निकषानुसार विचार केला तर 40 हजार पेक्षा अधिक पदे भरण्याची आवश्यकता असतानाही राज्य शासनाने पदे भरलेली नाहीत. पदे भरण्याची प्रक्रिया सीईटीच्या माध्यमातून केली जाणार आहे. सीईटी परीक्षा कधी घेतली जाणार हे शासनाने जाहीर केलेले नाही. त्यामुळे या संदर्भात धोरणात्मक विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 1/10 लोकसंख्या ठाणे जिल्हयाची आहे. 7 महानगरपालिका, नगरपालिका, वाढते नागरी क्षेत्र विचारात घेता ठाणे जिल्हयाचे विभाजन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

होण्याची नितांत आवश्यकता आहे. ठाणे जिल्हा असेल, नाशिक जिल्हा असेल, इतर जिल्हे असतील त्यांचे विभाजन होण्याची गरज आहे. ठाणे जिल्हा विभाजनाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. ज्या ज्या जिल्हयांचे विभाजन प्रशासनाच्या सोयीसाठी करणे आवश्यक आहे त्या संदर्भातील उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, वालधुनी प्रकल्प 300ते 350 कोटी रुपये खर्चाचा आहे. आज उल्हासनगरमधील वालधुनी या नदीचे अस्तित्व उरलेले नाही. सगळ्या ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. मोठमोठ्या विकासकांनी, सर्वसामान्य नागरिकांनी नदीच्या परिसरात घरे बांधली आहेत. त्यामुळे नदी लोप पावली आहे. अशा परिस्थितीत शासनाने जो प्रकल्प जाहीर केला त्याचे प्रतिबिंब या अभिभाषणात उमटणे आवश्यक होते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या अनेक योजना आहेत. त्या योजनांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. राज्य शासनाचे मराठी शाळा, मराठी भाषेच्या संदर्भातील धोरण या अभिभाषणात व्यक्त झालेले नाही. मराठी माध्यमाच्या शाळांना परवानगी देणारे धोरण या अभिभाषणात जाहीर करणे आवश्यक होते. ते राज्य शासनाने जाहीर केलेले नाही एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. मैंने कई बार यह प्रश्न उठाया है कि बी.ए.सी. में सभापति महोदय सत्ताधारी पक्ष और विरोधी पक्ष के लिए समय निश्चित करते हैं. जब प्रस्ताव पर बोलने की शुरुआत होती है, तब घंटी नहीं बजती है और विरोधी पक्ष के माननीय सदस्यों को सत्ताधारी पक्ष के माननीय सदस्यों से 3 गुना, 4 गुना अधिक समय दिया जाता है. जब हम लोगों की बारी आती है तो समय का बंधन रहता है. मैं अपना भाषण 10 मिनट में भी खत्म कर सकता हूँ और 2 घंटे तक भी बोल सकता हूँ. सब से ज्यादा समय जिस किसी माननीय सदस्य ने लिया है, उतने समय तक मैं आज बोलूँगा. आप स्टडी कीजिए कि विरोधी पक्ष के माननीय सदस्यों ने कितना समय लिया है और सत्ताधारी पक्ष के लोगों ने कितना समय लिया है. मैं 2 घंटे तक भी बोल सकता हूँ और तब तक सभागृह चलना चाहिए नहीं तो यह सब के बराबरी के अधिकार का हनन है.

. . . 4O-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सभागृहात भाषण करीत असताना जेवढा वेळ देणे शक्य असेल तितका वेळ माननीय सभापतींनी दिलेला आहे व त्यानुसार सभागृहाचे कामकाज चालू आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांनी कोणतीही शंका घेऊ नये. आता सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई या आपले भाषण सुरु करतील.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : महोदय, परवा नाव दिले असताना आज मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम आपले आभार व्यक्त करते.

महोदय, महामहीम राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी असे सांगेन की, या राज्याचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने शासनाने युवक, औद्योगिक आणि शेती क्षेत्रासंबंधी जे नवीन नवीन प्रयोग केले व लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. संयुक्त राष्ट्र संघाने सन 2012 हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केल्याची माहिती सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी अगोदरच दिलेली असल्याने त्यावर मी जास्त भाष्य करणार नाही. पण एवढे मात्र निश्चितपणे सांगणार आहे की, राज्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी या शासनाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी मानव विकास, कर्जाचे समान वितरण असे पर्यायी मार्ग शोधण्यासाठी प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली असून या समितीच्या अहवालातून समतोल प्रादेशिक विकासाची एक रुपरेषा मिळेल हा निर्णय अभिनंदनास पात्र आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या 1 लाख 60 हजार 625 कोटी रुपये इतक्या अंदाजित केलेल्या आकाराच्या तुलनेत रोड मॅप तयार केलेला असून त्यासंदर्भात मी माझे मत मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. केंद्र सरकारने संपूर्ण भारतात 78 जिल्हे नक्षलग्रस्त म्हणून घोषित केले असून त्यात आपल्या राज्यातील गोंदिया आणि गडचिरोली हे दोन जिल्हे नक्षलग्रस्त म्हणून घोषित केलेले आहेत. या जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून स्वत: माननीय गृह मंत्री हेच असून या जिल्ह्यांमध्ये शासनाने एक कृती आराखडा तयार करुन त्याच्या माध्यमातून हे जिल्हे नक्षलवाद्यांपासून कसे मुक्त करता येतील याचे चित्र तयार केले आहे. या निमित्ताने मी शासनाला अशी विनंती करु इच्छिते की, जे अधिकारी या कामासाठी नेमणार आहात त्यांना आत्मविश्वासाने काम कसे करता येईल आणि हा पैसा जास्तीत जास्त त्यांच्यापर्यंत कसा जाईल याचे दिग्दर्शन शासनाच्या वतीने होणे आवश्यक आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, माननीय राज्यपालांनी अभिभाषणात जे ठराविक मुद्दे मांडलेले आहेत त्यात भार नियमन, सिंचन क्षेत्रात वाढ, नोकर भरती, तंटामुक्ती योजना, गुन्हे शोधण्यासाठी ग्राम पंचायत पातळीवर संग्राम सारख्या योजना हाती घेतल्या आहेत. यासंदर्भात मी नोकर भरतीबाबत असे सांगू इच्छिते की, नोकर भरतीसाठी ज्या वर्तमान पत्रात जाहिरात दिली जाते अथवा इंटरनेटवर माहिती दिली जाते. पण गावांमध्ये 6-6 ते 8-8 तास वीज नसल्याने त्याचा फायदा होत नाही. तसेच वर्तमान पत्र कोण व किती लोक वाचतात याचाही विचार होणे आवश्यक आहे. म्हणून माझी अशी सूचना आहे की, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लोकांना माहिती मिळावी म्हणून फलकावर माहिती देणे तसेच ग्राम सेवकामार्फत लोकांना जाणीव करुन देणे असाही प्रयत्न झाला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अलका देसाई.....

सभापती महोदय, राज्यातील आदिवासींसाठी विकास योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेच्या अनुषंगाने आदिवासींच्या मुलांसाठी शासन जे 600 रुपये देणार आहे ते पैसे त्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करावे अशी विनंती आहे. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा न करता हे पैसे अधिका-यांच्या हातामध्ये दिल्यामुळे हे पैसे आदिवासींच्या मुलांपर्यंत पोहचत नाहीत त्यामुळे सदर आदिवासी मुलांच्या बँक खात्यामध्ये पैसे जमा करावेत अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील पृष्ठ क्रमांक 82 वर म्हटले आहे की, देशातील पहिली मोनो रेल चेंबूर ते संत गाडगे महाराज चौकापर्यंत धावणार असल्यामुळे महाराष्ट्र शासन खरोखरच अभिनंदनास पात्र आहे. ही मोनो रेल सन 2014 पर्यंत सुरु होईल असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे या कामाचा लवकरात लवकर शुभारंभ व्हावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, दीर्घकाळ प्रलंबित असणारा महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा मी माझ्या लहानपणापासून पाहत आहे. परंतु या प्रश्नाचा अजून पर्यंत काही निर्णय लागत नाही. परंतु समोरची मंडळी हौस भागवण्यासाठी दर वेळेला तेच तेच मुद्दे तोंडी लावून राजकारण करीत असतात. त्यामुळे मी आपल्याला विनंती करते की, महाराष्ट्रामध्ये कायदे विषयक सल्लागारांची कमतरता नाही, कायद्याचे ज्ञान असणा-या माणसांचा तोटा नाही. माननीय सभापतींच्या अध्यक्षतेखाली या विषयाच्या संदर्भात तज्ज्ञ मंडळी नेमून कायमचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला तर समोरची जी मंडळी मुद्दे तोंडी लावतात ते तोंडी लावणार नाहीत.

सभापती महोदय, महामहिम राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर काल पासून या सभागृहात चर्चा सुरु आहे. परंतु काही सन्माननीय सदस्यांना सरकारवर टीका करण्याची सवय झालेली आहे. ते सरकारवर टीका करतात, मंत्र्यांवर प्रेशर आणतात व आपल्या फाईल्स क्लिअर करुन घेतात. त्यामुळे ज्यांनी हातवारे करुन सभागृहात अशा प्रकारे भाषणे केलेली आहेत अशांना खरे म्हणजे चाप लावला जावा एवढे या निमित्ताने सांगते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

जय हिंद, जय महाराष्ट्र..

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : आता सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा भाषण करतील.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपण आताच काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली होती त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली गेली पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांच्या नंतर आता माझा नंबर असल्यामुळे मला बोलण्याची संधी देण्यात यावी. एका मागोमाग एकाच पक्षाच्या सदस्यांना बोलण्याची संधी देणे हे काही बरोबर नाही. सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात जे संकेत ठरलेले आहे त्या संकेताला अनुसरुनच मी विचार मांडत आहे. आपण माझ्यावर जो अन्याय करीत आहात तो सहन करुन मी खाली बसतो.

तालिका सभापती : माननीय सभापती महोदयानी सदस्यांच्या भाषणाचा जो क्रम ठरवून दिलेला आहे त्या प्रमाणे मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहे. आपल्याला सुध्दा बोलण्याची संधी दिली जाणार आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मा.सभापतींशी अशा प्रकारे ऑर्ग्युमेंट करणे योग्य नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

तालिका सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांनी भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा.....

सभापति महोदय, सिर्फ दो तीन और मुद्दों का जिक्र ही मैं यहां पर करना चाहूंगा. मैं कहना चाहूंगा कि यहां पर अल्पसंख्यकों के बारे में एक मुद्दा दिया गया है. लेकिन उसमें अल्पसंख्यकों के बारे में विस्तार से कुछ नहीं कहा गया है. मैं चाहता हूं कि हमारी केंद्र सरकार द्वारा बनायी गयी सच्चर समिति की जो सिफारिशें हैं तथा डॉ. रंगनाथ मिश्रा कमीशन की जो सिफारिशें रिजर्वेशन के बार में हैं उस बारे में भी हमारी सरकार द्वारा कुछ तैयारी करनी होगी तथा इस बारे में सरकार द्वारा एक दिशा निर्देश दिया जाना बहुत जरुरी है.

सभापति महोदय हमारे माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में उद्योग का जिक्र तो किया गया है, औद्योगिक उत्पादन को बढ़ाये जाने के बारे में वहां पर थोड़ा बताया गया है. लेकिन श्रमिकों के बारे में विस्तार से कुछ नहीं कहा गया है. महाराष्ट्र राज्य में श्रमिकों को लगता है कि वे बहुत पिछड़े हुए हैं. मुझे लगता है कि श्रमिकों की हालत को सुधारना बहुत जरुरी है. मैं माननीय सदस्य श्री रामनाथ मोते जी की सभी बातों से सहमत हूं. उन्होंने बहुत अच्छी-अच्छी बातें यहां पर कहीं हैं. हम यहां पर पर टैक्सटाईल पॉलिसी तथा यूथ पॉलिसी ला रहे हैं. हमारी सरकार ने कबड्डी के खिलाड़ियों को एक-एक करोड़ रुपए पुरस्कार के रुप में देने का निर्णय भी किया है. इसके लिए मैं अपनी सरकार का तथा माननीय खेल मंत्री महोदय का अभिनंदन करना चाहता हूं. हमारे खेल मंत्री महोदय खुद एक बहुत अच्छे कुश्ती के खिलाड़ी हैं. मेरा कहना है कि हमारे यहां पर युवा पॉलिसी तथा खेल पॉलिसी फाइनल करना बहुत जरुरी है. इस काम के लिए पैसा देना जरुरी है तथा एक अच्छी डायरेक्शन देना भी बहुत जरुरी है ताकि हमारे यहां पर खेलों को बढ़ावा मिल सके.

सभापति महोदय, मैंने अपना भाषण बहुत ही संक्षिप्त कर दिया है इसलिए अब मैं सिर्फ एक-दो मिनट का समय ही और लेना चाहूंगा. मेरा कहना है कि खिलाड़ियों को स्कूली शिक्षा में पास होने के लिए मार्कस में कुछ रियायत मिलनी चाहिए ताकि उनके अंदर खेल भावना को बढ़ावा मिल सके. सिर्फ एक-दो मार्कस कम आने पर उनको फेल नहीं किया जाना चाहिए. स्कूल और कालेज के विद्यार्थियों में खेल भावना को प्रोत्साहन देने के लिए हमें आवश्यक कदम उठाने चाहिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

माननीय सभापति महोदय, हमारे विरोधी पक्ष नेता ने आज सुबह कुछ बातें यहां पर कहीं. सुप्रीम कोर्ट तथा हाई कोर्ट के किस्से यहां पर पढ़ कर सुनाए गए. सभी लोग पेपर पढ़ते हैं. इसलिए इस तरह के किस्से तो सभी को मालूम हैं. माननीय विरोधी पक्ष नेता ने माननीय मुख्यमंत्री महोदय पर एक आरोप लगाया और इस आरोप को पृथ्वी मिसाइल का नाम दिया. मैं यहां पर बताना चाहूंगा कि मैं भी कामगार क्षेत्र में काम करता हूं. महाराष्ट्र में माथाडी कामगारों का जो एडवाइजरी बोर्ड है, उस बोर्ड का मैं बहुत सालों से एक सदस्य हूं. जिस संगठन का नाम यहां पर लिया गया और बताया गया कि वहां पर सदस्य संख्या पूरी न होने पर भी हाउसिंग सोसायटी बनाने के लिए वर्तमान माननीय मुख्यमंत्री महोदय ने तीन एकड़ जमीन उनको दी है. मेरा कहना है कि पोपट लाल पाटील जी हमारे साथ उस एडवाइजरी बोर्ड में बैठते हैं. मैं उनको व्यक्तिगत तौर पर जानता हू. यहां पर आरोप लगाया गया कि उनको तीन एकड़ जमीन दी गयी. इस संबंध में मैंने पाटील जी से फोन पर बात करके जानकारी ली है. यहां पर विरोधी पक्ष नेता जी ने बताया कि घनसोली में तीन एकड़ जमीन उनको दी गयी. मेरा कहना है कि मेरे पास एक पत्र है. सन् 2009 में उस समय के माननीय मुख्यमंत्री महोदय ने एक मीटिंग ली थी. उस मीटिंग में सिडको के बड़े अधिकारी थे,नयी मुंबई में माथाडी कामगारों को मकान बनाने के लिए जमीन दी जाए, इस तरह का निर्णय उस समय का है. उस निर्णय के अनुसार सिडको ने कार्यवाही की है. उस निर्णय की पूर्ति अब हुई है और 13 सितम्बर 2011 को ढाई एकड़ जमीन उन कामगारों की हाउसिंग सोसायटी के लिए दी गयी है. यहां पर बताया गया कि उनके सिर्फ 7-8 सदस्य हैं. लेकिन मेरे पास सबूत है. माथाडी बोर्ड में रजिस्ट्रेशन होता है. वह यूनियन 15 साल से काम कर रही है. यह यूनियन रजिस्टर्ड यूनियन है. उस यूनियन के 5 हजार से ज्यादा सदस्य हैं.

तालिका सभापति (श्री विनायक मेटे): जमा जी आप यहां पर 12 मिनट से बोल रहे हैं. बोलने के लिए सबसे ज्यादा समय आपको ही दिया गया है.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मैं अपनी बात समाप्त करने जा रहा हूं. विरोधी पक्ष नेता ने कहा कि वहां पर 2 हजार मकान बनेंगे. लेकिन मेरा कहना है कि वहां पर सिर्फ एक

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

एफएसआई दिया गया है. इसलिए वहां पर ढाई एकड़ जगह में 5 सौ से ज्यादा मकान नहीं बनेंगे. मेरा कहना है कि माननीय मुख्यमंत्री महोदय पर इस सदन के अंदर इस तरह का आरोप लगाना उचित नहीं है. मेरी मांग है कि माननीय सदन में इस बारे में स्थिति स्पष्ट होनी चाहिए.

सभापति महोदय, आखिर में सिर्फ एक और पाइंट पर मैं बोलना चाहूंगा. उस बारे में माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में जिक्र होना चाहिए था. मेरा कहना है कि हमारे देश में इस समय भ्रष्टाचार समाप्त करने की चर्चा बहुत बड़े पैमाने पर हो रही है. भ्रष्टाचार को समाप्त करने के संबंध में माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में किसी तरह का दिशा निर्देश नहीं दिया गया है. इसलिए मैं चाहता हूं कि इस बारे में महाराष्ट्र सरकार द्वारा कोई ठोस कदम उठाया जाना चाहिए. आज आम आादमी के मन में यह बात बैठ गयी है कि सरकार में भ्रष्टाचार है, सरकार की ब्युरोक्रेसी में भ्रष्टाचार है तथा सरकार के पॉलिटिकल लीडर्स तथा अन्य लीडर्स में भ्रष्टाचार है. इस भावना को समाप्त करने के बारे में भी सरकार के द्वारा एक निश्चित पॉलिसी बनायी जानी चाहिए. यहां पर लोक आयुक्त नाम की मशीनरी को मजबूत किया जाना चाहिए. भ्रष्टाचार खत्म करने से संबंधित सभी एक्शन टाइम बाउंड होने चाहिए. इतनी ही मेरी प्रार्थना है. धन्यवाद.

(इसके बाद श्री.अ.शिगम .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सुरु असलेल्या चर्चेत मला माझे मत मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सर्व प्रथम खेद व्यक्त करतो. खेद व्यक्त करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

सभापती महोदय, विदर्भ एक दु:खद भावना घेऊन महाराष्ट्रात विलीन झाला. विदर्भाचा मागासलेपणा, बॅकलॉग कमी करण्याची घोषणा या अभिभाषणात निश्चितपणे दिसत नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी योग्य ती दिशा देणारी घोषणा या अभिभाषणात नाही. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाला पाहिजे, शेतमालाला खर्चावर आधारित मूल्य देण्याची तरतूद या अभिभाषणात दिसत नाही.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राबाबत बोलावयाचे झाल्यास शिक्षण क्षेत्रात दुरवस्था निर्माण केलेली आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण केलेले आहे. बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क देणारे हे पहिले राज्य आहे असे या अभिभाषणात घोषित केलेले आहे. परंतु त्यासाठी आवश्यक असलेली तरतूद करण्यात आलेली नाही. कॉन्व्हेन्ट स्कूल्स सुरु आहेत. सहा ते चौदा वयोगटातील बालकांकडून शुल्क घेणे सुरु आहे. आम्ही शुल्क घेण्याची कायदेशीर तरतूद केलेली आहे आणि शिक्षणाचा हक्क देणारे हे पहिले राज्य आहे अशी विसंगत बाब आम्ही घोषित करीत आहोत. शिक्षण शुल्क आवाक्यात रहावे म्हणून कायदा केला आणि शिक्षणाचा अधिकार दिला असे सांगणे हे विसंगतीपूर्ण असून घटनादत्त अधिकारापासून बालकांना वंचित ठेवणारे आहे. ्स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर शाळा देण्याचे धोरण सरकार आखत आहे, त्याची अंमलबजावणी करणार आहे हे सुध्दा खेद व्यक्त करण्यासाठी पुरेसे आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार.....

सभापती महोदय, वेतनेत्तर अनुदान देणे बंद केलेले आहे. विना अनुदानित शाळांचा कायम शब्द काढला परंतु नवीन मूल्यांकनाचा जी.आर.काढून अनुदान मिळू नये अशी व्यवस्था केली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम हा शब्द काढण्याचे नाकारलेले आहे. नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता आणि पदोन्नतीची एकस्तर वेतनश्रेणी दिली जात नाही. नक्षलवादा विरुध्द बोलण्याची, नक्षलवादा विरुध्द प्रतिकार करण्याची घोषणा केली गेली परंतु प्रत्यक्ष वैचारिक संघर्ष करणाऱ्या शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी नाकारली गेली, अतिरिक्त घरभाडे भत्ता देण्याचे नाकारले गेले आहे. आश्रमशाळांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. त्या ठिकाणी शिकणारा विद्यार्थी हा चांगला नागरिक बनूच शकत नाही तो आतंकवदी किंवा नक्षलवादीच बनेल अशी दुरवस्था या आश्रमशाळांची आहे. एक तारखेला वेतन देण्याची घोषणा होते परंतु महराष्ट्रातील शिक्षकांना एक तारखेला वेतन दिले जात नाही. माझी विनंती आहे की, शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे हे या देशाला आणि समाजाला परवडणारे नाही. राज्यात राबविण्यात येणाऱ्या सर्वशिक्षा अभियानाच्या दहा वर्षाच्या सातत्यपूर्ण कामगिरीनंतरही 2 लाख 18799 मुले अजूनही शाळेबाहेर असल्याचे सिध्द झाले असून शालेय विकास आराखडयातील धक्कादायक वास्तव्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, फसव्या जाहिराती देऊन विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या किंवा अनधिकृत शैक्षणिक संस्था चालविणाऱ्या संस्था चालकांच्या विरोधात दंड आणि कारावासाच्या शिक्षेची तरतूद असलेला कायदा करण्याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही याबद्दल खेद व्यक्त करतो. कुपोषणामुळे बालमृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असताना त्यावर कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही याबद्दल खेद व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाचे समर्थन करण्यासाठी, त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विधानमंडळाची 75 वर्षे पूर्ण झाली आणि तो सोहोळा साजरा करीत असतानाच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि या महाराष्ट्र राज्याचे प्रथम मुख्यमंत्री यांचे विकास कामांचा पाया रचण्याबरोबरच पंचायतराज, कृषी, उद्योग, सहकार, सामाजिक न्याय, साहित्य, शिक्षण, कला, संस्कृती आणि पायाभूत सुविधा या सारख्या क्षेत्रात महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यात मोठे योगदान दिलेले आहे. फक्त महाराष्ट्रामध्येच नव्हे तर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी अवाहन केले त्यावेळी त्यांनी दिल्लीला जाऊन या देशाचे संरक्षण मंत्री पद यशस्वीरीत्या सांभाळले आहे. हिमालयाच्या मदतीला सहयाद्री धावला आणि त्या धावून गेलेल्या सहयाद्रीने यशस्वीपणे या देशाचे रक्षण केले हे या देशाने पाहिलेले आहे. त्या स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त सन 2012-2013 मध्ये महाराष्ट्र शासनामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत याबद्दल मी प्रथम महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो.

संयुक्त राष्ट्रसंघाने 2012 हे वर्षे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षे म्हणून घोषित केले आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

सभापती महोदय, खरीप हंगामातील कमी पावसामुळे आणि बाजारभावातील चढउतारपणामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आपल्या शासनाने कापूस, सोयाबीन, धान या उत्पादनांसाठी 2 हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली. त्याचप्रमाणे मला आठवते की, ज्या वेळी या देशातील शेतकरी संकटामध्ये सापडलेला होता त्या वेळी देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद्चंद्रजी पवार साहेबांनी संपूर्ण देशातील शेतकऱ्यांना 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. त्या वेळेला आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना केंद्राची आणि आपल्या राज्याची मिळून जवळपास 11 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी झाली होती आणि त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला होता. ज्याप्रमाणे आपण कापूस, सोयाबीन, धान या पिकांना मदत दिली त्याप्रमाणे या राज्यातील दुष्काळी भागामध्ये द्राक्ष, बेदाणे, डाळींब इत्यादी उत्पादने घेणाऱ्या शेतकऱ्यांना सुध्दा दुष्काळी भागाचा विकास मदत म्हणून दिलासा देणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, महिलांना 50 टक्के आरक्षण देणारे देशातील पहिले राज्य हे आपले राज्य ठरले. मला या ठिकाणी मुद्दाम अभिनंदन करावेसे वाटते की, 20 वर्षापूर्वी या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय शरद्चंद्रजी पवार साहेबांनी महिलांना 33 टक्के आरक्षण देऊन या देशामध्ये पहिल्यांदा महिला धोरण या राज्यामध्ये आणले. मी मुद्दाम या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, चार-पाच महिन्यापूर्वी आपल्या विधानमंडळाचे एक शिष्टमंडळ युरोप दौऱ्यावर गेले होते. कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या माध्यमातून हे शिष्टमंडळ युरोप देशांच्या दौऱ्यावर गेले होते. त्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली होती. ज्या वेळेला आम्ही लंडनमध्ये कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या सभागृहामध्ये कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांबरोबर, जनरल सेक्रेटरींबरोबर आमची बैठक झाली त्या वेळी त्या जनरल सेक्रेटरीने आपल्या भाषणात असे नमूद केले की, कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या माध्यमातून या वेळी जगात आम्ही महिलांकडे आणि युवकांकडे लक्ष केंद्रित करणार आहोत. त्यानंतर त्या शिष्टमंडळाचा प्रमुख म्हणून ज्या वेळी कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनमध्ये मला भाषण करण्याची संधी मिळाली त्या वेळी भाषण करताना मी त्यांना सांगितले की, आज आपण जगातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

महिलांच्या विकासाकडे बघत आहात पण माझे राज्य हे पहिले असे राज्य आहे की ज्या राज्यामध्ये आधीच महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे आणि येणाऱ्या निवडणुकांमध्ये आमच्या राज्यामध्ये 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. हे मी ज्या वेळी त्या ठिकाणी सांगितले त्या वेळी त्या ठिकाणी असणारे कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी आणि इतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या राज्याचे अभिनंदन केले. मला खरोखर हे सांगण्यामध्ये अभिमान वाटतो की, जग आता जो विचार करावयास लागले आहे तो विचार आपल्या राज्याने 20 वर्षापूर्वी म्हणजे 1992-93 मध्ये केला आणि पहिल्यांदा महिला धोरण या देशामध्ये आणून महिलांचा मानसन्मान केलेला आहे. आज आपण पाहतो की, जरी 50 टक्के आरक्षण दिले असले तरी 50 टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजे जवळजवळ 60 टक्के पर्यंत आपल्या महिला भगिनींना आरक्षण मिळालेले दिसते.

सभापती महोदय, पंचायती राज संस्थांमध्ये अधिक पारदर्शकता येण्यासाठी संग्राम म्हणजे संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र योजना राबविण्याचे आपण ठरविले, त्याबद्दल मला शासनाचे अभिनंदन करावेसे वाटते. जग आधुनिकतेकडे जात असताना सुध्दा आपले राज्य यामध्ये मागे राहणार नाही. त्याकरिता तंत्रज्ञान माहीत असलेल्या 20 हजार तांत्रिक युवकांची त्या ठिकाणी नेमणूक करुन ई-गव्हर्नंसमध्ये सुध्दा आपण कशा प्रकारे पुढे आहोत हे दाखवून दिलेले आहे. त्याबद्दल मला शासनाचे आणि माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करावयाचे आहे. राज्यात सिंचन क्षमतेचा वापर वाढविण्यासाठी जुलै 2010 ते जून 2011 या सिंचन वर्षात 4 लाख 21 हजार हेक्टर एवढी भरीव वाढ सिंचन क्षेत्रामध्ये आपण केलेली आहे. सिंचन क्षमता वाढविल्यानंतर पीक वाढते, शेतकऱ्यांचे उत्पादन वाढते आणि ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे उत्पादन वाढते त्या राज्याची प्रगती वाढते हे आपण पाहिलेले आहे. म्हणून त्या बाबतीत मी अभिनंदन करीत असताना आणि सिंचन क्षमता वाढवित असताना ग्रामीण दुष्काळी भागाचा विचार होणे सुध्दा अतिशय आवश्यक आहे असे मला वाटते. या राज्यामध्ये कायम दुष्काळी तालुके आहेत. मी ज्या तालुक्यातून येतो तो

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

कवठेमहांकाळ तालुका असेल त्याचप्रमाणे जत, आटपाडी, खानापूर, माण, खटाव, सांगोला, मंगळवेढा असे अनेक तालुके या राज्यामध्ये अजून कायम दुष्काळी आहेत. म्हणून सिंचन क्षमता वाढवित असताना या कायम दुष्काळी तालुक्यांचा सुध्दा विचार व्हावा अशी मला या ठिकाणी सूचना करावीशी वाटते.

सभापती महोदय, जुन्या पाटबंधारे प्रकल्पांची दुरुस्ती, नूतनीकरण आणि पुनर्स्थापणा या केंद्र सरकारच्या कार्यक्रमांतर्गत आपण 135 कोटी रुपयांच्या 258 प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. त्याबद्दल मी अभिनंदन करीत असतानाच आमच्या सांगली जिल्ह्यामध्ये, आमच्या दुष्काळी भागामध्ये ताकारी योजना, म्हैसाळ योजना, टेंभू योजना 25-30 वर्षापासून प्रलंबित आहेत.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

त्यांना सुध्दा जास्तीत जास्त निधी मिळावा अशी आपल्यामार्फत सूचना करु इच्छितो.

राष्ट्रीय ग्रामीण पेय जल योजनेंतर्गत सन 2012-13 व 2013-14 या वर्षामध्ये 1500 वाड्या वस्त्यांचा समावेश केला जाणार आहे. परंतु आजही काही वाड्या वस्त्यांमध्ये 8-8 महिने टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. त्यांचा प्राथम्याने विचार व्हावा. त्यातील बरीचशी गावे आमच्या तालुक्यातील आहेत.

ग्रामीण दलित वस्ती वैयक्तिक नळजोडणी व शौचालय बांधकाम योजना सुरु करुन अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या कुटुंबाला शौचालयासाठी 11 हजार रुपये व घरगुती नळयोजनेसाठी 4 हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. या वर्गातील लोकांचा शासनाने मानसन्मान केलेला आहे. खरोखरच ही देखील अभिमानास्पद बाब आहे. या देशामध्ये पहिल्यांदा या राज्याने अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. शाहू, फुले व आंबेडकरांच्या विचारांचा महाराष्ट्र घडवित असताना त्यांचा योग्य मानसन्मान केलेला आहे. निवडणूक लढवित असताना शासनाने काही अटी घातलेल्या आहेत. त्यांना शौचालये व नळयोजना देत आहोत. मागासवर्गीय बांधवांना निवडणूक लढवित असताना त्याचा उपयोग होईल असे मला वाटते.

निर्मल ग्राम पुरस्कार योजनेबाबत महाराष्ट्र राज्य कायमच अग्रेसर राहिलेले आहे. त्याबाबत सुध्दा मला शासनाचे अभिनंदन करावयाचे आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सन 2007-08 पासून आतापर्यंत 2175 कोटी रुपये मंजूर करुन 155 प्रकल्प शासनाने सुरु केलेले आहेत. याबाबत मला सूचना करावयाची आहे की, आरकेवाय अंतर्गत केंद्र सरकारकडून आपल्याकडे पैसे येतात. पण या पैशाचा विनियोग करीत असताना अधिकाऱ्यांकडून पाठपुरावा केला पाहिजे किंवा प्रतिसाद मिळाला पाहिजे तो योग्यरित्या मिळत नाही. पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी महामंडळाला आदरणीय श्री.शरद पवार साहेबांना विनंती केल्यानंतर त्यांनी मार्च, 2010 मध्ये 10 कोटी रुपये मंजूर केले होते. परंतु शासनाच्या मार्गदर्शक सूचना आल्याशिवाय ते खर्च करावयाचे नाहीत असे सांगण्यात आले आहे. या मार्गदर्शक सूचना डिसेंबर-जानेवारी महिन्यात आल्या होत्या. त्यामुळे हे पैसे मार्चपर्यंत खर्च होऊ शकत नसल्यामुळे 10 कोटीपैकी फक्त 1 कोटी रुपये ठेवून 9 कोटी रुपये परत घेण्यात आले.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या पैशाची मागणी करुनही आम्हाला ते पैसे दिले जात नाही. अशा प्रकारे प्रशासनातील अधिकारी काम करीत आहेत. मी या संदर्भात पशुसंवर्धन खात्याच्या आयुक्तांना अनेकदा विनंती केली आहे. सचिवांना विनंती केली आहे. हे पैसे केंद्र सरकारचे असतानाही राज्य सरकार ते देत नाही. निदान केंद्र सरकारकडून आलेले पैसे तरी आम्हाला वापरण्यास द्यावेत अशी विनंती केली आहे. पण कोणत्याही प्रकारचे आम्हाला सहकार्य मिळत नाही. याबाबत त्यांना सुध्दा योग्य त्या सूचना जाणे आवश्यक आहे असे मला वाटते.

कृषी विकासासाठी शेतकऱ्यांना 1 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याज दराने व 3 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज केवळ 1 टक्का दराने उपलब्ध करुन शेतकऱ्यांना मदत केली जात आहे.

वस्त्रोद्योग क्षेत्रात शासन रोजगार निर्माण करीत आहे. सूत गिरण्यांसाठी शासन 106 कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्जे देत आहे. कापसापासून धागा तयार करणाऱ्या सूत गिरण्यांना शासन मदत करीत आहे. मग लोकरीपासून वस्तू तयार करणाऱ्यांना सुध्दा अशा प्रकारे बिनव्याजी कर्ज देण्याची योजना आखावी अशी विनंती करतो.

माननीय श्री.शरदराव पवार साहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी अनुसूचित जाती व जमातींना निधी दिला आहे. त्याप्रमाणे राज्यातील भटक्या जाती व जमातींना तसेच ओबीसीतील लोकांना राखीव निधी देऊन त्यांच्या विकासासाठी प्रयत्न व्हावेत अशी विनंती करतो.

जगामध्ये औद्योगिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती करणारे भारत व चीन असे दोनच देश आहेत. पण आज पुरोगामी धोरणांच्या उपाययोजना करुन देशातील थेट गुंतवणुकीपैकी एक तृतीयांश गुंतवणुकीला आरक्षित करुन महाराष्ट्र राज्याने देशात पहिला क्रमांक मिळविलेला आहे. म्हणून जगात वेगाने जाणाऱ्या देशात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. हे येथे नमूद केलेले आहे. देशात 25 टक्क्यापेक्षा अधिक निर्यातीचा वाटा राज्याचा आहे. अशा चांगल्या योजना या अभिभाषणात समाविष्ट केलेल्या असल्यामुळे मी राज्यपालांच्या भाषणाचे पुन्हा एकदा समर्थन करतो व त्यांचे अभिनंदन करतो. आपणही मला संधी दिल्याबद्दल मी आपलेही आभार मानून येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 21 मार्च, 2012 रोजी सकाळी 10 ते 10.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या बैठकीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेवर माननीय उप मुख्यमंत्र्यांचे उत्तर होईल. त्यानंतर सकाळी 11 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 15 मिनिटांनी बुधवार, दिनांक 21 मार्च, 2012 रोजीच्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही